कला (द्वितीय वर्ष)
S. Y. B. A.

पत्रकारिता भाग १ व २
(Journalism Part I & II)

डॉ. संजय देशमुख
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. अंबुजा साळगांवकर
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्रभार अभ्यास साहित्य
मुंबई विद्यापीठ, मुंबई

या अभ्यास साहित्याचे इंग्रजी लेखन आणि त्याचे भाषांतर खालील प्राध्यापकांनी केले आहे :

(१) प्रा. विजय एस्. आपटे
मराठी विभाग,
किर्ती महाविद्यालय,
दादर, मुंबई - ४०००२८.

(२) प्रा. सुरेखा घोंड
इंग्रजी विभाग,
सोमय्या महाविद्यालय,
मुंबई - ४०००७७.

कला (द्वितीय वर्ष) S. Y. B. A. पत्रकारिता भाग १ व २

(Journalism Part I & II) सप्टेंबर २०१५

प्रकाशक : **प्रभारी अभ्याससाहित्य**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

अक्षरजुळणी :: **श्री ग्राफिक सेंटर**
२८, मंगल वाडी,
मुंबई - ४०० ००४

मुद्रण :

अनुक्रमणिका

पाठ क्रमांक	पाठाचे शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१.	पत्रकारिता - व्याख्या, स्वरुप आणि व्याप्ती	१
२.	पत्रकारितेची मूलतत्त्वे आचारसंहिता आणि वृत्तपत्रकायदे	६
३.	पत्रकार - गुणवैशिष्ट्ये, कर्तव्ये हक्क आणि जबाबदाऱ्या	१२
४.	वृत्तपत्रस्वातंत्र्य	१८
५.	इ.स. १९४७ पूर्वीची भारतातील पत्रकारिता	
६.	इ.स. १९४७ नंतरची पत्रसृष्टी	२८
७.	वृत्तपत्रांचे संघटन	३६
८.	२१ व्या शतकाचे आव्हान	३९
९.	वृत्त - वृत्तमूल्य, वृत्तसंकलन	४१
१०.	चांगल्या वार्ताहराची वैशिष्ट्ये	४७
११.	वृत्तकथनाचे प्रकार	५१
१२.	लेखन - भाषेचा उपयोग - शैली	५५
१३.	पत्रकारितेची शैली	६२
१४.	विशेषवृत्ते - व्याख्या व प्रकार	६७
१५.	विशेषवृत्तलेखकांना मार्गदर्शन	७१
१६.	लेखनाचे प्रकार	७७
१७.	प्रकल्प लेखन	८२
१८.	वृत्तपत्राचा संपादक	८६
१९.	वृत्तसंपादक व वृत्तसंपादन	८९
२०.	वृत्तसंपादनातील सृजनशीलता	९२
	✡ नमुना प्रश्नपत्रिका क्र. १ ते क्र. ३	
	✡ वाचनासाठी पुस्तकांची यादी	

पाठ क्र. १

पत्रकारिता – व्याख्या, स्वरूप आणि व्याप्ती

उपग्रह, आकाशवाणी आणि दूरदर्शन यांमुळे जगाचे सगळे भाग जोडले गेले आहेत आणि सर्व जग थेट संपर्कामुळे जवळ आले आहे. वृत्तपत्रांची मृत्युघंटा वाजणार असे भविष्य अगदी काही दशकांपूर्वी वर्तविण्यात आले होते, गती आणि विविधता या बाबतीत अनेक वृत्तपत्रांना आणि मासिकांना दूरदर्शनशी स्पर्धा करता येत नव्हती. पण आज पुरेशा संख्येने नियतकालिके वाचकांची सेवा करताना दिसत आहेत.

जग संकोचल्यामुळे वृत्ताची भूक वाढली आहे. जवळच्याच नव्हे तर दूरवरच्या घडामोडी जाणण्याची गोडी वाचकाच्या मनात निर्माण झाली आहे. छपाई माध्यम आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांत वृत्त संकलनाचे आणि सादरीकरणाचे विभाग व घटक तेच राहिले आहेत. वृत्तपत्रांचा वार्ताहर पेन्सिलीच्या साहाय्याने तर आकाशवाणी संवाददाता ध्वनिक्षेपकाच्या साहय्याने आणि दूरदर्शन वार्ताहर कॅमेराच्या मदतीने लोकांना घटनास्थळी घेऊन जातो. दूरदर्शनचा प्रेक्षक उशीरा मध्यरात्री घटना प्रत्यक्ष पाहतो. सकाळी त्याच्या दारात पडणाऱ्या दैनिकात तीच बातमी असते परंतु बातमीच्या प्रथम परिच्छेदातील 'का' आणि 'कसे' या दोन प्रश्नांची उत्तरे देणारा भाग वाचकाचे खरेखुरे समाधान करतो. घटना जणी काही आपण डोळ्यांनी पाहिली आहे असा आभास दूरदर्शन निर्माण करतो; पण तीच घटना दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात वाचली तर त्या बातमीच्या पृष्ठभागाखाली दडलेल्या कितीतरी गोष्टी आपल्याला समजतात. आकाशवाणी आणि दूरदर्शन जे दोनशे शब्दात सांगतात त्या मजकुराला वृत्तपत्रात दहापट जागामिळू शकते.

या अर्थाने आकाशवाणी/दूरदर्शन ही माध्यमे आणि वृत्तपत्रे एकमेकांना पूरक कार्य करतात. एका समालोचकाच्या मते दूरदर्शनमुळे वृत्तपत्रांचा वाचकवर्ग वाढला आहे. वाचकांचा खेळ व अन्य क्षेत्रातील बातम्यात रस वाढला आहे हे एक वरदानच आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वृत्तांमुळे लोकांच्या मनात वृत्त आणि माहितीच्या कुतूहलाला चालना मिळते. अधिक सखोल व सविस्तर माहिती मिळवण्याची जिज्ञासा जागृत होते. वृत्तपत्रे वाचून लोक ही जिज्ञासा तृप्त करून घेतात.

पत्रकारिता म्हणजे काय ?

पत्रकारिता या संज्ञेच्या मागे 'संपर्क साधणे' ही मूळ संकल्पना आहे. भावना, कल्पना, विचार, मते व्यक्त करणे आणि अन्य व्यक्तीला/गटाला हा संदेश स्पष्टपणे व बरोबर समजतो आहे की नाही ते पाहाणे म्हणजे 'संपर्क' होय. दुसऱ्या व्यक्तींना कल्पना संदेश आणि माहिती देणे म्हणजे संपर्क होय.'कम्युनिकेशन्स' या अनेकवचनी शब्दाचा अर्थ 'वाहतूक' असा होतो. पत्रकारितेच्या विद्यार्थ्याचा संबंध एकवचनी शब्दाशी म्हणजेच माहिती वा संदेश पाठविणे या अर्थाशी येतो. संपर्क व्यक्ती-व्यक्तीमध्ये, व्यक्ती समूहामध्ये आणि व्यक्ती आणि लोकांमध्ये असू शकतो. व्यक्ती-व्यक्तीमधील संपर्काचे 'टेलिफोनवरील बोलणे' हे एक उत्तम उदाहरण आहे. याठिकाणी दुसऱ्या बाजूने म्हणजेच ग्राहकाच्या (रिसीव्हर) बाजूने लगेच प्रतिसाद मिळतो. वर्गातील अध्यापन हे समूह वा गट संपर्काचे उदाहरण होय. वृत्तपत्रांतील अग्रलेख, आकाशवाणी व दूरदर्शन व्याख्याने/भाषणे वा बातम्या ही व्यक्तीने साधावयाच्या लोकसंपर्काची उदाहरणे होत. इथे फार मोठ्या संख्येने लोकांशी संपर्क येतो. ग्राहकांची संख्या हजारो, लाखो किंवा अगदी दशलक्षावधीही असू शकते. उदा. आकाशवाणीवरून प्रसारित होणारे पंतप्रधानांचे भाषण. कोट्यावधी जनता त्यांचे भाषण ऐकत असते. वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी व दूरदर्शनवरील ही लोकसंपर्काची माध्यमे म्हणून ओळखली जातात आणि त्यापैकी वृत्तपत्रे हे सर्वात जुने माध्यम आहे. वृत्तपत्रे, पत्रकारिता यांना 'पत्रसृष्टी' असेही म्हटले जाते. छापील शब्दाचे सामर्थ्य 'फोर्थ इस्टेट' या शब्दाचे व्यक्त होते. अन्य तीन शक्ती आहेत. विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायसंस्था.

ज्या लेखनाद्वारे वृत्त आणि वृत्तांवरील मते लोकांपर्यंत पोचतात अशा सर्व लेखनप्रकारांना 'पत्रकारिता' ही संज्ञा वापरतात. वाचकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या कोणत्याही घटना आणि त्यामुळे चालना मिळालेले विचार, कृती आणि कल्पना या दोन्ही प्रकाराच्या गोष्टी पत्रकारितेची मुख्य सामग्री होय.

एरिक हॉडगिन्सच्या मते –

सत्य घटनांचे दर्शन घडविण्यासाठी माहिती अचूकतेने, परिपूर्णतेने आणि त्वरेने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे म्हणजे पत्रकारिता होय. लेस्ली स्टीफन्स म्हणतो– लोकांना माहिती नसलेल्या बाबींवर पैसा घेऊन केलेल्या लेखनाचा समावेश पत्रकारितेत होतो.

स्वातंत्र्याची हमी असेल तरच या दोन्ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकतात.

दैनिक या अर्थाच्या मूळ लॅटिन 'डियुर्नॅलिस' या शब्दांवरून 'जर्नॅलिझम' ही संज्ञा रूढ झाली आहे. आज पत्रकारितेचे क्षेत्र असा शब्दप्रयोग केला जातो आणि त्यात लेखनाची व्यापक क्षेत्रे येतात.

वृत्तमाध्यमे, संपादकीय वा वृत्ताचे संकलन आणि त्याचा प्रसार करण्यासाठी उद्योग व्यवस्थापनाची असलेली एखादी संस्था यांच्या माध्यमातून आज लोकांना हव्या असलेल्या (त्यांचा रस असेल/वाटेल अशा) माहितीचे संकलन आणि संपादन करण्याची कारागिरी म्हणजे पत्रकारिता होय.

लोकांची संपर्क साधण्याचे उद्दिष्ट बाळगणारा लेखक असे पत्रकाराचे वर्णन केले जाते.

'पत्रकारिता' या संज्ञेच्या काही व्याख्या –

(अ) संपर्काची आधुनिक माध्यमे वापरून लोकवार्ता, लोकमत आणि लोकानुरंजन (प्रकट करणाऱ्या माहितीचा) व्यवस्थित आणि विश्वासनीय प्रसार म्हणजे पत्रकारिता होय.

(ब) लिहिण्याच्या क्षणी दिसणाऱ्या घटनांचे संकलन/कथन म्हणजे वृत्त होय. ती काही एखाद्या प्रसंगाचा/घटनेचा वा गोष्टीचा निश्चित असा अभ्यास नसतो.

(क) वृत्ते तसेच त्याविषयीचे दृष्टिकोण यांना प्रसिद्धी देणे म्हणजे पत्रकारिता होय.

'पत्रकारिता' या शब्दाचा मूळ अर्थ, या संज्ञेचा कोशगत अर्थ आणि वर दिलेल्या विविध व्याख्या पत्रसृष्टीचे वृत्तविषयक कार्य ठळकपणे दर्शवितात.

एखादी घटना 'घडणे'आणि त्या घटनेचे 'कथन होणे' या दोन वेगळ्या गोष्टी आहेत एखाद्या घटनेचे वेळेवर केलेले कथन म्हणजे वृत्त होय, असे म्हणूनच म्हटले जाते. म्हणूनच पत्रकारितेची प्रमुख कार्ये – अ) वृत्त देणे, ब) अन्वयार्थ लावणे, क) शिक्षण देणे, ड) लोकमत घडविणे आणि प्रकट करणे इ) ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जाहिराती प्रसिद्ध करणे आणि फ) करमणूक करणे ही होत.

पत्रकार लोकमत प्रकाशझोतात आणतो. 'एन्रॉन पॉवर प्रॉजेक्ट' च्या संदर्भात स्थानिक रहिवाशांचा निषेध लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य पत्रसृष्टीने अलीकडेच केले. राज्य सरकारला या प्रश्नाची गंभीर दखल घ्यावी लागली आणि लोकहित लक्षात प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाला घ्यावा लागला.

पत्रसृष्टी लोकमत घडवूनही शकते. मुख्य घटनांचे स्पष्टीकरण आणि अन्वयार्थ यासाठी संपादकीय पृष्ठ वापरले जाते. लोकमताच्या संदर्भात अग्रलेख, लेख, वाचकांची पत्रे ही सदरे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

इलेक्ट्रॉनिक माध्यमे सरकारच्या अधीन असतात आणि मग पत्रसृष्टीवर मोठी जबाबदारी पडते. 'वॉटरगेट' सारख्या प्रकरणात सरकार उलथून टाकण्याचे काम वृत्तपत्रांनी शक्य करून दाखविले. महाराष्ट्राचे तीन भूतपूर्व मुख्यमंत्री लोकमताच्या दडपणामुळे बदलेले गेले.

लोकमत काय आहे व ते कोठे झुकते आहे हे पत्रकाराने अगत्याने पाहावे लागते. लोकमताच्या चाचण्या, निवडणूक निकाल, इथून, तिथून येणारा अनौपचारिक कानोसा यामुळे लोकमत कोठे व कसे झुकते आहे याबद्दल अंदाज करता येतो.

एखाद्या घटनेचे परिणाम बदल लक्षात घेऊन, साधक बाधक चर्चा करून, अभ्यास करून हेतुतः एका विशिष्ट दृष्टिकोण स्वीकारणे (व्यक्तीने वा समूहाने) म्हणजे लोकमत होय. आणीबाणीच्या काळातील अत्याचारांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे कार्य पत्रसृष्टीने लोकांच्या सहकार्यामुळे केले.

पत्रकारितेचे स्वरूप –

वृत्ताव्यतिरिक्त दृष्टिकोण आणि मते यांनाही वृत्तपत्रात महत्त्वाचे स्थान मिळते. भारतीय पत्रकारितेचे विषय कालानुरूप बदलत राहिले आहेत. राजकीय स्वातंत्र्य आणि समाजसुधारणा हे १९४७ पूर्वीचे मुख्य विषय होते. लोकमान्य टिळकांसारखे

दिग्गज पत्रकारितेच्या क्षेत्रात कृतिशील होते. भारतीय पत्रकारितेतील 'केसरी' हे वृत्तपत्र म्हणजे एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याकाळात 'वृत्तपत्रे' ही 'मतपत्रे' होती. टिळक काय म्हणतात हे उत्सुकतेने जाणण्यासाठी लोक 'केसरी' ची वाट पाहात असत. १९४७ नंतर राष्ट्र उभारणीच्या कार्यात पत्रसृष्टीचे कार्य महत्त्वाचे आहे, असे मानले गेले आणि पत्रसृष्टीचे सामर्थ्य वाढेल याकडे लक्ष देण्यात आले.

पत्रकारिता आणि साहित्य –

'घाईगर्दीत निर्माण झालेले साहित्य' असे मॅथ्यू आर्नोल्ड पत्रकारितेतील लेखनाबद्दल म्हणतो. परंतू हे विधान पारखून घेतले पाहिजे. या व्याख्याने आधुनिक पत्रकाराचे समाधान होणार नाही. वास्तविक पाहता पत्रकारिता आणि साहित्य यांमध्ये रेषा आखणे अत्यंत कठीण आहे. स्वतःचे विचार व अनुभव साहित्यिक लेखनाद्वारे मांडतो, तर पत्रकार समाजाचे मत मांडत असतो. पत्रकाराला सामायिकतेचे भान ठेवावे लागते. साहित्यिकावर असे प्रासंगिकतेचे बंधन (अगदी त्याच्या त्यावेळी लेखन करणे बंधकारक) नसते. मोठ्या विचारवंतांनी पत्रकारिता आणि साहित्यातही योगदान केले आहे. या प्रकारच्या सव्यसाची लेखनाची उदाहरणे महाराष्ट्रातील पत्रकारितेत विपुल आढळतात.

पत्रसृष्टी समाजीची संस्था आहे –

पत्रसृष्टी ही लोकसंपर्काची संस्था आहे. अशी संस्था म्हणून मान्यता मिळवण्यासाठी जो आवाका, जी विविधता व जलदाता असावी लागते की तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पत्रसृष्टीला मिळाली आहे. माहितीप्रसाराच्या शास्त्रातील एक महत्वाची संस्था म्हणून पत्रसृष्टीला स्थान आहे. (वृत्ते आणि मते यांचा प्रसार करण्याचे शास्त्र)

तंत्रज्ञानाच्या वाटचालीमुळे पत्रसृष्टी भरभराटीला आली आहे व तिची जबाबादारी सतत वाढली आहे. काम करताना नैतिकतेचे व कायद्याचे बंधन पत्रसृष्टीला पाळावे लागले आहे. वार्तासंकलनात वस्तुनिष्ठता असावी लागते हे अनुभवाचे शहाणपण पत्रकाराजवळ असावे लागते. पत्रकाराला वृत्ताचे एखादे अंग दर्शविण्याचे वा मत व्यक्त करण्याचे अजिबात स्वातंत्र्य नसते असा याचा अर्थ होत नाही. संपादकीय पृष्ठावर लेखन करताना व लेखनाची पूर्ण जबाबदारी स्वीकारली असेल तर पत्रकार स्वतःचे मत मांडू शकतो. वस्तुनिष्ठता व स्वमतनिष्ठा अशी दुहेरी गरज आपले काम करताना पत्रकाराला मनात वागवावी लागते.

पत्रसृष्टी – खाजगी उद्योग आणि लोकसेवा

या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडते. खाजगी व्यवसाय असल्यामुळे आर्थिक नियमांचा विचार करणे भाग पडते. स्पर्धेमुळे वृत्तपत्रात सतत सुधारणा करीत राहण्याची निकड भासते. 'चौथी शक्ती' म्हणून गणल्या गेलेल्या पत्रसृष्टीच्या सदस्यांपुढे म्हणजेच पत्रकारांपुढे यामुळे गुणवता आणि वृत्तपत्रांचे स्वरूप टिकवून ठेवण्याचे आव्हान उभे राहते.

लोकसेवेचे कार्य अधिक महत्त्वाचे आहे.

आज समाज संमिश्र आणि गुंतागुतीचा झाला आहे. त्यामुळे संपर्कासाठी संस्थांवर अवलंबून राहावे लागते. अन्य माध्यमांच्या तुलनेने पत्रसृष्टी हे माध्यम सर्वात जुने आणि प्रभावी आहे. अधिक खपाचा वृत्तपत्रांनी आणि मासिकांनी त्यांच्या वाचकांना इत्यंभूत माहिती पुरवली पाहिजे. त्यांनी नेतृत्वही केले पाहिजे. घटनांवर टीका करून व्यवस्थेवर अंकुश ठेवला पाहिजे व लोकहिताचे रक्षण केले पाहिजे. हे कार्य करण्यासाठी पत्रसृष्टी दबावापासून स्वतंत्र राहिली पाहिजे. एकदा पत्रसृष्टीने लोकसेवेचे व्रत घेतले की लोकसेवेची जबाबदारी संभाळणे ओघानेच येते.

लोकसंपर्क हे समाजावर प्रभाव पाडणारे उपयुक्त साधन आहे. पत्रसृष्टी स्वतंत्र असेल आणि लोक स्वतंत्र असतील तर लोकसंपर्काचे शास्त्र खऱ्या अर्थाने उपयुक्त आणि विधायक संस्था ठरू शकते. नियंत्रित समाजव्यवस्थेत लोकसंपर्क ही संस्था विघातक ठरू शकते आणि गुलामगिरी निर्माण करण्याची एक मुख्य पद्धती म्हणून उपयोगात आणली जाते.

पत्रकारितेचे क्षेत्र –

पत्रकारिता ही संज्ञा वृत्तपत्रांशी निगडित आहे, पण वृत्तपत्रे हा एक भाग झाल. पत्रकारितेची आणखी क्षेत्रे आहेत आणि संपर्काची गरज भागविण्यासाठी आधुनिक जगात उपग्रहासारखी आणखी माध्यमे उपयोगात आणली जात आहेत. या सर्व क्षेत्रांना मिळून 'पत्रकारितेचे क्षेत्र' अशी संज्ञा आहे.

पत्रकारितेचे पाच प्रकार करता येतात. (१) वृत्तपत्रे (२) मासिके आणि रिव्ह्युज (३) वर्ग, व्यापार आणि

व्यावसायविषयक नियतकालिके (४) वृत्तमासिके आणि मॅगझिन डायस्टस् (५) रेडिओ आणि दूरदर्शन पत्रकारिता.

उपग्रह आणि संगणक संपर्काच्या क्षेत्रात उतरले आहेत आणि त्यामुळे संपर्काची व्याप्ती अपरिमित झाली आहे. वृत्तपत्रे ही मुख्यतः वृत्त देणारी साधने आहेत.

वृत्त हे वृत्तरूपाच्या पद्धतीने मांडले जाते, लिहिले जाते आणि वृत्तमूल्याच्या आणि सामायिकतेच्या प्रमाणात वृत्तपत्रात योग्य त्या जागी छापले जाते. नवीन, विचित्र, रंजक, रस वाटेल अशा आणि महत्त्वाच्या घटनांचे कथन केल्यास ते वृत्त होऊ शकते, आणि महत्वानुसार ते छापले जाते. स्थानिक, राज्यातील, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय असे स्थानानुसार वृत्ताचे प्रकार पडतात. अथवा ही वर्गवारी विषयानुसार करता येते. गुन्हा, वित्त, क्रीडा, समाज, विज्ञान किंवा राजकारण इत्यादी.

मासिके आणि रिव्ह्युज –

यांनी विशिष्ट स्थान पटकावले आहे. ललित, सत्यकथा आणि चर्चा अशा प्रकारचे लेखन यांत प्रसिद्ध होते. मासिकांत लेख, कथा, निबंध, रेखाटने आणि संपादकीय अशा प्रकारचे लेखन त्यांत प्रसिद्ध होते. मासिकांत लेख, कथा, निबंध, रेखाटने आणि संपादकीय अशा प्रकारचे साहित्य असते संपादकीय धोरणानुसार त्यातून विचार, कल्पना, सत्यकथा आणि ललित गद्य या प्रकारचे लेखन प्रसिद्ध होते.

'रिव्ह्यू' हे विशिष्ट प्रकारचे नियतकालिक आहे. संपादकीय दृष्टिकोनातून सर्व विषय त्यात हाताळले जातात आणि ते टीकात्मक स्वरूपाचे असतात. या प्रकारचे लेखन मासिकांच्या स्वरूपात प्रसिद्ध होते. किंवा हल्ली टीकात्मक लेखन 'वृत्तपत्र' प्रसिद्ध केले जाते. कित्येक वृत्तपत्रांत आणि मासिकात विविध प्रकारचे समीक्षा विभाग असतात.

वर्ग, व्यापार व्यावसायविषयक नियतकालिके विशिष्ट गटांच्या गरजा पूर्ण करतात.

व्यक्ती मर्यादित संख्येने असलेल्या विशिष्ट गटांसाठी या नियतकालिकांत मजकुराचे संकलन, संपनादन आणि लेखन केले जाते. या क्षेत्रातील प्रगतीशी संबंधित मजकूर त्यात असतो. या गटातील प्रत्येक प्रकारचे प्रकाशन राष्ट्र, विभाग, राज्य आणि स्थानिक अशा भागात वितरित होते.

वृत्तमासिके आणि मॅगझिन डायजेस्ट यांचे महत्त्व वाढत आहे –

पत्रकारितेच्या कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या विशेषतः राज्यधानीतून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेल्या अतिशय महत्त्वाच्या बातमी योग्य घटनांच्या वृत्तांचा सारांश, त्याचे व्यवस्थीकरण, संक्षेप करून प्रसारित करण्याचे कार्य वृत्तमासिके करतात. वृत्ताचे तिरकस सादरीकरण आणि प्रथम परिच्छेदाचा वापर करून सर्वसामान्य वापरातल्या शब्दांचा उपयोग अशी साधारणतः शैली असते रूपरेषा, वितरणातची पद्धती आणि संपादकीय मार्गदर्शन या बाबतीत मासिके आणि रिव्ह्यू यांच्याशी साम्य असते.

मॅगझिन, डायजेस्ट –

विविध प्रकाशांमधून अतिमहत्त्वाच्या बातम्या आणि लेख विशेषतः लेख संक्षिप्त रूपाने प्रसिद्ध करतात. मासिकातील निवडक लेखांच्या संक्षिप्त लेखसमूहांचा समावेश करणारा हा ठळक उठून दिसणारा (पत्रकारितेचा) विभाग आहे.

आकाशवाणी पत्रकारिता –

छापील पत्रकारितेपेक्षा अनेक प्रकारे वेगळी आहे. वृत्तप्रसारण आणि जाहिरातीतही हे दिसून येते. आकाशवाणी पत्रकारितेचे बरेच प्रकार आहेत त्यापैकी 'समालोचन' हा महत्त्वाचा प्रकार आहे. त्यात दोन प्रकार आहेत.

१) परीक्षणे व २) संपादकीय

विविध संहिता प्रकारांनी समालोचन तयार करता येते. निबंधामुळे प्रसारण सुसूत्र आणि सहज होते. रूपरेषा लवचिक स्वरूपाचा समालोचनाच्या कार्यक्रम प्रसारित करण्यास मदत करते. एखाद्या विषयावरील संहिता सहजता निर्माण करू शकते परंतू त्यात एकात्मता (विविध सहभागी घटकांची) राहात नाही तसेच प्रभावीपणा असत नाही. (फक्त रूपरेषा समोर ठेऊन दोन तीन कलाकारांनी/विचारवंतांनी केलेल्या चर्चेत एक प्रकारचा जिवंतपणा जाणवतो व योग्य संचालन केले गेले तर समालोचनात एकात्मता हा गुण दिसून येतो.)

आकाशवाणीवरील वृत्त 'घटना वृत्तकथन' विविध वृत्तांचा नाट्यपूर्ण आविष्कार, वृत्तप्रसारण, अन्वयार्थप, वृत्तकथन आणि लेखाचे प्रसारण अशी विविध रूपे धारण करू शकते. वृत्तप्रसारणाचे वेगवेगळे प्रकार आहेत. बातमीपत्र, वृत्तकथन, परीक्षण, लोकरूची वार्तापत्रा सारखे लोकांना रस वाटले असे वार्ताविशेष असे अनेक प्रकार संभवतात.

आकाशवाणी पत्रकारितेचे वार्तासंकलन पत्रकारितेचे इतर संस्थाप्रमाणेच केले जाते. आकाशवाणीसाठी लेखन करताना पत्रकारितेची काही विशिष्ट तंत्रे आत्मसात करावी लागतात तसेच 'आकाशवाणी' या माध्यमाचे वेगळेपणही लक्षात घ्यावे लागते. समालोचन, वृत्तप्रसारण, आकाशवाणीवरील जाहिरात असे कोणतेही लेखन करताना संहिता (कॉपी) 'संक्षिप्त, नेमकी आणि कमीतकमी शब्दांची' असावी लागते. ही 'कॉपी' साहजिकच संभाषणात्मक असावी लागते. संपादकाला जशी 'वृत्ताची जाण' असावी लागते तशीच आकाशवाणीवरील वृत्तसंपादकाला 'आकाशवाणी माध्यमाची जाण' असावी लागते.

दूरदर्शन पत्रकारिता प्रमुख संपर्क माध्यम म्हणून पुढे येत आहे. माहिती, अन्वयार्थ, शिक्षण, करमणूक, जाहिराती आणि ग्राहक मार्गदर्शन अशा सर्व विषयांत ते उपयुक्त ठरत आहे.

पत्रकारितेचे हे प्रचंड प्रमाणावरील प्रगत क्षेत्र युवा पदवीधारांना अनेक संधी उपलब्ध करून देत आहे. आणि त्यांच्यापुढे आव्हान ठेवत आहे. पत्रकारितेच्या या सर्व क्षेत्रांना काही जबाबदाऱ्याही आहेत आणि विधायक कार्य करण्याची कितीतरी विविधतापूर्ण संधी त्यात निर्माण झाली आहे. पाचही क्षेत्र वाचक-श्रोते-प्रेक्षक यांना विविध रीतीने आवाहन करीत आहेत. त्यांच्याशी संवाद साधीत आहेत.

विविधांगी क्षमतेच्या लोकांना वृत्तपत्रे आकर्षित करीत आहेत. वृत्तपत्रांच्या वृत्तकक्षांनी आणि संपादन विभागांनी विविध स्वभावाच्या आणि क्षमतेच्या अनेक लोकांना पुढे येण्यासाठी अनुभवाचे पाठबळ दिले आहे.

सृजनशील लेखनाचा (साहित्यिक होण्याचा) मार्ग अनेकदा वृत्तपत्राच्या कामातून सहज शक्य झाला आहे. मान्यवर कादंबरीकार, नाटककार, निबंधकार यांनी शहरातल्या वृत्तकक्षात उमेदवारी केलेली आहे स्वतःचे विचार स्पष्ट व्हावेत यासाठी मासिकांना मोठ्या प्रमाणावर संधी असते आणि त्याचा उपयोग लेखन करून घेऊ शकतो. त्यासाठी लेखनाची सर्व उपलब्ध साधने वापरता येतात. मासिकातील लेख उत्तम लिहिले गेले असतील तर आधुनिक काळातील उत्तम साहित्यात त्यांनी गणना होऊ शकते.

समाधानकारक नोकरी मिळण्यासाठी संयम ठेवावा लागतो. गेल्या काही वर्षात व्यापार किंवा व्यवसाय पत्रकारितेच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. वर्ग, व्यापार आणि व्यावसायविषयक नियतकालिके, जाहिरात, दूरदर्शनचे कार्यक्षेत्र आणि आकाशवाणी पत्रकारिता, यातही नवनवीन संधी येत आहेत. राजधानी मधून प्रसिद्ध होणाऱ्या पत्रकारितेव्यतिरिक्त वृत्तपत्रांचे मोठे क्षेत्र काम करायला खुले आहे. तालुका किंवा लहान शहरात प्रसिद्ध होणाऱ्या आणि पंधरा हजाराच्या आसपास खप असणाऱ्या दैनिकांना 'लहान वृत्तपत्रे' अशी संज्ञा आहे. यात तालुक्यातील साप्ताहिक आणि दैनिक यांचा समावेश होतो. या दोन्ही प्रकारच्या नियतकालिकांचा त्यांच्या वाचकांशी निकटचा संबंध असतो. या वर्तमानपत्रात प्रत्यक्ष अनुभव घेतला तर कोणीही पत्रकाराला त्याचा फायदा होईल. यशस्वीपणे साप्ताहिक चालवणे वा अर्ध साप्ताहिक किंवा लहान गावातील दैनिक चालविणे हाही एक चांगला व्यवसाय आहे आणि समाधान देणारा आहे. स्थानिक बातम्यांना लहान वृत्तपत्रांत कटाक्षाने स्थान दिले पाहिजे. ही वृत्तपत्रे सावकाशपणे अधिक वेळ देऊन वाचली जातात, पूर्णपणे वाचली जातात. त्यामुळे काही व्यक्तींच्या व घटनांच्या बातम्या गाळल्या गेल्या तर ते दीर्घकाळ लक्षात ठेवले जाते. देशातील कोणत्याही भागातील लहान वृत्तपत्रात लायक आमि उत्साही तरूणांना नेहमीच संधी आहे, हे अन्य क्षेत्रांप्रमाणे पत्रकारितेतही आढळून येते. (राजधानीतील वा मोठ्या वृत्तपत्रातील संधी मिळत नाहीत म्हणून हातावर हात धरून बसणे योग्य ठरणार नाही.)

*****

पाठ क्र. २

पत्रकारितेची मूलतत्त्वे

पत्रसृष्टीचे जागतिक सिद्धान्त

पत्रकारितेची मूलतत्वे सर्वसाधारपणे जाणून घेण्यासाठी भारतीय संदर्भात नेमकेपणाने जाणून घेण्यासाठी लहानमोठ्या वृत्तपत्रपद्धती आणि त्यांच्या चाललेल्या कार्याचा विस्तृत परीघ जाणून घ्यावा लागेल आणि विश्वव्यापक अशा दृष्टिकोणातून त्याकडे पाहावे लागेल. या सर्व पद्धतींना विशिष्ट तत्त्वाचे मार्गदर्शन असते आणि त्या तत्त्वांमध्ये कितीतरी फरक असतो. त्या त्या देशांतील पारंपारिक शासनव्यवस्थेशी या वृत्तपत्रपद्धती दृढतेने निगडित झालेल्या असतात. त्यातून मार्गदर्शक कल्पना सिद्ध होतात. पत्रसृष्टीच्या या व्यापक आणि गुंतागुंतीच्या व्यापातून काही ध्येयांवर आधारित पद्धती तयार होतात व वेगळ्या उठून दिसतात.

इ.स. १९५६ मध्ये 'फोर थिअरीज ऑफ द प्रेस' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला माध्यमांच्या जबाबदाऱ्यांची चर्चा त्यात होती आणि ही माध्यमे एका समाजाहून दुसऱ्या समाजात इतकी ठळकपणे भिन्न कशी असतात, ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला. माध्यमे आणि प्रत्येक समाज जो विश्वास ज्या श्रद्धा बाळगीत असतो त्यात जवळतचे नाते आहे. यावर या ग्रंथाचे लेखक फ्रेड एस्. सीबर्ट, थिओडोर पीटरसन आणि विल्बर श्रॅम यांनी भर दिला. मानवतेचे स्वरूप, समाज आणि राज्य यांचे स्वरूप, नागरिकांचो राज्याशी संबंध, ज्ञानाचे आणि सत्याचे स्वरूप याविषयी काही श्रद्धा, विश्वास वा मान्यता समाज बाळगीत असतो. माध्यमांबाबत समाज चार भिन्न प्रकारच्या मान्यता बाळगतो असे या लेखकांना दिसून आले. (१) एकाधिकारशाही (२) साम्यवादी (३) स्वतंत्रतावादी (४) सामाजिक जबाबदारी

वृत्तपत्र स्वातंत्र्य

भारतीय राज्यघटना (अमेरिकेच्या पहिल्या घटनादुरूस्ती प्रमाणे व त्यांना अनुसुरून मिळणारे स्वातंत्र्य) पत्रसृष्टीला कोणतेही विशेष हक्क वा सवलती देत नाही. अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत स्वतंत्रतावादी सिद्धान्त बहुतेक पश्चिम युरोपमध्ये व नंतर अमेरिकेत गेला. अमेरिकेची राज्यघटना लिहिणाऱ्यांवर त्याचा प्रभाव पडला. सरकारने एक चौकट ठेवली पाहिजे. ही अशी चौकट असावी की ज्यात व्यक्तींना त्यांच्या क्षमतांचा विकास करता आला पाहिजे या थॉमस जेफरसनच्या घोषणेत स्वतंत्रासिद्धान्त प्रकट झालेला दिसून येतो. एकटा नागरिक चूक करू शकेल हे जेफरसनला मान्य होते पण नागरिक बहुमताने योग्य निर्णय घेतील यावर त्याचा विश्वास होता. नागरिकांना शिक्षण व माहितीची जी गरज आहे ती मिळण्याचे पत्रसृष्टी हे आवश्यक साधन होय असेही त्यांने म्हटले.

अमेरिकन राज्यघटनेने 'पत्रसृष्टी' असा शब्द फक्त एकदाच वापरला आहे आणि काँग्रेस तिच्या स्वातंत्र्याचा संकोच करू शकत नाही असे जाहीर केले आहे. 'पत्रसृष्टी' या शब्दाची व्याख्या राज्यघटनेने केलेली नाही वा तिच्यावर बंधनेही घातलेली नाहीत. पत्रसृष्टी सरकारला पेचात पकडील अशी भीती राज्यघटना लिहिणाऱ्यांना वाटली नाही. सरकार पत्रसृष्टीचा छळ करील व तिच्यावर नियंत्रण लादणे किंवा तिने स्विकारलेल्या श्रद्धा वा मान्यतांच्या विरूद्ध मजकूर छापयला भाग पाडणे या गोष्टी राज्यघटनेला अपेक्षित नव्हत्या. अशा रितीने स्वतंत्रता सिद्धान्त हा केवळ अमूर्त तत्त्वज्ञान राहिला नाही.

पत्रसृष्टी निकोप वाढ होण्यासाठी जबाबादार पत्रसृष्टी असणे ही एक अट आहे. विसाव्या शतकातील विचारवंतांचे दृष्टिकोण या दृष्टीने आपण समजावून घेतले पाहिजेत. माध्यमे स्वतंत्र असावीत असे विसाव्या शतकातील विचारवंतांना वाटते पण त्याला ते 'माध्यमांना काही जबाबदाऱ्या आहेत', अशी पुस्ती जोडतात. 'स्वातंत्र्याबरोबर अनुषंगिक कर्तव्येही येतात आणि आपल्या सरकारने पत्रसृष्टीला विशेष स्थान दिलेले आहे हे लक्षात घेता काही आवश्यक अशी लोकसंपर्काची कर्तव्ये पार पाडण्यास तिला भाग पाडणे आवश्यक आहे.' असे सामाजिक जबाबदारी सिद्धान्ताचे

प्रमुख प्रतिपादन आहे. अमेरिकेतील 'वृत्तपत्र स्वातंत्र्य' या विषयावरील आयोगाने १९४७ मध्ये अहवाल प्रसिद्ध केला. अहवालाने मुख्यतः वृत्तपत्रांचा विचार केला. पुस्तके, मासिके, चित्रपट, आकाशावाणई व वृत्तपत्रे अशी अमेरिकेतील सर्व माध्यमे आयोगाने अभ्यासिली. वृत्तपत्रांकडून पुढील अपेक्षा प्रकट केल्या.

(१) दैनंदिन घटनांचे अर्थपूर्ण संदर्भात सत्य, विस्तृत आणि अभ्यासू कथन करणे.

(२) मते आणि टीका यांची देवाणघेवाण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे.

(३) समाजातील अंतर्गत गटांचे प्रातिनिधिक चित्र ठळकपणे समोर ठेवणे.

(४) समाजापुढील उद्दिष्टे व मूल्ये यांचे सादरीकरण व स्पष्टीकरण करणे.

(५) दैनंदिन खबरबात संपूर्णपणे पुरविणे.

या अपेक्षा पत्रकारांनी पाळावयाच्या नीतिमूल्यांचा निर्देश करतात. उदा. अचूकता, वस्तुनिष्ठता, विस्तृत वृत्तसंकलन आणि सादरीकरण. (यात विरोधकांनी महत्त्वाची मते समाविष्ट व्हावीत) वृत्तपत्रांची आधीची कामगिरी असमाधानकारक आहे असे आयोगाला वाटले आणि वृत्तपत्रस्वातंत्र्याचा दुरूपयोग झाला तर लोकांचे रक्षण करण्यासाठी नवीन कायदे आवश्यक ठरतील असा इशारा आयोगाने दिला. आयोगाचा १३९ पानी ग्रंथ सामाजिक जबाबादारी सिद्धान्ताचे पहिले सपष्ट निवेदन आहे असे मानले जाते.

पत्रकारांपुढे संदिग्ध, अस्पष्ट उद्दिष्टे ठेवल्याबद्दल अहवालांवर टीका झाली. समाजासाठी उद्दिष्टे आणि मूल्ये निश्चित करण्याचे काम पत्रकार कसे करून शकेल ? सर्व वृत्ते छापणे अश्यक आहे अशी तक्रारही पत्रकारांनी केली. त्यांना निवड करावी लागते. व तारतम्य वापरावे लागते (हेही ध्यानात ठेवले पाहिजे) पत्रकारिता हा खाजगी उद्योग आहे. याकडे आयोगाचे दुर्लक्ष झाले आहे, मनोरंजन हेही कार्य करावे लागते आणि टिकून राहण्यासाठई नफाही मिळवावा लागतो. शासनाच्या नवीन बंधनांना तोंड द्यावे लागेल या धोक्यामुळए मात्र पत्रकार अस्वस्थ झाले.

आयोगावर टीका झाली असली तर 'सामाजिक जबाबदारी' च्या सिद्धान्ताने प्रमुख मुद्दे पत्रकारांनी कालांतराने मान्य केले. लोकांची सेवा करणे ही जबाबादारी पत्रकारांनी उचलली पाहिजे, हे सर्वसाधारण मान्य झाले. माहिती मिळण्याचा लोकांचा हक्क पत्रकारांनी नेहमीच मान्य केला आहे. शासनाचा कारभारावर पहारा ठेवण्याची कामगिरी त्यांनी महत्त्वाची मानली. 'सामाजिक जबाबदारी सिद्धान्ताचा एक भाग आहे.'

विस्कॉन्सिन मधील मिल्वॅन्की येथील मार्क्केट विद्यापीठात केलेल्या भाषणात एव्हान्लवाइल (इंडियाना) येथील पत्राचे व्यवस्थापकीय संपादक विल्यम. आर्. बर्ले यांनी पहिल्या घटना दुरूस्तीतील वृत्तपत्रस्वातंत्र्य विषयक हमीच्या संदर्भातल्या पहिल्या भागावर नेहमी अवास्तव भर देण्यात येत असल्याबद्दल तक्रार केली. 'घटना दुरूस्तीची दुसरी बाजू लक्षात घेऊन वृत्तपत्रस्वातंत्र्याचे महत्त्व जोखले पाहिजे याची निकड फारच थोड्या पत्रकारांना भासते.' (जबाबदारीची निकड जाणणे) दि. बिल ऑफ राइटस् हे विधेयक स्वतंत्र पत्रसृष्टीचा लोकांचा हक्क मान्य करते. प्रकाशक किंवा वार्ताहरांचा हक्क असे हे विधायक म्हणत नाही. हे नीट लक्षात घ्यावे. यापैकी कोणीही विशेष नाही. हक्क आहे तो लोकांचा! या हक्कामुळे वृत्तपत्रांना काही विशेष सवलती मिळतात. त्याचबरोबर आपल्यावर कर्तव्याचे बंधन येते. नागरिकांसाठी उपयुक्त, ठोस आणि विचारांनी परिपूर्ण अशी माहिती गोळा करण्याचे व प्रसिद्ध करण्याचे कर्तव्य ओघानेच येते अशी भर त्यांनी आपल्या विवेचनात घातली.

वृत्तपत्रे ही त्यांच्या काळाची निदर्शक अशी वैशिष्ट्यपूर्ण साधने असतात. ज्या समाजात ती कार्य करीत असतात. त्या समाजाचे वातावरण वृत्तपत्रे स्पष्टपणे दर्शवितात. लोकरूचीच्या अत्यंत संवेदनक्षम आणि व्यापक अशा बाजूंना एकाच वेळी स्पर्श केला जातो. (प्रसिद्धी दिली जाते). सर्वसामान्यांना उत्कंठा वाटेल असे विषय आणि आधिकाऱ्यांनी (लोकांच्या माहितीसाठी) केलेले गौप्यस्फोट छापले जातात. एकमेकांशी निगडित अशा तीन परंपरागत जबाबादाऱ्या पत्रसृष्टी पार पाडते. वृत्तसंकलन व प्रसिद्धी, वृत्ताचा अन्वय लावणे व त्यावर मते देणे, कार्यकारी सत्ता जेथे मनमानीपणाने वापरली जाण्याची शक्यता आहे अशा लोकांशी संबंधित अशा हितसंबंधाचे रक्षण करणे या तीन जबाबदाऱ्या होत.

पत्रसृष्टीच्या स्वातंत्र्याचा पारंपारिक दावा हे साधन जबाबादारी वापरल्यासच करता येणे शक्य आहे. सर्वसामन्य माहिती देणारी, तिची छाननी करणारी आणि तिचे रक्षण करणारी अशी तीन प्रकारची कर्तव्ये संपर्काचे साधन म्हणून पत्रसृष्टीच्या जबाबदारीत समाविष्ट होतात.

स्वायत्तता (संपादकाचे स्वातंत्र्य)

प्रत्येक वृत्तपत्राचे स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व असते. वृतपत्रांची प्रतिमा संपादक मोठ्या काळजीपूर्वक रीतीने तयार करीत असतो. पत्रकारितेच्या निकोप वाढीसाठी म्हणूनच संपादकाचे स्वातंत्र्य हेही अत्यावश्यक ठरते. सत्तारूढ पक्षाशी जवळचे संबंध असलेल्या बिर्ला यांचे हितसंबंध दुखावल्यामुळे 'हिन्दुस्थान टाईम्स' च्या मालकांनी बी.जी. व्हर्गिस यांना संपादकावरूप दूर केले. मोठ्या उद्योगपतींकडून स्वतंत्र पत्रकारितेला असलेले धोके वाढत आहेत. अलीकडे कित्येक उद्योगसमूहांनी वृत्तपत्रे सुरू करण्यात वाढत्या प्रमाणात रस घेतला आहे. वृत्तपत्रांची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होत असलेल्या मुंबई शहरात वृत्तपत्र (स्वतंत्र) उरणार नाही असे संकेत मिळत असल्याचा सर्व प्रकारच्या वावड्या उडत आहेत. (प्रेस ॲट क्रॉसरोडस् इन इंडिया–प्रस्तावना लेखक – के. आर सुंदरराजन) बी.जी. व्हर्गिस यांच्या संपादकीय वागणुकीहद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या विचारात बिर्ला असतानाच व्हर्गिस यांना प्रतिष्ठित स्वरूपाचा मॅगसेसे पुरस्कार (१९७५) मिळाला. ही लक्षणीय बाब ठरली. ऐतिहासिक परिप्रेक्ष्य आणि विषयाचे सखोल ज्ञान याबद्दलच्या प्रशस्तिपत्रात पुढील उल्लेख केला. 'अन्य कोठेही पत्रकारिता करीत असलेल्या आपल्या सहकाऱ्यांच्या तुलनेत या वरील निकषांवर उतरणारी पत्रकारिता एखाद्या असिधारा वृत्ताप्रमाणे व्हर्गिस यांनी केली.' पत्रसृष्टीची भरभराट होण्यासाठी स्वातंत्र्य, जबाबदारी यांच्या बरोबरीने संपादन स्वातंत्र्याची (स्वायत्ततेची) गरज आहे.

पत्रसृष्टीची स्वतंत्रता व स्वायत्तता या संकल्पनांवर व्हार्गेस केसच्या उच्च न्यायालयामध्ये निकालाने प्रकाशझोत टाकला. संपादकाबद्दल पुढील विधान केले – संपादकाचा आवाज हा वृत्तपत्रात अखेरचा शब्द असतो आणि वृत्तपत्रातून तो बोलत असतो. (संपादकीयातून त्याचा बुलंद आवाज प्रकट होतो.) वृत्तपत्राचे महत्त्व त्याच्या मजकुरात दडलेले असते. या मजकुराची निवड करण्याची जबाबादारी संपादकावर एकट्यावर असते. (अन्य कुणाला त्यात वाटेकरी होता येत नाही)

न्यूयार्क टाईम्स चे अध्यक्ष व प्रकाशक ऑर्थर हेज् सुल्झबर्गर १९४९ मध्ये वृतपत्रसंपादकांच्या (अमेरिकन) सभेपुढे म्हणाले – ''लोकांचा स्वतःचा पाठिंबा ज्या प्रमाणात राहिल त्या प्रमाणात अचूक, संपूर्ण आणि वस्तुनिष्ठ वृताची अपेक्षा करण्याचा त्यांना हक्क आहे. वृत्तपत्र स्वातंत्र हा त्यांचा मूलभूत हक्क पर्यायाने अत्यंत कमी लोकांच्या हातात जात असल्याने लोकांना हा हक्क (जबाबदार नागरिक या नात्याने) प्राप्त होतो. याबाबातीत एखाद्या समाजाची या हक्कांची मागणी व स्वीकृती अयशस्वी ठरली तर पत्रसृष्टीला आणि वृत्तपत्रस्वातंत्र्याला त्याचे परिणाम भोगावे लागतात. समाधानकारक खप असलेल्या वृत्तपत्राने प्रत्येक प्रश्नावरील वृत्ताच्या सर्व बाजू आपल्या वाचकांपुढे ठेवल्या पाहिजेत, हे मी वृत्तपत्रांचे कर्तव्य मानतो आणि असे न झाल्यास त्यांना अपयश आले असे होईल. वृत्ताच्या सर्व बाजू सांगण्यात आणि वस्तुनिष्ठ वृत्त देण्याच्या निकषाशिवाय अन्य कोणत्याही निकषांवर वृत्तांचे सादरीकरण आधारित असू नये. घटनाधिष्ठित माहिती काटेकोरपणे मिळवणे अवघट असते याची दखल घेऊनही आपण तशी माहिती मिळवण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. अन्वयार्थ आणि मत प्रतिपादन यातीन अंतर आपण नेहमी ओळखले पाहिजे आणि आपल्या वृत्तपृष्ठावर मतप्रतिपादन करणे कटाक्षाने टाळले पाहिजे.'' नीतिसंहिता तयार करण्यात पत्रकारांनी वेळोवेळी रस घेतला आहे. तशी गरज नेहमीच वाटत आली आहे. पत्रकारांच्या नाखुशीला अनेक कारणे आहेत. आपत्काळ आणि आपत्कालीन परिस्थीतत त्यांचा स्वातंत्र्य टिकवून ठेवायचे आहे. न्यायाधीन मार्गदर्शक तत्त्वांचे कायद्यात रूपांतर करतील अशी त्यांना भीती वाटते आणि म्हणूनच के स्वनिर्धारति व्यावसायिक तत्त्वांचे पालन करण्याचा पर्याय निवडतात.

नीतिसंहिता आवश्यक आहे – दर्जेदार वृत्तपत्र किंवा मासिकातील नवख्या पत्रकाराला नीतिसंहितेची ओळख करून दिली जाते. या नीतिनियमांचे उल्लेघन न करणे पत्रकाराच्या हिताचे असते. पत्रकारितेच्या मूलतत्त्वाचे उत्तम विवेचन अमेरिकन सोसायटी ऑफ न्यूजपेपर एडिटर्स या संस्थेने १९२३ मध्ये एका नीतिसंहितेद्वारे केले आणि त्या संहितेचे पालन सर्वसाधारणपणे संपूर्ण देशात केले जाते. नियम पुढील प्रमाणे आहेत. १) जबाबदारी २) वृत्तपत्रस्वातंत्र्य ३) संपादकाचे स्वातंत्र्य ४) सचोरी, सत्यता, अचूकता ५) निःपक्षपातीपणा ६) योग्य वर्तणूक ७) सभ्यता, अनेक वर्षे लोकांच्या दबावापासून मुक्त असलेले ऐच्छिक नीतिनियम वापरात होते. संपादकाची कर्तव्ये या नियमांनी सांगितली. लेखक तर्कशुद्ध विचार करू शकतात, बुद्धीचा वापर करू शकतात, त्यांनी निखळ घटना शक्य तितक्या समतोलपणे देऊन त्या घटनांचे निष्कर्ष त्यांना काढून दिले पाहिजेत, हा विचार या नीतिनियमांमधीन व्यक्त झाला. माध्यमांनी सुमारे दहाबारा तरी नीतिसंहिता आचरणात आणल्या आहेत, पण त्यातील काहींचाच या माध्यमांच्या कामगिरीवर परिणाम झाला. या सर्व प्रचलित नीतिसंहिता ऐच्छिक आहेत, लादलेल्या नाहीत. वृत्तपत्र नीतिसंहिताप्रमाणे चित्रपट नीतिसंहिता, आकाशवाणी–आचार संहिता, करमणूकप्रधान पुस्तकांसाठी नीतिसंहिता अशा विविध नीतिसंहिता प्रचलित आहेत.

पत्रकारांची नीतिसंहिता –

व्यवसायिक पत्रकारांच्या 'सिग्मा डेल्टा ची' या सोसायटीने तिच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत १९७३ मध्ये एक नवीन ऐच्छिक नीतिसंहिता स्वीकारली. पत्रकाराने सत्य शोधले पाहिजे आणि त्याच्यावर हुशारीने, वस्तुनिष्ठतेने, अचूकतेने व योग्य रीतीने कामगिरीपार पाडण्याची जबाबदारी आहे, असे या नीतिसंहितेने जाहीर केले. त्यांनी कोणतीही मौल्यवान वस्तू घेता कामा नये. भेटवस्तू आणि मेहरबानी यांच्यामुळे त्यांच्या सचोटीवर प्रतिकूल परिणाम होतो. ''अखेर पत्रकार ज्या प्रमाणात एक नीतिमान, विचारी व्यक्ती आहे त्या प्रमाणात तो नीतियुक्त वागले'' अशा तक्रारयुक्त प्रतिक्रिया पत्रकारांनी व्यक्त केली.

समस्या आणि मर्यादा लक्षात घेऊनही नीतिसंहिता नसण्यापेक्षा त्या असणे ही निःसंशय स्वीकार्य बाब आहे. आपल्या जबाबादाऱ्यांचा विचार करणे आणि लोकांमध्ये त्या मान्य करणे हे पत्रकारांवरचे बंधन नीतिसंहितांमुळे अस्तित्त्वात येते आणि उद्दिष्टे साधण्यासाठी प्रवासाची आखणी करणेही त्यामुळे शक्य होते.

पत्रकारांच्या नीतिसंहितेची मूलतत्वे–

पहिल्या वृत्तपत्र आयोगाने नीतिसंहितेत पुढील तत्त्वे समाविष्ट केली.

(१) पतसृष्टी हे लोकमत घडविण्याचे प्राथमिक माधन असल्यामुळे त्यांनी विश्वासाची भूमिका घेऊन लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण केले पाहिजे आणि सेवा करण्यास सिद्ध असले पाहिजे.

(२) मूलभूत मानवी हक्क आणि सामाजिक हक्क यांची बूज राखून पत्रकार स्वतःची कर्तव्ये करील आणि सद्भावना बाळगून योग्य तऱ्हेने वृत्त देईल, मतेही समतोलपणे मांडील आणि या व्यावसायिक उत्तरदायित्वाचे स्मरण ठेवील.

(३) वृत्त आणि घटना यांचे प्रामाणिकपणे संकलन व मुद्रण (प्रसिद्धी) या बाबतीतले स्वातंत्र्य आणि वाजवी वा योग्य तऱ्हेने वृत्त देईल, मतेही समतोलपणे मांडील आणि या व्यावसायिक उत्तरदायित्वाचे स्मरण ठेवील.

(४) तणाव निर्माण करून हिंसाचार धडकविणारे एखादे मत मांडताना पत्रकाराने योग्य तो संयम दाखवला पाहिजे.

(५) प्रसारित होणारी बातमी घटनांचे अचूक वर्णन करणारी असावी याची निश्चिती करण्यासाठी पत्रकार झटत असतो. कोणतीही घटना चुकीची सांगितली जाता कामा नये. महत्त्वाच्या घटना दाबून टाकता कामा नयेत. चुकीची माहिती किंवा विश्वासनीय नसलेली माहिती प्रसिद्ध करू नये.

(६) सर्व माहिती व मते जबाबादारीने मांडली आहेत असे गृहीत धरले पाहिजे. वृत्तास वा मतास संपादक जबाबदार नसतील तर तसे स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

(७) दुजोरा न मिळालेले वृत्त ओळखून वेगळे ठेवले पाहिजे.

(८) गोप्तनीयता नेहमी महत्त्वाची मानली जाते आणि गुप्तता ठेवली जाते. वृत्तपत्रमंडळापुढे येणारे प्रश्न आणि कोर्टाचे कामकाज यांच्याद्वारा मिळणारी माहिती जाहीर करणे कायद्याचा भंग ठरत नाही.

(९) कर्तव्ये पार पाडीत असताना पत्रकार व्यक्तिगत हितसंबंधाचा त्यावर परिणाम होऊ देत नाही.

(१०) कोणतेही वृत्त चुकीचे होते असे नंतर आढळल्यास ते वृत्त आणि त्यावरील मतप्रदर्शन दुरुस्त केले पाहिजे. चुकीचे वा चुकीचा तपशील असलेला मजकूर असलेले वृत्त त्यावरील दुरुस्ती अथवा मतभिन्नता छापून वृत्तपत्राने आपल्या कामातील गफलत दूर करावी, असे बंधन त्यांच्यावर आहे.

(११) वृत्तसंकलनाच्या आणि प्रसारणाच्या कामात असलेल्या तसेच त्यावर मतप्रदर्शन करणाऱ्या सर्व पत्रकारांनी स्वतःच्या कामातील सचोटी व तिची प्रतिष्ठा याबाबतीत लोकांचा विश्वास टिकवून ठेवावा. सचोटी आणि प्रतिष्ठा यांची जपणूक होईल अशीच कामे नेमून दिला जातात व स्वीकारली जातात. आपल्या पदामुळे अन्य सामाजिक घटक शोषण करणार नाहीत याबाबतीत पत्रकाराने जागरूक राहिले पाहिजे.

(१२) वृत्ताला प्रसिद्धी देणे वा नाकारणे यासाठी कोणत्याही लाच वा कोणतीही भेट मागणे वा स्वीकारणे यासारखी दुसरी अयोग्य गोष्ट नाही.

(१३) लोकांचा कोणताही प्रश्न निगडित नाही असे व्यक्तिगत मतभेद मांडणे हे पत्रकारितेला न शोभणारे आणि व्यवसायाची प्रतिष्ठा कलंकित करणारे आहे.

(१४) लोकांच्या खाजगी जीवनावर विपरीत परिणाम होईल असे अफवा किंवा वावड्या अशा स्वरूपाचे वृत्त देण्याचा परिपाठ असणे हे व्यवसायाला काळिमा आणते, व्यक्तींवर परिणाम होऊ शकेल अशी खात्रीशीर बातमीही लोकांचे हित गुंतलेले नसल्यास छापू नये.

(१५) नालस्ती करणे आणि बिनबुडाचे आरोप करणे हा गंभीर व्यावसायिक गुन्हा आहे.

(१६) ग्रंथचौर्य वा वाङ्मयचौर्य हा देखील गंभीर गुन्हा आहे.

(१७) वृत्त वा छायाचित्रे मिळवताना बातमीदारांनी व छायाचित्रकारांनी निर्दोष, निरागस तसेचे पीडित लोकांना दुःख पोचेल असे काही करता कामा नये.

वृत्तपत्रांशी संबंधित असलेले कायदे

जीवनाच्या अन्य कोणत्याही संस्थांप्रमाणे कायद्याचा पत्रकारितेवर परिणाम होतो. कायद्याच्या आधारे वृत्तपत्र स्वातंत्र्य टिकून राहते.

पत्रकारांच्या कायद्यांमध्ये 'बदनामीकारक लेखन करणे' या विषयीचा कायदा आधारभूत स्वरूपाचा आहे. प्रकाशकांना 'बदनामी' विषयक कायद्याचा सर्वात मोठा धाक पडतो. व्यक्तीची बदनामी केल्यास नियतकालिकांकडून मर्यादांचे उल्लंघन पडते आणि त्याच्याविरुद्ध दिवाणी व फौजदारी दावा होऊ शकतो.

व्यक्तीची प्रतिष्ठा कलंकित करून ती लोकनिंदा, अपमान वा थट्टा यांचा विषय व्हावी या हेतूने छापील स्वरूपात, चिन्हांनी, आकृत्यांनी, व्यंगचित्रे व चित्रे यांच्या मदतीने मत्सरग्रस्त मजकूर प्रसिद्ध करणे असा 'बदनामी करणे' या शब्दाचा अर्थ आहे.

देशातील नागरिकांना वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या दुरुपयोगापासून संरक्षण मिळावे यासाठी बदनामीविषयक कायदे तयार केले गेलं. पुरावा असल्यास पत्रकार स्वतःचा बचाव करू शकतो. पत्रकाराने त्याची सूत्रे (वृत्त मिळण्याची ठिकाणे) अचूकपणे दिली पाहिजेत. व्यक्तींच्या कृती दाखविणारे सरळसोट शब्द वापरण्याच्या ऐवजी पत्रकाराने जपून शब्द वापरावेत. उदाहरणार्थ, 'कथित', 'संशयित', दोषारोष, 'आरोप' याप्रकारे संदिग्ध शब्द वापरावेत. (स्पष्ट शब्द वापरून बदनामी करण्याबद्दलच्या खटल्यात सापडू नये यासाठी ही सावधगिरी बाळगावी.)

कोर्टाच्या आदेशांचे व तत्क्षम बाबींचे हेतूपूर्वक उल्लंघन करणे, न्यायाच्या अंमलबजावणीत हस्तक्षेप करणारे लेखन करणे वा न्यायाधीशाने दिलेल्या आदेशाला कमी लेखणे वा गुन्ह्यांच्या संदर्भात कोर्टाच्या बेअदवीचा कायदा (१९७१) आदेश देतो. न्यायाधीशांच्या सचोरी आणि क्षमतेबद्दल पत्रकाराने मतप्रदर्शन केल्यास किंवा एखाद्या 'इनकॅमेरा' (न्यायमूर्तींच्या खाजगी कक्षात होणाऱ्या) सुनावणीचे वृत्त पत्रकाराने दिल्यास ती कोर्टाची बेअदबी ठरते.

लोकसभेची बेअदबी–

पत्रकाराची मते सर्वदूर पसरत असल्याने अन्य नागरिकांच्या तुलनेने मते प्रदर्शित करताना पत्रकारांना अधिक काळजी घ्यावी लागते. लोकसभेच्या कामकाजीवर टीका किंवा लोकसभेच्या सदनात काम करणाऱ्या सदस्यावर व्यक्तिगत स्वरूपाचे हल्ले यांचा समावेश तो मतप्रदर्शनात करू शकत नाही. पत्रकारांची भाषा अर्वाच्य असली किंवा त्याची मते योग्य व समर्थनीय नसली तर ती टीका हक्कभंग करणारी आणि पार्लमेंटची बेअदबी करणारी ठरते.

फिरोझ गांधी कायदा –

पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहात होणाऱ्या कामकाजाचे पुरेसे खरे वृत्त छापण्यास पत्रकाराला अटकाव नाही आणि कोणीह असे वृत्त छापल्यास त्याच्याविरूद्ध कोणताही दिवाणी वा फौजदारी खटला दाखल होऊ शकणार नाही अशी तरतूद पार्लमेंटरी प्रोसिडिंग्ज (प्रोटेक्शन ॲन्ड पब्लिकेशन) ॲक्ट १९५० प्रमाणे करण्यात आली आहे. आणीबाणीत हा कायदा रद्द करण्यात आला आणि नंतर पुन्हा अस्तित्वात आला. हक्कभंगाचा आरोप येऊ न देता पार्लमेंटमधील बदनामीकारक विधाने कथन करण्याची परवानगी पत्रसृष्टीला आहे. मात्र हा कायदा फक्त लोकसभेच्या कामकाजाला लागू आहे, विधानसभेला नाही.

सरकारची गोपनीय कागदपत्रे किंवा छायाचित्रे वा रेखाटने वा प्रतिकृती मिळविणे, गोळा करणे, ध्वनिमुद्रित करणे वा प्रसिद्ध करणे 'ऑफिशियल सिक्रेटस् ॲक्ट, १९२३' च्या अनुसार निषिद्ध आहे. गोपनीय कागदपत्रांच्या बाबतीतली

आतल्या गोटातील बातमी भारतीय पत्रकारांना प्रसिद्ध करण्यासा मज्जाव करणारा हा कायदा आहे.

वृत्तपत्रमालकीची पद्धती, कोर्टाची बेअदबी, लोकसभेचे विशेष हक्क आणि ऑफिशियल सिक्रेटस् ॲक्ट हे भारतीय वृत्त स्वातंत्र्यावर प्रमुख निर्बंध आहेत. ऑफिशियल सिक्रेटस् ॲक्ट, १९२३ दोन प्रकारच्या गुन्ह्यांची दखल घेतो.

(अ) टेहळणी करणे आणि (ब) गोपनीय माहिती गैर संपर्क प्रक्रियेद्वारा फोडणे लोकहित जपणाऱ्या प्रसिद्धीला आणि सत्तेवर असणाऱ्या पक्षाच्या हितसंबंधाच्या विरोधात असलेला माहितीला ऑफिशिय सिक्रेट ॲक्टचा विभाग ५ वा प्रतिबंध करतो. म्हणूनच या कायद्याची अंमलबजावणी नियंत्रित करणे आणि ज्यांना गौप्यस्फोटांपासून संरक्षण मिळावे अशा माहितीच्या प्रकारांची निश्चिती करणे आवश्यक आहे.

ओ.एस्.ए. पाचवा विभाग रद्द करण्याच्या मागणी पाठोपाठ दुसऱ्या वृत्तपत्र आयोगाने आपल्या १९८२ मध्ये सादर केलेल्या अहवालात हा विभाग रद्द करण्याची शिफारस केली. परंतू सरकारने ही शिफारस मे, १९८३ मध्ये नाकारली.

लोकसभेला असलेले विशेष हक्क ही पत्रकारांच्या चिंतेची आणखी एक बाब आहे. सभासदाने दिलेल्या भाषणाच्या वृत्ताचे विपर्यस्त रूप न करता पत्रकाराला वृत्त वृत्तपत्राच्या गरजांनुसार संपादित करण्याचा हक्क असतो हे लोकसभेचे काही हळवे सदस्य मान्य करीत नाहीत आणि लोकसभा वार्ताहरांचा नाहक छळ केला जातो. लोकसभा समितीचे अहवाल प्रतिकूल वाटल्यास सभापती सत्तारूढ पक्षाच्या संगनमताने त्या अहवालाची प्रसिद्धी रोखून ठेवतात.

नागरिकांचे खाजगी हक्क –

सर्वोच्च न्यायालायने निवृत्त न्यायाधीश श्री. के.के. मॅथ्यू यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या तिसऱ्या वृत्तपत्रआयोगाने खाजगी हक्कांच्या संदर्भात कायदा करण्याची शिफारस केली. शोधपत्रकारितेच्या संदर्भात नेहमीच एक प्रश्न उपस्थित केला जातो. हे कथन 'सनसनाटी' म्हणायचे की 'वृत्त' म्हणायचे ? खाजगी जीवनाचा प्रश्न सामान्य नागरिकाला भेडसावीत नाहीय वार्ताहरांना ती भीती नेहमीच त्रास देते. वृत्त मग ते कथन असो, छायाचित्र वा व्यंगचित्र असो सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी त्याकडे योग्य दृष्टीने पाहिले नाही तर अनर्थ ओढावतो. वृत्तपत्रे गोप्यस्फोटांवर जगत असल्याने कोणताही खाजगी हक्कांचा कायदा पत्रकाराच्या हक्काची पायमल्ली तर करीत नाही ना हे अगत्याने पाहिले पाहिजे. अशी एक अपेक्षा असते, पण आता पत्रकार हाच विशेष लाभ मिळवणारा वर्ग होऊ पाहात आहे. सामान्यांच्या कल्याणापेक्षा त्यांना आरोप आणि लागेबांधे अधिक प्रिय ठरू लागले आहेत. स्वतःच्या जबाबदारीचे आन्यपरीक्षण करण्याची भारतीय पत्रकारांवर वेळ येऊन ठेपली आहे. वृत्तपत्राच्या मालकांनी 'वृत्तपत्रे चालविणे' या एका हितसंबंधाशिवाय इतर हितसंबंधात रस घेऊ नये हा एक वृत्तपत्र स्वातंत्रय टिकवण्याचा मार्ग होय. 'हिन्दु' भारत, 'ते मोन्ड' (फ्रान्स), काही अमेरिकन, ब्रिटीश व बहुतेक स्कॅन्डिनेव्हियन वृत्तपत्रे यांच्याबाबतीत ही स्थिती आढळून येते. सहकारी तत्त्वावर वृत्तपत्र चालविण्याचे प्रयत्न भारतात अयशस्वी ठरले आहेत.

*****

पाठ क्र. ३
पत्रकार आणि त्यांची गुणवैशिष्ट्ये, कर्तव्ये, हक्क आणि जबाबदाऱ्या

पत्रकार ही उपयोजित कला आहे तसेच तो एक उद्योग व्यवसायही आहे. पत्रकार 'व्यवसाय' हा शब्द वापरायचा टाळतात आणि त्यांच्या कामाला एक प्रकारची प्रतिष्ठा आहे असे मानतात. अत्यंत अनुभवी पत्रकाराच्या तयारीत चारित्र्य, उपजत क्षमता, अर्जित तांत्रिक कौशल्य आणि उदारमतवाती शिक्षण यांचा समावेश होतो. त्याच्या कामात जबाबदारीने वागणे आवश्यक असेत आणि त्या कामाची सामाजिक उपयुक्तता मोठी असते. त्याची कार्ये तो समाधानकारक रीतीने करीत असेल तर अत्यंत आदराने त्याच्याकडे पाहिले जाते. पत्रकारिता या शब्दाने सामान्य माणसांच्या दृष्टीने वृत्तपत्रांशी साहचर्य आहे. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांला मात्र पत्रकारितेचे विविध पैलू ठाऊक असायला हवेत.

पुरेशी तयारी आवश्यक आहे–

पत्रकाराला माहितीचा अनेकविध प्रकारचा साठा वापरावा लागतो. महत्वपूर्ण आणि तातडीने करावयाच्या कामासाठी तो सज्ज असतो आणि आपली उद्दिष्टे अधिकाधिक साध्य होतील या साठी उत्साहाने काम सुरू करण्याच्या तयारीत तो असावा लागतो. (त्याला राहावे लागते). पत्रकारितेच्या काही विशिष्ट जबाबदाऱ्या आहेत आणि विधायक कार्य करण्याची पुरेपूर संधी त्याला असते.

पत्रकाराची गुणवैशिष्ट्ये

कामाचे भरगच्च वेळापत्रक पूर्ण करता यावे यासाठी त्याला शारीरिक स्वास्थ जपावे लागते आणि दिवसरात्र काम करण्याची तयारी व क्षमता निर्माण करावी लागते. पत्रकाराचे काम कष्टाचे असते आणि त्याला शारीरिक व मानसिक तंणावाखाली काम करावे लागते, वक्तशीरपणा व नियमितपणा असावा लागतो; कारण त्याला ठराविक वेळाच्या मर्यादेत राहून काम करारे लागते. पत्रकाराच्या दैनंदिन कामात सामयिकतेला फार महत्त्व असते.

पत्रकाराचे काही एक औपचारिक स्वरूपाचे शिक्षण झालेले असावे लागते. कोणत्याही ज्ञानशाखेचा पदवीधर असेल तर त्याचा प्राधान्याचे विचार होतो. पत्रकाराची स्थिती – 'एक ना धड भाराभर चिंध्या'– अशी असेत, पूर्वी एक समज होता. पण आज स्पर्धेच्या युगात पत्रकारितेकडे पाहण्याचा दृष्टिंकोण बदलला आहे. हे 'प्रावीण्य संपादन करण्याचे' युग आहे आणि एखाद्या विषयातील क्षमता आणि कौशल्य संपादन करणे व त्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवणे आज आवश्यक झाले आहे. उदा. लोकसभेच्या दोन्ही सभागृहांचा अनुभव घेऊन त्यात प्रावीण्य संपादन केलेल्या पत्रकारावर लोकसभेच्या कामकाजाचे वृत्तसंकलन करण्याचे काम सोपवले जाते. मातृभाषे इतकेच राष्ट्रभाषेचेही ज्ञान त्याला असावे लागते. इंग्रजावर तर प्रभुत्व तर हवेच ! रशियन, फ्रेंच, जर्मन, अरबी यासारखी एखादी परदेशी भाषा येत असली तर अधिक चांगले!

संपादकीय विभाग वृत्तविभाग यांपैकी एका विभागात काम करण्याची निवड पत्रकार करतो; परंतू त्याला टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक यांचे ज्ञान असावे लागते.

अत्यंत कमी वेळात भाषांतर करण्याची क्षमता असावी. कायद्याचे ज्ञान अधिक पात्रता मानली जाते. अथकपणे काम करण्याची तयारी हाच एकमेव मुख्य मुद्दा आहे.

वेगवेगळ्या वर्गातील लोकांशी पत्रकाराला जमवून घेता आले पाहिजे. जीवनातल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील सर्व लोकांला समवेत मिळून मिसळून राहता आले पाहिजे.

विचित्र आणि कठीण परिस्थितील शांत राहण्याचा गुण पत्रकाराने अंगी वाणवला पाहिजे. इतरांची मते त्याने ऐकून घेतली पाहिजेत. (यात त्याचे विरोधकही येतात) आणि जे ऐकले वा पाहिले ते कोणत्याही एकाचे पक्षपाती न होता प्रामाणिकपणे कथन केले पाहिजे. स्वतःच्या विश्वासावर ठाम राहण्याचे धैर्य पत्रकाराजवळ पाहिजे. स्वतःच्या कर्तृत्वावर

विश्वास पाहिजे. बातमीचे सुत्र आणि बातमी यांना चिकटून राहणयाचे तसेच वृत्ताचा तळ गाठण्याची चिकाटी त्याने दाखवली पाहिजे. पत्रकाराजवळ चांगले सामान्य ज्ञान असले पाहिजे.

अनुभव–

नियकालिकासाठी ठराविक वेळ मर्यादेच्या आत लिहिण्याचा अनुभव तुम्हाला कोणत्याही अभ्यासक्रमात घ्यावा लागेल. स्वतः एखादी गोष्ट करून त्याद्वारे तुम्ही शिकत असता या म्हणण्यात तथ्य आहे. उमेदवारांना दोन संधी (प्रयोगशाळा) सहज प्राप्त होतात. (एक परिसरातील दैनिक व दोन) विशिष्ट समूहात प्रसिध्द होणारी दैनिके. वर्गातील तास आणि प्रत्यक्ष अनुभव यांना जोडणारा एक सहज उपलब्ध असा दुवा म्हणजे विद्यार्थ्यांची वृत्तपत्रे होत. शहरातील 'कन्युनिटी' वृत्तपत्रे वा उपनगरांतील 'कम्युनिटी वृत्तपत्रे' पत्रकारितेच्या संस्थांशी बहुधा सहकार्य करतात.

'बदनामी करणे' ही पत्रकारितेत एक गंभीर चूक मानली जाते. विद्यापीठातील दैनिकात अशी एखादी चूक खपून जाते. या चुकीचे व्यावसायिक जगात म्हणजेच पत्रसृष्टीत गंभीर परिणाम भोगावे लागतात, हे सांगण्याची गरज नाही.

तुम्हाला टंकलेखनाचे महत्त्व समजते हा महाविद्यालयातील पत्रकारितेच्या अनुभवाचा उघड फायदा आहे.

संगणकाच्या पध्दती सुधारित स्वरूपात पुढे येत आहेत आणि त्यांची मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण होत आहे अशा परिस्थितीत एखाद्या वृत्तपत्राच्या संगणक व्यवस्थेचे ज्ञान मिळवण्याचा मार्ग 'तिथला प्रत्यक्ष अनुभव ' हाच शिल्लक राहतो. वृत्तपत्रात प्रशिक्षण देणारा वर्ग नसेल तर तेथील ज्येष्ठ पत्रकाराकडून 'की बोर्ड' व अन्य मूलभूत माहिती मिळवता येते. एका प्रशिक्षणार्थी पत्रकाराने पुढील मार्मिक अनुभव सांगितला आहे. व्ही. डी. टी. (व्हिडिओ डिस्प्ले टर्मिनल) या वापर मला कुणीही शिकवला नाही. बहुतेक वेळा मी स्वतः शिकलो, समस्या निर्माण झाल्या तेव्हा मी अनेक शंका विचारल्या. चुकतमाकत शिकलो. व्ही. डी. टी चा वापर करताना भय, निराशा आणि प्रंचड दबाव यांना मला सामोरे जावे लागले.

पत्रकारितेकडे पाहण्याचा दृष्टिकोण

पुढील परिच्छेद पत्रकाराची कर्तव्ये कोणती आहेत, यावर प्रकाश टाकतो. पत्रकाराची त्याच्या कामाकडे पाहण्याची दृष्टी काय असते हेही त्यावरून स्पष्ट होते.

''भ्रष्ट राष्ट्राध्यक्षांना पदात्याग करावा लागेल यासाठी किंवा चुकीचे आरोपपत्र दाखल झालेल्या व्यक्तांच्या मुक्ततेसाठी आपल्यापैकी बहुतेक जणांनी काही मदत केली असण्याची शक्यता नाही. परंतु कायदे बदलून घेणे, निर्णयांवर परिणाम घडवणे (राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे निर्णय). संस्थाना सदोष उत्पादने परत घ्यायला भाग पाडणे या गोष्टी आपण केल्या असतील. ऐतिहासिक वास्तूचे जतन व्हावे किंवा गरजू कुटंबांना साहाय्य व्हावे यासाठी अनेकांनी वृत्तलेखन केले असेल.

वृत्तपत्रातील बातम्या लोकांचे जीवन बदलून टाकतात. आणि म्हणून बातम्या लिहिणे मला आवडते. धरणीकंप घडविणाऱ्या बातम्या मुळातच कमी असतात. काही वेळा वाचकाला बरे वाटते व त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलते, हा परिणामही काही कमी नाही. पत्रकारितेबद्दलची मला अगदी शंभर नंबरी वाटणारी गोष्ट अशी आहे, की एका बाजूला तुम्ही लोकोपयोगी काम तर करतात पण त्याच वेळी तुम्ही सुवर्णयुगाच्या काळ (तसा आनंद) अनुभवता. तुम्ही लक्षावधी भूमिका निभावता. पोलीस अधिकारी, अग्निशमन अधिकारी, वकील, राजकीय दूत, शिंपाईगाडी अशा विविध भूमिका असतात, आणि एकदा वृत्तलिहून झाले की तुम्ही पुन्हा आणखी कोणतीतरी भूमिका करायला मोकळे होता. काही अत्यंत नाट्यपूर्ण घटना स्थळी जाण्यबद्दल तुम्हाला पगार मिळतो.

राणीचा राज्याभिषेक, राष्ट्राध्यक्षांनी केलेले उद्रघाटन, महापौरांच्या शपथविधी (या त्या नाट्यपूर्ण घटना होत.) अर्थातच काही भयावह कामे– उदाहरण विमान कोसळणे, खून अशा घटना स्थळीही जावे लागते. काही वार्ताहक त्यांचे सर्व आयुष्य एका गावात घालवतात, काही जगभर शोध घेत राहतात.

वृत्तपत्राचे उत्तम वार्ताहर कोणत्याही गोष्टीवर लिहू शकतात. वस्तुस्थितीवर आधारित आणि कुरकुरीत असे लेखन ते करु शकतात आणि पहाटेच्या दवाप्रमाणे हळुवारपणेही लिहू शकतात.''

'न्यूयॉर्क टाइम्स' चा वार्ताहर जोसेफ वी ट्रेजलर याने लिहिलेल्या या परिच्छेदात वार्ताहराची काही कर्तव्ये सांगितली आहेत पण त्याचे हे प्रतिपादन संपादन विभागातील अन्य पत्रकारांनाही लागू पडते.

प्रशिक्षण आवश्यक आहे–

लिहिण्यकडे थोडाफार कल असलेली व्यक्ती पत्रकारितेत सहज उडी घेऊ शकेल अशा हा व्यवसाय नाही.

प्रथमोपचाराची आवड असणाऱ्याने एकदम वैद्यकीय व्यवसायात पदार्पण करण्याचे धाडस करावे असा काहीसा हा प्रकार झाला. माहिती तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे अशा काळात पत्रकारितेत अधिक गांभीर्य आणि स्पर्धा शिरली आहे आणि विविध कौशल्यांचे प्रशिक्षाण घेतल्यास नवीन पत्रकाराला या क्षेत्रात त्याचा फायदा होऊ शकतो.

दैनिकाची वा साप्ताहिकाची पत्रकारिता करू पाहणाऱ्या उमेदवाराला महाविद्यालयीन प्रशिक्षणाचा अभाव असेल तर ते त्याला अडचणीत आणू शकेल. अमेरिकेत या प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. पदवी पत्रकारिता अभ्यासक्रम असणारी महाविद्यालचे भारतात आहेत. परंतु व्यवस्थित प्रशिक्षण मिळते ही आजही एक महत्त्वाची गरज या व्यवसायात आढळून येते. 'टाइम्स ऑफ इंडिया' यासारख्या वृत्तपत्रांची सुसंज्ज लायब्ररी आहे, त्यात संदर्भ विभागही आहे. परंतु अन्य वृत्तपत्रांमधून पत्रकारितेचे प्रशिक्षण अजूनही सुरू व्हायचे आहे.

पत्रकारितेचे प्रशिक्षण ही तशी अलीकडे आलेली कल्पना आहे. कायदा किंवा वैद्यक क्षेत्रात काम करण्यासाठी ज्या प्रमाणे निश्चित अशी पात्रता किंवा कायद्याने निश्चित केलेले नियम असतात, तसे पत्रकारिता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांवर वा हा व्यवसाय निवडणाऱ्याच्यांवर पात्रता वा नियम यांचे बंधन नसते. बागकामासारख्या एखाद्या विषयात पदवी वा पदविका अभ्यासक्रम समजू शकतो पण एखादी शिक्षणसंस्था खुसखुशीत शैलीत, सयुक्तिकपणे आणि मनोंरजक कसे लिहावे हे कसे काय शिकवू शंकेल? पत्रसृष्टीशी संबंधित लोकांच्या मनात पत्रकारितेच्या प्रशिक्षणाची कल्पना १९२० च्या सुमारासं उदयाला येई. पर्यंत पश्चिमेकडे असा दृढ समज होता की पत्रकार घडवता येत नाही तर तो जन्मावा लागतो.

१९२० मध्ये पत्रकारिते च्या प्रशिक्षणांची कल्पना डॉ. ॲनी बेझंड यांनी भारतात प्रथम मांडली. थिऑसॉफिकल सोसायटींच्या आश्रयाखाली मद्रास येथे अडयार मधील नॅशनल विद्यापीठाची स्थापना केली. कला, शास्त्र आणि वाणिज्य शाखा विध्यापीठात होत्या आणि इंग्रजी विभागाचा एक भाग म्हणून पत्रकारिता हा अधिक विषय कला शाखेत अधिक सुरू करण्यात आला, सन्मान्य कवी रवींद्रनाथ टागोर या विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ. जेम्स, एच. कझिन्स पत्रकारिता विभागाचे प्रमुख होते.

पत्रकारितेचा इतिहास, वृत्तपत्र कायदे, संपादकीय कार्य आणि वृत्तपत्र-प्रशासन हे विषय शिकवले जात. एन. एस्. रामाराव, यदुनाथ सरकार, शेंषगिरी राव आणि सी. एस्. त्रिलोकेकर आणि परांज्रपे हे शिक्षक अनुभवी पत्रकार आणि वकील होते. सर्व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षण मिळेल अशी दक्षता डॉ. बेझंट यांनी घेतली. हा पत्रकारिता अभ्यासक्रम ५ वर्ष चालला. २५ पदवीधरांनी अभ्यासक्रम पूर्ण केली. एस्. सदानंद रे फ्रीप्रेस जर्नल चे संस्थापक आणि संपादक होते. त्यांचा प्रशिक्षणावर भर होता. स्वतंत्र आणि निर्भीड पत्रकारितेचे प्रशिक्षण अनेक ज्येष्ठ पत्रकारांना त्यांनी दिले, हिन्दु चे संपादक आणि गांधींचे कट्टर समर्थक कस्तुरी श्री निवासन यांनी १९३९ मध्ये प्रशिक्षणाच्या कल्पनेला भरघोसपणे साहाय्या केले. 'हिन्हु' च्या संपादन विभागात प्रत्येक वर्षी पत्रकारिता प्रक्षिशणासाठी विद्यार्थी घेतले जात असते. भारतीय विद्यापीठीतील विद्यार्थ्यांनाच संधी दिली जात असे. वृत्तपत्रांत पत्रकारांची नेमणूक करतान शैक्षणिक आणि पत्रकारिता विषयक चांगली तयारी असलेचे उमेदवार घेणे महत्त्वाचे आहे, यावर ब्रिटिश रॉयल कमिनशनने भर दिला. पत्रकारितेच्या व्यवसायात भरती करताना चांगली शैक्षणिक तयारी असावी यावर वृत्तपत्र आयोग आणि लहान वृत्तपत्रविषयक आयोगाने विशेष भर दिला. योग्य शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य वृत्तपत्र मंडळा कडे म्हणूनच सोपवले गेले असावे.

पजकारांचे हक्क

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा अतिशय महत्त्वाचा मूलभूत मानवी हक्क आहे. पत्रकार देखील हा हक्क बजावतो. भारतीय नागरिकापेक्षा अमेरिकेतील नागरिकाला हा हक्क अधिक दिला जातो. सामान्य माणसाला सहज न मिळणाऱ्या माहिती पर्यंत जाणे पत्रकाराला शक्य होते. त्याच्या कामाच्या या स्वरूपामुळे हा हक्क त्याला मिळतो. (माहिती मिळवण्याचा हक्क) म्हणून त्याला काही विशेष सवलती/लाभ मिळतात.

१) नियमित वृत्तसूत्रांवर पत्रकार सर्वस्वी विसंबून रहात नाही. तो घटना स्थळी जातो, लोकांना भेटतो व घटनेचे प्रत्यक्ष वर्णन मिळवतो. म्हणून त्याला वृत्तसूत्रापर्यंत जाण्याची मोकळीक असली पाहिजे. काही वेळा पत्रकार तेच वृत्तसूत्र पुन्हा पुन्हा वापरतो. ही प्रवृती असता कामा नये.

२) आगाऊ परवानगी व निर्बंध यांच्या शिवाय बातमी प्रसिध्द करण्याची हक्क त्याला असतो. अनुभवी पत्रकार

त्याच्या जबाबदारी बद्दल जागरुक असतो. वृत्तपत्राचे संपादकीय धोरणही त्याला चांगले ठाऊक असते.

३) सूड बुध्दीने वागवले जाईल वा अटक होईल या भीती पासून अभय असून वृत्त प्रसिध्द करण्याचा हक्क पत्रकाराला आहे. निर्भय वृत्त कथनामुळे वार्ताहराला सरकार, राजकीय पक्ष आणि खाजगी संस्थाकडून धमक्याही दिल्या जातात. असमर्थनीय स्वरुपाची अटक वा सक्तीने छापील मजकूर हस्तगत करणे हे घडता कामा नये. अर्थात वृत्तपत्रविषयक कायदे पत्रकाराने पाळले पाहिजेत.

४) छपाईच्या कागद व अन्य साहित्य नियमित मिळाले नाही कर वृत्तपत्रे काम करु शकणारे नाहीत वृत्तपत्रांचे स्वांतत्र्य नियंत्रित करण्यासाठी या साहित्याचा पुरवठा खंडित करण्याचा एक उपाय बहुधा अधिकारशाही राज्यांकडून अंमलात आणला जातो.

५) कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप न होता पत्रकाराला माहिती प्रसगरित करण्याचा अधिकार आहे. अमेरिकेच्या राज्याघटनेत सरकारपासून व्यक्तींचे रक्षण करणारे हक्कविषयक विधेयक समाविष्ट करण्यात आले आहे. दि. युनायटेड नेशन्सने (युनो) माहिती मिळण्याचे स्वातंत्र्य हा एक मानवी हक्क मानला आहे. या स्वातंत्र्यामुळे समाज प्रगती करू शकतो आणि लोककल्याण साधू शकतो.

पत्रसृष्टीच्या जबाबदाऱ्या

काही विशेष लाभांबरोबरच पत्रकारावर काही विशिष्ट जबाबदारी सोपवली जाते. विविध आयोगाने याबाबत काम करुन काही जबाबदाऱ्या नेमून दिल्या आहेत.

१) दैनंदिन घटनांचे सविस्तर आणि चाणाक्ष स्वरूपाचे कथन अर्थपुर्ण संदर्भात करणे'' हे पत्रकारितेचे मुख्य कर्तव्य आहे. वृत्त निःपक्षपातीपणे गोळा करणे व ते सविस्तर देणे या कर्तव्याचाच एक भाग आहे.

२) माध्यमांचे शैक्षणिक कार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. मते आणि टीका यांची देवाणघेवाणा करण्याचे पत्रकारिता हे एक व्यासपीठ आहे. विकसनशील देशात काही प्रश्नांना माध्यमांमध्ये अग्रक्रम दिला जातो. समाजातील दुर्बल घटकांवर होणारे अत्याचार, बालमजुरी, ग्रामीण विकास, शेतीतील आधुनिकीकरण, कुटुंब कल्याण, साक्षरता मोहिमा, भ्रष्टाचार, हुंडा या अनिष्ट सामजिक गोष्टींबद्दल जागरुकता निर्माण करणारे कार्यक्रम यांना माध्यमात वृत्त आणि संपादकीय मजकुरात स्थान मिळते.

'टाइम्स ऑफ इंडिया' हि हिन्दु' या सारखी राष्ट्रीय वृत्तपत्रांची गुणवत्ता दाखवीत आहेत आणि स्वतःचा दर्जा उंचावून माध्यमांच्या जागतिक नकाशावर स्थान मिळवण्याचे प्रयत्न करीत आहेत.

३) समाजाच्या घटकांचे प्रातिनिधिक चित्र उभे करण्याचे एक महत्त्वाचे कार्य माध्यमे आणि पत्रसृष्टी करतात. विभिन्न वंश, धर्म आणि संस्कृतीचे लोक भारतात आहेत. समाजाच्या या प्रत्येक घटकाला योग्य ती प्रसिध्दी देण्याची पत्रसृष्टीकडून अपेक्षा असते. शहरी लोकांचे प्रश्नच केवळ न देता वृत्तापत्रांनी ग्रामीण व आदिवासी जमातीच्या लोकांचे प्रश्नही दिले पाहिजेत. दैनिके आपल्या 'डाक आवृतीत' स्थानिक बातम्यांना जागा देताना अशी एका प्रवृत्ती दिसून येते. 'टाइम्स ऑफ इंडिया' आणि 'इंडियन एक्सप्रेस' या सारख्या आघाडीच्या वृत्तपत्रांनी आठवड्यातून एक दिवस आपल्या दैनिकाची 'पुणे' व 'नाशिक आवृत्ती काढायला हल्ली प्रारंभ केला आहे.

अल्पसंख्याक गटांच्या संदर्भात भारतीय वृत्तपत्रांना नेहमीच प्रश्न पडतो. अल्पसंस्थाकांना नेहमीच आपण दुर्लक्षित आणि असुरक्षित आहोत असे वाटते. भारतीय वृत्तपत्रांनी सर्वसाधारणपणे वृत्त देताना समतोल राखला आहे. विशेषतः 'टाइम्स ऑफ इंडिया' ने संपादकीय आणि वृत्त विभागात अल्पसंख्यांच्या भावनांना प्रसिध्दी दिली आहे.

४) माध्यमांची भूमिका काय असावी या बाबतच्या एक प्रकारच्या तात्त्विक पातळीवरील चर्चेसह माध्यमांचा देशाच्या सांस्कृतिक जीवनावर कोणता परिणाम होतो याची गंभीरपणे चर्चा होते. कुटुंब, शाळा, चर्च

आणि जमात हे घटक समाजची सांसकृतिक पातळी माध्यमांपेक्षा अधिक ठरवतात, असे मत मांडले जाते. माध्यमे प्रश्न पुढे मांडताना निवड करीत नाहीत आणि त्यांच्या कार्यक्रमांच्या प्रतिसादांबद्दलही जबाबदारी घेत नाहीत. असे मतही मांडले जाते. प्रसिध्दीचे वलय, साहक आणि प्रणय यांनी युक्त अशा दूरदर्शन संस्कृतीचा तरुण पिढीवर खोलवर परिणाम होतो. चित्रपट मासिके खोऱ्याने पैसा ओढतात आणि मुलांचे साहित्य त्या तुलनेत कमी प्रमाणात खपते. कामुकतेला आवाहन करणारे जाहिरातीचे विश्व नेहमीच आढळते. अलीकडे माध्यमांवर दाखवली गेलेली बुटांची जाहिरात त्यामुळेच वादग्रस्त ठरली. उच्च सांस्कृतिक मूल्य काही वेळा दाखवली जातात पण हा प्रयत्न तोकडा ठरतो. त्यामुळे योग्य-अयोग्य यातील फरक करणे लोकांना अशक्य होऊन बसते.

वॉल्टर लिपमन यांनी 'वृत्त' आणि 'सत्य' यामधील फरक दाखवून दिला आहे. क्रिकेटमधील धावसंख्या किंवा निवडणूक निकाल अशा काही मर्यादित विषयांवरील बातम्यांच्या बाबतीत 'वृत्त' आणि 'सत्य' या गोष्टी एकमेकांशी जुळतात. परंतु आधुनिक पत्रकारितेने नवीन परिणाम दिले आहे. सत्ताधारी लोकांपासून सत्य दडवून ठेवतात आणि आधुनिक पत्रकारिता ते सत्य शोधून काढण्याचा प्रयत्न करते. चुकीच्या मार्गानी दडवून ठेवलेले सत्य पत्रकारिता लोकांपुढे प्रकट करते. हे सखोल वृत्तकथनाचे (वृत्तविश्लेषणाचे) आणि शोध पत्रकारितेचे क्षेत्र आहे. पण वृत्ताची अशी कित्येक क्षेत्रे आहेत की जेथे सत्य शोधण्याचा प्रयत्नांना स्वाभाविकपणे मर्यादा पडतात. म्हणून या मर्यादा लक्षात घ्यायला पाहिजेत. पत्रकारिता हा काही सत्याचा घेतला जाणारा शोध नव्हे, असे म्हटले गेले आहे. पत्रकारिता हा सापेक्ष सत्याचा. शोध घेण्याचा प्रयत्न राहिला पाहिजे आणि अशा शोधामुळे आपण माहिती मिळवू शकतो आणि जगात शहाणेसुरते ठरतो. जाणता येऊ शकेत अशा माहितीचा अथकपणे घेतलेला तो एक शोध असतो. जे मीहीत होणे शक्यच नाही, त्यात व्यर्थ श्रम करीत राहणे याला पत्रकारिता म्हणता येणार नाही. आपण सामाजिक दोष दूर करु शकणारे व्यावसायिक अधिकारपदस्य आहोत हा भ्रम दूर केला पाहिजे, गोष्टी दुरुस्त करण्याचा कायद्याचा अधिकार आपल्याला नाही (पोलास यंत्रणा, न्यायालये) हे पत्रकाराने ओळखून काम केले पाहिजे. माहितीचे संकलन व वितरण हे त्यांचे काम आहे, ते काही इतिहाससंशोधक नव्हेत. पत्रकार तणावाखाली काम करीत असतात आणि जे काही शक्य आहे ते वृत्त मिळवतात आणि पध्दतशीरपणे लोकांपुढे सादर करतात. हे करताना त्यांना वेळेचे पुरते भान ठेवावे लागते. वृत्तपत्रे आणि आकाशवाणी या माध्यमांवरील काम पूर्ण करण्याची वेळ मर्यादा (डेडलाइन) त्यांना सांभाळावी लागते.

उपलब्ध असलेल्या वेळात शक्य तेवढी जास्तीत जास्त माहिती गोळा करणे व सादर करणे हे पत्रकाराचे आद्यकर्तव्य आहे. आपण काळजीपूर्वक तयार करीत असलेली बातमी अचूकही असणार आहे पण तरीही त्याने शोधलेली व लिहिलेली बातमी अपूर्ण आहे व 'कॉपी' लिहून छापायला दिल्यानंतरच्या मधल्या काळात घडणाऱ्या घटनांनी छापलेले वृत्त हे अपुरे ठरु शकते, याचती जाणीव पत्रकाराला असायली हवी. अतिशय उत्तम तयार केलेली बातमी देखील प्रसिध्दीनंतरच्या एखाद्या दिवसभरात शिळी आणि कालबाह्य ठरू शकते. दुरदर्शनकडे घटना प्रत्यक्ष दाखवण्याची क्षमता असुनही त्या माध्यमाला संपूर्ण वृत्त अनेकता मिळू शकत नाही. कॅमेरा टिपू शकेल इतकीच किंवा प्रसारणाचे उपलब्ध क्षण बातमीची पूर्णता किंवा अपूर्णता ठरवीत असतात. असे असूनही वाचकाला, श्रोत्याल किंवा प्रेक्षकाला आजूबाजूच्या बातम्या त्वरेने देण्याचा सतत प्रयत्न करणे. हे काम पत्रकार आणि माध्यमातील कलाकार करीत असतात.

वृत्तपत्रांची तसेच आकाशावाणी आणि दुरदर्शन केंद्रांनी आपल्या विभागातील नागरिकांना सल्लागार मंडळावर काम पाहण्यासाठी विचारले आहे. नियमित कालावधीनंतर भेटून या माध्यमांच्या कामगिरीबद्दल मते मांडणे हे काम सल्लगार मंडळाकडे असते. अमेरिकेतील सल्लागार मंडळांबद्दल फ्रेड फ्रेडलर याने त्याच्या 'मास् मिडिया' या पुस्तकात उल्लेख केला आहे. रोज होणाऱ्या संपादकीय परिसंवादाद्वारा बी. बी. सी. च्या वृत्तकक्षात नियंत्रणा रोजच्या रोज ठेवले जाते. या परिसंवादांना 'सकाळच्या सभा' असे म्हटले जाते. रेडिओ आणि दूरदर्शन असे दोन वृत्तविभाग असल्याने सभांचा विभागीय पातळीवर नियंत्रण ठेवण्याचे साधन म्हणून उपयोग होते. हे विभाग रेडिओ सर्किटस् द्वारा जोडले गेलेले असतात. त्यांच्या साहाय्याने एकमेकांच्या प्रश्नांवर परस्परांत चर्चा होते.

(संदर्भ- हियर इज द् न्यूज-रंगास्वामी पार्थसारथी- पृ. ५५,७७)

स्वतःच्या व्यवसायाबद्दल उल्हास वाटत नाही असा पत्रकार विरळा! काही सेवाशर्ती नाराची निर्माण करणाऱ्या

असू शकतात. उदा. बाबा आदमच्या जमान्यापासून चालत आलेले कमी वेतन, गतानुगतिक संपादक –जे तुम्ही मागच्याच आठवड्यात लिहिलेल्या नेत्रदीपक बातम्या सहजपणे विसरतात. परंतु निराशेचे हे मेघ अनेकता काही संस्मरणीय बातम्यांमुळे चंदेरी रेषेने उजळतात – पंत्रसृष्टीचा दबदबा, वाय् लाइन्सचे वैभव आणि स्वतःला प्रथम वृत्त कळले यातील रोमहर्षकता.

(इन्ट्र द् न्यूज रुम – लिओनार्ड रे टील, रॉन टेलर पृ.११)

हॉस्पिटल्स आणि पोलिस खाते यांच्या प्रमाणेच सुट्टी न मिळता दैनिक, वृत्तपत्रे यांना रोज छपाईचे काम करावे लागते. तेव्हा हॉस्पिटल कर्मचारी आणि पोलिस अधिकाऱ्यांप्रमाणे पत्रकारांना निरनिराळ्या पाळ्यांमध्ये (शिफ्टस्) काम करावे लागते. या शिफ्टस्च्या अध्येमध्येही वार्ताहर, संपादक यांना डॉक्टरांप्रमाणे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास घरून बोलावले जाते.

*****

पाठ क्र. ४
वृत्तपत्र स्वातंत्र्य

जागताल राष्ट्रे मोठ्या प्रमाणावर एकमेकांशी संबंध प्रस्थापित करीत आहेत. संपर्क साधीत आहेत आणि त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडतो आहे. लोकसंपर्काच्या माध्यमांची संख्या व क्षमता वाढते आहे आणि जागतिक पातळीवरील संपर्काच्या देवघेवील त्यांचा मोठ्या प्रमाणावर हातभार लागतो आहे. युनेस्कोसारख्या जगप्रसिंध्द संस्था चर्चासत्रे, परिसंवाद, परिषदा आयोजित कुन पत्रकारिता आणि संपर्क यांच्याशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांवर आणि प्रश्नांवर तोडणे काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'वैश्विका लोगसंपर्क', 'आंतरराष्ट्रीय पत्रकार', 'लोकसंपर्क – प्रेषक' असे शब्द वापरून या प्रयत्नांचा निर्देश आपण करतो. विश्व पातळीवर दिसून येणाऱ्या पत्रकारितेचे समग्र दर्शक घडविण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचा अभ्यास करण्यास येतो आणि जागतिक पातळीवरील समस्यांचे सैध्दान्तिक विवेचन केले जाते. तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी जी नवी वृत्तयंत्रणा बांधली आहे. (New world information order) तिच्यापुढे असलेल्या जागतिक पातळीवरील संपर्कविषयक समस्यांची चर्चा अशा अभ्यासाद्वारा केली जाते. संदर्भ 'ग्लोबल जरनॅलिझम्' जॉन. सी. मेरिल पृ. २. महत्त्वपूर्ण माहिती पुरविण्याची जबरदस्त शक्ती जागतिक पत्रसृष्टीत आज आढळून येते. वृत्त आणि त्याचा अन्वयार्थ जगभर प्रसारित करण्याची भौतिक साधने अत्यंत प्रगत झाली असल्यामुळे लोकांना वृत्ताचे नीटपणे आकलन करुन देणाऱ्या भरपूर बातम्या प्रचंड संख्येने देण्याची क्षमता त्यांच्यात आज निर्माण झाली आहे. एका बाजूने बातम्यांचा ओघ प्रचंड प्रमाणावर आणि जलदगतीने होऊ लागला आहे, तर दुसऱ्या बाजूने बातम्यांचा परिणाम, महत्त्व, समतोल, सत्य आणि हेतू या संदर्भातील प्रश्न पृष्ठभागावर आले आहेत. जगभरातील बऱ्याचशा देशांत पुरेसा वृत्तप्रसार होत असल्याचे दृश्य वंरवर दिसत असले तरी सरकारचा दबाव, गोपनीयता, नियंत्रण आणि प्रचार हे घटक बातम्यांचा मुक्तपणे प्रसार होण्याच्या कामात बाधा आणतात.

पत्रसृष्टीशी विसंवाद निर्माण झाला की सरकारे अति संवदनशील आणि सावध होतात आणि वृत्तकथनाचे स्पष्ट वक्ते आणि खुल्या वातावरणाचे जग बंधनात सापडते; प्रामाणिक आणि पारदर्शक संवाद अधिकच कठीण होतो. जगभर योग्य निर्णय व्हावेत यासाठी माहितीचे पाठबळ असलेले लोकमत आवश्यक आहे. म्हणूनच समतोल वृत्त आणि मते यांचा मुक्त प्रसार लोकमत परिपुष्ट करण्याच्या कामी उपयोग झाला पाहिजे.

राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवर सत्यतापूर्ण आणि निर्बधरहित पत्रसृष्टी लोकांची अधिक चांगली सेवा करू शकते. पाश्चिमात देशातील स्वातंत्र्यवादी भुमिका घेणाऱ्यांनी हा दृष्टिकोण घेतला आहे. अशी स्वतंत्र पत्रसृष्टी राष्ट्राराष्ट्रातील, वर्गावर्गातील आणि गटागटातील मतभेट मिटविण्याची मजल मारील. युध्दपिपासू नेते आणि राज्यकर्ते बेत हाणून पाडील.

एकाधिकारशाही सिध्दान्त –

पंधराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत पश्चिम युरोपवर एकाधिकार सत्ता असणाऱ्या राज्यांचे वर्चस्व होते आणि त्यांच्या राज्यपध्दतींचा पत्रसृष्टीवर लक्षणीय प्रभाव पडला होता. एकाधिकारशाही राजवटीत शांतता आणि सुव्यवस्था, सुरक्षा आणि प्रगती – संस्कृतीची प्रगती यांना व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जात होते. आणि त्यामुळे राज्यातील नागरिकांना राज्याची सेवा करावी लागत असे. सोळाव्या शतकातील इंग्लंडमध्ये एकाधिकारशाही अवतरली. 'हुकूमशहा' प्रकारच्या एकाधिकारशाहीमध्ये सरकारच्या प्रचार यंत्रणेत सहभागी होणाऱ्या पत्रसृष्टीला एकाधिकारशारी सिध्दान्त मान्य करणारी पत्रसृष्टी असे म्हटले जाते.

एकाधिकारशहांना मुद्रण हा आपल्या सत्तेला असलेला मोठा धोका वाटला आणि त्यांनी मुद्रणालयांचा उपयोग नियंत्रिण करण्यासाठी कायदे (परवाने) जारी केले. राज्याच्या उद्दिष्टांना पाठिंबा देणाऱ्या मोजक्याच लोकांना परवाने दिले गेले. सरकारवर टीका करणाऱ्या, नेत्यांवर वा धोरणांवर टीका करणाऱ्या लेखकांना व प्रकाशकांना राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगात पाठवले जात असे.

नाझी जर्मनीच्या काळात एकाधिकापध्दतीची पत्रसृष्टी होती. द. अमेरिकेच्या कित्येक देशातही अशा प्रकारची पत्रसृशष्टी होती. आशियातील अविकसित देश, आफ्रिका आणि मध्यपूर्वेतील देशांत या प्रकारची पत्रसृष्टी आढळते.

साम्यवादी सिध्दान्त–

चालू शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात या सिध्दान्ताने मूळ धरले. साम्यवादी विचारप्रणाली टिकवणे व वाढवणे या मुख्य कार्यातून वृत्तपत्राच्या कार्याचा उगम होतो असे साम्यवादी विचारसरणीच्या समाजाच्या संदर्भात मार्क्स याने म्हटले आहे. सामाजिक धोरणांचा प्रसार करण्यासाठी संपर्क साधने अस्तित्वात आहे; सत्याच्या शोधासाठी ती नाहीत. राज्याने वृत्तपत्रे आपल्या अधीन (मालकीची) ठेवली पाहिजेत आणि स्वतःसाठी वापरली पाहिजेत. त्यांना साम्यवादी पक्ष वा त्यांच्या संस्थांचे मार्गदर्शन असले पाहिजे. साम्यवादी योजनांच्या संदर्भातील अपयशांच्या संदर्भात जोवर आत्मपरीक्षण/(स्वतःवर टीका) होत आहे तोवर त्याचे स्वागत होते. जनता अस्थिर मनोवृत्तीची असते आणि अतिशय अडाणी असून शासनाशी तिला काही देणे घेणे नसते. या कारणासाठी शासनाच्या कार्यपध्दतीबद्दल तिला विश्वासात घेण्याचे कारण नाही. साम्यवादी पत्रसृष्टी राज्याच्या मालकीची असून त्याच्यामार्फतच सी चालवली जाते; तर एकाधिकार पध्दतीची पत्रसृष्टी खाजगी मालकीची असते. साम्यवादी राजवटीमधील वृत्तपत्रावरील नियंत्रण सतत राहते व त्याबाबत तडजोड संभवत नाही. एकाधिकारशाही मधील वृत्तपत्रांवरील नियंत्रण सत्ताधारी व्यक्तीनुरुप बदलते.

सोव्हिएट युनियन (रशिया) मधील बदलांच्या संदर्भात 'माध्यमांची स्थिती' या विषयावर गेल्या काही वर्षातील घटनांच्या संदर्भात अधिक विचार करावा लागेल.

स्वतंत्रता सिध्दान्त–

इंग्लंड आणि अमेरिकेच्या नवीन खंडावर सतराव्या शतकात या सिध्दान्ताने मुळ धरले. अधिकारशाहीच्या सिध्दान्ताला राजकीय विचारप्रणालीकडून आव्हान मिळू लागले. पश्चिम युरोपमधील प्रस्थापित संस्थांवर टीका होऊ लागली. कॅथलिक चर्चच्या सत्तेला प्रोटेस्टंट सुधारणांमुळे आव्हान मिळाले आणि अधिकारशाही सत्तांना राजकीय क्रांतीमुळे आव्हान मिळाले. भुगोल आणि विज्ञान या क्षेत्रातील नव्या शोधांमुळे मानवी ज्ञानाचा विस्तार याज सुमारास सुरू झाला. या बदलांमुळे वैचारिक क्रांतीला चालना मिळाली. त्यामुळे व्यक्तींच्या भूमिकांना महत्त्व मिळाले आणि स्वतः निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना प्राप्त झाले. माणूस हा विचारशील प्राणी आहे स्वतःचे भवितव्य ठरविण्याचा त्यांना अधिकार आहे असे मत विचारवंतांना मांडले. याआधी लोकांना राज्याचे सेवक मानले जात असे. समाज स्वायत व्यक्तींचा बनला असून त्यांच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी त्यांनी सरकार तयार केले आहे असे मत राजकीय प्रणालींनी मांडायला सुरुवात केली. राज्य अपयशी ठरले तर ते बदलण्याचा वा नष्ट करण्याचा नागरिकांना अधिकार आहे. जॉन मिल्टन आणि जॉन लॉक यांचे नेतृत्व असलेल्या वृत्तपत्र स्वातंत्र्य चळवळीच्या विचारवंतानी (अठराव्या शतकातील) सरकारने वृत्तपत्रांच्या कारभारात हस्तक्षेप करून नये असा आग्रह धरला. या विचारप्रणालींनी व्यक्तिस्वातंत्र्यावर भर दिला. अमेरिकन स्वातंत्र्याची घोषणा आणि स्वतंत्र वक्तव्य. स्वतंत्र पत्रसृष्टी आणि स्वतंत्र धार्मिक आचरण यांची घटनेने हमी दिली. शासनाच्या कार्यक्रमांच्या किती जवळ लोकांना आणले जाते यावर स्वतंत्र पत्रसृष्टीची सामाजिक उपयुक्तता ठरवली जाते.

सरकारच्या कार्यकारी, न्याय आणि विधानमंडळाच्या कार्याला पूरक असे कार्य स्वतंत्र पत्रसृष्टी करते म्हणून तिला 'चौथी शक्ती' या नावाने संबोधले जावे अशी सैध्दान्तिक भूमिका घेतली जाते. स्वतंत्र पत्रसृष्टीने सामाजिक जबाबादारी स्वीकारण्याच्या मार्गातील हा मुख्य मार्ग आहे अशी भूमिकाही घेतली जाते.

सामाजिक जबाबदारीचा सिध्दान्त –

स्वतंत्र पत्रसृष्टीतच या सिध्दान्ताची बीजे आहेत. बरेचसे नैतिक निर्बंध घातल्यामुळे हा सिध्दान्त वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या बाबतीतला पुढचा टप्पा गाठतो. वृत्तपत्र स्वांतत्र्यापेक्षा जबाबदारीवर या सिध्दान्ताचा भर असतो. १९४७ मध्ये हटकिन्स आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. त्या 'वृत्तपत्र स्वातत्र्य' या कल्पनेचे कठोरपणे परीक्षण करण्यात आले. आधुनिक समाजात वृत्तपत्रांचे महत्त्व इतके वाढले आहे की संपर्क माध्यमांवर सामाजिक जबाबदारीचे तत्त्व अनिवार्यपणे सोपवले पाहिजे. वृत्तपत्रांच्या कार्यावर लक्ष ठेवणारी नियंत्रण संस्था असावी असे यामुळे प्रतिपादन केले गेले. ज्यायोगे वृत्तपत्रांचे कार्य योग्य प्रकारे होईल असे म्हटले गेले व त्या अनुषंगाने सूचना करण्यात आल्या.

अमेरिकेतील पत्रकारांनी सामाजिक जबाबदारी या तत्त्वाचा पुरस्कार करण्याची परंपरा राखली आहे; परंतु सरकारच्या सक्तीच्या धोरणांकडे साम्यवादाचे पुरस्कर्ते म्हणून पाहिले गेले आहे आणि वृत्तपत्रस्वातंत्र्याला तो एक धोका आहे असे मानले आहे. राष्ट्राचा विकास आणि प्रगती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एक सरकारी भागीदार या दृष्टीने जबाबदारीचे तत्त्व

पत्रकारितेकडून अपेक्षा करीत राहील या मुद्यावर तिसऱ्या जगातील राष्ट्रांत एकवाक्यता आहे. तिसऱ्या जगातील राष्ट्रे–

युनेस्को यांनी दर्शविलेली ही प्रकृती १९४० च्या दशकातील हटकिन्स आयोगाप्रमाणे खुल्या व स्वतंत्र संपर्काला धोका आहे असे अनेक पत्रकारांना वाटते. सामाजिक जबाबदारीचा सिध्दान्त याला वेगळ्या सिध्दान्ताचे असे स्वरुप देता येणार नाही. एखाद्या विशिष्ट समाजातील पत्रसृष्टी त्या समाजाची तत्त्वे, संहिता वा पूर्वअटी पाळीत असतील तर सर्वच वृत्तपत्र-पध्दती सामाजिक दृष्ट्या जबाबदार ठरतील. देशातील राजकीय तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब त्या वृत्तपत्र पध्दतीत नसेल तर तिला बेजबाबदार म्हटले जाईल. सामाजिक आहे असे नसून अन्य तीन पत्रसृष्टी-सिध्दान्तांचाच एक भाग आहे.

तिसऱ्या जगातील अनेक सरकारे (अलिप्त राष्ट्रे वा विकसनशील राष्ट्रे) पाठिंबा देणारी वा सहकार्य पुढे करणारी पत्रसृष्टी असावी यावर ठामपणे भर देतात. राष्ट्राची सुरक्षा आणि स्थिरता यांना
धक्का लावू पाहणाऱ्या अनिष्ट शक्तींशी मुकाबला करण्यासाठी सरकारांना मदत करण्याची नैतिक जबाबदारी पत्रसृष्टीने स्वाकारली पाहिजे.

अधिकारशाही आणि साम्यवादी सिध्दान्त यांच्यात अनेक साम्ये आहेत. दोन्ही पध्दती अधिकारशाही - प्रसंगी एकाधिकारशाही मानणारी आहेत. अधिकारशाहीतील पत्रसृष्टीला काय छापायचे नाही ते ठाऊक असते. संपादकांना बरेचसे स्वातंत्र्य आणि निर्णय स्वातंत्र्य संपादकीय निर्णयांच्या संदर्भात दिलेले असते ही विशेष बाब आहे. साम्यवादी पत्रसृष्टी मुख्यतः आदेशानुसार मजकूर छापले. काय छापायचे आहे हे वृत्तपत्रांना ठाऊक असते असे थोडक्यात म्हणता येईल.

सर्व थरातील टीकाकारांकडून स्वतंत्र पत्रसृष्टीवर कडाडून टीका झाली. पत्रसृष्टीने जबाबदारीने वागण्यासाठी काय करायला पाहिजे हे जबाबदारीचे तत्त्व प्रतिपादन करणाऱ्यांना माहीत आहे असे त्यांना वाटते. 'जबाबदारी' ही संकल्पना परंपरेने मांडल्या गेलेल्या 'स्वातंत्र्य' या संकल्पनेच्या आधी लक्षात घेतली पाहिजे असे ठामपणे त्यांना वाटते. स्वतंत्र पत्रसृष्टी जसजशी अधिक जबाबदार बनत जाईल तसतसे तिचे स्वातंत्र्य कमी कमी होत जाईल असा एक ठाशीव मुद्दा प्रतिपादन करता येईल हेही लक्षात ठेवले पाहिजे. स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी तरी हा धोका ओळखला पाहिजे. सामाजिक जबाबदारीच्या लोकप्रिक घोषणेखाली वृत्तपत्र स्वतंत्र्य हळूहळू का होईना पण सहजपणे दबून जाईल, नष्ट होईल.

आंतरराष्ट्रीय बातम्यांचा आणि माहितीचा प्रवाह फार मोठ्या प्रमाणावर मोठ्या जागतिक वृत्तसंस्थांच्या हातात आहे. माध्यम विषयक परिषदांमध्ये अपुरी माहिती पुरवण्याबद्दल आणि पूर्वग्रहयुक्त
वृत्त कथनाबद्दल आणि वृत्त प्रसाराबद्दल आतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांवर वारंवार टीका केली जाते. 'अमेरिकेतील ॲसोसिएटेड प्रेस' (ए. पी.) आणि युनायटेड प्रेस इंटरनॅशनल (यू. पी. आय्.) 'ब्रिटन' मधील 'रॉयटर' आणि 'फ्रान्स' मधील 'ॲग्रेस फ्रान्स प्रेस' (ए. एफ्. पी) या पश्चिमेकडील देशांवर टीकेचा मुख्य भडिमार होतो. पाश्चिमात्य वृत्तसंस्थाकडे वृत्तप्रसाराची जणू मक्तेदारीच आहे. आणि घटनांचे खरेखुरे चित्र जगापुढे ठेवण्यात त्या अपयशी ठरत आहेत असे तिसऱ्या जगाच्या प्रवक्त्यांचे मत आहे. तिसऱ्या जगाच्या संबंधातील वृत्ते पूर्वग्रहयुक्त आहेत. गरिबी, दंगली, क्रांती, ज्वालामुखी, राष्ट्रीय नेत्यांची वृत्त, विमानअपहरण या प्रकारच्या वृत्तांचा गाजावाजा केला जातो. पुलांचे बांधकाम, महामार्गाची कामे, नवीन शाळा या सारख्या विधायक घटनांबद्दल या संस्था अधिक वृत्त का देत नाहीत? असा सवाल हे प्रवक्ते करतात. पाश्चिमात्य पत्रकारितेकडून तिसऱ्या जगाच्या पुढील अपेक्षा आहेत. (१) माहितीचा दुहेरी समतोल ओघ-तिसऱ्या जगाकडे आणि तिसऱ्या जगा कडून आतबाहेर जाणारी माहिती. (२) अधिक सखोल,--- आणि पूर्वग्ररहित बातम्यांचे संगलन (तिसऱ्या जागातील) सतत होत राहिले पाहिजे. (३) तिसऱ्या जगातील चांगल्या आणि विधायक बातम्यांवर अधिक भर; ज्यात विकासविषयक शैक्षणिक स्वरुपाच्या (विकासकार्यक्रम वृत्त) बातम्यांचा समावेश असावा.

पाश्चिमात्य पत्रकारितेच्या संदर्भात निर्माण केलेल्या प्रश्नांमध्ये थोडेफार तथ्य असल्योचे तेथील पत्रकार मान्य करतात. मात्र तिसऱ्या जगातील राष्ट्रातील वृत्ताच्या ओघातच असमतोल असल्याचेही ते लक्षात आणून देतात. 'विकास कार्यक्रम वृत्त' म्हणून तिसऱ्या जगात संबोधले जाणारे वृत्त पाश्चिमात्या पत्रकारांना बातमीयोग्य वाटत नाही असेही ते म्हणतात.

जागतिक आणि स्थानिक वृतासाठी बहुतेक विकसनशील राष्ट्रांना चार मोठ्या पाश्चिमात्य वृतसंस्थांवर अवलंबून राहावेच लागते. ए. पी.यू. पी. आय्. / रॉयटर आणि ए. एफ्. पी आणि काही बाबतीत 'तास' या सोव्हिएट युनियन मधाल वृतसंस्थांवर विसंबून राहाणे भाग पडते. 'मोठ्या चार' वृतसंस्था आणि तास मिळून तिसऱ्या जगातील वृत्तपत्रांना बातम्या मिळतात आणि दररोज सुमारे पाच लाख शब्द भारतीय वा अन्य विकसनशील देशांच्या न्यूज डेस्कच्या माधी मारल्या जातात.

परस्परांचे हितसंबंध जपण्याच्या दृष्टीने काही समान विषयात आस्था असणाऱ्या बातम्यांची देवघेव करणे.

नवीन शैलीची पत्रकरिता – ज्यात विधायक बातम्यांना अग्रक्रम असेल अशा वृत्तांना प्राधान्य देणे या हेतूने तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी स्वतःचा असा एक 'न्यूज एजन्सी पूल' तयार केला. आंतरराष्ट्रीय दबदबा असलेल्या मोठ्या वृत्तसंस्थांविषयीच्या असमाधानातून या 'न्यूज एजन्सी पूल' कार्यरत केला आहे. युगोस्लाव्ह सरकारची वृत्तसंस्था 'तान्जुग' दैनंदिन घटनांचे वृत्त देते. त्यात सुमारे ४० वृत्त संस्थांशी वृत्तची देवघेव समाविष्ट असते. शासकीय संदेश पोचविणारी निवेदने, राजदूतांच्या भेटीगाटी, भाषणांचे मसुदे या प्रकारच्या बातम्या त्यात येतात. आर्थिक, पर्यावरण विषयक आणि सांस्कृतिक बाबींचाही या वृत्तसंकलनात समावेश होतो.

अलिप्ततावादी 'न्यूज पूल' च्या जोडीने 'इटरप्रेस' ही संस्था काम करते. '' तिसऱ्या जगाची वृत्तसंस्था'' या नावाने ती ओळखली जाते. सरकारी संस्थां त्यांची वृत्ते 'इंटरप्रेस' कडे पुनर्लेखनासाठी आणि परिष्करणासाठी सोपवतात; तसेच दुसऱ्या राष्ट्रातील वृत्तांच्या 'फाइल्स' त्यांच्याकडून मिळवतात. 'युनेस्को' कडून 'इंटरप्रेस' ला त्यांची विशेष कार्ये करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. एका दृष्टीने 'इंटरप्रेस' ही जागतिक स्तरावरची 'जनसंपर्क' संस्था आहे असे म्हणता येईल.

बरीचशी वृत्ते विधायक स्वरूपाची असतात. सांस्कृतिक, आर्थिक प्रगती, कृषी, तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकास, तिसऱ्या जगातील व्यापार आणि मैत्रीपूर्ण संबंध वाढीस लावणाऱ्या घडामोडींचे वृत्त असे या वृत्तांचे स्वरूप असते. विशेषवृत्ते, विशेष लेख, वृत्त पृथक्करण, वृत्ताचा पाठपुरावा अशा विविध लेखन प्रकारांचा उपयोग होतो. तिसऱ्या जगातील वृत्तसंस्थांकडून प्रसारित होणारी बातमी वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह असत नाही अशी पाश्चिपात्य पत्रकारांची प्रतिक्रियी आहे. यापैकी बरेचसे वृत्त सरकारचा प्रचार आणि सरकार धार्जिण्या नेत्यांनी काढलेली पत्रके या स्वरूपांचे असल्यामुळे हे घडते असे त्यांचे मत आहे.

वृत्तपत्र स्वातंत्र्याला जगांत सर्वज उतरती कळा आली आहे असे जागतिक पत्रसृष्टीच्या विद्यार्थ्यांचे एकूण मत दिसते. काही अपवाद वगळता सगळीकडील पत्रसृष्टी अधिकाधिक नियंत्रणाखाली येते आहे. असे दरवर्षी होणाऱ्या 'पाहणी' चे निष्कर्ष दर्शवितात.

'ॲसोसिएटेड प्रेस' आणि 'इटरं अमेरिकन' 'प्रेस असोसिएशन' यांनी केलेल्या पाहणींचे निष्कर्ष जगातील बहुतेक भागात खालावलेल्या वृत्तपत्र स्वातंत्र्याचे निराशाजनक दर्शवितात. वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या पाश्चिमात्य संकल्पना सर्वत्र स्वीकारलेल्या दिसत नाहीत; आणि या विषयाबद्दल बोलताना त्या संकल्पनेच्या अर्थाबद्दल प्रश्न निर्मान होतात. वृत्तपत्र स्वातंत्र्याने सर्व जगभर बाजी गमावलेली असली तरी काही प्रांतांमध्ये ही संकल्पना टिकून आहे आणि त्यात थोडी सुधारणाच होत आहे हे अमेरिकेचे म्हणणे लक्षात घेणे व नोंदवणे आवश्यक ठरते.

उत्तर अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे. लॅटिन अमेरिकेन अगदी कमी. युरीपमध्ये मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरण झाले आहे. पश्चिम युरोपात वृत्तपत्रपध्दती स्वातंत्र्य उपभोगीत आहेत आणि पूर्व युरोप मधील देश दुसऱ्या टोकावर आहेत.

मध्यपूर्वेचे ध्रुवीकरण स्वतंत्र पत्रसृष्टी आणि नियंत्रित पत्रसृष्टी अशा गटात झाले आहे. युरोप प्रमाणे इथे स्वातंत्र्याची स्थिती नसून वाढत्या निर्बधांना तिथे तोंड द्यावे लागते. अफ्रिका आणि आशियातील नवी स्वतंत्र झालेली राष्ट्रे अधांतरी आहेत; सर्वसमान्यपणे अधिक निर्बंधांकडे जाण्याची प्रवृत्ती तेथे दिसते. हीच प्रवृत्ती त्यांच्या वृत्तपत्रपध्दतीत दिसते. जबाबदारी, स्थिरता, किंवा देशांपुढील ध्येये या नावाखाली वृत्तपत्रांवर नियंत्रण ठेवले जाते. ऑस्ट्रेलिया तसेच जपान न्यूझीलंड, सिंगापूर येथील वृत्तपत्रपध्दती कमालीची स्वतंत्र आहे. आफ्रिकेस कोणतीच वृत्तपत्रपध्दती स्वतंत्र नाही. दक्षिण आफ्रिका वृत्तपत्र स्वातंत्र्याची वैशिष्ट्ये दर्शवते पण लोकसंख्येची मोठा भाग वृत्तपत्रांपासून दूर राहिला; वृत्तपत्रसेवेला वंचित राहिला आहे.

जगातील वृत्तपत्रांवर सरकारचा दबाव कसा पडतो हे पुढील वर्गवारीवरून कळून येते.

१) कायद्याचा दबाव –

स्वातंत्र्य निरकुश आणि निर्बंधरहित असू शकत नाही ही गोष्ट भारतीय राज्यघटनेने जाणली आणि परिच्छेद १, कलम १९ अनुसार असलेल्या स्वातंत्र्याला काही विशिष्ट मर्यादा पाळून नियंत्रित करण्याचे अधिकार मिळावेत अशी तरतुद केली आहे, परिच्छेद २, कलम १९ (ज्यात नंतर घटना दुरूस्ती झाली) अनुसार राज्याच्या सुरक्षितेतेच्या रक्षणांच्या संदर्भात विदेशी राज्यांबरोबरचे मैत्रीपूर्ण संबंध, सुव्यवस्था,

नैतिकता, कोर्टाची बेअदबी, बदनामी वा गुन्ह्याला प्रवृत्त करणे या कारणांसाठी विधानमंडळाला वृत्तपत्र स्वातंत्र्य तसेच भाषण स्वातंत्र्यावर योग्या ते नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहे.

सुरक्षाविषयक कायदे–

माहिती प्रसिध्द करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य कोणताही देश नाही. राष्ट्राची सुरक्षा धोक्यात येईल असा कोणताही मजकूर प्रसिध्द करण्यावर प्रतिबंध असतो.

वृत्तपत्रविषयक कायदे–

पत्रसृष्टीचे हक्क आणि नियंत्रण या संदर्भात विशेषत्वाने हे कायदे अंमलात येतात. टर्की या देशाच्या उदाहरणाप्रमाणे जगभरातील वृत्तपत्र–कायदे नियंत्रण असतात. वृत्तपत्रांच्या बाजूने नसतात. भारत मध्यपूर्वेकडील अनेक देश आणि लॅटिन अमेरिकन देशही याच उदाहरणात येतात. मात्र स्वीडन सारख्या देणाच्या उदाहरणाप्रमाणे काही देण वृत्तपत्रांच्या हक्कांवर भर देतात आणि तसा स्पष्ट निर्देश कायद्यांमध्ये केलेला असतो. 'डेसॅकॅटो' नावाचे लॅटिन अमेरिकेतील कायदे सरकारी अधिकाऱ्यांचा अवमान करू नये असा निर्बंध घालतात. कठोर कायद्याचे हे एक उदाहरण झाले. अमेरिका, बेल्जियम स्वित्झरलंड आणि ब्रिटनमध्ये वृत्तपत्र–कायदे नाहीत.

(१) दंड देणारे कायदे–

बहुतेक देशांत कोणीही व्यक्तीच्या प्रतिष्ठेला दुष्ट बुध्दीने धक्का लावणाऱ्या बदनामीकारण विधानांना बंदी घातलेली आहे.

न्यायालयाच्या कामकाजात अडथळा आणील असा मजकूर छापण्यात जवळ जवळ सर्व देशांनी निर्बंध घातले आहेत.

कोर्टापुढे पुरावे दाखल झाल्याशिवाय त्यांना प्रसिध्दी देण्यास काही देश प्रतिबंध करतात. कोर्टाचे कामकाज सुरू असताना ते प्रसिध्द करायला वृत्तपत्रस्वातंत्र्य असणाऱ्या देशात परवानगी असते. कोर्टाची बेअदबी करणे या संदर्भात अत्यंत कडक कायदे बहुतेक देशांत आढळतात.

(२) आर्थिक आणि राजकीय दबाव–

सरकारी सूत्रे जाहिराती, वृत्तपत्र कागदाचा पुरवठा, निरनिराळ्या प्रकारच्या 'ग्रँटस्' हे वृत्तपत्र आणि पत्रकारांवर दबाव आणण्याचे काही प्रकार आहेत. विशेष कृपा आणि लाभ सरकारधार्जिण्या वृत्तपत्रांना मिळतात.

(३) गोपनीयता–

सरकारी सूत्रे व कागदपत्रे यांच्यापासून वृत्तपत्रांना दूर ठेऊन एक प्रकारचा दबाव आणता येतो. जगभरातील वृत्तपत्र पध्दतीत हे तंत्र सर्रास वापरले जाते.

(४) प्रत्यक्ष नियंत्रण व बळाचा वापर

साम्यवादी देश आणि हुकूमशाहीखाली असलेले देश– या दोन्ही ठिकाणी राज्यकर्ते या तंत्राचा नेहमी वापर करतात.

*****

पाठ क्र. ५

इ. स. १९७४ पूर्वीची भारतातील पत्रकारिता

इ. स. १७८० मध्ये जेम्स हिकी या इंग्रजाने 'बेंगॉल गॅझेट' हे भारतातील पहिले वृत्तपत्र प्रसिध्द केले. भारतातील इंग्रजांसाठी हे इंग्रजीतील वृत्तपत्र प्रसिध्द होत असे. पुढील दहा वर्षात कलकत्ता, मुंबई, मद्रास येथे अनुक्रमे ५, ३ व २ वृत्तपत्रे सुरु झाली. ब्रिटीश संसदेचे कामकाज, इंग्लंडमधील सामाजिक घटना आणि लष्करी अधिकाऱ्यांना रोचक वाटतील अशा बातम्या अशा प्रकारचा मजकूर या वृत्तपत्रांमधून प्रसिध्द होत असे. इंग्रजांचे आगमन आणि स्वदेशगमन यांचे वृत्तही त्यात असे. ब्रिटीश पत्रकारितेच्या भारतातील प्रारंभापासूनच तिने प्रशासनावर हल्ला चढवला. भारतातील प्रांतिक सरकारला अस्वस्थ केले. मुंबईतील भारतीय व्यापाऱ्यांच्या व्यापारविषयक गरजा लक्षात घेऊन इ. स. १७९७ पासून मुंबईच्या वृत्तपत्रांनी गुजरातील जाहिराती द्यायला सुरुवात केली. याप्रमाणे भारतीय भाषांतील पहिले वहिले वृत्त प्रसिध्द झाले ते गुजरातील आणि वृत्त होते व्यापारविषयक !

भारतीय पत्रकारितेचा जन्म बंगालमध्ये झाला. इ. स. १८१६ मध्ये गंगाधर भट्टाचार्य यांनी 'बेंगॉल गॅझेट' बंगालीत प्रसिध्द केला. वृत्तपत्र फक्त एक वर्ष चालले. या सुमारास (इ. स. १८१८) श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांनी 'दिगू दर्शन' हे मासिक सुरु केले आणि थोड्या कालावधीनंतर ''समाचार दर्पण'' हे बंगाली साप्ताहिक सुरु केले. या मिशनरी नियतकालिकांनी हिंदु धर्मांवर हल्ला केला. प्रतिहल्ला करण्यासाठी राममोहन रॉय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी इंग्रजीत 'ब्रॅहमॅनिकल मॅगझिन' आणि बंगालीत 'ब्रॅह्मिन सेवाधी' ही नियतकालिके काढली आणि वेदान्तावरील टीका खोडून काढली.

ख्रिश्चनांच्या धर्मसंकल्पनांच्या खात्रीलायकतेबद्दलही रॉय यांनी प्रश्न उपस्थित केले. 'संबद कौमुदी' त्यांनी इ.स. १८२१ मध्ये सुरु केले. पर्शियन भाषेतील 'मिरातूल अकबर' हे वृत्तपत्र त्यांनी इ.स. १८२२ मध्ये संपादित केले. या नियतकालिकांतून त्यांनी हिंदुधर्मांतील उच्च तत्त्वांचा पुरस्कार केला आणि 'सती' प्रथेवर टीका केली. ब्रिटीश प्रशासनाच्या अनेक कृतींवरही त्यांनी टीका केली. श्रीरामपून मिशनऱ्यांनी हिंदु धर्माविरोधी केलेल्या प्रचाराला खोडून काढण्याचे दुसरे एक उद्दिष्ट रॉय यांनी समोर ठेवले होते. रॉय यांच्या लेखनामुळे ब्रिटीश वसाहतींचे सरकार एका बाजून रुष्ट झाले तर दुसऱ्या बाजूने सनातनी विरोधात गेले. ख्रिश्चन मिशनरीत दुखावले गेलेच. रॉय यांनी आपल्या लिखाणात स्वतःची संपादकीय कर्तव्ये सांगितली आणि विचार प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याच्या (त्याचे रक्षण करण्याच्या) वृत्तपत्रांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला.

रॉय यांनी केलेल्या भारतीय पत्रसृष्टीच्या प्रारंभामुळे भारतीयांचे तत्कालीन विवादास्पद सामाजिक व राजकीय प्रश्नांकडे लक्ष गेले. नव्याने नेमणूक झालेल्या प्रभारी गव्ह. जनरल जॉन ॲडम याने भारतीय पत्रसृष्टीच्या उदयाची कठोरपणे दखल घेतली आणि निर्बंधाचा रोख भारतीय भाषांतील वृत्तपत्रांवर होता. परिणामतः रॉय यांचे 'मिरातूल्य अकबर' बंद पडले आणि वृत्तपत्र निर्बंधाविरुध्द त्यांनी केलेले सर्वोच्च न्यायालयातील अपील फेटाळले गेले. पुढील ५ वर्षे भारतीय भाषांतील वृत्तपत्रांनी भीतीपोटी कोणतेही राजकीय आणि प्रशासकीय बाबींशी संबंधित वृत्त छापले नाही. १८२३ - २८ हा भारतीय पत्रसृष्टीच्या इतिहासातील तमोयुगाचा काळ होता. कर्तृत्त्ववान संपादक बकिंगहॅम याची हकालपट्टी झाली. (सर जेम्स सिल्क बकिंग हॅम हा 'कलकत्ता जर्नल' चा संपादक होता; त्याने वृत्तविभागाचे क्षेत्र विस्तृत केले आणि त्यात पत्रव्यवहाराचे सदर समाविष्ट केले. वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या लढतीत त्याचा सह्योग उल्लेखनीय आहे.)

राजा राममोहन रॉय हे आधुनिक काळातील भारतातील एक श्रेष्ठ सुधारक होते. आधुनिक भारताच्या शिल्पकारांच्या देदीप्यमान / तेवस्वी मालिकेत ते शोभून दिसतात; आणि त्यांना 'भारतीय पत्रकारितेचे जनक' म्हणून संबोधणे यथोचित ठरेल.

इ.स. १८२२ मध्ये फर्दुनजी मर्झबान यांनी गुजराती साप्ताहिक, 'बॉम्बे समाचार' सुरु केले. त्यात व्यापार विषयक वृत्ते असतं रॉय यांचे उद्दिष्ट. लोकांना हिंदु धर्माबद्दल ज्ञान देणे व समाज सुधारणांचा पुरस्कार करणे हे होते; तर मर्झबान

यांचा हेतू व्यापारविषयक गरजा पूर्ण करणे हा होता. ब्रिटीशांच्या मालकीची वृत्तपत्रे आणि भारतीयांच्या मालकीची वृत्तपत्रे यांचे प्रवाह एकमेकांपासून भिन्न राहिले. हे एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील एकाच कालखंडात नोंदणाऱ्या वृत्तपत्रांच्या बाबतीत एक वैशिष्ट्य राहिले, असे असले तरी दोघांनीही वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी लढा दिला.

रॉय यांच्या संपादकीय लिखाणामुळे सरकारचा रोप ओढवला आणि त्याची परिणती 'व्हरनॅक्युलर प्रेस ॲक्ट १९२३' मध्ये झाली. या कायद्याने वृत्तपत्र स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. वृत्तपत्रातून प्रसिध्द होणारा देशद्रोह फैलावणारा मजकूर समाजातील शांतता नष्ट करील या विचाराने प्रत्येक वृत्तपत्राला शासनप्रमुखाकडून परवाना काढण्यास भाग पाडण्यात आले.

लॉर्ड विल्यम बेटिंक व इतर प्रशासकांच्या उदार दृष्टीमुळे इ.स. १८२५ ते इ.स. १८५७ या काळात भारतीय पत्रसृष्टी सरकारी हस्तक्षेपापासून मागील बंडाच्या तुलनेने स्वतंत्र होती.

प्रत्येक वृत्तपत्राने मुद्रणस्थळ, संपादक या संदर्भात मॅजिस्ट्रेटसमोर निवेदन दिले पाहिजे ही बाब वगळता प्रेस ॲक्ट १८३५ मध्ये भारतीय पत्रसृष्टीवरील निर्बंध कायम राहिले.

वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झालेल्या मजकूराचा १८५७ च्या बंडात मोठ्या प्रमाणात वाटा होता. पत्रसृष्टी १८५७ या वर्षात लोकांना चिथावणी देणारा मजकूर प्रसिध्द करीत होती. संपादकीय आणि पत्रव्यवहार अशा दोन्ही सदरांमधून लोकांच्या भावनांचा प्रक्षोप घडविणारा मजकूर प्रसिध्द झाला. अँग्लो इंडियन वृत्तपत्रांनी या विरोधात भूमिका घेतली आणि सरकारने भारतीय पत्रसृष्टीला आणि जनतेला सूढ बुध्दीने वागवावे अशा प्रकारचा मजकूर लेखांमधून प्रसिध्द केला; याचा परिणाम होऊन १८५७ प्रेस ॲक्ट लागू करण्यात आला आणि छापील पुस्तक व वृत्तपत्रांच्या खपावर नियंत्रण आले. छापखाना चालविण्यासाठी परवाने आवश्यक ठरु लागले. ३५ लोकप्रिय प्रकाशनांपैकी (१८५३) फक्त ६ वृत्तपत्रे १८५७ च्या उत्तरार्धापर्यंत तग धरु शकली. बंड आणि त्यानंतरचे कायदे यांचा मोठा आघात पत्रसृष्टीवर झाला. कॅनिंग याच्या राजवटीतील कायद्यांमुळे भारतीय व इंग्रजी पत्रसृष्टीची वाताहत झाली. या वेळेपासून भारतीय पत्रसृष्टी आणि अँग्लो इंडियन वृत्तपत्रांमधील वेढ हा भारतातील पत्रसृष्टीचा प्रभावी विशेष ठरला.

'इंडियन काडन्सिल्स ॲक्ट' मुळे सरकारला खास निवडक भारतीय प्रतिनिधी संसदेवर नेमण्याचे अधिकार मिळाले म्हणून इ.स. १८६१ पासून राजकीय पत्रकारिता सुरु झाली असे म्हटले जाते. भारतीयांना या ना त्या स्वरुपात सरकारमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाल्यामुळे लोकमत्त फार मोठ्या प्रमाणावर ढवळले गेले. आज भरभराटीला आलेली अनेक मोठी वृत्तपत्रे या काळात प्रसिध्द होऊ लागली होती. 'दि टाइम्स ऑफ इंडिया' (१८६१), 'दि पायोनियर' (१८६७), 'दि स्टेटसमन' (१८७५), 'दि हिंदु' (१८७८). संसदेत केवळ नेमणूक होऊन भारतीयांचे समाधान झाले नाही. सरकार आणि प्रशासन यांच्यावर वृत्तपत्रे अधिकाधिक टीका करु लागली.

लॉर्ड नॉर्थब्रुकच्या राजवटीत बिहारमध्ये मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा तुटवडा पडला. वृत्तपत्रांनी दुष्काळ घोषित केला. बंगाल सरकारने मदत म्हणून हजारो रुपयांचे साह्य पाठवले. लॉर्ड नॉर्थब्रुक या मदतकार्याला अनुकूल होते तर बंगालचे नायब राज्यपाल सर जॉर्ज कॅम्पबेल यांचे मत या मदतीला प्रतिकूल होते. रॉबर्ट नाइट याने राजपत्रात कॅम्पबेल यांनी उघड पाठिंबा दिला. सरकारी कर्मचारी आणि वृत्तपत्रे यांच्यातील संबंधांच्या जुन्या प्रश्नांना पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात घेरले.

जानेवारी १८७५ मध्ये नाइट याने 'इंडियन स्टेटस्मन' या वृत्तपत्राची स्थापना केली. रविवारची स्फुट सदरे आणि अन्य विविध सदरांना 'स्टेटस्मन' मध्ये स्थान मिळाले. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय विचार प्रसृत करण्याचे भरीव कार्य नाईट याने केले. भूत आणि भविष्यातील दरीवर मात करण्याच्या दृष्टीने त्याने अँग्लो इंडियन पत्रकारांना भारतीय प्रजाजनांच्या प्रश्नांचा विचार करण्यास प्रवृत्त केले. बकिंगहॅम प्रमाणे नाइट याने भारतीय लेखकांमध्ये सरकारच्या संबंधातील टीकादृष्टी निर्माण केली. लोकांच्या सामाजिक प्रश्नांना नाइट याने पत्रकारितेत स्थान दिले. कित्येक अनाथ आणि गरीब युरोपीय बेघरांसाठी इ.स. १८६२ च्या सुमारास 'स्ट्रेंजर्स होम' ची कल्पना, 'बॉम्बे पोर्ट ट्रस्ट' ची निर्मिती, मुंबईला पाणी पुरवठा करणारी 'तुलसी पाइपलाइन' योजना, नागरी सुविधांमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने लोकमत्त जागृती करणे, मुंबईतील मृत्युदरात झालेली वाढ, घरावर लादलेले अनिर्बंध कर असे अनेक सामाजिक प्रश्न त्याने मांडले.

इ.स. १८७६ मधील पाहणीद्वारा भारतीय भाषांतील पत्रकारितेची लोकप्रियता व प्रभाव स्पष्ट झाला. प्रशासनाच्या विरोधात भारतीय भाषांतील पत्रकारांनी कडवट सूर प्रकट केला. शिशिर कुमार घोष यांनी मार्च १८६८ मध्ये 'अमृत बाजार पत्रिका' हे बंगाली साप्ताहिक सुरु केले. १८७१ मध्ये 'अमृत बाजार पत्रिकेचे कलकत्ता' येते स्थलांतर झाले. या काळातील एक वैशिष्ट्यपूर्ण नियतकालिक असलेल्या 'पत्रिकेने वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि राष्ट्र स्वातंत्र्यविषयक' अनेक संघर्ष केले.

भारतीय भाषांतील वृत्तपत्रांना दडवून टाकण्याची निकड वाटल्यामुळे १ मार्च, १८७८ रोजी लॉर्ड लायटनने 'व्हर्नॅक्युलर प्रेस ॲक्ट' संमत करुन घेतला. सर्व निर्बंधाचा समावेश करणारा कडक असा हा कायदा होता. देशद्रोही लेखन करणाऱ्या लेखनविरुध्द सरकारला कठोर शिक्षा सुनावण्याचे अधिकार या कायद्यामुळे मिळाले. सरकारच्या विरोधात असंतोष फैलावेल असा मजकूर छापणार नाही असा प्रकारचा एक बाँड भारतीय भाषांमधील वृत्तपत्रांना आणि छापखान्यांना लिहून द्यावा लागत असे.

लॉर्ड रिपन हा नंतरचा व्हॉइसरॉय अत्यंत उदारदृष्टीचा होता. १८८१ मध्ये त्यांनी 'व्हार्नॅक्युलर प्रेस ॲक्ट' मध्ये बदल केले. १८५७ चा प्रसे ॲक्टही त्याने सुधारला. भारतीयांना सरकारी नोकरभरतीत संधी मिळावी आणि घटनेत बदल व्हावेत या कारणांसाठी प्रचार मोहीम हामी घेऊन बंगाली नियतकालिकाचे संपादक सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी एका व्याख्यामालेचा दौरा देशात १८७७ मध्ये सुरु केला. त्यांनी लोकांना राजकीय जागृती निर्माण केली आणि पत्रसृष्टीचा राजकारण हा एक वर्चस्व निर्माण करणारा विषय ठरला.

या हालचालींमुळे १८७९ चा प्रेस ॲक्ट अस्तित्वात आला. मुद्रक आणि प्रकाश यांना बाँड लिहून देणे भाग पडू लागले.

इ.स. १८८५ हे वर्ष इंडियन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेने उजाडले आणि त्यामुळे राष्ट्रीय भावना अधिक तीव्र झाल्या. दादाभाई नौरोजी, रानडे, नरेंद्रनाथ सेन, सुब्रमण्य अय्यर, आपटे, आगरकर, मलबारी इत्यादी काँग्रेसचे मातब्बर नेते वृत्तपत्रांचे संपादक होते. भारतीय पत्रसृष्टीचे तीन मुख्य विषय होते. इ.स. १८२० पासून प्रारंभ झालेल्या सामाजिक सुधारणा, इ.स. १८६१ पासून सुरु झालेल्या राजकीय सुधारणा आणि इ.स. १८८५ पासून अस्तित्वात आलेला राष्ट्रवाद. हे तीन विषय अगदी १९४७ पर्यंत टिकून राहिले. भारतीय वृत्तपत्रांच्या दृष्टिकोनातील फरक या कालखंडाने पाहिला. मतांपेक्षा त्यांनी 'वृत्ता' वर अधिक लक्ष केंद्रित केले. पत्रसृष्टिवर प्रतिकूल परिणाम घडविणाऱ्या अनेक घटना घडूनही इ.स. १८५७ ते १८८५ या काळाने वृत्तपत्रांच्या संस्थेतील लक्षणीय वाढ पाहिली. ही आश्चर्यकारक वाढ इंग्रजी तसेच भारतीय भाषांतील वृत्तपत्रांमध्ये दिसून आली. विशेषतः भारतीय वृत्तपत्रे प्रशासनाविरुध्द मते मांडण्यात अधिक प्रभावी दिसत होती. रानडे सामाजिक सुधारणांचे आग्रहीपणाने पुरस्कार करीत होते तर टिळक राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय सामाजिक सुधारणांना काही वाव नाही असे मानीत होते. देशाच्या गरजांची स्पष्ट दृष्टी टिळकांना आहे या कारणासाठी अरबिंदो घोष यांनी टिळकांची स्तुती केली. राजकीय सत्तेचा आग्रह धरणारे नेते २०व्या शतकाच्या प्रारंभी अधिक शक्तिशाली झाले. टिळकांनी पत्रकारितेद्वारा राष्ट्रीय स्वातंत्र्याची मोहीम उघडली. लोक जागृतीसाठी टिळकांनी 'केसरी' मधून सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयावर लेखन केले. लोकशिक्षण आणि जनआंदोलन ही दोन कार्ये या लेखनाद्वारा टिळकांना साधायची होती. समाजाच्या अधिक प्रगत घटकांशी टिळकांनी 'मराठा' द्वारा संवाद साधला. भारतातील सुशिक्षित लोक आणि भारतातील इंग्रज यांचे सरकारच्या बाबतीतले मत (लोकमत्त) प्रकट करणारे खात्रीलायक साधन म्हणून 'मराठा' ने कार्य करावे असा टिळकांचा हेतू होता. १९०५ मधील बंगालची फाळणी या घटनेमुळे राष्ट्रवादाची धार तीव्र झाली आणि राष्ट्रीय चळवळीने जोर धरला.

मोन्टेग्यू – चेम्सफर्ड अहवाल इ.स. १९१८ मध्ये प्रसिध्द झाला. मवाळ पक्षाच्या लोकांनी त्याचा स्वीकार केला परंतु त्यांनी महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या. जहालपक्षाच्या लोकांनी अहवाल पूर्णपणे नाकराला. इ.स. १९१९ मधील देशद्रोह विषयक समितीमुळे पुन्हा पत्रसृष्टीत निषेध पसरला. इ.स. १९१९ मध्ये रौलट ॲक्ट संमत झाला. या कायद्यामुळे न्यायाधीशांना ज्यूरींच्या शिवाय राजकीय गुन्हेगारांवर खटले चालवण्याची मुभा मिळाली. प्रान्तिक सरकार विध्वंसक होत बाळगल्याचा संशय आला तरी अशा व्यक्तींना खटला न चालवला नजरकैदेची शिक्षा करु शकत असत. हा कायदा दुरुस्त करावा असे भारतीय लोकमत असले तरी सरकारने या लोकमताला प्रतिसाद दिला नाही. सरकारने अधिक कठोर उपाय अवलंबले.

जनरल डायर आणि पंजाबचे नायब राज्यपाल ओ ड्रवायर (O' Dwyer) यांचा भारतीय पत्रसृष्टीने तीव्र निषेध केला. परंतु अँग्लो इंडियन पत्रसृष्टीने जन. डायरच्या कृतीकडे डोळेझाक केली आणि 'मार्शल लॉ' च्या अत्याचारांचे त्यांनी समर्थन केले. देशाच्या अन्य भागांत पंजाबमधून बातमी जाऊ नये म्हणून आतोनात प्रयत्न केले गेले तरी बऱ्याच बातम्या फुटल्या आणि भारतीय पत्रकारांनी जालियनवाला बाग हत्याकांडाचे वर्णन 'क्रूर आणि भयावह घटना' असे केले. या वृत्तांमुळे ब्रिटीश सरकारने वृत्तपत्रांना धारेवर धरले. अमृत बाजार पत्रिकेची सुरक्षा अनामत रु. ५०००/ह्न आणि अनामत रक्कम रु. १००००/– जप्त झाले. 'दि ट्राइब्युन' या वृत्तपत्राला रु. २०००/– सुरक्षा अनामत म्हणून द्यावी लागली. संपादकाला दंड आणि तुरुंगवास भोगावा लागला.

'पंजाबी' हे नियतकालिक सक्तीने बंद करण्यात आले. 'दि हिंदु' आणि 'स्वदेशीमित्रन' या मद्रासमधील वृत्तपत्रांनी रुपये २०००/- प्रत्येकी सुरक्षा अनामत भरावी असे सांगण्यात आले. पंजाबमध्ये 'हिंदु' वर बंदी घालण्यात आली. हॅर्निमन यांना हद्दपार केल्यामुळे 'दि बॉम्बे क्रॉनिकल' ला संपादक गमवावा लागला.

व्हॉइसरॉय यांच्या समितीचा कायदेविषयक सदस्य या नात्याने तेग बहादूर सप्रु यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली वृत्तपत्र कायद्यांचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली. लेखी पुरावे मागवले गेले आणि साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. आठ ज्येष्ठ पत्रकारांशी संपर्क साधला; परंतु ते समितीपुढे येण्यास अनुत्सुक होते वा येऊ शकत नव्हते. 'हिंदु' चे कस्तुरी रंगा अय्यंगार आणि 'रंगून गॅझेट' चे मॅक् कार्थी यांनी गोपनीय अशा पध्दतीने (in camera) साक्षी दिल्या.

१९०८ आणि १९१० चे कायदे दुरुस्त करण्याची शिफारस 'प्रेस लॉ कमिटी' ने केली. भारतीय पत्रसृष्टीच्या दृष्टीने १९१० ते १९२० हे दशक घडामोडीचे गेले. लंडन येथे 'दि इम्पिरियल प्रेस कॉन्फरनत' घेतली गेली. भारतीय पत्रसृष्टीचे प्रतिनिधीत्व 'सुरेंद्रनाथ बॅनर्जी' यांनी केले तर ब्रिटीश पत्रसृष्टीचे प्रतिनिधीत्व स्टन्ले रीड यांनी केले. रीड यांच्या प्रयत्नांमुळे केबल आणि मुद्रणविषयक दरांमध्ये सवलत मिळू लागली.

१९२० पासून राष्ट्रीय चळवळीचे वातावरण तापत गेले आणि त्याचा आविष्कार भारतीय वृत्तपत्रांत दिसू लागला. भारतीय भाषांतील प्रत्येक वृत्तपत्राची पाने गांधीजींची असहकार चळवळ, सत्याग्रह आणि निदर्शने या विषयींच्या बातम्यांनी भरू लागली. १९२२ मध्ये प्रेस कमिटीच्या शिफारशीनुसार १९०८ आणि १९१० चे वृत्तपत्र कायदे दुरुस्त करण्यात आले. निवडणुकांच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी गोवा येथे काँग्रेस पक्षाची बैठक झाली. मतभेद होऊन सी. आर. दास, वल्लभभाई पटेल आणि मोतीलाल नेहरु यांनी निवडणुकांत भाग घ्यायचा होता व संसदेत ब्रिटीशांविरुध्द संघर्ष करायचा होता, 'स्वराज्य पार्टी' चे विचार प्रस्तृत करण्यासाठी त्यांनी स्वतःची नियतकालिके काढली. लॉर्ड आयर्विनच्या अखत्यारीत १९१९ च्या कायद्याचे परीक्षण करण्यासाठी 'सायमन कमिशन' १९२० च्या उत्तरार्धात नेमण्यात आले. त्यामुळे ब्रिटीश विरोधी भावना वाढीस लागल्या. एप्रिल १९३० मधील ऐतिहासिक अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची पहिल्याप्रथम मागणी केली. गांधीजींची असहकार चळवळ, दांडी येथील मिठाचा सत्याग्रह, क्रांतिकारकांचे चितागाँग येथील हल्ले य सर्व बातम्यांना वृत्तपत्रात स्थान मिळाले. बंगालमधील वृत्तपत्रांचा सरकारवरील हल्ला आणि प्रकट अप्रकट स्वरुपातील अनेक पत्रके तसेच राजकीय प्रचार यांनी देश ढवळून निघाला. सहा वटहुकुमांपैकी एक महत्त्वाचा वटहुकुम १९३० मध्ये वृत्तपत्रांवर नियंत्रण करण्यासाठी जारी करण्यात आला.

दहशतवादी कृत्ये आणि वृत्तपत्रांतील प्रक्षोभक मजकूर यांच्याविरुध्द सरकारने कठोर अंमलबजावणी केली. 'हिंदु' सारख्या वृत्तपत्रांतून पसरत असलेली. स्वदेशी चळवळ पाहून गांधी, नेहरु यांच्यासारखे नेते आणि 'बॉम्बे क्रॉनिकल' चे संपादक एस्.ए.ब्रेलव्ही आणि 'प्रताप' चे संपादक गणेश शंकर विद्यार्थी यांना अटक करण्यात आली. १९३० मध्ये एस्.सदानंद यांनी मुंबईहून प्रसिध्द होणारे 'फ्री प्रेस जर्नल' हे दैनिक सुरु केले. पहिला अंक १३ जून १९३० रोजी निघाला.

'फ्री प्रेस जर्नल' ने स्वातंत्र्यसंग्रामात सिंहाचा वाटा उचलला. स्वतंत्र आणि निर्भीड पत्रसृष्टीवर सदानंद यांचा भर होता आणि विश्वास होता. राष्ट्रवाद आणि जनसेवा ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे होती. त्यांच्या नियतकालिकाचा सरकारवर बराच मोठा प्रभाव होता. रु. ७०,००० इतकी डोळे फिरवून टाकील इतकी अनामत रक्कम जप्त झाली. यावरुन राज्यकर्त्यांच्यावरील या वृत्तपत्राची पकड स्पष्ट होते. फाळणीनंतर लगेचच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांनी ही जप्त अनामत रक्कम परत देऊ केली. ही अनामत वेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण कारण्यासाठी देशसेवेच्या कार्यासाठी होती असे सांगून सदानंद यांनी ही रक्कम घेण्यास नकार दिला.

१९२७ मध्ये स्थापन झालेल्या 'फ्री प्रेस' समूहातील वृत्तसंस्था फ्री प्रेस या वृत्तसंस्थेने लोकांना त्यांना हव्या असलेल्या बातम्या पुरवण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय पुढाऱ्यांना होणाऱ्या अटकेच्या दैनंदिन बातम्या, प्रचंड मिरवणूका, लोकांच्या प्रचंड संभा, काँग्रेस कार्यकर्त्यांवर होणारे गोळीबार आणि त्यांच्यावर होणारे आघात, लाठीहल्ले आणि लोकप्रिय नेत्यांची वक्तव्ये अशा प्रकारचे खास वृत्त साहित्य त्यात असे. हा सर्व मजकूर मोक्याच्या ठिकाणी व ठळक टाइपात छापला जाई. संपूर्ण पानभर लांबीचे मथले छापण्यास प्रारंभ झाला.

१९१७ पासून राजकारणातील गांधीयुग सुरु झाले. गांधींचे भारतीय राजकारणातील वर्चस्व १९२० ते १९४८ (त्यांच्या मृत्युपर्यंत) अबाधित राहिले. त्यांनी अनेक नियतकालिके संपादित केली. इंग्रजी, तामिळ आणि गुजराती भाषांत प्रसिध्द होणाऱ्या द. आफ्रिकेतील 'इंडियन ओपिनियन' या वर्तमानपत्राचे संपादन त्यांनी १९०४ मध्ये स्वीकारले. १९१९ मध्ये त्यांनी इंग्रजीत 'यंगइंडिया' आणि गुजरातीत 'नवजीवन' ही नियतकालिके काढली.

१९३३ मध्ये त्यांनी 'हरिजन' हे वृत्तपत्र काढले. या सर्व वृत्तपत्रांचा खप खूप असला तरी त्यांनी जाहिराती कटाक्षाने टाळल्या. त्यांचे लेख वृत्तसंस्थाकडून दैनिकांना वरचेवर पाठवले जात आणि देशाच्या सर्व भागात ते त्याच दिवशी वा दुसऱ्या दिवशी प्रसिध्द होत. गांधींनी साप्ताहिकांद्वारे राजकारण आणि समाजधारण दोन्ही साधले. राष्ट्रवाद आणि संयम भारतीय पत्रसृष्टीत बाणवण्याचे मोठे कार्य गांधी यांनी केले.

'भारत छोडो आंदोलन' आणि 'दुसरे महायुध्द' घडत असताना भारतातील पत्रसृष्टी स्वातंत्र्यलढ्याचे यथोचित चित्रण करण्याचे उल्लेखनीय काम करीत होती. जातीय दंगली आणि देशाच्या फाळणीला तिने विरोध केला. दि नॅशनल हेराल्ड, हिंदुस्थान टाइम्स, दि ड्रायब्युन या पत्रांनी दुसरे महायुध्द आणि 'भारत छोडो' आंदोलनात लढा दिला.

*****

पाठ क्र. ६
इ. स. १९७४ नंतरची पत्रसृष्टी

१९५६ नंतर पत्रसृष्टीने संपूर्ण स्वातंत्र्य अनुभवले. पत्रसृष्टीच्या स्वातंत्र्याबद्दल जवाहरलाल नेहरु यांना दृढमूल विश्वास होता नेहरुंजवळ पत्रकारितेची अव्वल कौशल्ये होती. 'नॅशनल हेरॉल्ड' चे माजी संपादक चलपती राव यांनी आपल्या एका पुस्तकात नेहरुंची पत्रकारिता कौशल्ये उल्लेखली आहेत. नेहरुंनी एकदा एका सभेचा वृत्तान्त लिहिला. तो इतका यथातथ्य आणि उत्तमरीत्या लिहिला होता की अनेकजण चकित झाले होते. ''दडपलेल्या आणि नियंत्रणाखाली असलेल्या पत्रसृष्टीच्या तुलनेत स्वतंत्र असण्याचे सर्व धोके पत्करुनही मी संपूर्ण स्वतंत्र पत्रसृष्टीची निवड पत्करेन'' या शब्दांत नेहरुंची वृत्तपत्र स्वातंत्र्याबाबत आपले विचार प्रकट केले. घंटनेचा मसुदा तयार करताना झालेल्या समितीच्या चर्चेत अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यात वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो या मताचा पाठपुरावा केला. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा नागरिकांचा अधिकार स्वतंत्र भारताच्या घटनेने उचलून धरला. या स्वातंत्र्यात वृत्तपत्र स्वातंत्र्य अनुस्थूत आहे. निषेधार्ह वृत्तपत्रकायदे रद्द झाले वा बदलण्यात आले तरी 'ऑफिशियल सिक्रेटस् ॲक्ट' आणि द्वेष, जातीय तेढ आणि लष्कराला बंड करण्यास प्रवृत्त करण्याच्या संदर्भातील भारतीय दंडसंहिता अस्तित्वात होती. १९५१ 'द प्रेस ऑब्केक्शनेबल मॅटर्स ॲक्ट' सुचवला गेला व अस्तित्वात आला. त्यामागे जातीय विद्वेष पसरविणारे मोठ्या प्रमाणावरील विखारी लेखन. नियंत्रित करण्याचा हेतू होता. वृत्तपत्रांनी जोरदार विरोध केल्यामुळे हा कायदा १९५६ मध्ये मोडीत निघाला.

पहिल्या सार्वजनिक निवडणुकांची प्रचार मोहीम (१९५१-५२) राष्ट्रीय आणि प्रांतिक वृत्तपत्रांनी कुशलतेने प्रसिध्द केली. भाषावर प्रांतरचना, दुसरी व तिसरी निवडणूक, चीनचे आक्रमण आणि गोवा मुक्ती या वृत्तपत्रांनी प्रसिध्दी दिलेल्या आणखी काही महत्त्वाच्या घटना होत्या.

न्यायमूर्ती जी. एस्. राजाध्यक्ष, डॉ. झाकिर हुसेन आणि एम्. चलपती राव हे तीन महत्त्वाचे सदस्य असलेले 'प्रेस कमिशन' स्थापन केल्याची घोषणा नेहरुंनी १९५२ मध्ये केली. १४ जुलै १९५४ रोजी आयोगाने अहवाल सादर केला व पुढील शिफारशी केल्या.

१) केंद्राने 'प्रेस रजिस्ट्रार' ची नेमणूक करावी आणि राज्यातील त्याच्या अन्य सचिव सहकाऱ्यांनी वृत्तपत्रे आणि मासिके यांच्या संदर्भातली सर्व प्रकारची नोंद आणि आकडेवारी सिध्द ठेवावी.

२) वृत्तपत्रमंडळ स्थापन करावे. स्थायी स्वरुपाचे वृत्तपत्रमंडळ स्थापन करण्यात यावे. वृत्तपत्रांवर देखरेख ठेवणे आणि व्यापारविषयक तसेच संपादनविषयक किमान दर्जाकडे त्याने लक्ष द्यावे.

३) वृत्तपत्रावर संपादकाचे व्यवस्थापकीय नियंत्रण असावे. संपादन विभागातील नेमणूका त्याच्या सल्ल्याने व्हाव्यात. संपादकांच्या नेतृत्वाखाली आपण एका समाने उद्दिष्टासाठी काम करीत आहोत ही जाणीव सर्व कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण व्हावी.

४) वृत्तपत्राची पृष्ठे व वृत्तपत्राचे मूल्य यांचे गुणोत्तर निर्धारित करावे. तसे न केल्यास देशातील वृत्तपत्रांवर परिणाम होईल.

५) वृत्तपत्रविक्रेत्यांना सारख्या प्रमाणात कमिशन देण्यात यावे. ज्यायोगे भरघोस कमिशन देऊन गैरवाजवी स्पर्धा टळेल.

६) वृत्तपत्रांमधून 'बक्षिण कुपन्स' छापू नयेत. वृत्तपत्राच्या खपाची त्यामुळे होणारी वाढीव आकडेवारी दिशाभूल करणारी असते.

७) जाहिरातदरांनी नीतिसंहिता तयार करुन जाहिरातींची नैतिक श्रेणी उंचावण्याचा प्रयत्न करावा.

८) वृत्तपत्रांचे नियंत्रण ही मक्तेदारीची बाब होऊ नये म्हणून पावले उचलावीत.

९) जिल्हा वृत्तपत्रे वाढावीत म्हणून प्रयत्न व्हावेत. मासिकांची वृध्दी व्हावी म्हणून उत्तेजन द्यावे.

१०) वृत्तपत्रांकडून होणारे अतिरेकी वर्तन रोखण्यासाठी 'इमर्जन्सी लेजिस्लेशन' असावे. प्रेस (ऑब्जेक्शनेबल मॅटर्स ॲक्ट') मधील तरतुदी 'भारतीय दंड विधान' आणि 'गुन्हेगारविषयक कायदे' यांच्यात समाविष्ट करु नयेत.

११) पत्रकारांचे कामाचे नियम वेतन व अन्य भत्ते या संदर्भात कायदेशीर तरतूद व्हावी. वृत्तपत्रआयोगाने वृत्तपत्रमंडळांपुढे पुढील उद्दिष्टे ठेवली.

(१) वृत्तपत्रस्वांतत्र्याचे रक्षण

(२) पत्रसृष्टीची स्वायतता टिकवणे

(३) पत्रसृष्टीतील घडामोडींचा अभ्यास करणे व मक्तेदारी येऊ पाहात असल्यास त्यावर उपाय सुचवणे.

(४) वृत्तपत्र मालकीच्या पध्दतींचा आणि वृत्तपत्रांच्या कामगिरीवर त्यांचा होणारा परिणाम यांचा पुनविचार करणे.

वृत्तपत्रआयोगाने नीतिसंहिता सुचवली. सचोटीने वृत्त गोळा करावे व प्रसिध्द करावे. त्यावर यथायोग्य मत मांडण्याचा व टीका करण्याचा त्यांना अधिकार आहे. या तत्त्वांची बूज राखली गेली पाहिजे. कर्तव्ये बजावीत असताना जबाबदारी या तत्त्वावरही आयोगाने भर दिला.

वृत्तपत्रमंडळ :

स्वांतत्र्य आणि जबाबदारी ह्या पत्रकारितेची निकोप वाढ होण्याच्या दृष्टीने दोन पूर्व अटी आहेत. लोकशाहीचे रक्षण करण्याचे कार्य पत्रकारिता करते. कोणत्याही बाजूने मग ते राज्यसरकार असो वा समाजाचा कोणाताही विभाग असो, स्वतंत्र्य पत्रसृष्टी कोणत्याही दबावांपासून मुक्त हवी. राजकीय किंवा अन्य हितसंबंध आणि पत्रसृष्टीतील विभागांच्या दबावापासूनही पत्रसृष्टी मुक्त असावी.

भ्रष्टाचार आणि इतर वाईट प्रवृत्ती समोर टिकाव धरण्यासाठी वृत्तपत्रांजवळ पुरेसे सामर्थ्य हवे म्हणून वृत्तपत्रे जबाबदार हवीत. लोकमानसात विश्वासर्हता निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रांनी विशिष्ट आचारसंहिता पाळली पाहिजे. वृत्तपत्रे आणि समाज यांच्यात परस्पर सामांजस्य निर्माण होण्याचे साधन सरकारच्या हातात नसून ते वृत्तपत्रांच्या हाती आहे, असे वृत्तपत्रांच्या पहिल्या 'ब्रिटीश रॉयल कमिशन'ने म्हटले आहे. वृत्तपत्रे जर जबाबदारीने वागली नाहीत आणि त्यांनी आचारसंहिता पाळली नाही तर त्यांना जाब विचारणारी एखादी यंत्रणा असायला हवी. शासन जाब विचारु शकते परंतु वृत्तपत्र स्वातंत्र्याशी सुसंगत असा मार्ग म्हणजे वृत्तपत्रांनी स्वनियंत्रण ठेवणे हा होय. या कल्पनेतून 'प्रसे काउन्सिल' किंवा 'कोर्ट ऑफ ऑनर' यांचा जन्म झाला. वृत्तपत्रांनी स्वतः संयम दाखवला नाही तर शासन नियंत्रण आणील. हे घडता उपयोगाचे नाही. सरकारवर अवलंबून न राहता वृत्तपत्रांनी स्वतंःचा कारभार स्वतः चालवला पाहिजे. सरकारचा हस्तक्षेप आणि प्रभाव यांच्यापासून मुक्त असलेली स्वनियंत्रण ठेवणारी यंत्रणा वृत्तपत्रांनी निर्माण केली पाहिजे. पत्रकारितेची आचारसंहिता न पाळल्याबद्दल कारवाई करणे व पत्रकारितेचा उच्च दर्जा टिकवणे हे एक कार्य एका बाजूला तर दुसरीकडे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे रक्षण करणे हे वृत्तपत्रमंडळाचे कार्य आहे.

प्रेस काडन्सिल ॲक्ट १९७८ मध्ये अस्तित्वात आला. त्यानुसार पहिले वृत्तपत्रमंडळ १९७९ मध्ये स्थापन झाले. १९८२ मध्ये दुसरे, १९८५ मध्ये तिसरे आणि २८ सप्टेंबर १९८८ रोजी चौथे वृत्तपत्रमंडळ स्थापन झाले. वृत्तपत्रे आणि वृत्तसंस्था यांचा दर्जा टिकून राहावा आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य सुरक्षित राहावे या हेतूंसाठी वृत्तपत्रमंडळांची निर्मिती झाली. न्यायमूर्ती आर. एस्. सरकारिया विद्यमान अध्यक्ष आहेत. लोकशाहीच्या गाडा सुरळीत चालण्यासाठी वृत्तपत्र स्वातंत्र्य अत्यंत गरजेचे आहे याची नेहरुंना जाणीव होती. संपादकाच्या स्वातंत्र्याच्या बाजूने ते ठाम उभे राहिले. पंतप्रदान या नात्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांशी विचारविनिमय केला. नेहरू स्वतः उत्तम पत्रकार होते. 'नॅशनल हेरॉल्ड' या वृत्तपत्राचे संस्थापक आणि अध्यक्ष या नात्याने स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी संपादकीय धोरण आणि वृत्तमांडणीच्या संदर्भात आपलेपणाने मार्गदर्शन केले. नेहरुंचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते आणि ते साध्या व सुबोध शैलीत लेखन करीत.

नेहरुंनी कलम १९(२) च्या घटना दुरुस्तीला पाठिंबा दिला असला आणि 'प्रेस ऑबजेक्शनेबल ॲक्ट १९५१' संमत होण्यास मदत केली असली तरी त्यांचा काटेकोर अंमल त्यांनी केला नाही. जातीय फुटीरता, भिन्न राज्यांची मागणी आणि हिन्दीला विरोध या गोष्टी दिसल्या नसल्या तर त्यांनी घटना दुरुस्ती विधेयक मांडले नसते असेही म्हणता येईल.

आणीबाणीच्या काळातही (१९६१, चीनचे आक्रमण) वृत्तपत्रांवर कमीत कमी निर्बंध होते. पत्रकारांनी त्यांच्यावर घातलेल्या मर्यादांची मोठ्या प्रमानात कदर राखली. स्वातंत्र्योत्तर काळातील पत्रसृष्टीने नवीन सरकारला आवाजवी सहकार्य दिले आणि त्याच्या धोरणांवर टीकाटिप्पणी करण्यात वृत्तपत्रे अपयशी ठरली. चीनच्या आक्रमणाचे व त्या राष्ट्राबरोबरच्या संघर्षाचे स्वरुप जाणून घेण्यात नेहरूंनी अदूरदर्शीपणा दाखवला असला आणि लष्करी तयारीचा कमकुवतपणा उघड केला असला तरी वृत्तपत्रे जबाबदार विरोधकाची भूमिका घेण्यात कमी पडली, अपयशी ठरली. मात्र इंदिरा गांधींच्या काळात वृत्तपत्रांनी ही भूमिका बजावलेली दिसते.

इंदिरागांधीची राजवट :

सरकार आणि वृत्तपत्रे यांच्या परस्परसंबंधांच्या संदर्भात नेहरु राजवटीच्या विरोधी चित्र. या काळात पाहावयास मिळाले. बँकांचे, विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे थांबवणे या त्यांच्या निर्णयांमुळे व्यापारीवर्गात घबराट पसरली. उद्योगपतींच्या मालकांच्या वृत्तपत्रांनी विरोधी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

आणीबाणी घोषित केल्यानंतर केंद्राने नियंत्रनाचे आदेश जारी केले. २६ जून १९७५ च्या संदर्भातील हे आदेश मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांना कळविण्यात आले. आणीबाणीच्या संदर्भातील केंद्राने केलेल्या कृतींच्या बातम्या, मतेमतांतरे, अफवा वा अन्य कोणतेही वृत्त प्रसिध्द करण्यास प्रतिबंध घालण्यात आले. १९७१ चा 'मिसा' कायदा (मेंटेनन्स ऑफ इन्टरनल सिक्युरिटी ॲक्ट), डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट आणि अन्य कायद्यांनुसार प्रमुख अधिकाऱ्याला (चीफ सेन्सॉर) निर्बंदावर देखरेख व मार्गदर्शन करण्याचे अधिकार दिले गेले.

कोणतेही दैनिक, नियतकालिक वा छापीळ दस्तऐवज प्रकाशनापूर्वी सरकारी अधिकाऱ्याला तपासणीसाठी सादर करावे लागत. या काळात प्रमुख अधिकारी प्रत्येक दैनिकाकडे वृत्तपत्रातील मजकूर आणि छायाचित्रे या संदर्भातील सूचना पाठवीत असे. 'इंडियन एक्स्प्रेस' ने नंतर दैनिकाचे 'सेन्सॉर' झालेले एक पान प्रसिध्द केले होते. त्यावर फारच थोड मजकूर आणि खूप रिकामी जागा दिसत होती.

आणीबाणीत अनेक पत्रकार अटकेत होते; वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांवर धाडी घालण्यात आल्या आणि मुद्रणालयांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. पत्रसृष्टीने आणीबाणीच्या विरोधात उभे ठाकण्याचे धैर्य दाखवले नाही. अभिवादन करावे, दबून रहावे एवढी अपेक्षा असताना वृत्तपत्रांनी सपशेल लोटांगण घातले.

आणीबाणीच्या काळात पुढील विदेशी पत्रकारांना देशाबाहेर घालवून देण्यात आले. 'लंडन टाइम्स' चे पीटर हॅझलहर्स्ट, 'न्यूजवीक' चे लॉरेन जेनकीन्स 'लंडन डेली टेलिग्राफ' चे पीटर गिल आणि 'वॉशिंग्टन पोस्ट' चे लुईस एम्. सायमन. 'पांचजन्य' (साप्ताहिक), 'तरुण भारत' (दैनिक) आणि राष्ट्रधर्म (मासिक) ही जनसंघाची हिन्दी प्रकाशने उत्तरप्रदेशात पोलिसांनी दंडेली करुन बंद पाडली. प. बंगाल येथे 'अमृत बझार पत्रिका' चे पत्रकार गौरी किशोर घोष आणि वरुन सेन गुप्ता यांना अटक झाली. पिलू मोदी याचे 'मार्च इंडिया', जे. पी. चे 'एव्हरीमॅन' आणि 'प्रजानीती', जॉर्ज फर्नांडिस यांचे 'प्रतिपक्ष' या नियतकालिकांचे प्रकाशन थांबविण्यात आले. नानासाहेब गोरे यांचे 'जनता' आणि एस्.एम्. जोशी संपादक असलेले मराठीतील 'साधना' ह्या नियतकालिकांवर बंदी घालण्यात आली.

सरकारच्या दडपशाहीच्या कारवायांना 'इंडियन एक्स्प्रेस' आणि 'स्टेटस्मन' या वृत्तपत्रांनी धैर्याने तोंड दिले. आणिबाणीचे फायदे प्रसिध्द करण्याच्या सरकारच्या दबावाला 'इंडियन एक्स्प्रेसने' थंड प्रतिसाद दिला. एक्स्प्रेस न्यूज सर्व्हिसचे संपादक कुलदीप नायर यांना त्यानंतर सरकारने अटक केली. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स रद्दबातल ठरवले आणि सरकारमान्य सदस्य असलेले बोर्ड ऑफ डायरेक्टर्स नियुक्त केले. १९७५ मध्ये 'स्टेटस्मन' मधील केंद्र व राज्य शासनाच्या सर्व जाहिराती बंद झाल्या. 'समाचार' या एका वृत्तसंस्थेत सर्व वृत्तसंस्था विसर्जित करण्यात आल्या. 'प्रेस काडन्सिल' चे काम थांबले. 'प्रसे काडन्सिल ॲक्ट १९६५ खाली नोव्हेंबर १९६६ ते १९७६ जानेवारी पर्यंत त्यांचे काम चालू राहिले होते. परंतु आणीबाणीच्या राजवटीत 'प्रेस काडन्सिल' गुंडाळण्यात आली. तरीही भूमिगत पत्रसृष्टी मात्र चांगलीच सक्रिय होती. ३४ पेक्षाही जास्त छापखाने सापडले आणि सुमारे ७००० लोकांना भूमिगत वृत्तपत्रे छापल्याबद्दल आणि त्यांचे वितरण केल्याबद्दल अटक करन्यात आली. ए.डी. गोरवाला यांचे 'ओपिनियन', 'क्वेस्ट' आणि अन्य मासिके दडपशाहीने बंद करण्यात आली. आणीबाणीच्या विरोधातले साहित्य गुजरात, तामिळनाडू, बिहार आणि महाराष्ट्रात विपुल निर्माण झाले. जे.पी. (जयप्रकाश नारायण) आणि जॉर्ज फर्नांडिस यांची पत्रे नियमितपणे प्रसिध्द झाली. एकट्या बिहारमधून सुमारे २००० नियतकालिके वितरित झाली. वृत्ते आणि अवतरणे (वक्तव्ये) असलेल्या वृत्तपत्रिकांच्या स्वरुपात आर. एस्.एस्. ने भूमिगत साहित्य प्रसिध्द केले. हे साहित्य इंग्रजी आणि प्रमुख भारतीय भाषांत प्रसिध्द होत असे. परदेशस्थ भारतीय भाषांत प्रसिध्द होत असे. परदेशस्थ भारतीयांनी आणीबाणीच्या विरोधात असलेले साहित्य प्रसिध्द केले. उदा. स्वराज्य (इंग्लंड), इंडियन ओपिनियन (यू. एस्. ए.)

जनता सरकारची राजवट :

इंदिरा गांधी १९७७ च्या निवडणुकात पराभूत झाल्या. एकाधिकारशाही राजवटीला नकार आणि लोकशाहीच्या मूल्यांचा विजय असा या पराभवाचा अर्थ वृत्तपत्रांनी लावला. ''त्यांचे राज्य, त्यांचे नेतृत्व आणि त्यांनी लादलेली आणीबाणी यांना (लोकांनी) ठोकरले'' अशी प्रतिक्रिया 'दि. लंडन टाइम्स' ने व्यक्त केली.

लंडन टाइम्सने नव्या सरकारला राष्ट्र उभारणीच्या अवघड कार्याबद्दल सावध केले. भारतीय वृत्तपत्रांना आनंद होणे स्वाभाविकच होते. जयप्रकाशनारायण आीन मोरारजी देसाई यांचे मोठे फोटो पहिल्या पानावर छापले आणि 'जनता पार्टी'च्या विजयाच्या विस्तृत बातम्या छापल्या. 'आणीबाणी असो वा नसो, मूलभूत अधिकारांना (हक्कांना) धक्का लावता कामा नये. घटनेने ते सांभाळले पाहिजेत. असे एका मुलाखतीत पंतप्रदान मोरारजी देसाई यांनी सांगितले. माहिती आणि नभोवाणी खात्याचे मंत्री म्हणून एल. के. अडवाणी यांची नेमणूक झाली. देसाई यांच्या सरकारमधील इतर अनेक मंत्र्याप्रमाणे आणीबाणीच्या काळात अडवानींनी तुरुंगवास भोगला होता. त्यांना पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव होता. १९६० ते १९६७ या अवधीत ते 'ऑर्गनायझर' चे सह संपादक होते. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर घाला घालणारे कायदे रद्द करण्याचा मनोदय त्यांनी जाहीर केला. एका महिन्याच्या आत देसाई सरकारने 'प्रिव्हेन्हान ऑफ पब्लिकेशन ऑफ ऑब्जेक्शनेबल मॅटर ॲक्ट १९७६' रद्द केला. 'पार्लमेंटरी प्रोसिडिंग्ज (प्रोटेक्शन ॲन्ड पब्लिकेशन) ॲक्ट १९७७ संमत झाला. आणीबाणीत गमावलेले वृत्तपत्र स्वातंत्र्य पत्रसृष्टीला मिळाले व पूर्वीच्या दर्जा परत मिळाला. प्रख्यात पत्रकार कुलदीप नायर यांच्या अध्यक्षतेखाली 'दुसरा वृत्तपत्र आयोग' नेमण्यात आला. भारतीय पत्रसृष्टीच्या सर्व बाजूंवर विचार करण्याचे काम आयोगाकडे आले. माध्यमांना स्वायत्तता देता येईल किंवा नाही विशेषतः सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या आकाशवाणी व दूरदर्शनच्या संदर्भात चाचपणी करण्यासाठी 'व्हर्गिस कमिशन' नेमले गेले. आकाशवाणी आणि दूरदर्शनवर विरोधी पक्षांना प्रक्षेपणाची समान संधी मिळावी ही शिफारस आता प्रत्यक्षात अवतरली आहे.

पत्रसृष्टीच्या स्वातंत्र्याच्या संदर्भातील देसाई यांच्या भाषणांना वृत्तपत्रांनी पुरेशी प्रसिध्दी दिली. तसेच त्यांनी देसाईवर अकारण टीका केली नाही.

भारतीय वृत्तपत्रांनी देसाई यांच्याविषयी आदरभाव बाळगला असला तरी राजकीय, आर्थिक तसेच सामाजिक अनागोंदीकडे त्यांना डोळेझाक करता आली नाही. कामगारांचे संप, विद्यार्थ्यांची हिंसक आंदोलने, चलन फुगवट्यात वाढ, राजकीय गोंधळ, पक्षफुटीचे प्रकार, मंत्र्यांचे राजीनामे आणि इंदिरागांधी वरील खटल्यांची अपयशी हाताळणी या विषयांवरील बातम्या १९७७ ते १९७९ या काळात वृत्तपत्रांनी दिल्या.

१९८० च्या सार्वत्रिक निवडणुकांत इंदिरा गांधी यांना निर्विवाद बहुमत मिळाले. ५२५ लोकसभा जागांपैकी दोन तृतीयांश जागा त्यांच्या पक्षाने मिळवल्या. विरोधी पक्षांवर इतके वर्चस्व प्रस्थापित झाले की, या निवडणुकांत कोणत्याही विरोधी पक्षाला ४१ हून अधिक जागा मिळाल्या नाहीत.

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यावर लगेचच त्यांना आणीबाणीत वृत्तपत्रांवरील नियंत्रणाबद्दल विचारले असता त्या म्हणाला – ''फार गंभीर आणि जुन्यापुराव्या रोगावरीळ सेन्सॉरशिप हा एक खास उपाय होता. हा विशिष्ट प्रकारचा आजार पुन्हा देशाला सतावेल असे आम्हाला वाटत नाही आणि पुन्हा तेच जालिम औषध देण्याचा आमचा विचार नाही.''

या उत्तरामधून सावधपणा डोकावतो; अन्यथा वृत्तपत्रांशी इंदिरागांधीचे संबंध कधीच सौहार्दपूर्ण नव्हते.

१९८० नंतरच्या भारतीय राजकारणातील परवलीचा शब्द 'सावधानता' हा होता. सत्तारुढ पक्ष, वृत्तपत्रे आणि जनता हे सारेच सावध झाले आणि यापैकी कोणत्याही एका गटाकडून काही अतिरेकी कृत्य झाले. तर अन्य घटकांचा त्यावर दबाव येत असे.

राजीव गांधीच्या काळातील पत्रसृष्टी :

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यावर पत्रकारांशी झालेल्या वार्तालापात राजीव गांधी यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याचा उच्चार केला. परंतु वृत्तपत्रांसमवेत त्यांचे सौहार्द फार काळ टिकले नाही. ८ जुलै १९८५ रोजी पत्रकार परिषदेत त्यांनी केलेल्या दोन विधानांमुळे त्यांची प्रतिमा डागाळली आणि वृत्तपत्रांकडून विरोधी प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या. त्यांनी आणीबाणीचे समर्थन केले आणि १९७५ सदृश परिस्थिती निर्माण झाली तर ते पुन्हा आणीबाणी लादायला मागेपुढे पाहणार नाहीत असे आग्रही मत त्यांनी मांडले. दुसरे वादग्रस्त मत त्यांनी मांडले आणि आकाशवाणी व दूरदर्शन यांच्या स्वायत्ततेला स्पष्ट नकार दिला आणि ही इलेक्ट्रॉनिक माध्यमे वृत्तपत्रांप्रमाणे (बेलगाम) वागू शकणार नाहीत असे म्हटले. वक्तव्यांमधून

एकाधिकार शाहीची जी प्रवृत्ती डोकावत होती तिची गंभीर दखल 'स्टेटस्मन', 'इंडियन एक्स्प्रेस' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' च्या संपादकीयांमधून घेतली गेली आणि राजीव गांधींच्या विधानांवर टीका करण्यात आली. १९८५ – ८६ मध्ये वृत्तपत्रे आणि राजीव गांधी यांचे संबंध अधिकच बिघडले. मोठ्या उद्योगसमूहांवर आयकर खात्याने घातलेल्या धाडी, अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ, काँग्रेसमधील घडामोडी आणि मुस्लिम महिलांविषयक बिल या विषयांवर वृत्तपत्रांनी टीका केली. 'रशिंग बॅकवर्डस्' (द. टाइम्स ऑफ इंडिया) आणि 'गिव्हिंग इन टू द फंडामेंटलिस्टस्' ('हिंन्द', ८ मे १९८६) या अग्रलेखांनी मुस्लिम महिलांच्या विधेयकाच्या संदर्भात राजीव गांधी सरकारला दोषी ठरवले आणि एकविसाव्या शतकात नेण्याची भाषा करणाऱ्या पण प्रतिगामी धोरणांना बळी पडणाऱ्या (राजीव गांधी सरकारवर) वृत्तपत्रांनी कठोर टीका केली.

राष्ट्रपती – पंतप्रधान यांचे परस्परसंबंध आणि पंतप्रधान विरुध्द माजी केंद्रीय अर्थमंत्री व्ही. पी. सिंग या वादग्रस्त प्रश्नांच्या संदर्भात वृत्तपत्रांनी घेतलेल्या भूमिकेचे सटीक परीक्षण करणे आवश्यक आहे. काही वर्तमानपत्रात मतेमतांतरे वृत्त म्हणून छापली गेली. मते मांडण्याचे स्वातंत्र्य असते खरे; परंतु वृत्ताचे 'वृत्तपण' जपणे महत्त्वाचे असते या दंडकाप्रमाणे विचार केल्यास वृत्तपत्रे नीतिसंहिता सोडून वागली असे म्हणावे लागेल. मतांची योग्य जागा संपादकीय पृष्ठावर असते. वरील वादग्रस्त प्रश्नांच्या संदर्भातील मते पक्षपाती होती आणि त्यांनी वस्तुनिष्ठ चित्रण केले नाही. आघाडीच्या दैनिकाच्या पत्रकारांची पक्षपातीपणाची प्रवृत्ती आणि आपल्या व्यवसायमाला राजकीय रंग देण्याचा त्यांचा प्रयत्न यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे मोठा यशप्रश्न पडला आहे.

भारतीय पत्रकारितेतील प्रवृत्ती :

स्वातंत्र्यानंतर इंग्रजी दैनिके प्रभाव आणि लोकप्रियता या दोन्ही बाबतीत आघाडी दाखवीत आहेत. इंग्रजी वृत्तपत्रांची संख्या व त्यांचा खप या दोन्ही बाबतीत सतत वाढ होत राहिली आहे असे आकडेवारी दर्शविते. इंग्रजी वृत्तपत्रांच्या मालकांनी भारतीय भाषांत वृत्तपत्रे प्रसिध्द करणे हे या कालखंडातील आणखी एक लक्षणीय वैशिष्ट्य आहे.

१९६८ मध्ये अनेक आवृत्या असलेली २८ दैनिके होती आणि त्यांच्या ७१ आवृत्या निघत. अनेक आवृत्या निघणारी दैनिके एकूण खपाच्या ३७% भाग व्यापून टाकीत होती. उदाहरणार्थ 'इंडियन एक्स्प्रेस' एकाच वेळी ७ शहरामधून प्रसिध्द होत असे आणि त्याचा सर्वाधिक खप होता. (४ लाख – 'प्रेसइन इंडिया' १९६९) इंग्रजी वृत्तपत्रांचा खप १९५६ पासून सर्वाधिक आहे. आजही हा प्रवाह कायम असल्याचे या पाठाच्या शेवटी दिलेल्या आकडेवारीवरून दिसते. भारतीय भाषांतील वृत्तपत्रांचा खप सातत्याने वाढत असला तरी इंग्रजी वृत्तपत्रांच्या प्रमाणात तो नाही. हिन्दी ही राष्ट्रभाषा असली तरी सर्व राज्यातून प्रसिध्द होणारी इंग्रजी दैनिके राज्या राज्यातील संपर्काचे माध्यम म्हणून कार्य करीत आहेत असेच दिसून येते. मल्याळम आणि तामिळ वृत्तपत्रांचा खप प्रचंड वाढला आहे. हा खप हिन्दी भाषेतील वृत्तपत्रांच्या मानाने कमी पर मराठी, गुजराती आणि बंगाली भाषांतील दैनिकांपेक्षा अधिक आहे. अहिंदी भाषिक प्रदेशात इंग्रजी वृत्तपत्रे सामार्थ्यवान आहेत; तर हिन्दी भाषिक प्रदेशात ती कमकुवत आहेत, असे राज्यांतील खपाची आकडेवारी दर्शविते. ७०% पेक्षाही अधिक हिन्दी वृत्तपत्रे लहान शहरे व गावांतून प्रसिध्द होतात. (प्रेसइन इंडिया १९६९) लहान शहरे व गावे दैनिकांच्या बाबतीत अधिक सक्रिया आहेत. नियतकालिके त्यामानाने कमी आढळतात. इंग्रजी किंवा भारतीय भाषांपैकी एकही दैनिक संपूर्ण देशभर खप असणारे राष्ट्रीय दैनिक होऊ शकलेले नाही, ही लक्षणीय बाब आहे, असे एखादे हिन्दी दैनिक अस्तित्वात येईल काय हे काळच सांगेल.

१९५९ पासून भारतीय पत्रसृष्टीची आश्चर्यचकित करुन टाकील अशी प्रचंड वाढ झाली. 'टाइम्स' ग्रुपचा हिन्दी पेपर 'नवभारत टाइम्स' १९५० मध्ये सुरु झाला. १९६० पर्यंत त्याचा खप ६०,००० इतका होता आणि १९६९ मध्ये तो सुमारे दोन पट वाढला. (१ लाख ४० हजार); 'हिन्दुस्तान' नावाचे दुसरे एक दैनिक १९६० मध्ये ५७,००० इतक्या खपाचे होते. १९६९ मध्ये त्याचा खप १ लाख दहा हजार इतका वाढला. बंगाली वृत्तपत्र 'आनंद बझार पत्रिका' १ लाख ७० हजारवरुन (१९६५) २ लाख ३० हजारावर पोचले (१९६९) इंग्रजी भाषेतील प्रचंड खपाच्या अनेक दैनिकांनी स्वातंत्र्यानंतर भारतीय भाषांत दैनिके सुरु केली ही भारतीय पत्रदृष्टीतील महत्त्वाची घटना होय. उदा. इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्र समूह चार भारतीय भाषांत दैनिके प्रसिध्द करीत आहे. त्यापैकी 'लोकसत्ता' (मराठी) आणि 'दिनमणी' (तमिळ) हे अत्यंत लोकप्रिय पेपर्स आहेत.

भारतीय पत्रकारिता – ठळक प्रवृत्ती :

भारतीय पत्रकारितेचा भविष्यकाळातील विस्तार छोट्या वृत्तपत्रांच्या निर्मिताने होईल. इंग्रजी व भारतीय भाषांत आज प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बातम्यांवर भर देतात. समाजाच्या उच्च आर्थिक श्रेणीच्या लोकांच्या

उपयोगाच्या वस्तूंच्या जाहिराती करतात. या उलट जिल्हा, तालुके येथून निघणारी लहान वृत्तपत्रे जिल्हावृत्ते अधिक देतील आणि बेताचे आर्थिक उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या गरजेच्या वस्तूंच्या जाहिराती देतील. कर्नाटकात अशी तालुक्याच्या ठिकाणाहून प्रसिध्द होणारी आणि स्थानिक बातम्या देणारी वृत्तपत्रे सुरुही झाली आहेत.

भारतीय भाषांतील पत्रांनी राज्यातील बातम्यांना अधिक जागा देऊन त्यांचे स्वतःचे असे स्थान निर्माण करायला हवे. जिल्ह्यातील आणि स्थानिक बातम्यांना त्यात स्थान मिळायला हवे. त्यांची लेखनशैलीही बदलली पाहिजे. 'अमृत बझार पत्रिके' ने अभिजात भाषा न वापरता बोलींचा वापर केला आणि शब्दांचे लेखनही सुबोध केले. त्यामुळे वृत्तपत्रांचा खप वाढला.

राजकारण्यांची लंबीचौडी भाषणे थोडक्यात द्यायची प्रवृत्ती अलीकडे दिसून येऊ लागली आहे. त्याऐवजी विशेषवृत्तांना अधिक जागा दिली जाते, महिला आणि लहान बालके यांच्यासाठी सदरे देण्याची प्रवृत्तीही आढळते. छायाचित्रे, व्यंगचित्रे आणि विनोदी किस्से यांची मागणी अलीकडे वाढली आहे. ड्र्यु पिअर्सन, वॉल्टर लिपमन, किंग्ज्ले मार्टिन या विदेशी पत्रकारांनी लिहिलेल्या विशेष सदरांना एकेकाळी मागणी असे. एम्. रॉय, फ्रेंच मोरायस, चलपती राव, मंकेकर, प्रेम भाटिया, दुर्गादास, के रंगास्वामी इत्यादी विशेष सदरे लिहिणारे लेखक निर्माण झाले. 'मिड डे' आणि 'डेली' हे टेब्लॉइड ही आकर्षक नियतकालिके वाचक आपल्याकडे खेचीत आहेत. नियतकालिकांनी मोडणी, सजावट आणि मुद्रण या बाबतीत नवीन तंत्रज्ञान वापरण्याची व्यावसायिकता दिसून येत आहे.

प्रातिंक आणि स्थानिक तसेच ग्रामीण भागातील वृत्तपत्रांचा उदय ही आणखी एक प्रवृत्ती दिसून येते. ग्रामीण पत्रसृष्टीचा उदय आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि केरळ या प्रातांत होतो आहे.

व्यापारी विषयक दैनिके व नियतकालिके अलीकडे मोठ्या प्रमाणात प्रसिध्द होत आहेत, शोधपत्रकारिता दैनिके आणि मासिके अशा दोन्ही ठिकाणी लोकप्रिय असे आहे.

राजकीय घटना आणि वक्तव्ये यांचे महत्त्व भारतीय पत्रसृष्टीत टिकून राहिले आहे. हा तिचा प्रमुख दोष दाखवला गेला आहे. देशातील विकास कार्यक्रमांचे वृत्त आणि वृत्तविश्लेषण याकडे दुर्लक्ष होत आहे. दलबदलविषयक लांबलचक वृत्तान्त आणि सत्तेवरुन खाली खेचण्याच्या खेळाचे तपशील वाचून उद्वेग तर येतोच पण देशातील घटनांचे अवास्तव चित्र उभे राहते. राजकीय घटनांचे वृत्त देण्याचे महत्त्व कमी होऊन विकास योजनांच्या वृत्तान्तांचे महत्त्व वाढविण्याची आज तातडीची गरज आहे.

लोकपालाची नेमणूक :

अमेरिकेतील काही वृत्तपत्रांनी लोकपाल या पदावर अनुभवी संपादकांची नेमणूक केली असून त्यांचे काम वृत्तपत्राच्या कामगिरीविषयक तक्रारींमध्ये लक्ष घालणे हे आहे. वृत्तपत्रांच्या कामगिरीबद्दल असमाधानी असणाऱ्या व्यक्तींना लोकपालाची नियुक्ती झालेली नसल्यास समाधानकारक उत्तरे मिळून त्यांच्या तक्रारींचे निवारण होणार नाही.

लोकपाल निष्पक्षपाती मध्यस्थाची भूमिका पार पाडतो. तो तक्रारी ऐकून घेतो, त्या लक्ष घालतो आणि काही सुधारणा प्रसिध्द करायची असेल तर त्याला तसा अधिकार असतो. काही तक्रार आलेली नसली तरी पुष्कळदा लोकपाल वृत्तपत्र वाचतो आणि वृत्तपत्राच्या कामगिरीवर मते प्रकट करतो. मोठ्या वृत्तपत्रांत हे पूर्ण वेळ पद असते.

'द वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राने पहिला लोकपाल १९७० मध्ये नेमला. त्यावर एका संपादकाने समाधान व्यक्त करणारी प्रतिक्रिया व्यक्त केली. ''लोकपाल नियुक्त होईपर्यंत आम्ही एका महत्त्वाच्या घटकाला मुकलो होतो. या अनिवार्य घटकाशिवाय कोणीही वार्ताहर वा वृत्तलेखक लोकांचा विश्वास प्राप्त करण्याचे कार्य समाधानकारकपणे करु शकत नाही. 'टाइम्स ऑफ इंडिया' ने सर्वोच्च न्यायालयांचे प्रमुख माजी न्यायमूर्ती पी.एन्. भगवती यांची लोकपाल या पदावर नियुक्ती केली आहे.

विदेशी माध्यमांचा बागुलबुवा :

केंद्र सरकारकडे निदान ७ तरी प्रस्ताव विदेशी वृत्तपत्रांकडून आले आहेत. भारतीय वृत्तपत्रांच्या सहकार्याने विदेशी वृत्तपत्रांना येथे काम करावयाचे आहे. 'फायनन्शियल टाइम्स', 'वॉलस्ट्रीट जर्नल', 'न्यूयॉक टाइम्स', 'द गार्डियन', 'द इंटरनॅशनल हेरॉल्ड ट्रायब्युन', टाइम्स मॅगॅझिन', 'द इ. यु. ई. ग्रुप ऑफ फ्रान्स' आणि 'द पॉलमान चेन' या आघाडीच्या वृत्तपत्रांच्या भारतीय आवृत्या काढण्याचा प्रस्ताव आहे. ह्या प्रस्तावात भाग घेण्यास पुढील भारतीय वृत्तपत्रे अनुकूल आहेत. 'आनंद बझार ग्रुप', 'बिझनेस स्टॅन्डर्ड' चे प्रकाशक, 'लिव्हिंग मिडिया', 'इंडिया टुडे' चे प्रकाशक 'मॅग्ना पब्लिकेशन्स', 'परेड' चे प्रकाशक आणि डेक्कन क्रॉनिकल.

पाश्चिमात्य वृत्तपत्रांना प्रवेश करु देण्यास प्रतिकूल असलेली एक फळी निर्माण झाली आहे. सांस्कृतिक साम्राज्यवादाचे एक साधन म्हणून उपयोग, पाश्चिमात्य उद्योग आणि विदेशनीतीच्या हितसंबंधांची जपणूक आणि तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे कट्टर विरोधक या दृष्टीने विदेशी वृत्तपत्रे धोका निर्माण करीत आहेत असे या पक्षाची म्हणणे आहे. या फळीच्या विरोधात विदेशी वृत्तपत्रांचे स्वागत करणारे पुरस्कतेही आहेत. विविध विचार प्रवाह, स्पर्धा आणि माहिती मिळवण्याचा वाचकांचा हक्क या कारणांसाठी पुरस्कर्त्यांना विदेशी वृत्तपत्रे भारतात यायला हवी आहेत. 'जागतिकीकरण' त्यांच्या मते आता थांबवणे शक्य नाही.

विदेशी माध्यमांचा भारतात प्रवेश हानिकारक ठरु शकतो असे मत न्या. आर्. एस्. सरकारिया (वृत्तमंडळाचे अध्यक्ष) यांनी व्यक्त केले आहे. सार्वभौम लोकशाही राष्ट्र म्हणून भारत कसा टिकून राहील हे भारतीय वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचे भवितव्य काय असेल यावर अवलंबून आहे.

या विषयावर चर्चा सुरु आहे.

पत्रकारितेतील प्रवृत्ती :

आशय आणि त्यांना महत्त्वाचे वाटणारे विषय या बाबतीत जागतिक वृत्तपत्रे अगदी विभिन्न आहेत. (ती भिन्न भिन्न प्रकारे कार्य करतात). भांडवलशाही देशांत वृत्तपत्रे ४० ते ६५% जागा वृत्ते आणि संपादकीय यांना देतात. राहिलेली जागा जाहिराती व्यापतात. नेहमीचे वृत्तपत्र वाचकांना पुढील विशेष मजकूर पुरवते. विशेषवृत्ते, छायाचित्रे, संपादकीय आणि निंबध, सदरे, वांचकांची पत्रे, आमंत्रित लेखकांकडून आणि व्यावसायिक पत्रकारांकडून येणारे लेखन, वृत्त पृथक्करण, मोठी शब्दशः भाषणे, शासकीय घोषणा, कॉमिक्स आणि व्यंगचित्रे, शब्दकोडी आणि इतर कोडी, हवामान वृत्त (नकाशांसह), कुंडली, ग्रहमान आणि अन्य हलकीफुलकी वृत्तपत्रीय सामग्री, शेअरबाजारविषयक तक्ते, आलेख आणि संपादकीय पृष्ठावरील मनोरंजक स्वरुपाचे अन्य लेखन.

साम्यवादी देशातील वृत्तपत्रांवर वृत्त सादरीकरणाच्या बाबतीत कडक निर्बंध असतात. गुन्हेगारी, रोगराई यांच्या बातम्या ही वृत्तपत्रे अभावानेच देतात. शासकीय निवेदने, विकास आणि प्रगती याबद्दलच्या बातम्या, साम्यवादेतर देशांच्या विरुध्द अग्रलेखांतून प्रचार अशा प्रकारचे लेखन या वृत्तपत्रांत असते.

तिसऱ्या जगातल्या राष्ट्रातील वृत्तपत्रे सामान्यतः लहान आणि निकृष्ट छपाईची असतात. आर्थिक ओढ्ग्रस्तीची स्थिती असते. काही वृत्तपत्रे भांडवलदारी वृत्तपत्रांसारखी तर काही वृत्तपत्रे साम्यवादी वृत्तपत्रांसारखी असतात. ही वृत्तपत्रे मजकुराबाबत सातत्यपूर्ण धोरण दाखवीत नाहीत असे सर्वसामान्यपणे म्हणता येईल. एकाच वृत्तपत्रातून पाश्चिमात्य धर्तीची सनसनाटी वृत्ते आणि राष्ट्रीय विकासासंबंदाच्या प्रदीर्घ निबंधांचा व लेखांचा समावेश असेल.

वृत्तपत्रांची वाढ आणि वाचकवर्ग यांना खीळ बसल्याचे दिसून येते. दैनिके नाहीत अशी आफ्रिकेतील अनेक देशांची स्थिती आहे आणि १० अफ्रिकन देशात वृत्तपत्रांचा (खप) (खरेदीदार) दर हजार लोकांमध्ये २० इतका आहे, असे युनेस्कोने नमूद केले आहे. विकसनशील देशांत वृत्तपत्रे हा शहरी व उच्चभ्रू लोकांचा संपर्कव्यवहार मानला जातो. वृत्तपत्रांच्या खपावरुन वृत्तपत्रांचे महत्त्व किती आहे किंवा नाही हे सांगता येणे अवघड आहे असे एक मत वृत्तपत्रप्रसाराच्या बाजून व्यक्त केले जाते.

जगभर वृत्तपत्रांच्या विकासाला अडथळे येत असले, तरी पत्रसृष्टी वाढते आहे, प्रत्येक खंडावर नवी प्रकाशने उदयाला येत आहेत. विशिष्ट समूहांच्या गरजा पुरविण्याचे कार्य त्यापैकी बरीच दैनिक करीत आहेत. १९७० नंतर युरोपमध्ये वृत्तपत्रे संथ गतीने वाढत आहेत. अनेक आर्थिक प्रश्न भेडसावीत असतानाही पत्रसृष्टी अजूनही सशक्त आहे. आफ्रिका, द. अमेरिका आणि आशिया या खंडातील वृत्तपत्रे लहान आहेत व त्यांना संघर्ष करावा लागतो आहे. अधिकाधिक तरुणांचा वर्ग प्रशिक्षण घेऊ लागल्याने या वृत्तपत्रांची गुणवत्ता वाढीस लागली आहे.

अधिकाधिक दैनिके प्रसिध्द होतात अशा शहरांपैकी 'मुंबई' हे एक शहर आहे.

जगभर वृत्तप्रसारणाच्या दृष्टीने जगभरात अशी काही विशिष्ट शहरे आहेत की ज्यांचे स्थान, मोठा आकार, राजकीय महत्त्व यामुळे त्यांना वृत्तसंकलन आणि वृत्तप्रसारणाची केंद्रे म्हणून महत्त्वपूर्ण स्थान मिळाले आहे. कलकत्ता, मुंबई, दिल्ली या महत्त्वाच्या शहरात मोडतात.

आंतरराष्ट्रीय दर्जाची वृत्तपत्रे :

जगभरातील बुध्दिजीवी वर्गावर आणि मतनेतृत्व करणाऱ्या लोकांवर प्रभाव पाडणाऱ्या वृत्तपत्रांना 'दर्जेदार' पत्रकारिता अशी मान्यता मिळते. राजदूत, शिक्षक, लेखक, वेदान्ती, अर्थतज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ या विचारवंताकडून 'दर्जेदार' पत्रकारितेला

मान दिला जातो. आपल्या देशांतील विद्यापीठे आणि ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावीत असे सर्व देशांमधील लोकांना वाटत असते. देशातील महत्त्वाच्या वृत्तपत्रांमध्ये आणि पत्रकारांपुढे ही वृत्तपत्रे आदर्श समजली जातात. या वृत्तपत्रांचा विशेष अधिकार व दबदबा असतो. या वृत्तपत्रांतील मजकूर उधृत केला जातो. (संदर्भ म्हणून त्यातील अवतरणे दिली जातात.)

जगातील 'दर्जेदार' वृत्तपत्रांमधून 'दर्जेदार' पत्रकारिता दिसून येते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धोरणांवर खराखुरा प्रभाव पडावा या हेतूने ही वृत्तपत्रे पत्रसृष्टीचे मतनेतृत्त्व करण्याच्या कार्याला वाहिलेली असतात. विचारी, शिक्षित आणि जबाबदार नागरिक या वृत्तपत्रांना सखोलता, समतोलपणा आणि निष्ठा या गुणांमुळे मान देतात. देशातील अन्य वृत्तपत्रांपुढे त्यांचा आदर्श असतो.

स्वतःच्याच देशात नव्हे तर अन्य देशांतही दर्जेदार वृत्तपत्रांनी प्रभाव पाडला पाहिजे; निदान लोकांनी त्यांची दखल तरी घेतली पाहिजे. दर्जेदार वृत्तपत्रे स्वाभाविकपणे दोन प्रकारची असतात. (१) स्वतंत्र देशात प्रसिध्द होणारी व (२) नियंत्रणाखाली असलेल्या वा एकाधिकारशाही असलेल्या देशात प्रसिध्द होणारी. प्रत्येक गटाचे एक पत्रसृष्टीशी संबंधित वा जबाबदारी या तत्त्वाला वृत्तपत्राचा दर्जा ठरवताना आज मोठेच महत्त्व दिले. चीन, जपान आणि भारत वगळता आशिया खंडात दर्जेदार वृत्तपत्रे जवळ-जवळ नाहीत असे म्हणता येईल. दर्जेदान व लोकप्रिय पत्रकारितेच्या बाबतीत जपान अत्यंत प्रगत आहे.

रशिया, चीन किंवा जपान त्यांच्या तुलनेत भारतापुढे दर्जेदार पत्रकारितेच्या संदर्भात गंभीर समस्या आहेत. बहुभाषिकता आणि आर्थिक टंचाई हे दर्जेदार पत्रकारितेच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत. सध्या प्रमुख दर्जेदार वृत्तपत्रे इंग्रजीत प्रसिध्द होत आहेत. 'स्टेटस्मन' (कलकत्ता), 'हिन्दु' (मद्रास) आणि टाइम्स ऑफ इंडिया' (मुंबई, दिल्ली) ही तीन अत्यंत महत्त्वाची वृत्तपत्रे आहेत. भाषेचा प्रश्न आणि त्याबरोबरीने, अल्प साक्षरताप्रमाण, अविकसित शिक्षण पध्दती, प्रशिक्षण सुविधांची कमतरता आणि प्रशिक्षित पत्रकारांची उणीव आणि जुनीपुराणी छपाई यंत्रणा हे प्रश्न भारतीय पत्रसृष्टीला भेडसावीत आहेत. मध्यमदर्जाची वृत्तपत्रे (ज्यांची संख्या लक्षणीय आहे) दर्जेदार वृत्तपत्रे आणि जनसामान्यांपर्यंत पोचणाऱ्या वृत्तपत्रांच्या अधेमध्ये येतात आणि जगातील वृत्तपत्रांची फार मोठी संख्या त्यांनी व्यापली आहे. (दर्जेदार आणि सामान्य वृत्तपत्रांचा सुवर्णमध्य साधतात).

पत्रसृष्टीची स्थितीगती आणि तिची उंची यथार्थपणे जाणण्यासाठी त्या देशातील दर्जेदार वृत्तपत्रांची पाहणी करणे आवश्यक ठरते.

सर्वाधिक खप असलेली दैनिक, १९९४

मल्याळ मनोरमा (५ युनिट्स) ७४८७८८.
टाइम्स ऑफ इंडिया (६ युनिट्स) ७११०६३.
पंजाब केसी (३ युनिट्स) ६१३९०३.
इंडियन एक्सस्प्रेस (१५ युनिट्स) ५३७७२७.
मातृभूमी (५ युनिट्स) ४९२६५८.
दि हिन्दु (७ युनिट्स) ४७८१३९.
ईनाडु (७ युनिट्स) ४७५८३०.
आनंद बझार पत्रिका - ४५८१०४.
संदेश (४ युनिट्स) ४३९१८६.
नवभारत टाइम्स (४ युनिट्स) ३८५४९९.
हिदुस्थान टाइम्स (२ युनिट्स) ३७७१९०.
डेली ठंथी (१० युनिट्स) ३६०४५८.
(मनोरमा इयर बुक) १९९५.

*****

पाठ क्र. ७
वृत्तपत्रांचे संघटन

प्रत्येज यशस्वी वृत्तपत्रामागे एक दूरदृष्टी, व्यवस्थापकीय कौशल्य व अपार मेहनत असलेली आपल्याला आढळून येते. वृत्तपत्रे ही केवळ लोकशाहीचा एक प्रमुख आधार एवढीच राहिलेली नसून त्यांनी आज एका फार मोठ्या उद्योगाचे स्वरुप धारण केलेले आहे. वृत्तपत्र उद्योगात भांडवलसकट उत्पादनाचे सर्व घटक असलेले आपल्याला दिसतात.

वृत्तपत्र छोटे असो वा मोठे, ते सरकारी मालकीचे असो नाहीतर त्याची मालकी एखाद्या व्यक्तीकडे किंवा उद्योगसमूहाकडे असो, फायदा व उत्पादनात प्रगती हे त्याचे उद्दिष्ट असते. राजकीय वा सामाजिक विचारांशी बांधिलकी ठेवणे हे इतर अनेक उद्दिष्टांपैकी एक असते.

कुठल्याही विकसित वृत्तपत्रसंस्थेमध्ये वृत्तपत्राची छपाई, त्यातील जाहिराती, त्याची विक्री व या गोष्टींचे व्यवस्थापन करण्याची संपूर्ण व कार्यक्षम अशी व्यवस्था असते. वृत्तपत्रसंस्थेमध्ये साधारणपणे तीन मुख्य विभाग असतात – यांत्रिकी, संपादकीय व व्यवस्थापकीय. व्यवस्थापकीय धोरणाखाली सारे विभाग नियंत्रित असतात. व्यवस्थापनाचे काम म्हणजे वृत्तपत्राचे धोरण ठरविणे व त्याला आर्थिक सहाय्य पुरविणे. हे धोरण पूर्णपणे स्वतंत्र प्रवृत्तीचे पूर्णपणे अलिप्त (neutral) अथवा एखाद्या विचारप्रणालीला बांधलेले असू शकते. राजकीय बांधिलकी असलेले वृत्तपत्र कुठलाही वाद उद्भवला तर त्यावेळी अमुक एका राजकीय पक्षाची वा राजकीय धोरणाची बाजू उचलून धरते, कारण त्या वृत्तपत्राला त्या पक्षांची तत्त्वे व मूल्ये यांबद्दल आदर व आत्मियता असते. स्वतंत्र वृत्तपत्र हे अमुक एका पक्षाला सातत्याने पाठिंबा कधीच देत नाही किंवा वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या पक्षांना पाठिंबा देऊ शकते. अलिप्त वृत्तपत्र मात्र कुठल्याही एका पक्षाची बाजू कधीच घेत नाही. बहुधा आपण असे पाहतो की बरीचशी वृत्तपत्रे ठराविक विषयांबाबतीत अलिप्त व अपक्ष असतात. सर्व विषयांवर अपक्षपणे लिखाण कुठलेही वृत्तपत्र करु शकत नाही कारण, असे वृत्तपत्र कणा नसलेले वृत्तपत्र म्हणून समजले जाईल. भ्रष्टाचार किंवा गुन्हेगारीसारख्या विषयांवर अलिप्त राहणे कुठल्याच वृत्तपत्राला शक्य नाही.

धोरण ठरविण्याव्यतिरिक्त वृत्तपत्राच्या कामकाजाचे अनुशासन, जाहिरातदारी, हिशोब, वृत्तपत्रसंस्थेतील सर्व विभागातील कर्मचारी लोकांची पदोन्नती, पगार इत्यादी बाबी, वृत्तपत्राची विक्री आणि वितरण ही कामेही विभागाला करावी लागतात. वृत्तसंस्थेचा मालक हा इतर कुठल्याही उद्योजकाप्रमाणेच एक उद्योजक असतो. त्याच्या व्यवसायामध्ये अनुशासनाकरता स्थापन झालेल्या मंडळावर (board) प्रत्येक विभागाचे प्रतिनिधी असतात ते वृत्तपत्राच्या आर्थिक बाबींकडे लक्ष पुरवितात. वृत्तपत्राचा मालक (व्यक्ती अथवा समूह) स्वतःच प्रकाशक असतो किंवा प्रकाशकाची नेमणूक करतो. साधारणपणे, सगळ्यात महत्त्वाचे अधिकारी म्हणजे मालक, प्रकाशक, व्यवस्थापक, वितरण व्यवस्थापक व बहुधा वृत्तपत्राचा संपादक हे त्या मंडळात असतात. वृत्तपत्राच्या अनुशासन विभागात इतर कार्यालयाप्रमाणे अधिकारी, अकाऊंटस्, लिपिक, टंकलेखक इ. कर्मचारी असतात.

१) वृत्तपत्राला जास्तीत जास्त उत्पन्न मिळवून देणारा विभाग म्हणजे जाहिरात विभाग होय. तो जर व्यवस्थित कार्य करत असेल तर वृत्तपत्राची भरभराट होते. वृत्तपत्राचे यश खालील गोष्टींवर अवलंबून असते. अ) त्यातील संपादकीय विभाग वाचकांच्या मनात पुरेशी उत्सुकता व स्वारस्य निर्माण करत असते तर; ब) यांत्रिकी विभाग (छपाई इ.) वृत्तपत्रास आकर्षक रुप देऊ शकत असेल तर; व क) वितरण विभाग वृत्तपत्राचे जास्तीत जास्त वितरण करु शकत असेल तर. जाहिरात विभागात जाहिरातींची 'कॉपी' एकत्रित केली जाते. हा विभाग जाहिरातदारांसाठी वृत्तपत्रातील जागा राखून ठेवणे, जाहिरातींची 'कॉपी' वनबून घेणे व त्यांसाठी जाहिरातदाराकडून मान्यता घेणे, जाहिरातींची बिले तयार करणे आणि शेवटी त्या कॉपीज् संपादकीय विभागात वृत्तपत्रांच्या पानांमध्ये जुळणीकरिता देणे, ही कामे करतो.

छोट्या जाहिराती (Classifieds) या वाचक आणि वृत्तपत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. जाहिरातींमुळेच वृत्तपत्राला बरेचसे उत्पन्न मिळते. वृत्तपत्राचे वितरण किती प्रमाणात होते, जाहिरातींच्या छपाईचा दर्जा आणि कमीत कमी वेळात प्रसिध्द होणाऱ्या जाहिराती यांच्यावर वृत्तपत्राची लोकप्रियता अवलंबून असते.

२) वितरण विभाग हा आणखी एक विभाग. या विभागातर्फे वृत्तपत्राचे घरोघरी वितरण होण्यास मदत होते. इतर विभाग वृत्तपत्रासाठी लागणारे सर्व साहित्य पुरवतात व हा विभाग वृत्तपत्र लोकांपर्यंत पोहचवतो. समाज, संपादकीय विभागाने जर उत्कृष्ट संपादन केले आणि ते वृत्तपत्र जर वेळीच वाचकाच्या हातात पडले नाही, तर संपादकाचे सारे कष्ट व कर्तृत्व व्यर्थ ठरतात म्हणून या विभागासाठी काम करणाऱ्यांमध्ये परस्पर सहकार्य असणे महत्त्वाचे असते. शहरी आवृत्ती किंवा डाक आवृत्ती या दोन्हींसाठी बातम्या शिळ्या होण्याअगोदरच त्यांचे वितरण होणे आवश्यक असते. एखाद्या महानगरातील वृत्तसंस्थेकडेच अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके यांचे वितरण होत असते तेव्हा या गुंतागुंतीच्या वितरणव्यवस्थेसाठी त्या वृत्तसंस्थेला स्वतःची वाहने आणि हवाई वितरणव्यवस्था यांची सोय करावीच लागते. वृत्तपत्राचे उत्कृष्ट संपादन, दूरवरचे वितरण, कमी किंमत या साऱ्या गोष्टी जमवणे ही वृत्तपत्रव्यवस्थापनाची एकच मोठीच कसोटी असते. त्यामुळे वितरणविभाग हा नेहमीच वेळेच्या तणावाखाली काम करत राहतो.

वृत्तपत्रसंस्थेतील इतर शासकीय व व्यवस्थापकीय कामे म्हणजे कार्यालये त्यातील सामानसुमानाची देखभाल करणे, वृत्तपत्रीय कागदाच्या साठ्याची नियमित देखबाल करणे, यंत्रसामुग्रीची देखभाल, वृत्तपत्राचा खप वाढविणे, पत्रव्यवहार, मासिके इ.ची पोच व वितरण इत्यादी सर्वसाधारण कामे होत. वृत्तपत्राची प्रगती व्हावी म्हणून वाचकांशी संपर्क व समन्वय साधणे, समाजातल्या इतर घटकांशी संपर्क राखणे, परदेशी वाचकवर्ग व परदेशी प्रवासी तसेच भेटी देणाऱ्या मंडळींशी सतत संपर्क राखणे इ. कामेही महत्त्वाची आहेत. तसेच वृत्तपत्राचीच जाहिरात करणे, त्यासाठी दूरचित्रवाणी, इतर वृत्तपत्रे, शहरातील मोठमोठे फलक यांचा उपयोग करणे, विविध स्पर्धा, प्रदर्शने यांचे आयोजन करणे ही कामे ओघाने आलीच. वृत्तपत्रसंस्थेच्या तांत्रिक विभागाचे काम म्हणजे वृत्तपत्राची छपाई. यात टाईप सेट करणे, गॅलिब बनवणे, बातम्या छापून पानांच्या डमीज तयार करणे ही कामे येतात. छपाई विभागाच्या 'कंपोजिंग रुम' मध्ये विविध प्रकारची टाईपसेटिंग करणारी यंत्रे असतात. या यंत्रांच्या सहाय्याने मूळ कॉपीचा (वृत्ताचा वा लेखाचा) प्रथम परिच्छेद (lead) आणि स्तंभ (column) यांची छपाई केली जाते. तसेच जाहिराती ठरलेल्या जागी छापल्या जातात, शीर्षकांची (leadlines) जुळणी होते व या साऱ्या गोष्टी वृत्तपत्राच्या पानावर योग्य त्या जागी योग्य त्या आकारात छापल्या जातात. या विभागातील 'एन्ग्रेव्हिंग रुम'मध्ये छापल्या जाणाऱ्या छायाचित्रांमध्ये सुधारणा केली जाते. तसेच विविध प्रकारची व्यंगचित्रे, हास्यचित्रे, शब्दकोडी, चित्रकथा इ. साहित्य व कलात्मक सजावटीचे काम (Art Work) या विभागातच केले जाते. अखेरची छपाई ही प्रत्यक्ष छपाई विभागातच (Press Room) होते.

३) वृत्तपत्रसंस्थेचा एक अतिशय महत्त्वाचा विभाग म्हणजे संदर्भ व संशोधन विभाग होय. या विभागात सर्व प्रकारची माहिती साठविली जाते. वेगवेगळ्या प्रकारची कात्रणे, संदर्भग्रंथ, ज्ञानकोश, छायाचित्रे, रेखाचित्रे, व्यंगचित्रे, आकृत्या इ. साहित्य व्यवस्थित संभाळून ठेवले जाते. या साहित्याचा फार मौलिक उपयोग सदरे वा लेख लिहिताना होतो. बातम्यांची कात्रणे, त्यांच्या फाईल्स, महत्त्वाच्या व्यक्तिंची चरित्रे इ. साहित्याचा उपयोग त्या व्यक्तिंच्या मृत्युनंतर मृत्युलेख लिहिताना अथवा त्यांच्या हयातीतही त्यांच्याविषयी इतर लिखाण करताना होतो. आजच्या विज्ञानयुगामध्ये या सगळ्या जमवलेल्या बातम्या व इतर माहिती 'ऑनलाईन डेटाबेस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संगणकीय माहितीकोशामध्ये समाविष्ट झाल्या आहेत. सुसज्ज व परिपूर्ण असा संदर्भ व संशोधन विभाग हा वृत्तपत्राच्या प्रगतीशीलतेचे प्रतिक आहे. इतिहासाचे जतन करणारा व वर्तमानाशी इतिहासाला जोडणारा तो एक दुवा आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास, दुसऱ्या महायुध्दातील नॉर्मंडीवरील हल्ल्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली त्या घटनेचे देता येईल. पन्नास वर्षांपूर्वीचा हा इतिहास सर्व प्रसारमाध्यमांतर्फे पुनश्च जिवंत केला गेला. जुनी छायाचित्रे पुनः छापली गेली, पण त्याशिवाय युध्दासंबंधी मध्यतरीच्या काळात जी नवी माहिती मिळविली गेली. तिच्या संदर्भात या महायुध्दाचा नवा अर्थ व नवीन दृष्टीही दिली गेली. स्तंभलेखक, सदरे लिहिणारे पत्रकार, संपादक व विशेषतः शोधपत्रकारितेसाठी (Investigative journalism) संदर्भ व संशोधनविभाग हा एक प्रेरणाचा स्त्रोत ठरलेला आहे.

४) शेवटी येतो तो संपादकीय विभाग. वर्तमानपत्र बनते ते या विभागात. वृत्तकथन, संपादन, प्रुफे तपासणे (मुद्रितशोधन), वृत्तपत्राची पाने तयार करणे वगैरे घाईगर्दीची कामे अव्याहतपणे जिथे चालू राहतात तो विभाग. ग्रामीण भागात असो वा एखाद्या महानगरात, संपादकीय विभाग हा नेहमीच कामात गर्क असलेला आढळून येईल.

संपादकीय विभागात बातम्या, सजावटीचे काम आणि इतर उपविभाग सामावलेले असतात. छोट्या किंवा ग्रामीण वृत्तपत्रांच्या मानाने महानगरातील वृत्तपत्राचा कर्मचारीवर्ग फार मोठा असतो. वृत्तपत्राचे वार्ताहर स्थानिक, राज्य पातळीवरील, आंतरराष्ट्रीय व जागतिक पातळीवरीळ बातम्या पुरवीत असतात; व्यंगचित्रकार व्यंगचित्रे देत असतात आणि छायाचित्रकार छायाचित्रे संपादक व त्याचे सहकारी अग्रलेख, लेख, स्तंभलेख सदरे लिहितात. संपादकीय विभाग हा या सर्वांच्या कॉपीज् बनवून त्यांची जुळणी व छपाई करावयास देतो. बातम्याचे मथळे (Headline) लिहिले जातात व चित्रे आणि छायाचित्रे पानांवर लावली जातात. सारी पाने पूर्ण तयार करण्यासाठी या विभागाला जाहिरातविभागाशी सतत संपर्क व सहकार साधावा लागतो.

वर्तमानपत्र मुख्यतः दोन भागात विभागात येते, बातम्या (News) आणि (Views). संपूर्ण वर्तमानपत्राचा मुख्य अधिकार संपादकाचा असतो, व सर्वांत महत्त्वाची जबाबदारीही त्याचीच असते. पण प्रत्यत्रात बातम्यांची बाजू वृत्तसंपादक (News Editor) संभाळतो तर संपादक त्याला वृत्तसंपादनामध्ये फक्त मार्गदर्शन करतो व संपादनाकडे स्वतः लक्ष देतो. महानगरातील वृत्तपत्रांच्या संपादकीय विभागात खेळ, संपादकीय लिखाण, आर्थिक बाबतींतले लेखन व संपादन, कला व संस्कृतीबद्दलचे संपादन, शहरी आवृत्तीचे संपादन, वैज्ञानिक लेखनाचे संपादन, महिलांच्याविषयीचे संपादन, रविवारच्या पुरवण्यांचे संपादन, तसेच ग्रंथालयाच्या बाबींचे आयोजन, वेगवेगळे स्तंभलेखन, साहित्यविषयक संपादन, प्रवास, विनिमय, शेती व बागकाम, संगीत व चित्रपट इ. प्रचंड विविधता असलेल्या विषयांवरचे संपादन करण्यासाठी खास संपादक असतात. संपादकीय विभागात या संपादकांखेरीज सहसंपादक, वार्ताहर, छायाचित्रकार, व्यंगचित्रकार तसेच लिपिका (clerical)

पासून कार्यालयास लागणारा तमाम कर्मचारीवर्ग येतो.

खालील तक्त्यावरुन या विभागाची कल्पना येईल.



पाठ क्र. ८

एकविसाव्या शतकाचे आव्हान

अंतरिक्षयुग, संगणकाचे युग, इलेक्ट्रॉनिक युग समजले जाणारे एकविसावे शतक अत्यंत वेगवान असणार आहे. येणाऱ्या शतकामध्ये दिवसातल्या चोवीसही तासात तत्काळ माहितीसाधनांना (Instant communication network) वाढत्या प्रमाणात सतत माहिती पुरवीत रहावे लागणार आहे. उद्याच्या गतिमान संस्कृतीसाठी त्वरित माहिती देणाऱ्या यंत्रणेची सज्जता प्रसारमाध्यमांना करावी लागणार आहे.

आज प्रसारमाध्यमांची वाढ झपाट्याने होत आहे. सतत बदलत जाणारी जीवनशैली आणि तिच्यासाठी लागणारी आत्यंतिक कार्यक्षमता यांच्यामुळे प्रसारमाध्यमांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. या जबाबदाऱ्या पार पाडायच्या तर त्यासाठी योग्य ते तंत्रज्ञान व योग्य हवेत. आज प्रसारमाध्यमांवर पडणारा ताण दोन प्रकारचा आहे – वेगाने वाढणारा प्रचंड वाचकवर्ग, त्याच्या आवडीनिवडी लक्षात घेणै आणि तितक्याच प्रचंड प्रमाणात येत राहणारी माहिती व ज्ञान हाताळून ते वाचकापर्यंत पोहोचविणे.

विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यामुळे बातम्या मिळविण्याची साधने व वर्तमानपत्र तयार होण्याची सारी प्रक्रिया या दोन्हींमध्ये जणू क्रांती घडून आली आहे. अमेरिका व जपानसारख्या देशांमध्ये स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्रांची कार्यालये ओळखू न येण्याइतकी बदलली आहेत.

टेलिप्रिंटवर येणाऱ्या माहितीवरुन बातम्या लिहून काढायचे दिवस कधीच संपले आहेत, कागद व शाई. कधीच भूतकाळात जमा झाले आहेत. संपूर्णपणे स्वयंचलित यंत्रसामुग्री असलेल्या आजच्या वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात पत्रकाराची बातमी ही सरळ पत्रकाराकडून किंवा उपसंपादकाकडून संगणकामध्ये 'व्हि. डी. टी.' (व्हिडिओ डिस्प्ले टर्मिनल) च्या सहाय्याने जाते, ती संपूर्णतः संपादित होऊनच संपादकीय विभागातील संगणकाला छोटासा दूरचित्रवाणीचा पडदा जोडलेला असतो. जसजसे उपसंपादक बातमीचे संपादन करीत जातो तसतशी ती पडद्यावर येत जाते. संपूर्ण पानाचे संपादन झाल्यानंतर ते मग वृत्तसंपादकाकडे पाठवले जाते.

टंकलिखित केलेले सारे साहित्य मुख्य संगणकापाशी (सेंट्रल प्रोसेसिंग युनिट) साठविले जाते. व्हि. डी. टी. वर आलेले लिखाण पुढेमागे सरकविता येते किंवा बदलताही येते. वृत्तपत्रांच्या कार्यालयात सतत माहिती पाठविण्यासाठी वृत्तसंस्था (न्यूज एजन्सीज्) संगणकांचीच मदत घेतात.

आधुनिक संपादकीय दालनात (न्यूज रुम) इलेक्ट्रॉनिक यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानेच संपादन केले जाते. प्रत्येक बातमीला एक कोडनंबर दिला जातो. पडद्यावर बातमी आली की उपसंपादक व्हि. डी. टी. वर लगेच संपादन करतो व तिला शीर्षक (हेडलाईन) देतो. बातमी देणारा वार्ताहरही व्हि. डी. टी. चाच वापर करुन ती उपसंपादकाकडे पाठवतो.

वृत्तपत्राच्या छपाई विभागातही आज खूप बदल घडले आहेत. पूर्वी वितळलेल्या शिशाचा उपयोग करुन लिनोटाईप वा मोनोटाईप मशीनवर अक्षरांची व ओळींची जुळणी करीत असत. आज 'टाईपसेटिंग' किंवा अक्षरजुळणी, अक्षरांचा आकार इ. गरम शिशाऐवजी 'शीत' पध्दतीने होतो. नवीन टाईपसेटिंग यंत्रामध्ये धातूच्या टाईपचा उपयोग करण्याऐवजी संपूर्ण पानाचे छायाचित्रण होते. संगणकाच्या मदतीने हे यंत्र अक्षरांचे छायाचित्रण करते व त्यानंतर वेगवान यंत्रावर संपूर्ण 'फोटोपेपर' किंवा छायाचित्रित पान 'डेव्हलप्' केले जाते, अक्षरांचे आकार व रेषा निश्चित केल्या जातात. अमेरिकन व जपानी वृत्तपत्रसंस्थांमध्ये ही सारी कामे स्वयंचलित यंत्रांद्वारे आपोआप, संगणकांच्या मदतीने पार पडतात. हळूहळू नजिकच्या भविष्यकाळात वर्तमानपत्राच्या बातम्या तयार करुन, चिकटवून पाने तयार करणे व टंकलेखन करणे या कामांचीही गरज स्वयंचलित यंत्रांमुळे नाहीशी होईल. आज आपल्याला मुळाबरहुकूम प्रत किंवा आवृत्ती (फॅसिमाईल न्यूजपेपर) उपलब्ध होऊ शकते. तयार केलेली पाने वृत्तपत्राच्या एका कार्यालयाहून दुसऱ्या कार्यालयात फॅक्सने पाठवता येतात आणि तिथे ती नुसती एकत्र करुन छापली जातात. अशा रितीने दूर अंतरावरील वाचकांपर्यंत वर्तमानपत्र सहज पोहचू शकते.

संगणकीकरण व स्वयंचलन यामुळे वृत्तपत्रसंस्थेतील संशोधन व संदर्भ विभागातून खूपच चालना मिळाली आहे. पुस्तके, फाईल्स, कात्रणे यांची देखभाल करणे हे जिकीरीचे काम असते. पण आज हे सारे साहित्य व सारे संदर्भ फ्लॉपीजमध्ये किंवा तबकडीमध्ये (कॉंपेक्ट डिक्स) साठवता येतात. जगभर पसरलेल्या संगणकीय जाळ्यांमुळे (कंप्युटर नेटवर्क) कुठलाही संदर्भ त्वरित मिळवता येतो.

आज 'डेटाबेसेस' किंवा 'ऑनलाईन लायब्ररीज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संगणकीयसेवा उपलब्ध झाल्या आहेत. त्यांच्याद्वारे पत्रकाराला अतिशय अचूक अशी माहिती फार मोठ्या प्रमाणात मिळू शकते. या संगणकीय जाळ्यांमध्ये इतकी माहिती असते की, ती वाचून हवे ते बारीकसारीक संदर्भ शोधण्यास कित्येक महिने लागतील. पण हे डेटाबेसेस किंवा माहितीचे साठे एका विशिष्ट शब्दाच्या (कोड) वापराने छाननी करता येतात व बारीकशी माहितीही अचूकपणे पकडता येते. हे परवलीचे शब्द अथवा 'कोडवर्डस्' अतिशय मेहनतीने, काळजीपूर्वक बनवलेले असतात म्हणून ते जर योग्य रितीने वापरले, तर कितीही प्रचंड प्रमाणात असलेले माहितीचे साठे काही मिनिटातच पिंजून काढता येतात. कित्येक दशलक्ष पाने मावेल एवढा मजकूर काही क्षणातच डेटाबेस व्यवस्थेमुळे उपलब्ध होऊ शकतो.

या ऑनलॉईन लायब्ररीज पूर्वीची वृत्तपत्रे, मासिके यांच्या आवृत्यांनी भरलेल्या असतात. हवाई बेटांवर असलेला एखादा वार्ताहर अतिशय जलद गतीने व कार्यक्षमतेने अमेरिका, जपान, रशिया, इंग्लंड इ. देशातील हजारो वृत्तपत्रे, मासिके, फाईल्स, बातम्या देणाऱ्या वृत्तसंस्था, 'तास' सारख्या वृत्तपत्रसंस्थांच्या बातम्यांची अगणित भाषान्तरे या साऱ्या महाप्रचंड साहित्यातून नेमका संदर्भ व माहिती बरोबर शोधून काढून शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या नवीन रोगासंबंधी त्याला बातमी किंवा सदर लिहायचे असेल, तर जगातली तमाम आरोग्यविषयक पत्रके व मासिके, जगातील तमाम कोर्टांची आरोग्यविषयक कायदे काही क्षणातच तो मिळवू शकतो. इतकेच नव्हे, तर या माहितीच्या आधारावर वेगवेगळ्या देशातील इस्पितळे व तेथील अधिकारी, पेथॉलॉजिस्टस्, कॉरोनर्स, पेशंटस् व त्यांची विधाने आणि इतर रेकॉर्डस् तो त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून मिळवू शकतो. या पध्दतीने त्याला खूप मोठ्या प्रमाणात मजकूर मिळतो व त्यातून त्याने विचारात घेतलेल्या समस्येवर नेमके निष्कर्ष व विधाने करणे शक्य होते.

सारी माहिती ही इलेक्ट्रॉनिक डिजिट्समध्ये सामावून ठेवलेली असते. पुस्तके, लेख नियतकालिके ही सारी शून्य व एक या अंकांचा परिभाषेत (बायनरी इलेक्ट्रॉनिक कोड) मध्ये सामावली जातात आणि विश्वास बसणार नाही. इतक्या वेगाने शोधता येतात. उदाहरण द्यायचे झाल्यास, छापील माहिती पाहताना पत्रकारास खूप वेळ घालवावा लागेल, पण ऑनलॉईन लायब्ररीत हे काम काही सेकंदातच होईल. आतापर्यंत अशा प्रकारची माहिती शब्दकोश, ज्ञानकोश इत्यादीच्या रुपाने वृत्तपत्रसंस्थेने संभाळलेली असायची. पण आज मात्र महाकाय अशा इलेक्ट्रॉनिक माहितीच्या जाळ्याचा ती अगदी छोटासाच भाग बनेल, इतके हे ऑनलॉईन लायब्ररीचे जाळे मोठे आहे.

अशा प्रकारच्या अत्याधुनिक व्यवस्थेला राबवायचे तर फार मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवावे लागते व हे केवळ विकसित देशांनाच शक्य आहे. विकसनशील देशांना अशा व्यवस्था खूप महागड्या वाटतील. त्याखेरीज, विकसनशील देशांपुढे आणखी एक समस्या उभी राहते – ती म्हणजे इलेक्ट्रॉनिक व्यवस्था व यंत्रणा कशा वापराव्यात व त्यांची देखभाल कशी करावी यांचे प्रशिक्षण तमाम पत्रकार व संपादकवर्गास आणि इतरही कर्मचाऱ्यांस देणे ही होय. एकविसाव्या शतकाचे आव्हान स्विकारायचे म्हटल्यावर वृत्तपत्रांना कामाच्या नवीन पध्दती शिकणे व त्यात प्रभुत्व मिळवणे आवश्यक आहे.

*****

पाठ क्र. ९

वृत्त, वृत्तमूल्य व वृत्तसंकलन

आजच्या जगात सतत बातम्यांचा ध्यास असतो. रोज सकाळसंध्याकाळ सारी प्रसारमाध्यमे सातत्याने बातम्या पुरवीत असतात, तरी आपण विचारतोय 'काय बातमी आहे?' आपल्याला बातम्या माहीत नसतील तर झपाट्याने प्रगती करीत जाणाऱ्या आजच्या जगात आपल्याला काहीही स्थान नाही, असे प्रत्येकाला वाटत असते.

बातमी किंवा 'वृत्त' म्हणजे काय? नवीन असे जे आहे त्याला वृत्त म्हणायचे का? एकच बातमी एखाद्या व्यक्तीला. नवी असेल तर ती दुसऱ्याच्या दृष्टीने शिळी असू शकेल. 'जे काही आत्ताच घडेल ती बातमी' अशी आपण वृत्ताची व्याख्या करू शकतो का? तसे असेल तर आजचा सूर्योदय ही नेहमीच्या सूर्योदयासारखीच घटना असूनही बातमी ठरेल. ज्या घटना असूनही बातमी ठरेल. ज्या घटना सूर्योदयाप्रमाणे रोज एकाच प्रकारे घडत असतात, ज्या घटना आपोआप सवयीनुसार घडतात, किंवा ज्या घटनांबद्दल आपण आधीच भविष्यकथन करू शकतो, ज्या सामान्य तर्कशास्त्रात बसणाऱ्या घटना बातम्या म्हणता येणार नाहीत. तरीही, जेव्हा सूर्यग्रहण असेल, आणि त्याचे भविष्यकथन झालेलेही असेल, तरी त्या दिवशांचा सूर्योदय हा एक बातमीच ठरतो. कारण सूर्यग्रहण ही रोजची घटना नसून ती 'असामान्य' घटना आहे. या घटनेतील वृत्ताचा अंश भविष्य कथनानुसार बरोबर त्याच क्षणी ग्रहण लागते किंवा नाही ही असू शकेल, किंवा त्या ग्रहणाचे वातावरणावर काय परिणाम होतात हाही असू शकेल.

न्यूयॉर्क टाइम्स या वृत्तपत्राची एक घोषणा आहे. 'छापायला योग्य असते ती बातमी.' अर्थात या घोषणे बद्दल मतभेद असू शकतात. बातमीची किंवा वृत्ताची 'योग्यता' ही त्या वृत्तपत्राचा वाचकवर्ग, त्याची संस्कृती, त्याची वृत्ती आणि त्याची नीतिमूल्ये यांच्यावर अवलंबून असते. 'देवोनेर' यासारख्या प्रसिध्द नियतकालिकात प्रसिध्द होणारी काही विशिष्ट छायाचित्रे ही उच्चभ्रू संस्कृतीस योग्य समजली जात असत. त्याच नियत कालिकातील अशी छायाचित्रे एक दिवस अचानक अश्लिल म्हणून जप्त करण्यात आली कारण वाचकांचा दृष्टिकोन व संस्कृती बदललेली होती. वाचकांप्रमाणेच संपादकाचा व वार्ताहराचा दृष्टिकोनही बातमीचे बातमीपण ठरवत असतो.

वाचकाला एखाद्या घटनेत किती स्वास्थ आहे यावरून त्या घटनेचे बातमी म्हणून मूल्य ठरते. ज्या घटनेमुळे वाचकाला आश्चर्य, आकर्षण, अचंबा वाटत असेल, त्याची करमणूक होत असेल किंवा धोक्याचा इशारा जाणवत असेल ती घटना 'बातमी' ठरू शकते. डायनोसॉरसारख्या अतिप्राचीन अंडी सापडणे किंवा सहा हजार वर्षापूर्वीच्या अदिमानवाचा बर्फात थिजलेल मृतदेह सापडणे अशा घटना बातम्या ठरतात, कारण या घटनांमुळे वाचकाची उत्सुकता जागृत होते, इतिहासाबद्दल एक अदभुत, रोमांचकारी भावना तयार होते. सिनेजगतातील चित्रताऱ्यांची पुनर्विवाह व घटस्फोट, शाही घराण्यांची राहणी व वैयक्तिक बाबी, किंवा गुन्हेगारी जगतातील घडणाऱ्या घटना या साऱ्या उत्सुकता जागृत करणाऱ्या असतात. या घटनांमधील व्यक्तींच्या जागी वाचक स्वतःची कल्पना करतो आणि आपण अमुक त्या प्रसंगात कसे वागले असतो याचे चित्र रंगवतो. कधीकधी एखादे व्यक्तिमत्त्व वाचकाल झपाटन टाकते. मायकेल जॅक्सन या गायकाबद्दलचे लोकांचे 'मायकेलवेड' लक्षात घेऊन साऱ्या प्रसारमाध्यमांनी जॅक्सनबद्दल भरपूर माहिती उजेडात आणली. एक बंडखोर म्हणून आलबी प्रतिमा निर्माण करणारे निवडणूक आयुक्त श्री. शेषन् हे असेच एक जबरदस्त व्यक्तिमत्व आहे. अशा व्यक्तींबद्दलच्या बहुधा सगळ्या घटना बातम्याच ठरतात.

ज्या घटनेमध्ये साहस व नाट्य आहे तिला बातमीचे मूल्य प्राप्त होते. वेगवेगळे विक्रम स्थापन करणे उदा. लोखंडी पिना, लोखंडाचे तुकडे, दुरचित्रवाणीसंच खाणे हा एक विक्रण. किंवा मोठेमोठे विवाह, समारंभ व मेजवान्या, जंगलकथा, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विश्वातील आश्चर्यजनक शोध व त्यामागील घाडसी प्रयत्न इ. घटनांमध्ये रोमांचकता असते म्हणून त्यांची बातमी बनते. युध्दे व युध्दानंतरच्या जीवनामधील घटना, विमानाचे अपहरण दहशतवाद्यांची धाडसी, 'महीन' चोऱ्या व दरोडे, वेगवेगळ्या प्रकारच्या कैद्यांची पलायने व सुटका, लैंगिक वर्तन व गुन्हेगारांना पकडण्याच्या घटना या साऱ्याच वाचकाय खिळवून ठेवतात, कारण या घटना कशा पडल्या, यात त्यांचे बातमीपण किंवा मूल्य असते. हे

सगळे घटक लक्षात घेऊन 'वृत्त' या शब्दाची बऱ्याच प्रकारे व्याख्या करता येते ती अशीः

उघडकीला आलेली घटना म्हणजे वृत्त, या व्याख्येप्रमाणे अशी घटना ही झाकून ठेवायचा प्रयत्न झालेला असतो असा आपल्यात अर्थ लावता येतो.

एखाद्याने मुदाम लपवून ठेवलेली घटना म्हणजे वृत्त अशीही एक व्याख्या आहे. घटनेमागे ती गुप्त ठेवणारी एखादी शक्ती असल्याने त्या घटनेला वृत्ताचे मूल्य येते.

जास्त बारकाईने केलेली व्याख्या अशी :– समाजाच्या मोठ्या वर्गाला किंवा वाचकांपर्यंत पोहोचणारी, त्यांना संबंधित असणारी व त्यांना समजू शकेल अशी कुठलीही घटना, विचार अथवा मत म्हणजे वृत्त होय.

वृत्तपत्र छापणाऱ्यांना स्वारस्य वाटणाऱ्या कुठल्याही सत्य घटनांचे संघटन म्हणजे वृत्त असेही समजले जाते.

जीवनाच्या व जीवनविषयक गोष्टींच्या बाबतीत चे काही उत्सुकता वा रस वाटण्याजोगे असते ते वृत्त होय.

वृत्त म्हणजे वाचकाला अर्थपूर्ण वाटणारी माहिती – कधीकधी अतिशय सामान्य वा साध्या घटना देखिल वाचकाच्या दृष्टिने उपयुक्त माहिती ठरतात. उदा. लोकल गाड्यांची बदलती वेळापत्रके, नवीन बसमार्ग किंवा बसचे थांबे इ. बातम्यांची सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे विभागणी केली जाते;

१. निखळ वृत्तः (हार्ड न्यूज)

जनतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटना–उदा. सरकारी योजना, शिक्षण विषयक, आर्थिक वा सामाजिक संदर्भ असलेल्या घटना, आंतरराष्ट्रीय संदर्भ असलेल्या घटना, इ.

२. हलकेफुलके वृत्त (सॉफ्ट न्यूजः)

वरील प्रकारांपेक्षा कमी महत्त्वाच्या, पण सुरस व चमत्कारिक अशा घटना उत्सुकता वाढवणाऱ्या चित्तथरारक किंवा गुन्ह्यासंबंधीच्या वगैरे घटना या प्रकारच्या वृत्तात येतात.

३. वेचक, वृत्तः (स्ट्रेट न्यूज)

कुठलेही विश्लेषण न करता अथवा अर्थ न लावता, वाचकांची उत्सुकता ताणून न धरता जशाच्या तशा दिलेल्या सत्य घटना.

४. प्रत्यक्ष घटनावृत्त. (स्पॉट न्यूज)

नेहमीपेक्षा खूपच वेगळ्या अगती अनपेक्षित, घटना उदा. आग लागण्यासारखे अपघात, एखादी अनपेक्षित राजकीय कलाटणी, एखादा न्यायालयीन निवाडा इ.

वृत्त किंवा बातमी (न्यूज इवेन्ट) आणि वृत्तजन्या समस्या (न्यूज इश्यू) यांमध्ये भेद काय आहे हे पत्रकाराला समजले पाहिजे. वृत्तजन्य समस्या या बरेच दिवस एखाद्या प्रसंगाबद्दल किंवा समस्येद्दल ज्या घडामोडी व पेच तयार होत राहतात, त्यांना म्हणतात. उदा. एनरॉन सारखे एखादे प्रकल्प. (प्रॉजेकट). एखादी घटना आकस्मिकपणे, नाट्यमय रीतीने घडते, ती घडते तेव्हा सामान्य भासते, पण नंतर हळूहळू, मोठे उग्र रुप धारण करते व अतिशय महत्त्वाची बनते; त्या घटनेच्या संदर्भात एक वेगळे वातावरण (फीव्हर) निर्माण होते. न्यूज इव्हेन्ट्सचे आयुष्य किंवा परिणाम अल्पकाळ असतो. पत्रकाराची वृत्ताची जाणीव आणि लिहिण्याचे कौशल्य यांच्यामुळे साध्या घटना देखिल बातमीचे मूल्या प्राप्त करतात.

वृत्तमूल्या अथवा वृत्तनिकष (न्यूज व्हॅल्यज्) व वृत्तसंकलन (न्यूज गॅदरिग):

वृत्तपत्राच्या कार्यालयामध्ये वेगवेगळ्या वृत्तमंडळांकडून व इतर स्त्रोतांतर्फे विविध प्रकारच्या बातम्यांचा सतत ओघ येत असतो. त्यांची छाननी करून वृत्तपत्राची पाने बनविण्याचे काम संपादकीय विभागात सतत चालू असते. बातम्यांचे संपादन हे ठराविक वेळेमध्येच कटाक्षाने पूर्ण करावे लागते; म्हणून बातम्या निवडणे व त्यांचे संपादन करणे हे खूप घाईगर्दीचे काम असते. शिवाय, प्रत्येक वृत्तपत्रामागील धोरण वेगवेगळे असू शकते, कारण त्याची मालकी व व्यवस्थापन वेगवेगळे असते, व त्या धोरणाप्रमाणेच बातम्यांची निवड व संपादन होत असते. या धोरणानुसार कुठल्या बातमीला किती महत्त्व द्यावे व वृत्तपत्राच्या पानामध्ये किती जागा अथवा व्याप्ती (कव्हरेज्) द्यावी हे ठरते. दैनिके, पुरवण्या, विशेषांक, लघुवृत्तपत्रे (टॅब्लॉईड पेपर्स) य सर्व प्रकारच्या वृत्तपत्रांमध्ये बातम्यांची निवड व व्याप्ती वेगवेगळ्या पध्दतीने केल्याचे आढळून येते. कुठल्याही वृत्तपत्रासमोर एक ठराविक वाचकवर्ग असतो व त्याला रूचेल अशा पध्दतीने ही निवड केली जाते. वृत्तमूल्ये किंवा वृत्तनिकष हे खालीलप्रमाणे आहेत.

१) सामयिकता (टाईमलीनेस्):

वाचकाला अगदी ताजी घडलेली घटना वाचावयाची असते. जर घटना आधीच घडलेली व ज्ञान असेल तर तिचे पुढे काय झाले किंवा त्यानंतर काय घडामोडी घडत गेल्या हे माहीत करून घ्यायचे असते. या नवीन घडामोडी किंवा बारकावे जर वृत्तपत्राला देता आले नाहीत तर ते अकार्यक्षम ठरते व त्याचा वाचकवर्ग आपोआप कमी होतो. आज दूरदर्शन व रेडिओ सारख्या प्रसारमाध्यामांशी वृत्तपत्रांना खूप कठीण स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. कारण ही इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे आहेत व त्यांच्या बातम्यांचे प्रसारण तासातासाने होत असते त्यामुळे त्या बातम्यांमध्ये नवीन बारकावे समाविष्ट केले जातात. तरीदेखिल वृत्तपत्रांची मागणी वा लोकप्रियता कमी झालेली नाही.याचे कारण म्हणजे रेडियो व दूरदर्शनवर वेळेच्या अभावामुळे बातमी थोडक्यात दिली जाते व वृत्तपत्र तीच बातमी खूप खोलात जाऊन संपूर्णपणे देऊ शकतात.

दुपारच्या आवृत्यांमध्ये सकाळी निघणाऱ्या वृत्तपत्रातील बातम्यांना उद्देशून पुढील घडामोडी दिल्या जातात, आणि या घडामोडींना उद्देशून त्यांच्या पुढील नंतरच्या घटना दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या वृत्तपत्रात दिल्या जातात. समजा, मुसळधार पावसाने मुंबईतील एखादी जुनी चाळ कोसळली, व ही बातमी दुपारच्या वृत्तपत्रात छापून आली, तर त्यानंतरच्या मदतीचे व चाळीतील लोकांच्या सुटकेच्या कार्याविषयक माहिती दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या वृत्तपत्रात छापली जाते, कारण चाळ कोसळल्याची बातमी दुसऱ्या दिवसापर्यंत शिळी झालेली असते. काही बातम्या या तातडीने द्यायची गरज असते, काराण जनतेच्या दैनंदिन जीवनाशी त्या निगडीत असतात. उदा. पाणी कपात, दुधाच्या भावातील चढउतार, शेअर्सचे भाव, बंद व संप इ.

२) समीपता (प्रॉक्झिमिटी) :

वृत्त निवडताना लक्षात घ्यायचा दुसरा निकष म्हणजे अमुक बातमी ही वाचकाला किती जवळची वाटते हा आहे. अमुक बातमीचा आपल्याशी संबंध आहे. असे वाचकाला वाटले पाहिजे किंवा ती बातमी 'ओळखता' किंवा समजता आली पाहिजे. प्रत्येक वाचकाला त्याची भौगोलिक परिस्थिती, त्याची संस्कृती व त्याचे शिक्षण या गोष्टींमुळे एक विशिष्ट मानसिकता तयार झालेली असते, त्यामुळे त्या मानसिकतेच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांना तो चटकन् ओळखू, शकतो किंवा समजू शकतो. त्याला अनोळखी, परक्या अकल्पनीय अशा घटना तो पूर्णपणे समजू शकणार नाही. पाश्चिमात्य जगाची जराही जाण नसलेल्या किंवा ते जग अजिबात न पाहिलेल्या भारतीय वाचकाला त्या जगातील घडामोडी संपूर्णपने आकलन होणार नाहीत. उदा. काही महिन्यांपूर्वी आलेली एक बातमी अशी – युरोपमधील एका देशात या वर्षी संत्र्यांचे इतके अफाट पीक आले की फार मोठ्या प्रमाणावर संत्री नदीत फेकण्यात आली व त्यामुळे नदीचे पाणी नांरगी रंगाचे झाले. भारतीय शेतकऱ्याला अशा बातमीवर विश्वास ठेवणेच जड जाईल. बातमी कितीही सनसनाही असली, तरी ती 'जवळची' न वाटल्याने वाचकात समजेलच असे नाही. भारतीय शेतकरी स्त्रीला रशियन स्त्रीच्या समस्या या तिच्या जीवनक्रमानुसार 'जवळच्या' वा ओळखीच्या नाहीत. म्हणून स्थळकाळानुसार लांबवर असलेल्या बातम्यापेक्षा स्थानिक बातम्या या वाचकाच्या व संपादकाच्या दृष्टीने जवळच्या व महत्त्वाच्या ठरतात. बहुतांश भारतीय समाजाला, तो विशेष आधुनिक नसल्याने, भविष्यविषयक घटना कमी महत्त्वाच्या वाटतात. म्हणून बातम्या निवडताना संपादकीय विभागाला वाचकांच्या मानसिकतेचा विचार कराव लागतो.

३) घटनेची व्याप्ती अथवा परिमाण (साईज्)

घटनेची व्याप्ती जर मोठ्या व महत्त्वाच्या असतील तर ती छोटी घटना असूनही तिची मोठी बातमी बनू शकते. मोठ्या व्यक्तींना साधे आजरपण आले तरी ते ठळकपणे छापले जाते. रोज लोकल गाडीमधून करणारा साधा प्रवासी किती ही घुसमटला तरी ती बातमी बनत नाही; पण त्याच गाडीतून मंत्र्याने एकदा जरी थोडा प्रवास केला तरा ती बातमी बनते.

घटलेले एकंदर परिणाम (डायमेन्शन्) केवढे आहे यावर तिची बातमी म्हणून निवड होणे अवलंबून असते. महापूर, दुष्काळ, चक्रीवादळे यांसारख्या घटनांमध्ये शेकडो माणसे मृत्युमुखी पडतात व त्या घटनेचे परिमाण विस्तृत होते. दुसऱ्या महायुध्दामागील हुकूमशाही वेडेपणा, युध्दाच्या वेळी झालेली खलबते व कारस्थाने, झालेला प्रचंड मनुष्यसंहार, व युध्दाच्या वेळी व नंतरही जनतेने भोगलेले अपार दुःख व कष्ट या सगळ्या गोष्टींमुळे आजही दुसरे

महायुध्द हे साऱ्या वृत्तपत्रातील मथळे व्यापत असते. अजूनही युध्दकथांवर नवीन प्रकाश पाडला जातो, नाझींबद्दलची माहिती मिळविण्यास अजूनही पाश्चात्या वाचकाला स्वारस्थ वाटते. एखादे जहा बुडाणे, विमानाचा अपघात होणे, प्रचंड इमारत कोसळणे, भूकंप होणे यांसारख्या घटना त्यांच्या परिमाणामुळे महत्त्वाच्या बातम्या बनतात. दंगली, अचानक घडून येणारे बंद, लोकल गाड्या अचानक बंद पडणे, बॉबस्फोटांची मालिका इ. घटना त्यांचे परिमाण किंवा आवाका, व्याप्ती अधिक असल्याने पहिल्या पानावर छापल्या जातात. या घटनांनी एकूण किती काळ व्यापला आहे यावरही त्यांचे महत्त्व अवलंबून असते. पुराणवस्तुशास्त्रज्ञांना सापडलेली एखादी वस्तू वाचकाला शेकडो वर्षापूर्वीच्या भूतकाळात नेते काही वर्षापूर्वी द्वारकेजवळील खोल समुद्रात मोठमोठे कोरीव स्तंभ सापडले, त्यांचा काळ काही हजार वर्षापूर्वीचा असावा असा अंदाज करण्यात आला. अशी बातमी ही फार 'मोठी' बातमी ठरते कारण द्वारका म्हटल्यावर कृष्ण व त्याच्या संबधीच्या अगणित कथा यांची भुरळ भारतीय मनाला पडलेलो असते, त्या संदर्भात अशा शोधाला आणखी महत्त्व येते. येत्या काही वर्षात, खिस्ती कालगणतेची २००० वर्षे पूर्ण होतील तेव्हा खिस्त व त्याच्या धर्माचा उदय यांच्या संदर्भात त्या घटनेला एक मोठा अर्थ असेल. भूतकाळ व त्यातील लक्षणीय घटना या मानवी मनाच्या तळाशी बसलेल्या असतात आणि नवीन छोटीशी घटना जरी त्यासबंधात घडली तरी त्या पूर्वस्मृती जाग्या होतात.

४) महत्त्व (इंपॉर्टन्स):

एखाद्या घटनेचे महत्त्व काय आहे यावर तिचे बातमी म्हणून मूल्यामापन होते. 'महत्त्व' हा शब्द सापेक्ष आहे. एकाच घटनेचे वेगवेगळ्या वाचकांना कमीजास्त महत्त्व वाटू शकते. टेलिप्रिंटरवर सतत वृत्ताची भेंडोळी येत असताना वाचकांच्या दृष्टीने कुठली बातमी महत्त्वाची ठरवायची हे त्या वृत्तसंपादकाचे काम असते. बातमीचे मूल्यमापन हे केवळ व्यक्तिनिष्ठ असते. कुठल्याही दोन दैनिकांच्या पहिल्या पानाची जर तुलना आपण केली तर असे दिसून येईल की एकाच घटनेला दोन्ही वृत्तपत्रांनी वेगवेगळे मूल्या दिलेले आहे व त्याप्रमाणे त्या घटनेने कमी अधिक जागा व्यापलेली आहे. प्रत्येक वृत्तपत्र हे आपल्या वाचकवर्गाच्या मानसिकतेशी वेगवेगळ्या रीतीने बांधला गेलेले असते आणि त्याच्या आवडीनिवडी व गरजा लक्षात घेऊन वृत्ताचे संपादन करते. या मानसिकतेनुसार बातमीचा कोन (ॲंगल्) त्याचे बारकावे निवडले जातात. याच कारणामुळे बहुतेक वाचकांना रोज अमुक तेच दैनिक हवे असते व इतर नवी दैनिके निघाली तरी ज्या दैनिकाची सवय झालेली असते त्याचे वाचन नियमितपणे होतेच. अर्थात काही घटना अशा असतात की त्यांना प्रथम प्राधान्य सगळ्याच वृत्तपत्रांनी दिलेले असते– उदा. दंगली उसळणे, मान्यवर व्यक्तींचे मृत्यू, बदलती राजकीय परिस्थिती, युध्दाची सुरवात व शेवट, देशाचे बदलते आर्थिक धोरण शैक्षणिक घटना किंवा सरकार व शासनाशी निगडीत अशा घटना. कधीकधी जागतिक किंवा राज्य व राष्ट्रीय पातळीवरील घटनेपेक्षा स्थानिक घटनेचेच महत्त्व जास्त असते, व म्हणून तिला वृत्तमूल्य प्राप्त होते.

१) सर्वात मोठे असे बातम्यांचे उगमस्थान वा मूलस्त्रोत म्हणजे प्रेस् ट्रस्ट ऑफ इंडिया (पी.टी.आय.) व युनायटेड न्यूज ऑफ इंडिया (यू–एन. आय) यांसारख्या वृत्तसंस्था. वृत्तपत्रे या संस्थांचे सभासद असतात व या वृत्तसंस्थातर्फे त्यांना टेलिप्रिटंरमार्फत वा फॅक्स यत्रांमार्फत सतत बातम्यांचा पुरवठा होत असतो. 'एशिया फीचर्स' सारख्या विशेषवृत्तसंस्था ही (सिंजिकेहस) अस्तित्त्वात आहे, त्या व्यापक प्रमाणात बातम्या गोळा करून वृत्तपत्रांना पुरवतात. मोठी वृत्तपत्रे आपली स्वतःची वृत्तसंस्थाही चालवू शकतात, उदा, टाइम्स समूहाची 'टाइम्स ऑफ इंडिया न्यूज् सर्व्हिस'.

२) वेगवेगळी सरकारी कार्यालये पत्रके व प्रस रिलीजेस् देत असतात. या सरकारी माहिती पत्रकांखेरीज, प्रत्येक जिल्ह्यावर आधारित अशा सरकारी पुस्तिका उपलब्ध असतात, त्यांना डिस्ट्रिक्ट गॅझेटीअर्श असे म्हणतात. या मध्ये प्रत्येक जिल्ह्याचे वर्णन व इतिहास, त्यातील लोक व त्यांची राहणी आणि संस्कृती, रूढी व प्रथा, धार्मिक वर्तन पाहण्यायोग्या स्थळे इ. व या व्यत्तिरिक्त काही खास आकर्षणे वगैरे भरपूर माहिती असते. तसेच जिल्ह्याच्या शासनव्यस्थेसंबधीही माहिती मिळते.

३) मंत्रालय अथवा राज्याच्या राजधानीतील मुख्य सरकारी कार्यालय हे एक स्त्रोत आहे. सरकारी धोरणे व योजनांच्या बाबतीत संपूर्ण माहिती तेथे मिळते. राज्यातील संपूर्ण शासनयंत्रणा, कायदा व सुव्यवस्था, मंत्रिमंडळ व मंत्र्यांची खाती, सरकारी विकासयोजना व विशेषतः दूरवरचे दुर्गम अविकासित प्रदेश यांबद्दल माहिती मिळविण्याचे ठिकाण म्हणजे मंत्रालय होय.

४) शहरातील नगरपालिका व तिचे कार्यालय – येथे वेगवेगळ्या प्रकारचे कर व त्यांची वसुली, सार्वजनिक आरोग्यसेवा व सुविधा, शहरातील लोकसंख्येचे संपूर्ण चित्र, पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक सेवा, घरबांधणी व शहरातील रस्ते व विभाग यांचे नकाशे, इतर सर्व नागरी सेवा या साऱ्यांबद्दलची माहिती मिळते.

५) शहरातील न्यायलाय–वेगवेगळे कायदेकानू व गुन्ह्यांसंबधी तसेच न्यायालयीन निवाड्यासंबधी सारे अहवाल व इतर माहिती येथे मिळते.

६) पोलिस कॉरोनर, गृहरक्षक दल (होम गार्डस) अग्रिशामक दल, इस्पितळ, इ. जागांमध्ये आपल्याला वेगवेगळे अपघात, गुन्हेगारी घटनांची माहिती मिळते.

७) संसद– वार्षिक अर्थसंकल्प, वेळोवेळी पास होणारे वटहुकूम (ऑर्डिनन्सस्) व बिले यांबाबत माहिती संसदेच्या कार्यालयात मिळते.

८) प्रत्येक शहरात प्रत्येक राजकीय पक्षाचे मुख्य कार्यालय असते. राजकीय व सार्वजनिक घडामोडींबाबत माहिती मिळविण्याचे हे एक चांगले ठिकाण असते. विशेषतः प्रत्येक विरोधी पक्षावर, त्याच्या हालचाली व योजनांवर काहीही टीकात्मक लिखाण करायचे झाल्यास राजकीय पक्षांच्या कार्यलयात जास्तीत जास्त माहिती मिळते.

९) शैक्षणिक बाबतीत बोर्ड, विद्यापीठे व संशोधनास वाहिलेल्या संस्था यांची कार्यालये माहिती पुरवितात.

१०)प्रत्येक शहरात समाजकार्य, सुधारकार्य तसेच मदतकार्य करणाऱ्या संस्था व मंडळे असतात. वेगवेगळे क्लबसू, धर्मादाय संस्था, व्यापारी एजन्सीज्, सांस्कृतिक मंडळे इ. कडून समाजातील शोषित वा दुर्बल घटकांचे पुनर्वसन व मदत यांबद्दल भरपूर माहिती उपलब्ध होते.

११)व्यापार व उद्योग यांबद्दलची सारी माहिती ट्रेड युनियन्स, सहकारी संस्था इ. कडून मिळते.

१२)भारतीय सरकारने स्थापन केलेल्या माहिती देणाऱ्या संस्था – केंद्र सरकारची प्रेस इन्फर्मेशन ब्यूरो व राज्य सरकारांच्या डिरेक्यरेट ऑफ पब्लिसिटी सारख्या संस्था सरकारी कामकाजाची माहिती देऊ शकतात.

१३)व्यवसाय मार्गदर्शन केंद्रे, एम्लॉयमेंट एक्स्चेंज, लेबर कमिशनरचे कार्यालय, रूग्णवाहिका, तसेच केंद्र व राज्या सरकारच्या अखत्यारीतील पर्यटन विकास केंद्र इ.

१४)वेगवेगळ्या व्यक्तींनी वेगवेगळ्या प्रसंगी वार्ताहरांनो दिलेल्या पार्ट्या व वर्ताहर परिषदा. उद्योगपती, मंत्री यांनी या आयोजित केलेल्या असतात किंवा सामाजिक संस्था, परदेशी प्रतिनिधा, ट्रेड युनियन्स यांनीही खास वार्ताहार परिषदा आयोजित केलेल्या असतात.

१५)वृत्तपत्रसंस्थेचा स्वतःचा संदर्भ व संशोधन विभाग व ग्रंथालय हा आणखी एक उत्तम स्त्रोत आहे. विविध विषयांवरील जुनी कात्रणे, छायाचित्रेस व्यक्तिगत माहिती, इ. चे भांडार असलेला हा विभाग कुठल्याही घटनेचा ऐतिहासिक व तौलनिक अभ्यास करावयास अतिशय उपयुक्त ठरतो.

१६)बऱ्याच वेळा अनामिक राहू इच्छिणाऱ्या व्यक्ती, घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या व्यक्ता व स्वतः वार्ताहरही जर घटनास्थळी उपस्थित असेल तर ही मंडळी खात्रीलायक माहिती देऊ शकतात.

तोंडी माहिती असेल तर ती वार्ताहराला पडताळून तिच्या सत्यतेची खात्री करून घ्यावी लागते. लेखी माहिती असेल तर तो चांगला पुरावा असल्याने पडताळ्याची आवश्यकता नसते.

वरील सगळे बातम्यांचे स्त्रोत रोजच वापारावे लागतात असे नाही. वृत्तसंकलन हे बऱ्याच पध्दतींनी करता येते. वार्ताहराला आपल्या 'बीट' मध्ये जेवढी ठिकाणे पालथी घालावी लागतात, तेवढीच तो घालतो. पोलिस ठाण्याचा वीट जर त्याला मिळाल तर रोज तेवढ्याच जागेतून तो गुन्ह्यासंबंधी बातम्या मिळवितो. इतर बीट्सकडे त्याला पहावं लागत नाही; फारतर कॉरानर कोर्ट व इस्पितळ इथपर्यतच तो जाईल. दुसऱ्या एखाद्या

वार्ताहराला कोर्ट, जेल व त्यातील गुन्हेगारांशी बातचीत एवढेच कदाचित् करावे लागेल. वार्ताहरांना बातम्या मिळविण्यासाठी विविधा सभांना व समारंभांना पाठवले जाते,तिथल्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्यास सांगितले जाते. महत्त्वाच्या व्यक्तींशी सतत संपर्क साधून असणे आवश्यक असते, कारण या व्यक्ती अधूनमधून सनसनाटी बातम्या पुरवतात. आपले नाव बातमीत येऊ न देता विशेषतः ती बातमी फारशी सुखकारक नसेल तर – ती बातमी देऊ इच्छितात. मात्र वार्ताहराने सतत पिच्छा पुरविलेला त्यांना नकोसा असतो. अशा वेळी त्यांना मानाने वागविणे, त्यांना दुखविता संपूर्ण बातमी मिळविणे महत्त्वाचे असते. संयमी व धीराने वागणारा वार्ताहर असेल तर व्यावसायिक वर्तुळात त्याला आदर मिळतो. व्यावसायिक, वृत्ता दाखवून वैयक्तिक हेवेदावे टाळणे व 'ऑफ् द रेकॉर्ड' किंवा खाजगीत दिलेली माहिती योग्या रीतीने वापरणे, तसेच अनामिक राहू इच्छिणाऱ्या व्याक्तींना अनामिका ठेवणे यांमुळे तो वार्ताहर एक 'सुरक्षित' किंवा त्रासदायक न ठरणारी व्यक्ती आहे अशी त्याची प्रतिमा तयार होते व साहजिकच त्याला अधिक चांगल्या बातम्या मिळत जातात.

*****

पाठ क्र. १०
चांगल्या वार्ताहराची वैशिष्ट्ये

प्रसार माध्यमांशी निगडित असलेल्या व्यक्तींभोवती, विशेषतः वार्ताहरांभोवती एक खास वलय असते. आजच्या अत्यंत कार्यव्यस्त अशा विनिमयाच्या जगात वार्ताहर ही एक खास व्यक्ती असते. संपादकाप्रमाणे वार्ताहर हा देखिल वृत्तपत्र 'बनवीत', घडवीत असतो. त्याचे नाव वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर फारसे झळकत नसते तरी रोजच्या वाचकाला तो आपल्या खास शैलीने भेटतच असतो. वार्ताहरांविना वृत्तपत्र चालविणे धाडसाचेच ठरेल.

वार्ताहरामध्ये काहीतरी खास असे असते की ज्यामुळे मुद्रित वा इतर माध्यमांचे त्याच्याखेरीज काम चालणे अशक्य होऊन बसते. ती खासियत म्हणजे त्याचे प्रशिक्षण, त्याची मानसिक व बौध्दिक जडण-घडण, व त्याचे एकंदर चारित्र्य व व्यक्तिमत्त्व.

प्रशिक्षण व गुणवत्ता असेल तरच वार्ताहराला वृत्तपत्राच्या जगात प्रवेश मिळतो. वृत्त मिळविणे व ते सादर करणे या दोन्ही क्रिया सतत चालू असल्याने, व या क्रिया वृत्तपत्राच्या कार्यालयात तसेय कार्यालयाबाहेरही होत असल्याने वार्ताहराची घटना व काळ यांच्याशी सतत शर्यत चालू असते. वार्ताहराला वृत्तपत्राचे तसेच कार्यालयाबाहेरही होत असल्याने वार्ताहराची घटना व काळ यांच्याशी सतत शर्यत चालू असते. वार्ताहराला वृत्तपत्राचे डोळे आणि कान मानले जाते. वृत्तपत्र व समाज यांना जोडणारा दुवा म्हणजे वार्ताहर. बातमीचा शोध घेणे, ती संपूर्णपणे मिळविणे व ती संपादकीय विभागाला देणे हे त्याचे काम टंकलेखकाप्रमाणे किंवा संगणकाप्रमाणे यांत्रिक पध्दतीने हे काम त्याला करायचे नसते. बातम्यांसाठी उत्सुक असणाऱ्या वाचकांना कुठल्याही घटनेचे संपूर्ण सत्य आकर्षक पध्दतीने त्याला सादर करावयाचे असते.

साऱ्या पत्रकारांप्रमाणे वार्ताहरालाही भाषेवर प्रभुत्व मिळवावे लागते, कारण त्याची भाषा हेच खरे त्याचे प्रभावी अस्त्र असते. उत्तम वार्ताहर बनण्यासाठी भाषेचे प्रभुत्व ही पाहिली आवश्यकता आहे. घटनेबद्दलचे संपूर्ण सत्य वाचकासमोर ठेवताना त्याला नेमकेपणा व संक्षिप्त लेखन करता येणे जरूरीचे आहे. घटनेतील महत्त्वाचे मुद्दे पकडून नको तो भाग टाळणे, उपलब्ध असलेल्या जागेत बातमी व्यवस्थित बसवणे, जशा प्रकारची घटना असेल तशा गंभीर अथवा हलक्याफुलक्या शैलीत लिहिणे, वाचकांची रुचि लक्षात ठेवणे व त्यानुसार शैली आत्मसात करणे, हे सारे वार्ताहराला जमले पाहिजे. बातमीमध्ये मुद्यांची पुनरावृत्ती होऊ नये. आदल्या दिवशीच्या बातमीविषयी अधिक माहिती देताना त्या बातमीचा सारांश ध्यानात ठेवणे, व्याकरणाचे नियम तंतोतंत पाळणे, चारित्र्यहनन होणार नाही अशा रीतीने लेखन करणे, पीत पत्रकारिता ('यलो जर्नॅलिझम') कटाक्षाने टाळणे या गोष्टी त्याला संभाळाव्यात लागतात. वार्ताहराला वायकाचे मन व बुध्दीपर्यंत पोहोचायचे असते, म्हणून आपल्या बातमीचा व लेखनाचा, भाषेचा वाचकावर काय परिणाम होईल याचा विचार त्याला करावाच लागतो.

वार्ताहराकरिता दुसरी अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे भरपूर, चौफेर वाचन व सामान्यज्ञान. मानवी इतिहास, व संस्कृती, साहित्य, तत्त्वज्ञान, कला यांचे त्याला ज्ञान असावेत लागते. त्याशिवाय विज्ञान व तंत्राज्ञान, व्यापार व उद्योग यांचीही माहिती त्याला असावी लागते, कारण आजची आधुनिक संस्कृती व समाज, तसेच आधुनिक दृष्टिकोन हे साऱ्यांचे हे मूलस्त्रोत आहेत; आधुनिक राहणी व जीवनमान त्यांनीच घडविले आहे. हे सारे मूळ ज्ञान असेल तरच वार्ताहराला बातम्यांचे महत्त्व ओळखता येते व योग्य ती बातमी निवडता येते. साहित्य व तत्त्वज्ञान यांच्या वाचनाने मानवी जीवनाचे सार व अर्थ तो समजू शकतो. वृत्तकथन म्हणजे केवळ साऱ्या घटना जशा घडल्या तशा लिहीत जाणे नव्हे, तर त्यांमधील आनंद दुःख, कारुण्य, हास्य इ. वेगवेगळे भावही वायकाच्या दृष्टीस आणून देणे होय, आणि तरीही वृत्तलेखन हे साहित्यलेखन होऊ शकत नाही. आपल्या पतीने आपल्या नकळत दुसरा विवाह केला या कारणाने एका मुसलमान महिलेने स्वतःस व स्वतःच्या पाच मुलांना जाळून घेतल्याची एक उदाहरण म्हणून पाहता येईल. या घटनेत दुःख व कारुण्य आहे, त्याशिवाय एका विशिष्ट समाजातील अंतर्गत तणावही या घटनेतून जाणवतात. अशा प्रकारचे वृत्त लिहिताना केवळ वरवरच्या

घटनाच कथन करणे पुरेसे नाही, तर त्या घटनांमागील इतर वास्तव जाणवून देणे जरूरीचे असते. वाचकाला या जाणीवा द्यावयाच्या असतील तर त्यासाठी भाषेची प्रमिभा वार्ताहरापाशी असायलाय हवी.

चांगल्या वार्ताहरापाशी बातमी ओळखता येते, बातमीचा 'वास' त्याला लागतो. एकदा तो लागला की येनकेन प्रकरण तो त्या बातमीच्या तळाशी जायचा प्रयत्न करतो. बातम्या मिळविणे ही कला व धडपड असते. लोकांना सनसनाटी बातम्या वाचायला आवडते, पण त्यांच्या दारात चौकशीसाठी व माहितासाठी वार्ताहर उभा राहिलेला चालत नाही. आपल्या खाजगी बाबतीत वार्ताहर लूडबूड करतात असे त्यांना वाटते. म्हणून बातम्या मिळविण्याचे काम अवघड होते. महत्त्वाकांक्षी वार्ताहराला एकाच ठिकाणाहून बातम्या जशाच्या तशा घेणे चालणार नाही, त्याला त्या बातमीची वेगवेगळ्या ठिकाणांहून किंवा स्त्रोतांपासून मिळवून छाननी करावीशी वाटेल, त्यातील सत्य व असत्य यांची चौकशी करावी लागेल. कार्यालयीन वेळेमध्ये किंवा गणवेषात असलेली माणसे आपल्या कामाबद्दलची महत्त्वाची गुपिते वार्ताहराला सांगणारे नाहीत, किंवा अर्धसत्ये सांगतील. पण जेव्हा गणवेषाचे मुखवटे त्यांनी काढलेले असतील किंवा कार्यालयाबाहेर वार्ताहराला भेटत असतील तेव्हा वार्ताहराला त्यांच्याकडून खुबीने बातम्या काढून घ्यावा लागतात. अशा वेळी त्यांच्याशी संवाद साधण्याची व माहिती हस्तगत करण्याची कला, त्यांच्यावर प्रभाव पाडण्याची व मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याची कला वार्ताहराला यावीच लागते. माणूस बोलत असताना त्याचे बोलणे 'योग्य' रीतीने ऐकणेही महत्त्वाचे आहे. कारण बोलताना त्याने केलेली शब्दांची निवड, वाक्यरचना व शैली, आवाजातील चढउतार यांमुळे प्रत्यक्ष बोलल्या न गेलेल्या बऱ्याच गोष्टी समजून येतात. म्हणून संभाषण ऐकण्याची कला, योग्य ते व नेमके प्रश्न विचारण्याची कला, योग्य त्या व्यक्तीला योग्य त्या वेळी योग्य ते प्रश्न विचारण्याची समज वार्ताहराला असावी लागते. बड्या व्यक्तींचे स्वभावविशेष, आवडीनिवडी त्याला ओळखावे लागतात. उच्चपदस्थ अधिकारी, मोठेमोठे नोकरशहा, उद्योगसम्राट, अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, चमत्कारिक स्वभावाचे व इतरांना दूर ठेवणारे शास्त्रज्ञ व कलावंत इत्यादी विविध प्रकारच्या माणसांशी कसे वागावे व बोलावे व त्यांच्याकडून बातम्या मिळवाव्या हे वार्ताहराने करणे, स्वतःचे वेळापत्रक त्यांच्या वेळेनुकार बदलणे हेही त्याला करावेच लागते. बऱ्याच वेळा त्याला चमत्कारिक स्वभावाच्या व्यक्तींना कुठल्याही आड वेळेला, अवघड वाटणाऱ्या घटनांविषयी प्रांजळपणे बोलते करणे हे एक व्यावसायिक आव्हानच असते व ते वार्तहराला झेलावेच लागते. म्हणून बातम्या मिळविणे हे शारिरीक व मानसिक दृष्टीने फार थकवणारे काम आहे.

वृत्तसंकलन व वृत्तकथन यांच्यासाठी वार्ताहरापाशी स्थितप्राज्ञ वृत्ती असावी लागते. सत्याला मानणाऱ्या व सत्यनिष्ठतेचे व्रत घेतलेल्या माणसालाच हे शक्य आहे. लोकांकडून येणारी टीका, उपहास किंवा अविश्वास धमक्या सहन करताना लागणारे मनोधैर्य व आंतरिक निष्ठा वार्ताहरापाशी असायला हवी. विशेषतः शोधपत्रिकारिता करताना (इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नलिझम) त्याच्या चिवटपणाची कसोटी लागते. खरा पत्रकार हा मूळचाच निर्भय असतो. अनेक शक्तींशी त्याला लढावे लागते, मग त्या शक्ती राजकीय असोत किंवा सामाजिक व इतर काही. त्या शक्तींना आव्हान देऊन सत्यशोधन करीत राहणे व आपले व आपले वैयक्तिक जीव भविष्य अथवा आरोघ्य इ. कशाचीही तमा न बाळगता सत्यास सामोरे जाणे हे करू शकेल तो खरा महान पत्रकार, त्याच्याकडे एकच प्रभावी शस्त्र असते, ते म्हणजे त्याची लेखणी.

निर्भयतेमुळे आत्मविश्वास येतो, व आत्मविश्वासामुळे कुठल्याही गोष्टीचे अचूक आकलन होते. माहिती गोळा केल्यानंतर ती समजून होऊन तिचे विश्लेषण करणे, व समजणारे नाही किंवा तिचे महत्त्व जाणवणारे नाही, पण एखाद्या उच्चशिक्षित वाचकाला ती चटकन् समजेल व अत्यंत महत्त्वाचीही वाटेल. कुणाला काय गोष्ट महत्त्वाची वाटते व कितपत त्या गोष्टीला वृत्तपत्राच्या पानावर स्थान द्यायचे हे वार्ताहरास ठरवावे लागते व त्याकरिता त्याला आपले शिक्षण व पत्रकारितेतील वृत्तपत्राच्या पानावर स्थान द्यायचे हे वार्ताहरास ठरवावे लागते व त्याकरिता त्याला आपले शिक्षण व पत्रकारितेतील प्रशिक्षण यांचा उपयोग होतो. आत्मविश्वासाने काम करता आले तर कुठल्याही टीकेला तो तोंड देऊ शकतो. त्याचप्रमाणे, शांतपणे व चिकाटीने एकाद्या बातमीचा पिच्छा पुरवता येणे व त्या बातमीतील बारकावे गोळा करीत राहता येणे हेही चांगल्या पत्रकाराचे एक वैशिष्ट्य आहे.

शेवटचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे एकंदर सहनशीलता व समजूत आणि मानवी स्वभावाची बरोबर पारख. दीर्घकाळ पत्रकारितेत राहिल्यानंतर वार्ताहर हा मानवी स्वभावाचा मुरब्बी पारखी बनतो. पण त्याला नुकती माणसे पारखण्यात समाधान नसते, तर त्याला ती माणसे बदलायची असतात, जग बदलायचे असते, प्रगतीच्या कल्पना समाजात रूजवायच्या असतात. पत्रकारितेचे हे मूलतत्त्व चांगल्या रीतीने जाणून प्रत्यक्षात अंगिकारणारा तो चांगला पत्रकार.

वार्ताहराचे कार्यक्षेत्र व जबाबदारीः-

सर्वसाधारणपणे मोठ्या वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात वेगवेगळ्या प्रकराचे वार्ताहर वृत्त पुरवीत असतात. ते प्रकार पुढीलप्रमाणे होत;

१) शहरातील सर्व स्थानिक वृत्त देणारे वार्ताहर. सरकारी योजना व काम, शहरातील व त्याभोवतालची सारी परिस्थिती व व्यवहार आणि घडामोडी, गुन्ह्यांपासून वेगवेगळे समारंभ इ. साऱ्या घटनांचे कथेन करणारे वार्ताहर.

२) ज्या राज्यात वृत्तपत्र चालते, त्या राज्यातील साऱ्या जिल्ह्यांचे प्रतिनिधी वार्ताहर. उदा. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात घडणाऱ्या तमाम बातम्या व घडामोडी जिल्हानिहाय वार्ताहर त्या वृत्तपत्रात सतत देत असतात. यात राज्यातील दुर्गम व अविकसित भागही येतात.

३) वृत्तपत्राचे राष्ट्रीय प्रतिनिधी वार्ताहर. देशातील प्रत्येक राज्यातील राजधानीमधून महत्त्वाच्या घडामोडी हे वृत्तपत्राच्या संपादकीय विभागाला पुरवितात.

४) वृत्तपत्राचे परदेशातील प्रतिनिधी वार्ताहर. जागतिक व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या बातम्या ते आपल्या वृत्तपत्राला पुरवितात.

घटनांचे कथन करणे हे मुख्यत्त्वे वार्ताहराचे काम असते. या कामाखेरीज त्या घटनांचा अन्वयार्थ लावणेही (इंटरप्रिटेशन) त्याचे काम असते. वृत्तपत्राचे खास वार्ताहर असतात ते कुठल्या तरी विषयातील तज्ज्ञ असतात म्हणून घटना प्रत्यक्ष न पाहताही त्यांच्याबद्दल गोळा केलेल्या माहितीवरून ते त्यांचा अर्थ व महत्त्व विशद करू शकतात. घटना पाहणे वा त्यांची माहिती गोळा करणे, त्यांचा अर्थ लावणे व त्यासंबंधी टीकाटिप्पणी वा मतप्रदर्श न करणे ही तिहेरी भूमिका पार पाडण्यासाठी वार्ताहरापाशी व्यासंग, संशोधकाची वृत्ती व कायदेकानूंविषयाचे ज्ञान असावे लागते.

बातम्यांचे वा घटनांचे वास्तव गोळा करणे हे वार्ताहराचे प्रमुख कार्य असते. गोळा केलेल्या बातम्यांची काळजीपूर्वक निवड करावी लागते. स्थानिक वार्ताहराला त्याच्या शहराचे संपूर्ण ज्ञान असावयास हवे. शहराचा नकाशा, वेगवेगळे भांग, गल्लीबोळ व रस्ते, विविध संस्था, महत्त्वाच्या इमारती, शहराचा इतिहास व संस्कृती, त्यातील सार्वजनिक जागा, त्याचा बदलता चेहरा व त्याचे भविष्यात घडू पाहणारे रूप या सर्वच गोष्टींची जाण असावी लागते. शहराच्या भरभराटीला ज्यांनी हातभार लावला आहे अशा सर्व व्यक्तींची माहिती त्याला असली पाहिजे, पण त्याचवेळी या सर्वात व्यक्तिशः गुंतून न राहता त्याने हे सारे अलिप्तपणे, अंतर राखूनच पहावयास हवे. बातम्या देणाऱ्या व्यक्तींचे वा संस्थांचे मत किंवा गर्भित मतलब काय आहे याचा दबाव त्याने आपल्यावर येऊ देता कामा नवे. स्वतःचा अनुभव, शहाणपणा विवेकबुध्दीस जागणारा व इतर कोणाचीही उसनी बुध्दी न घेता स्वतःच्या स्वतंत्र बुध्दीने लिहिणारा असा वार्ताहर इतर व्यावसायिक पत्रकारांच्या आदराला पात्र ठरतो.

बातम्या स्थानिक असो या जागतिक असो, तिच्या सत्येची छाननी वार्ताहराला करावीच लागते. घटनांविषयी त्यांचे स्त्रोत (सोर्सेज) कुठले आहेत हे त्याला नमूद करावेच लागते. सत्यघटना व अफवा, किंवा सत्याघटना मतप्रदर्शन यातील फरक त्याला आदराला पात्र ठरतो.

बातम्या लिहिण्याची आपली अशी खास शैलीही वार्ताहराला घडवता आली पाहिजे. कुठलेही तंत्र न वापरता घटना जशाच्या तशा ठोकून देणे म्हणजे वृत्तनिवेदन नव्हे. परिणामकारक असे वृत्तनिवेदन करणे ही एक कला आहे व बराच काळ सातत्याने, परिश्रमपूर्वक ती आत्मसात करावी लागते. शैली हे वार्ताहराचे अंतिम लक्ष्य नसते, पण साध्या व सुलभ रीतीने लोकांना वृत्त देण्यासाठी ते एक चांगले साधन असते. बातमीचा प्रथमपरिच्छेद व शेवट लिहिताना, बातमीत येणारी वर्णने, उद्धृत करायचे उतारे व कथने लिहिताना त्याला चांगल्या शैलीची गरज असते.

वार्ताहराला विविध प्रकराचे समारंभ पहावे लागतात व त्यात होणाऱ्या भाषणांचा सारांश द्यावा लागतो. तसेच वेगवेगळ्या संस्थांच्या व सरकारी अधिकाऱ्यांची विधाने व वक्तव्ये उद्धृत करावी लागतात. या विधानांमधील बातमीचे मूल्य कुठे दडलेले आहे हे त्याला आपल्या बुध्दीने हेरायचे असते. भाषणांमधील नेमके व महत्त्वाये काय आहे ते वृत्तकथनामध्ये यायला हवे. भाषणाच्या ओघात आलेले संदर्भ, इशारे यांचे महत्त्व समजून ते योग्य रीतीने निवेदन करावेत. भाषणाचा मसुदा जर छोट्याशा पत्रकरूपाने दिलेला असेल तर त्याचा सारांश दणे सोपे असते, कारण तो चटकन् वाचून हातावेगळा करता येतो. भाषण करणारी व्यक्ती फार मोठी. मान्यवर नसेल तर

बातमीमध्ये व्यक्तीपेक्षा घटनेला महत्त्व द्यायचे असते, म्हणून वार्ताहराने बातमी लिहिताना घटनेपासून म्हणजे नेमके काय घडले यापासून सुरवात करावयास हवी, व व्यक्तींचा निर्देश नंतर करावयास हवा. भाषणे संपूर्ण उद्धृत करायची गरज नसते, तर त्यांच्यामधील विशिष्ट, महत्त्वाचे मुद्देच वृत्तकथनात घालावे लागतात.

बातम्यांचे उगम वा स्त्रोत (सोर्सेज) काटेकोरपणे लिहिले पाहिजेत, खात्रीलायकपणे लिहिले पाहिजेत, बऱ्याच बातम्या या कागदोपत्री गाडल्या गेलेल्या अवस्थेत असतात व ही कागदपत्रे शोधून काढल्यानंतर त्या उघडकीस येतात, व पुरावेही मिळतात. मोठमोठ्या संस्थांमध्ये द्वितीय व तृतीय श्रेणीतील माणसे ही प्रथमश्रेणीतील अधिकाऱ्यांपेक्षा अधिक माहिती देऊ शकतात.

मुलाखती घेतानाही वार्ताहराच्या काही जबाबदाऱ्या असतात. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची असते तिला बोलू द्यावे व बोलणे काळजीपूर्वक ऐकावे. त्या व्यक्तीला जितके बोलायचे असेल तितके बोलू द्यावे व नेमके योग्य असेच प्रश्न विचारावेत. स्वतःची मते सांगून बोलण्यात मध्येच खंड पाडू नये, किंवा एकामागोमाग एक असे प्रश्न विचारून भंडावून सोडू नये. त्या व्यक्तीला जर काही माहिती खाजगी म्हणून सांगायची असल्यास त्या भावनेचा आदर करणे जरुरीचे आहे. मुलाखत घेतल्यानंतर तिचा सारांशही शक्यतो द्यावा.

शोधपत्रकारिता (इन्व्हेगेटिव्ह जरनलिझम) ही आजच्या वृत्तपत्राय व्यवसायात सर्वात अधिक आव्हान देणारी आहे. शोधपत्रकारिता गंभीर विषयांवर आधारित असते व पत्रकारीचा शोध टप्प्याटप्प्याने खोलवर त्या विषयाचा वेध घेत जातो. काही छोट्यामोठ्या घटना हा या पत्रकारितेचा विषय होऊ शकत नाहीत. तर गंभीर पेचप्रसंग वा समस्या, (इश्यूज) विचारात घेतल्या जातात. अर्थात् शोधपत्रकारितेची सुरवात एकाद्या छोट्याशा घटनेपासून होऊ शकते, पण ती तिथवर मर्यादित नसते, तिची व्याप्ती मोठी असते. घटनांचे मूळ शोधताना व त्या कथन करताना आपले स्वतःचे मत त्यात मांडले जात नाही याची काळजी वार्ताहराला घ्यावी लागते. समस्यांचा शोध घेतान त्या शोधाचे महत्त्व वाचकाला समजेल अशा रीतीने ती सादर करावी लागते.

वार्ताहराच्या अनेक जबाबदाऱ्या आहेत, त्यामुळे महत्त्वाकांक्षी वार्ताहराला या व्यवसायाचे आव्हान हे आकर्षक वाटते. प्रसारमाध्यमांचा वाचकांच्या मनावर फार मोठा प्रभाव असतो, म्हणून माध्यम व वाचक यातील एक दुवा द्या नात्याने वार्ताहराने खबरदारी घ्यायची असते. सत्य, निरपेक्षता, न्यायबुध्दी, भाषेचा डौल व सुसंस्कृतपणा या वार्ताहराच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या आहेत. कुणाचे चारित्र्यहनन न करण हीही एक जबाबदारी आहे. ठराविक स्त्रोतांपासून मिळणाऱ्या बातम्या ठोकळेबाजपणे न देता, त्यांमागील संपूर्ण सत्य वाचकांसमोर आणून देणे, अनामिक राहण्याची इच्छा असलेल्या स्त्रोतांना अनामिक ठेवणे, स्त्रोतांचा योग्य तो ऋणनिर्देश करणे, याही त्याच्याच जबाबदाऱ्या आहेत. या जबाबदाऱ्या पार पाडीत लोकजागृती व जनमत तयार करणारा सत्यशोधक म्हणजे चांगल वार्ताहर होय.

*****

पाठ क्र. ११
वृत्तकथनाचे प्रकार

कुठल्याही लहान वा मोठ्या वृत्तपत्रावर एक धावती नजर टाकल्यास असे लक्षात येते की वृत्तपत्राचा जास्तीत जास्त भाग बातम्यांनी भरलेला असतो. मुद्रित माध्यमे ही दररोज फार मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या बातम्या व माहिती देत असतात. वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात वार्ताहरांना बातम्यांसाठी वेगवेगळे विभाग (बीट्स) नेमून दिले जात असतात.

वार्ताहरांना नेमून दिलेले 'बीट्स' म्हणजे शहरातील विशिष्ट विभाग असतात – उदा. मंत्रालय, शेअरबाजार, मुख्य पोलीस ठाणी, कोर्ट, विद्यापीठे आणि इतर असे अनेक कार्यालयीन व राहत्या जागा, इ. स्थानिक वार्ताहराला यातील डाक, तार, दूरध्वनी, फॅक्स इ. द्वारा बातम्या व वृत्तविशेष (रिपोर्टस्) पाठवितात. 'बीट्संना वार्ताहराला नियमित भेटी घ्याव्या लागतात व बातम्यांचा वेध चालू ठेवावा लागतो. याखेरीज वार्ताहर मुलाखती घेतात, शोध पत्रकार म्हणून काम करतात तसेच घटनांचा अन्वयार्थ (इंटरप्रिटेशन) लावतात. काही वार्ताहर मुलाखती घेतात, शोध पत्रकार म्हणून काम करतात तसेच घटनांचा अन्वायार्थ (इंटरप्रिटेशन) लावतात. काही वार्ताहर तज्ज्ञ म्हणून एकाद्या क्षेत्रातील घटनांवर विशेषवृत्ते (फीचर्स, सदरे) लिहितात. आज पत्रकारितेचे जे लोकप्रिय प्रकार आहेत त्या शोधपत्रकारिता हा एक महत्त्वाचा प्रकार होय.

१) शोधपत्रकरिता हा प्रकार म्हणजे धाडसी अवघड, धोकादायक तसेच गुप्ततेने पार पाडावयाचा असा आहे. त्यासाठी सहसा एकट्यादुकट्या वार्ताहरपेक्षा छोटासा चमू (टीम) बनवून शोदकार्य केले जाते. या पत्रकारितेचे उद्दिष्ट म्हणजे वाचकांना खास असे काही वाचावयास देणे, व्यक्तिगत अथवा सार्वजनिक क्षेत्रातील वरवर निरुपद्रवी किंवा फालतू वाटणाऱ्या गोष्टींमागे जे भयानक वास्तव दडलेले असते, ते शोधून काढून वाचकांपुढे ठेवणे. दुसऱ्या महायुध्दाच्या वेळी आणि युध्दानंतर शोधपत्रकारितेच्या आव्हानाने तमाम महत्वाकांक्षी वार्ताहरांना झपाटून टाकले, आजही महायुध्दाच्या घटनांचा वेध घेतला जातो. आंतरराष्टीय किंवा जागतिक शोकांतिका ठरलेल्या या युध्दाचे स्वरूप खरे काय होते याबद्दलची नवी मिळविलेली माहिती युध्दाचे संपूर्ण चित्रच बदलत गेलेली आहे, व आजवर हे चित्र पुरे आलेले नाही. वॉटरगेट प्रकरणे हे शोधपत्रकारितेचे आणखी एक उत्तम उदाहरण आहे. काही मोजक्याच वार्ताहरांनी मिळून अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे घडलेले फार मोठ्या फार मोठ्या भ्रष्टचाराचे प्रकरण उघडकीस आणले. लाचखाऊ उपराष्ट्रपती, इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सहाय्याने चालणारी हेरगिरी, धूर्तपणे केलेली खोटी विधाने, सगळ्या गोष्टी गोपनीय फाईन्स व कागदपत्रे शोधून छापण्यात आल्या व त्याचां प्रचंड बोभाटा झाला. जगभर अशा पत्रकारितेची मुक्त कंठाने प्रशंसा झाली. केवळ दोनतीन वार्ताहरांनी मिळून पेंटेगॉन या अमेरिकन संरक्षणकार्यालयातील गोपनीय घटनांवर प्रकाश पाडला. प्रत्येक देशात खाजगी व सार्वजनिक सेवाक्षेत्रांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व लाचलुचपत चालू असते, त्यांविषसी शोधपत्रकारितेला मोठाच वाव आहे. आजच्या पत्रकारितेच्या जगात बहुमानाचे समजले जाणारे पुलित्झर पारितोषिक खास अशा प्रकारच्या पत्रकारितेला दिले जाते की जिच्यामुळे समाज प्रबोधन किंवा सत्यान्वेषण झालेले आहे. सर्वसाधारण वार्ताहर हा घटना घडून गेल्यानंतर तिचे निवेदन करतो. पण शोधपत्रकांराच्या कामाचे स्वरूप थोडेसे वेगळे आहे. घटनेची पाळेमुळे शोधून त्या घटनेचे सामाजिक, राजकीय वा आर्थिक परिणाम काय होतील व भविष्यात होणाऱ्या भयावह परिणामांना कसे टाळता येईल, याबद्दल शोधपत्रकार लिहितो. अशाप्रकारच्या लिखाणाला संयम, चिकाटी व दूरदृष्टी असावी लागते, कारण

जसा एखाद्या हिमनगाचा पाण्यावरील दृश्य भाग हा पाण्याखालील भागाच्या मानाने फारच छोटा असतो. त्याप्रमाणे वरवर लहानशी वाटणारी एकादी घटना हिमनगाच्या टोकाप्रमाणे एकाद्या भयानक उत्पाताची छोटीशी सुरुवात असू शकते, व तिचे हे स्वरूप शोधपत्रकाराने ताडलेले असते. त्याला त्याच्या शोधकार्याची स्वतःची पध्दत तयार करावी लागते व वेगवेगळ्या जोखमी व संकटांना सामोरे जावे लागते.

शोधपत्रकारितेची सुरवात करताना एखाद्या घटनेचा तळ खरोखरच खोल आहे याची खात्री आधी करुन घेतली पाहिजे, तो तळ गाठण्यासाठी त्या वार्ताहरापाशी आवश्यक ते धैर्य, बुध्दी व तयारी असली पाहिजे, कष्ट घेण्याची तयारी असली पाहिजे. या प्रकारच्या पत्रकारितेला वेळ व पैसा दोन्ही खर्ची पडतात. पध्दतशीपणे, हळूहळू माहिती गोळा करून ती जुळवावी लागते, व असा वार्ताहर थोडासा गुन्ह्याचे अन्वेषण करणाऱ्या डिटेक्टिव्हसारखाच असतो. शोधपत्रकाराला किंवा त्याच्या चमूला वेगवेगळे स्त्रोत पहावे लागतात, त्यांच्याकडून माहिती घेऊन आवश्यक तो पुरावा गोळा करावा लागतो व संपूर्ण 'केस' पध्दतशीरपणे तयार करावी लागते. ती तयार करताना कुठल्याही व्यक्तीला निष्कारण गोवू नये, कुणाचेही चारित्र्यहनन होणार नाही ही दक्षता घ्यावी लागते. जो पुरावा हाती आलेला त्यावरुन काढलेले तर्क व मांडलेली विधान सुसंगत व निर्विवाद असली पाहिजेत, सरकारी शासन, राजकीय पक्षांचे कामकाज, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील गैर व्यवहार, आरोग्यविषयक सेवांमधील गैरव्यवहार, ग्राहकांच्या सुविधा व सेवांमधील गैरव्यवहार इ. अनेक विषय शोधपत्रकारितेसाठी आव्हान देणारे विषय आहेत. समाजाचे देणे पूर्ण केल्याचे समाधान, वास्तवाचा शोध घेताना मिळणारा आनंद व समाजाकडून होणारी प्रशंसा या साऱ्या गोष्टी हे शोधपत्रकाराला मिळणारे पारितोषिक होत.

२) अन्ययार्थक (इंटरप्रिटिव रिपोटिंग) हा आणखी एक पत्रकारितेचा खास प्रकार होय. विविध प्रकारचे राहणीमान व विविध छंद असलेल्या आजच्या आधुनिक वाचकांची ती गरज आहे. विवेचक पत्रकार हा विषय, घटना व संकल्पना यांचे विश्लेषण करतो व योग्य तो अर्थ लावतो वाचकाला नवे विषय सुलभ रीतीने समाजवयाचा त्याचा हेतू असतो. बहुधा विश्लषण, स्पष्टीकरण यांबरोबर वार्ताहराचे किंवा पत्रकाराचे त्या विषयावरील अथवा घटनेबद्दल स्वतःचे असे मूल्यामापन वा मतप्रदर्शन असते. या प्रकरच्या लिखाणाला 'कार्यकारणभावाचे वृत्तकथन' असेही म्हटले जाते. घटनेच्या मागे असलेली कारणे दाखवून त्यांच्यामुळे कार्य घडून येते, ते पत्रकार स्पष्ट करतो. उदा. मुंबईसारख्या शहरात आरोग्यविषयक स्थिती काय आहे हे दाखवताना व्यापार व उद्योग, वाडती लोकसंख्या, वाढते प्रदुषण व आरोग्यविषयक सेवांचा तुटवडा हे सारे, चित्रे कार्यकारणभावासह वार्ताहर दाखवून देईल. शहरातील कौटुंबिक पातळीवर वीज कशी वापरली जाते, तिचा अपव्यय कसा केला जातो व अमूल्य अशा नैसर्गिक साधनसामुग्रीची नासाडी कशी केली जाते, हे तो आपल्या लेखामध्ये स्पष्ट करील. त्याच्या या लेखनामध्ये मानवी भोगवाद व निष्काळजीपणा आज कुटुंबसंस्थेतच कसा जोपासला जात आहे हे स्पष्ट होईल. वृत्तपत्रातील अग्रलेख हा त्या वृत्तपृत्राचा दृष्टिकोन व्यक्त करतो, पण अन्वयार्थक वा विवेचक पत्रकारिता ही त्या पत्रकाराचा वा वार्ताहराचा दृष्टिकोन आपल्यापुढे ठेवते. अप्रलेखामुळे ज्ञान, मनोरंजन, टीका व प्रशंसा, लोकमत तयार करणे, घटनांचे विश्लेषण व मूल्यमापन इ. अनेक हेतू साध्य होतात. पण अन्ययार्थक वा विवेचक पत्रकारितेच्या द्वारा पत्रकाराचा अमुक एका विषयावरील दृष्टिकोन उदाहरणासहित व परखडपणे मांडला जातो. घटनांचा योग्य तो अन्वयार्थ लागणे ही आजच्या वाचकांची गरज आहे. पहिल्या महायुध्दाच्या काळापासून या तऱ्हेचे लिखाण करण्याची पाश्चिमात्य जगात सुरवात झाली, कराण त्यावेली पत्रकारांच्या लक्षात असे झाले की अमेरिकेतील लोकांना महायुध्दाची सुरवात का व कशी झाली याची विशेष जाणीव नव्हती. १९२३ झाली 'टाईम' या मासिकाने घटनांचे विश्लेषण व त्यामागील कारणे शोधून काढण्यासाठी एक बोर्ड नेमले. त्यानंतर बहुतेक वृत्तपत्रांनी अशा प्रकारचे लिखाण. छापण्यासाठी विशेष स्तंभ वृत्तपत्रामध्ये ठेवले. हे लिखाण करणारे बहुतेक पत्रकार व्यासंगी तज्ज्ञ होते, तसेच बरेचसे राजकीय भाष्यकार होते. १९३० सालाच्या सुरवातीस ज्या गुंतागुंतीच्या आर्थिक व सामाजिक योजना राबविण्यात आल्या, त्यांना सामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी या पत्रकारितेची मोठी गरज भासू लागती. त्यानंतर काही वर्षातच दुसरे महायुध्द सुरू झाले; वेगवेगळ्या सामाजिक संस्था अस्तित्वात आल्या, सरकारी धोरणे गुंतागुंताची बनत गेली आणि अन्वयार्थक किंवा विवेचक पत्रकारिता ही एक आवश्यक बाब होऊन बसली, उद्योग व व्यापार, प्रवास व वाहतूक, विनिमय व प्रसार माध्यमे यांची भराभर वाढ होऊ लागली, शिक्षणाच्या कक्षा रुंदावत चालल्या तशी या पत्रकारितेस मिळणारी लोकप्रियता व तिची उपयुक्तताही वाढत गेली.

३) पत्रकारितेचा तिसरा लोकप्रिय प्रकार म्हणजे विशेषज्ञ व तज्ज्ञ म्हणून एखाद्या क्षेत्रासंबंधी केलेले लेखन. शासन, कायदा, शिक्षण, अर्थकारण, समाजकारण, कला व संस्कृती, विज्ञान व तंत्रज्ञान, खेळ तसेच इतर अनेक विषयांवरील तज्ज्ञ मंडळी वृत्तपत्रामध्ये त्या विषयांशी निगडित घटनांबद्दल वृत्तकथन व टीकात्मक लिखाण करतात. 'इकॉनॉमिक टाइम्स' 'फायनाशियल टाइम्स' यांसारखी वृत्तपत्रे अर्थसंकल्प, पंचवार्षिक योजना, नवी कायदे, लोकसभेत पास झालेली बिले व दुरूस्त्या, औद्योगिक धोरणे इ. विषयांवर लिहिणाऱ्या पत्रकारांची संपादकीय विभागात नेमणूक करतात. विशिष्ट क्षेत्रातील खास विषयांवर लिहिणाऱ्या पत्रकाराला त्या विषयाचे सखोल अद्यावत् माहिती असावी लागते. तो विषय हाच त्या पत्रकाराचे कार्यक्षेत्र किंवा 'बीट' बनते. त्या क्षेत्रात वाचकांना जाणकारी देणे व किचकट वाटणारा विषय सुलभ करून सांगणे हा हेतू असतो. विशेषज्ञ म्हणवणाऱ्या पत्रकाराने त्या क्षेत्रातील व्यावसायिकांशी सतत संपर्क व संबध ठेवले पाहिजेत. खेळासारख्या विषयात पत्रकार सर्वच खेळ समजू शकेल असे नाही, पण व्यावसायिकांशी संपर्क ठेऊन तो चांगल्या दर्जाचे लिखाण करू शकेल. कला व साहित्य, या विषयांमध्येही त्या जगाशी सतत संपर्क व विचारांची देवाणघेवाण ठेवणे पत्रकाराला अत्यंत आवश्यक आहे.

४) पत्रकारितेचा एक लोकप्रिय प्रकार म्हणजे मुलाखती घेणे. मुलाखती हे वृत्तपत्राचे एक महत्त्वाचे अंग आहे. मुलाखतकार वार्ताहरला संभाषणकला अवगत असावी लागते. मुलाखती दोन प्रकारच्या असू शकतात. एक म्हणजे अनोपचारिक मुलाखत. वार्ताहराच्या 'बीट' मध्ये ज्या घटना त्यांच्या संदर्भातील व्यक्तींची तिथल्या तिथेच घटनास्थळी प्रश्न विचारून थोडक्यात मुलाखत घेणे. उदा. ज्यांच्या डोळ्यांसमोर एखादा अपघात घडला आहे अशा व्यक्ती, किंवा अर्थसंकल्प वाचला जात असता समाजाच्या विविध थरांमधून विविध व्यक्तींच्या होणाऱ्या प्रतिक्रिया टिपणे, एखादा वादविषय मांडून त्यावर लोकमत आजमावण्यासाठी घेतलेल्या मुलाखती इ.

दुसऱ्या प्रकारची मुलाखत ही विशेष व औपचारिक असते, त्यात त्या व्यक्ताचे व्यक्तिमत्त्व, वैयक्तिक मत, विधाने, आवडीनिवडी इ. बद्दल प्रश्न विचारले जातात. अशी मुलाखत ही 'वृत्तवेधी मुलाखत' (न्युज इंटरव्ह्यू) किंवा 'व्यक्तिमत्ववेधी मुलाखत' पर्सनालिटी इंटरव्ह्यू) असू शकते. पहिल्या प्रकारात अमुक त्या व्यक्तीच्या कल्पना व मत लोकांना स्वारस्य वाटेल अशा बेताने मांडल्या जातात. दुसऱ्या प्रकारात त्या व्यक्तीचे जीवनचरित्र, एकंदर व्यक्तिमत्व यांचे चित्रण (प्रोफाईल) दिले जाते.

अनौपचारिक मुलाखती घेताना हजरजबाबीपणा व कौशल्या लागते. घटनास्थळावरील माणसे नेहमीच सहकार्य देतील असे नसते, किंवा उत्तेजित होऊन जास्त किंवा नको तितके संभाषण करतील असेही घडते. मोजकेच प्रश्न व मोजकीय उत्तरे घेऊन थोड्या वेळात या मुलाखती आटोपत्या घ्यायच्या असतात. पण औपचारित मुलाखत घेताना मात्र वार्ताहराला योग्य तो 'गृहपाठ' करूनच जावे लागते. त्या व्यक्तीची पूर्वपीठिका, सद्य स्थिती व पद, त्या व्यक्तीने केलेली विधाने व मांडलेली मते, खास स्वभावविशेष व छंद इ. या अभ्यास वार्ताहराला करावा लागतो. त्या व्यक्तीची भेटीची वेळ आधी ठरवून ती कशी बोलेल, तिची मनोवृत्ती कशी आहे, मोकळेपणा किंवा अलिप्तपणा किती आहे हे जाणावे लागते. मुलाखत घ्यायची ती व्यक्ती कलावंत असेल तर त्या व्यक्तीची कला पाहिली किंवा ऐकली पाहिजे, त्या कलावंताची खासियत काय आहे ते समजूत घेतले पाहिजे. ठरलेल्या वेळेत मुलाखत संपविण्यची दक्षता घेतली पाहिजे, तसेच मुलाखत चालू असताना महत्त्वाचे संभाषण वा मुद्दे टिपून ठेवणे जरूर आहे. सर्वात महत्त्वाची खबरदारी अशी की समर्पक प्रश्नच विचारावेत, मग ते थेट असोत किंवा सूचक असोत, मार्मिक असोत. या व्यक्तीला आवडणार नाहीत अशा प्रकारची सूचक विधाने, खोचक किंवा अपमानास्पद वाटेल अशी टीका करू नये.

५) मुलाखतीप्रमाणेच वार्ताहराला वेगवेगळ्या प्रसंगी होणारी वेगवेगळ्या प्रकराची भाषणे ऐकून वृत्तकथनामध्ये नमूद करावी लागतात. भाषणांमध्ये एखाद्या परिस्थितीवर केलेल्या विचारांचे प्रतिबिंब उमटलेले असते, तसेच त्या परिस्थितीवर केलेले वक्त्याचे भाष्य असते किंवा श्रोत्यांना उद्देशून वा जनतेला उद्देशून केलेला एखादा संकेत नाहीतर इशारा असतो. कधीकधी वक्ता त्या परिस्थितीचे मूल्यामापन करतो; ती जर एखादी समस्या असेल तर तीवर तोडगा सुचवतो किंवा एखादा निर्णय व्यक्त करतो. भाषणे ही प्रक्षोभक व उत्तेजित करणारी असतात, विचारांना चालना व दिशा देणारी असतात किंवा अतिशय नीरस रटळही असतात. त्यात अप्रत्यक्ष

टीका अथवा प्रशंसा असते, नाहीतर कुणा एका व्यक्तीवर, विचारप्रणालीवर कडाडून हल्ला चढवलेलाही असतो. भाषणे नमूद करताना वार्ताहराने त्यातल्या कुठल्या भागाला बातमीचे मूल्य आहे हे पहावे लागते भाषण देणारी व्यक्ती हीच कधी बातमीचा गाभा असू शकते, उदा. 'सेबी' चे प्रमुख शेअरबाजारासंबंधी एखादी महत्त्वाची घोषणा करत असतील तर त्यांच्यामुळे ती बातमी बनते. कधी कधी लांबलचक भाषणात एखादाच मुद्दा महत्त्वाची व बातमीस लायक असा असतो. काही वेळा भाषणाच्या ओघात ज्या व्याक्तींची नावे येतात त्या व्यक्ती अतिमहत्त्वाच्या असतील तर त्या भाषणाला बातमीचे मूल्य प्राप्त होते. भाषणाला जर वादविवादाचे स्वरूप असले, आरोप, व प्रत्यारोप असले तर वाचकांच्या दृष्टीने त्यात स्वारस्य निर्माण होते व तो बातमी बनते. कधी कधी वक्त्याच्या तोंडून निघणारे सूचक ध्वनी, शब्दयोजना व वाक्ययोजना यांच्यामुळेही वार्ताहराला बातमी मिळून जाते. भाषणे उद्धृत करावीत. पुनरावृत्ती, नको ती उदाहरणे टाळावीत.
कधीकधी भाषण चालू असताना त्या जागी इतर घटना अशा घडतात की त्यांचीच (एक छानशी बातमी बनून जाते. उदा. श्रोत्यांची उदासीन वृत्ती किंवा प्रचंड उत्साह, विनोदी किंवा हदय हेलावून हे टाकणारे प्रसंग इ.) पण या प्रसंगांकडे लक्ष वेधताना वार्ताहराने भाषणाचा वेगळा अर्थ लावता कामा नये.

*****

पाठ क्र. १२
लेखन – भाषेचा उपयोग – शैली

लेखनाची कला ही जन्मजात देणगी असते की ती वाढवता येण्याजोगी असते? लेखनाची आकांक्षा बाळगणारे कधी ना कधी हा प्रश्न स्वतःला करतात. देवाने ही अक्कल फार थोड्या आणि नशीबवान लोकांना वाटली असे म्हटले तर वरील प्रश्न अप्रस्तुत वाटतो. लेखनकला दीर्घ प्रयत्नांची आणि व्यासंगाने साध्य होते हे ही आपल्याला ठाऊक असते. अर्थातच आखीव रेखीव नियमांच्या साहाय्याने चांगल्या लेखनाप्रत जाता येणार नाही हे उघड आहे. लेखनचा तत्त्वे व नियम असतात पण त्यांचे स्वरूप जाचक कायद्यांप्रमाणे नसून लेखकाला मार्गदर्शनपर होईल असे असते. उत्तम लेखनाचा कोणताही 'राजमार्ग' असा सांगता येणार नाही; हे लक्षात ठेवले पाहिजे. लेखनाची आपण सवय लावून घेतली पाहिजे. सतत सराव आवश्यक असतो. फ्रान्सिस बेकन म्हणतो त्याप्रमाणे 'लेखनामुळे माणूस परिपूर्ण होतो' हे खरे असले तरी उत्तम लेखन करता यावे यासाठी 'शॉर्ट कट' शोधणारे पुष्कळ लोक आहेत. मोठ्या लेखकांची आत्मचरित्रे चाळली तर ते लिहिता लिहिता मोठे झाले हेच कळून येते. अपयश आणि निराश यांनी डगमगून न जाता त्यांनी अल्पसे का होईना परंतु यश प्राप्त केले. यशासाठी किती कष्ट उपसावे लागतात हे सॉगरसेट मॉम, अनॉल्ड टॉयन्वी आणि अनॉल्ड बेनेट या काही मोठ्या लेखकांच्या उदाहरणावरून दिसून येईल. चांगले लेखक होण्याच्या उमेदीने लिहिणाऱ्या लेखकाने ४०० शब्दांपेक्षाही अधिक लिखाण रोज केले पाहिजे असे टॉयन्बी म्हणतो. एखाद्या व्रचाच्या नियमितपणाने केलेला सराव यशाचा मार्ग दाखवितो.

लेखनाचे माध्यम भाषा हे असल्यामुळे भाषेवर प्रभुत्व असणे ही चांगल्या लेखनासाठी अत्यावश्यक पूर्वअट आहे हे भाषाप्रभुत्व नुसते इच्छा करून मिळत नाही, तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, भाषेचे व्याकरण आणि तिची रचना यांचे आकलन असावे लागते. तसेच निरनिराळ्या लेखनप्रकारांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा लागतो. भाषा हे एक लवचिक असे माध्यम असून तिचा सूक्ष्म आणि प्रभावी उपयोग इंग्रचीतील मान्यवार लेखकांनी कसा केला आहे हे पुन्हा पुन्हा पाहून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे लागते. श्रेष्ठ साहित्यिकांना भाषेचा उपयोग तिच्या सर्व क्षमतांसह करता येतो. साहित्यातील श्रेष्ठ कलाकृती आपल्याला काहीएक उपयोगाच्या नाहीत अशी समजूत पत्रकारितेच्या विद्यार्थ्याने करून घेता उपयोगाचे नाही, किंबहुना जितका मोठ्या साहित्यिकांच्या लेखनाचा त्याचा परिचय अधिक तितक्या त्याला त्या भाषेचा परिणामकारक उपगोग करणे शक्य होईल. 'लेखनाया विद्यार्थी निवडक पुस्तकांचा जवरा आणि उत्साही वाचक असला पाहिजे; असे ग्रेनव्हाइल क्लेसिअर याने म्हटले आहे. ''या निवडक पुस्तकांत त्याला उत्तम लेखनाचे नमुने मिळतील. परिणामकारक लेखनात कोणते गुण असावेत हेही समजेल. कोणते गुण साध्य करण्यासाठी झटले पाहिजे व काय टाळले पाहिजे हेही त्याच्या लक्षात येईल,'' असेही त्यांनी पुढे म्हटले आहे. जी. के. चेस्टरटन, जी. बी. शॉ, ऑस्कर वाइल्ड, चार्लस डिकन्स, जेन ऑस्टेन या सारख्या उत्तमोत्तम लेखकांची ओळख करून घेणे हा लेखन प्रशिक्षणाचा आवश्यक भाग आहे.

पत्रकारितचे लेखन प्रामुख्याने व्यावहारिक स्वरूपाचे असते. दैनिकातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचण्यासाठी केलेली लेखनशैली पत्रकारितेत आढळते. साहित्यिकाहून पत्रकार अशा वेगळा ठरतो. साहित्यिक भाषा मुळातच कल्पकतेने वापरतो. भाषेचा नवनवा शोध घेण्याचे स्वातंत्र्य, त्याला असते आणि वस्तुस्थितीचे तसेच घटनांचे सादरीकरण तो प्रतिभेच्या साहाय्याने करतो. भाषा साधेपणाने, नेमकेपणाने व जपून वापरण्यात पत्रकाराचे खरेखुरे कौशल्य दिसून येते. अगती सर्वसामान्याला समजेल याची दक्षता आपल्या साध्या व नेमक्या लेखनाचे घेत असतो, आणि आपल्या म्हणण्याचा विपरीत अर्थ निघू नये याची खबरदारी घेतो. पत्रकाराचे लेखन संक्षिप्त व स्पष्ट असावे लागते. याउलट साहित्यिक कल्पकतापूर्ण अभिव्यक्ती आणि शैली यांचा आधार घेतो.

वॉल्टर फॉल्स याने शैलीच्या दोन बाजू सांगितल्या आहेत. शब्दांची निवड करणे आणि वाक्यरचना करणे या शैलीच्या दोन बाजू आहेत. लेखक शब्दांचा उपयोग करतो. रंगाऱ्याचे माध्यम जसे रंग असते. तसे लेखकाने प्रमुख

माध्यम शब्द हे असते. संपर्क नाट साधू शकतील असे परिणामकारक ठरतील असे चांगले शब्द वापरावेत, असा शब्दांची निवड करण्याच्या बाबतीतला साधा नियम आहे. सरळ सोपे, साधे आणि विविधतापूर्ण शब्द चांगले शब्द असतात. (शब्दांचा थेट परिणाम आणि त्यांची विविधता असा अर्थ अपेक्षित आहे.) ''नेहमी वापरातले शब्द असल्यास संभापणात नसलेले शब्द निष्कारण वापरू नका'' असे डॉ. रोडोल्फ फ्लेश्च यांनी म्हटले आहे. सुटसुटीत शब्द असताना लांबलचक शब्द वापरण्याची प्रवृत्ती टाळली पाहिजे. अपरिचित शब्द वापरण्याच्या प्रलोभनापासून प्रख्यात फ्रेंच निबंधकार मॉंटेग याने लेखकाला सावध राहायला सांगितले आहे, ''केवळ एक चूष म्हणून अपरिचित शब्दांच्या शोधात आडरानात शिरणारा लेखक मूर्ख होय.'' असे तो म्हणतो. शब्द लेखकाच्या मागे आले पाहिजेत, शब्दांच्या मागे लेखकाने लागता कामा नये असे. मॉंटेगचे म्हणणे आहे.

मोठा परिणाम साधण्यासाठी किती साधे शब्द वापरले आहेत, हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल.

ब्रिटिश राजकीय मुत्सद्दी विन्स्टन चर्चिल यांनी 'हाऊस ऑफ कॉमन्स' च्या सभासदांपुढे – ''आम्ही पराभूत होणार नाही. कदापि शरणागती पत्करणार नाही.'' असा संदेश देणारे पुढील उद्गार काढले. मूळ इंग्रजी अवतरणातील प्रभाव मराठी भाषांतरात शक्यतो जाणवेल असा प्रयत्न केला आहे.

''आम्ही युध्दावरची पकड ढिली होऊ देणार नाही वा हरणारही नाही. आम्ही अखेरपर्यंत युध्द करू आम्ही फ्रान्स मध्ये लढू. समुद्र आणि महासागर यांच्यावर आम्ही लढू. आम्ही संपूर्ण आत्मविश्वासासह हवाई युध्द करु. कोणतीही किंमत द्यावी लागली तर आम्ही आमजे बेट रक्षण करू. (सुरक्षित ठेवू.) आम्ही किनारपट्ट्यांवर तसेच धावपट्ट्यांवर लढाई करू. युध्दासाठी आम्ही शेतात आणि रस्त्यांवर उतरू. आम्ही पर्वतांवर लढा देऊ. आम्ही कदापि शरणागती पत्करणार नाही.''

युध्द जिंकण्याची पक्का आणि दृढ निर्धार चर्चिल यांनी साधे शब्द व लहान वाक्ये वापरून कसा व्यक्त केला आहे. हे या लहान उताऱ्यावरून दिसून येते.

'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे' हे लो. टिळकांचे वाक्य असेच प्रभाव पाडणारे आहे. शिकागो येथील धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी 'माय ब्रदर्स ॲन्ड सिस्टर्स' या शब्दांनी श्रोत्यांना एका क्षणात आपलेसे केले, हे सर्वश्रतच आहे.

'दि किंग्ट इंग्लिश' या पुस्तकात एच्. डब्ल्यू. फाउलर याने शब्दांची निवड कशी असावी याचे मार्ग दर्शन केले आहे.

(१) अपरिचेत शब्दाला परिचित शब्दाचा पर्याय निवडा.

(२) किचकट शब्दाच्या ऐवजी साध्या शब्दाचा उपयोग.

(३) संदिग्धता नसावी : स्पष्टता असावी.

(४) मोठ्या शब्दाच्या जागी लहान शब्द वापरावा.

वृत्तपत्रीय लिखाणात अल्पाक्षरत्व किंवा संक्षेप यांना फार महत्त्व असते. छायाचित्रे व जाहिराती यांनी दैनिकाची इतकी जागा व्यापली जाते की संक्षिप्त लेखन हा गुण असणे भागच पडणे. आज वाचकाला प्रदीर्घ आणि वैचारिक लेखन वाचायला फार थोडा वेळ मिळतो. म्हणूनच वृत्तपत्रातील बातमी वाचताना ती थोडक्यात व रंजक स्वरूपात समोर यावी असे त्याला वाटते. निवडलेला प्रत्येक शब्द उचित असावा असे बंधन संक्षिप्त लेखनामुळे आपोआपच पडते. ''शब्दाची जागा वाक्यात अनिवार्य असायला हवी, दुसऱ्या अधिक चांगला पर्याय आल्यास त्याची निवड असावी आणि अनावश्यक शब्दा गाळावेत असे थोडक्यात म्हणता येईल.'' अचूक शब्दा शोधण्याच्या भरात लेखनाच्या वाचनीयतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अचूक असले तरी वृत्तपत्रीय लेखन कंटाळवाणे असून उपयोगाचे नाही. एखादा लेख वाचताना वाचकानी पकड घेतली पाहिजे व रंजकता टिकून राहिली पाहिजे.

वृत्तपत्रसृष्टीत एक जुना किस्सा सांगितला जातो. एका वार्ताहराने जॉनसृ टाउन. पेनृसिलृव्हेनिया येथील इ. स. १८८९ मधील महापुराचे वृत्त लिहिले. 'पर्वताच्या शिखरावर उभे राहून देव या विनाशाकडे पाहत आहे'असा प्रथम परिच्छेद त्याने लिहिला. संपादकाने उलटटपाली तार केली. ''महापूर बाजूला ठेव, देवाची मुलाखत घे!'' संपादक साहित्यागुणांची कदर करणारे असतात. 'पर्वतशिखवरून देवाने दृष्टिक्षेप टाकावा' अशा प्रकारचे एक परिप्रक्ष्य वृत्तपत्रीय लिखाणाला असते. (एक वेगळा दृष्टिकोण, असा दृष्टिकोण की जो एकाचवेळी अलिप्त ही असेल आणि विषयात रमणारीही असेल. 'शैली' हे आपल्या प्रत्येकाचे अंगभूत असे वैशिष्ट्य असते. ते सहजतेने प्रकट होते असते. सर्व

वाक्यांवर आणि परिच्छेदांवर 'हे माझे लेखन आहे' असे दर्शविणार एक ठसा उमटलेला असतो. व्यक्तीला जर तिची शैली सापडली असली तर लेखनावर त्या व्यक्तीची छाप उमटलेली असते.

चांगले लेखन हे संगीता प्रमाणे आहे. त्याला विशिष्ट ताल, लय वेग, स्वरांचा तालबध्द चढ उतार असतो. ते गुणगुणता येते. श्रेष्ठ शैलीयुक्त लेखकाच्या लेखनाला अंतर्गत संगीत असते. सर्वसाधारण लेखकही शब्दांचा उपयोग करूनही एखाद दुसरी धुन (गीत) तयार करू शकतात. स्वतःच्या शैलीचा शोध घेऊ पाहणाऱ्याने अन्य लेखकांची शैली अभ्यासणे श्रेयस्कर ठरते. काही निश्चित अशी योजना वगैरे करून शैली निर्माण होत नाही. ती सहजच आकाराला येते. वृत्तपत्रीय लेखनाच्या बाबतीत तर हे विशेष खरे आहे; कारण तिथे प्रतिभेच्या इंजिनाला 'डेल लाइन'(वृत्त छपाई विभागात पाठविण्याची निर्धारित वेळ; उदारहणार्थ दैनिकाची अशी वेळ रात्री ९ वाजताची असते) वर धडक मारण्याची वेळ येते तुमच्या सहज शैलीत तुम्ही लिहू लागाल. अनुभवाने ही सहजता येईल.

सी. बी. एस्- संध्याकाळच्या बातम्यात वॉल्टर क्रॉनकॉइट, याने वर्षाच्या दुसऱ्या महिन्याचा उल्लेख 'फेब्-यू-आरी' असा केला तेव्हा त्याने आलेल्या २८ दशलक्ष श्रोत्यांना आपण चांगला शब्दकाश पाहून हा उच्चार केल्याचे सांगितले. किती तरूण पत्रकारांना अशी बुध्दी झाली असती, हा प्रश्नच आहे.

जुन्या पिढीतील पत्रकार इंग्रची भाषा लेखन नियमांना अनुसरून वापरली पाहिजे असा आग्रह धरतात. ज्यूरींनी रेड स्मिथ याला 'पुलित्झर पुरस्कार' दिला (त्याच्या क्रीडा लेखनाबद्दल) तेव्हा त्यांनी स्मिथची त्याच्या भाषा उपयोग करण्याच्या काळची विषयी आणि तो त्याबाबतीत बाळगीत असलेल्या आदराविषयी स्तुती केली. हा दुर्मिळ पुरस्कार आहे. आमच्या नामवंता विद्यापीठातील पदवीधरांसह आजच्या नवीन पत्रकारांमध्ये दिसन मूलभूत लेखन विषयक दोषांबद्दल या ज्येष्ठ पत्रकारांनी काळजी व्यक्त केली आहे. नवोदित पत्रकारांची कामगिरी यथायोग्य व्हावी यासाठी अनेक तात्पुरते उपाय मूलभूत नियम ठाऊक नसतील तर. कारणे काहीही असली, तरी त्यांनी नियम शिकून घेतले पाहिजेत.

भाषेच्या वापराबाबत वृत्तमाध्यमांना शिथिल राहून चालणार नाही. वृत्त, मते आणि विचार लोकांना शक्य तितक्या परिणामकारकपणे समजले पाहिजेत, अशा प्रकारचे प्रसारण त्यांनी केले पाहिजे. वाचक श्रोते किंवा प्रेश्रकांच्या आदरास पाच व्हायचे असेल तर सुशिक्षितांच्या दर्जाला साजेशी भाषा त्यांना वापरायला हवी. व्याकरणाच्या नियमांना अनुसरून लिहिले तर ते चांगल्या पत्रकरितेला उपकारक ठरते, हे निर्विवाद आहे. नेमक्या भाषेमुळे घटनांचा तपशील अचूकपणे समजतो. म्हणूनच व्याकरण आणि पत्रकरिता एकमेकांच्या जोडीने उत्तम कार्य साधू शकतात. पुढील व्याकरण विषयक नियमावली पत्रकारांच्या लेखनातील काही महत्त्वाचा त्रुटी दाखवते.

विशेषणे -

अननुभवी लेखक तसेच अनेक लेखक विशेषणे फसवी असतात हे जाणून त्यांना जपून वापर करतात. विशेषणांचा अतिवापर टाळावा, त्यांचा साक्षेपाने वापर करावा, आवश्यक तेवढाच उपयोग करावा. 'ला जस्टिस' या वृत्तपत्राचा संपादक 'जॉर्ज क्लेमेन्स्यू' आपल्या वार्ताहरांना नेहमी सांगत असे ''तरुणांनो, वाक्य लिहिताना नाम वापरा, क्रियापद वापरा, पुरक शब्द वापरा; परंतु तुम्हाला विशेषण वापरायचे असेल तर माझी परवानगी घ्यावी लागेल.'' ह्या सांगण्यामागे अनावश्यक विशेषणे टाळावीत असा हेतू होता. मराठी बातम्यांत अनेकदा 'माननीय, मुख्यमंत्रीजी श्री. शरदरावजी पवारजी' असा अनावश्यक शब्दा समूह वापरला जातो. असे प्रयोग टाळावेत. प्रत्यय नसलेले क्रियाविशेषण काही वेळा विशेषण समजून त्याच्या वापरात चूक झाली आहे अशी दिशाभूल होते. 'गो स्लो' हा शब्दप्रयोग बरोबर आहे. ('स्लो' हे प्रत्यय न लागणारे क्रियाविशेषण आहे) परंतु 'ही ड्रोव्ह केअरफुल' हे वाक्या चुकीचे आहे. 'केअरफुल' हे विशेषण खरे, परंतु ते क्रियापदाला पूरक कार्य करणारे असल्याने क्रियाविशेषण म्हणून वरील वाक्य 'ही ड्रोव्ह केअरफुली' असे वाक्य लिहावे लागेल.

इंग्रजीमधील भाववाचक नामे मराठीत आणखी एक प्रत्यय लावून चुकीची योजली जातात. उदा. 'विकनेसपणा' असा चुकीचा शब्दप्रयोग होतो. शब्द 'विकनेस' असा हवा व त्याचे मराठी रूप मात्र 'अशक्तपणा' हे होईल. इंग्रजीत अे. ॲन् आणि दी असे तीन शब्दाप्रयोग केले जातात. त्यांना 'आर्टिकल्स' म्हणतात. आर्टिकल्सचा उपयोग टाळून लेखन करण्याची एक समजूत पत्रकारांत आढळून येते. 'आर्टिकल्स'चा वापर सरकटपणे न करणे यामुळे वृत्ताची फार कमी जागा वाचवता येते. अर्थदृष्ट्या वाक्यात गोंधळच निर्माण घेतो. आणि वाचक लेखनावर नाराज होतो.

शब्दलोप -

वाक्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला शब्द गाळताना 'शब्दलोप' या प्रक्रियेचा उपयोग इंग्रजीत होतो. मात्र

या बाबतीत वाक्यरचनेचे नियम लागू होतात. उदा. ''वन पर्सन वॉज किल्ड ॲन्ड अनदर इन्ज्युअर्ड'' – हे वाक्य बरोबर आहे. पण 'वन पर्सन वॉज किल्ड ॲन्ड ट्वेल्व्ह इन्ज्युअर्ड' हे वाक्य चुकीचे आहे,' १२ या संख्येनंतर 'वेयर' हा शब्दा यायला हवा. मराठीत असे उदाहरण वेगळ्या संदर्भात घेता येईल. 'मुलाने वही, पेन्सिली व पुस्तक आणले' असे वाक्य बरोबर आहे. माई या नामांचा क्रम बदलला तर शेवटी येणाऱ्या नामाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलेल. त्या त्या विशिष्ट भाषेची वाक्यरचना समजून घेतली पाहिजे हा मुद्दा येथे महत्त्वाचा आहे. मराठी भाषेतील हे उदाहरण इंग्रजी भाषेतील उदाहरणाला पूरक ठवेल. इंग्रजीतील 'इलिप्सिस' या संकल्पनेचे त्याने पूर्ण स्पष्टीकरण झालेले नाही याची जाणीव नोंदवणे जरूरीचे आहे. आणखी एक उदाहरण घेऊ. गंगाधर महाम्बरेंना साहित्य विषयक पुरस्कार जाहीर !

इथे यांना या शब्दाचा लोप बोलताना होतो; लेखनात मात्र 'महाम्बरे यांना पुरस्कार' हा शब्दप्रयोग मराठी भाषेच्या व्यवस्थेप्रमाणे योग्य आहे.

काही शब्दांचे अनेक वचनी रूप तेच असते. पत्रकाराने हे भाषिक ज्ञान करून घेतले पाहिजे.

'संपादक त्यांच ऑफिसमध्ये आलेले नाहीत.' इथे आपण आदरार्थी अनेकवचन गृहीत धरून 'आला नाही' याऐवजी 'आलेले नाहीत' वा 'आले नाहीत' असे रूप वापरतो. – शब्दांचे अर्थ चुकीचे होतील असे शब्दप्रयोग लक्षात ठेवावेत.

प्रथम परिच्छेद (लीड) कसा लिहितात?

'लीड' या शब्दाचा साधा अर्थ 'बातमीचा प्रारंभ' असा होतो. लहान आणि सरळ (गुंतागुंतीची नसलेली) बातमी असेल तर 'पहिले वाक्य' असा 'लीड' या शब्दाचा अर्थ होतो.

प्रदीर्घ आणि अधिक खोलात शिरणाऱ्या बातमीच्या बाबतीत. (वृत्तविश्लेषण, वृत्ताचा पाठपुरावा इत्यादी.) 'लीड' दोन, ती किंवा कधी चार परिच्छेदाचेही असते. 'समरी लीड' हे अतिशय उपयुक्त व अधिक वापरले जाणारे 'लीड' आहे. व्यावसायिक वृत्त लेखक होण्यासाठी 'समरी लीड' लिहिता येणे आवश्यक आहे.

'समरी लीड' –

सामान्यतः कोण, काय, कधी, कोठे व का या पाय प्रश्नांचे आणि कसे या प्रश्नाचे उत्तर देणारा प्रास्ताविक परिच्छेद 'समरी लीड' म्हणून ओळखले जाते.

१) काय घडले त्याचे निवदेन
२) कोणत्या लोकांवर परिणाम झाला आहे?
३) घटनेची वेळ
४) ठिकाण
५) घटनेच्या आजूबाजूची परिस्थिती
६) काही परिस्थितीत आरोपांचा समावेशही आवश्यक ठरतो.

'समरी लीड' या प्रकारांतील विविधता –

'समरी लीड' आटोपशीर असावे लागते; परंतु काही वेळा इतके काही सांगायते असते की 'लीड' प्रदीर्घ आणि सखोल होते. 'दि ब्लाईड लाड' आणि 'दि डिलेड आयडेंटिफिकेशन लीड' प्रास्ताविक परिच्छेदांना लहान आणि आटोपशीर बनवतात. 'ब्लाइंड लीड' वाचकाला बातमीचा गोषवारा (सारांश) दोन टप्प्यात सांगते. पहिल्या भागात वेचक किंवा निवडक माहिती देऊन दुसऱ्या भागात तोच धागा पकडून माहिती पुरवते. उदाहरणार्थ,

वाहतूक मालाच्या ट्रकखाली सापडल्यामुळे 'कारल्टन' येथील ४ वर्षाचा एक मुलगा शनिवारी जखमी झाला,

२६ डब्ल्यू, मेनस्ट्रीट येथे राहणारा विल्यम अेबट हा 'कारल्टन जनरल हॉस्पिटल' मध्ये असून त्याची प्रकृती स्थिर आहे.

घटना वाचकाचे लक्ष वेधून घेणारी आणि पुरेशी आकर्षक अशी बातमी योग्य असेल. तरच हे 'लीड' परिणामकारक ठरते, 'काय घडले?' हा बातमीचा घटक 'कोणाच्या बाबतीत घडले? य प्रश्नापेक्षा महत्त्वाचा असतो तेवहच हे लीड प्रभावी ठरते.

द डिलेड आयडेटिफिकेशन लीड –

याप्रकारात पहिल्या परिच्छेदात नाव दिलेले असते; परंतु पूर्ण ओळख राखून ठेवली जाते, –दुसऱ्या कधी कधी त्याही नंतर दिली जाते.

हॅरी कुक्स हा 'कॅरल्टन जनरल हॉस्पिटल मध्ये सोमवारी रात्री अत्यवस्थ स्थितीत होते. शनिवारी एका कारने त्यांना धक्का दिला होता.

३।। एन्. कॅलहौन स्ट्रीट येथील क्रुक्स हा ४५ वर्षे वयाचे रहिवासी गळ्याचे हाड, पोटाचा भाग आणि उजवा घोटा मोडल्यामुळे हॉस्पिटलमध्ये दाखल झाले असून कॅलहौन स्ट्रीटवर विस्कॉसिन ॲव्हेन्यू ओलांडीत असताना त्यांना जबर मार बसला. त्यामुळे घटनास्थानापासून ते ४० फूट दूर फेकले गेले.

'डिलेड आयडेर्टिफिकेशन' या प्रकारच्या लोड मध्ये माहितीचा काही भाग वगळला जातो. त्यामुळे लीडचा पहिला परिच्छेद नेटका आणि वाचनीय होतो. या उदाहरणात दुसऱ्या परिच्छेदापर्यंत व्यक्तीची ओळख, वय आणि रस्त्याचा ठावठिकाणा, या अपघातग्रस्त व्यक्तीच्या बाबतीतल्या गोष्टी दिलेल्या नाहीत.

ब्लाइंड लीड प्रमाणेच येथेही बातमीचे मुख्य सूत्र सांगण्याची मूळ कल्पना आहे. वाचकाला ठळक गोष्टी आधी सांगून नंतर अधिक माहिती दिली जाते.

'लीड'च्या संदर्भातील अन्य बाजू

डेटलाइन्स, क्रेडिट लाइन्स आणि बायलाइन्स या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. लीडचा मुख्य भाग नसून या गोष्टी त्यापूर्वी येतात. बातमीच्या पहिल्या वाक्यापूर्वी डेटलाइन येते. 'डेटलाइन' मुळे बातमीचे सूत्र समजते. लाड च्या पहिल्या परिच्छेदाच्या आधी येणारी व वेगळी छापलेली ओळ म्हणजे 'क्रेडिट लाइन' होय 'डेटलाइन' मध्ये नसलेली माहिती देणे. वा तिला पूरक असा माहितीचा भाग पुरवणे हे क्रेडिट लाइन चे काम असते. डेट लाइन व क्रेडिट लाइन यांचा वापर प्रत्येक दैनिकानुसार बदलतो. दैनिकाच्या 'शैली पुस्तिके'त (स्टाइल बुक) या दोन प्रकारच्या साधनांचा वापर कसा करावा, ते दिलेले असते. वृत्तलेखकाचे नाव सांगण्याचे काम बायलाइन करते.

शैलीयुक्त लीडसक–

माहितीवर निवेदन करणारी वाक्ये वापरण्याची पारंपरिक पध्दत लीडस च्या लेखनात समान्यतः दिसून येते. मात्र कधीतरी बातमीचे स्वरूपच असे असते की काहीतरी वेगळ्या पध्दतीने सांगण्याची गरज भासते. लीड मध्ये विविधता आणण्याच्या अनेक पध्दती आहेत. काही अगदी साधे प्रकार असे–

प्रश्नांचा उपयोग–

आपल्या परिसराला घरेलु स्पर्श मिळावा यासाठी एखादे गोजिरवाणे मांजर कोणाला हवे आहे काय?

'साऊथ कॅरोलिना हाऊस' मध्ये पॅटस् कोणी घातल्या आहेत? ओळख पाहू.

प्रत्येकाने.

आज्ञार्थी वाक्य

निवृत्ती पत्करण्याची घाई करू नका.

थेट आवाहन–

–धूम्रपान त्याग' या विषयावर कार्य करणाऱ्या 'ग्रेट अमेरिकन स्मोक आऊट' या मोहीमेत सहभागी होऊन धूम्रपान सोडण्याचा आज निर्धार करणाऱ्या १६ दशलक्ष अमेरिकन नागरिकापैकी तुम्ही एक आहात तर! हे तुमच्या अत्यंत हिताचे आहे. परंतु धूम्रपानाविना तुम्ही किती काळा तग धरणार आहात? (याचा गंभीरपणे विचार करून वागा.)

वृत्तलेखन–

आतापर्यंत सांगितलेली कौशल्ये तुम्ही नोटपणे आत्मसात केलीत तर लेखनाच्या अन्य समस्या तुम्ही समर्थपणे सोडवू शकता. कोणताही विषय असो, कोणत्याही स्तरावलील लेखन असो; मग ते राष्ट्रीय वृत्त, स्थानिक वृत्त घटनाधिष्ठित वृत्त, लोकरूची वृत्त, विशेषवृत्त, वृत्त यापैकी काहीही असो, वृत्तलेखन हे कौशल्याचे काम असून तो एक उद्योग व्यवसाय आहे. लेखनाची काही मूलभूद कौशल्ये तुम्ही आत्मसात केलीस तर व्यावसायिक पत्रलेखक (पत्रकार) होण्याचा एक राजमार्ग तुम्हाला सहज खुला होतो.

(वृत्ताचे) कालक्रमानुसार पध्दतीने कथन–

आपल्या घरासमोरच्या गाडीच्या रस्त्यावरून मोठा आवाज करीत जाणाऱ्या कारच्या आवाजाने दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास मिसेस् हॅरी रोझेनबर्ग या जाग्या झाल्या. त्या बैठकाच्या खोलीत धावल्या. त्यांची ज्युडिथ ॲन रॉबर्टस् या नावाची ७ वर्षाची नात पलंगावर झोपलेली दिसत नाही आणि घराचा पुढचा दरवाजा सताड उघडा आहे. असे त्यांना आढळून आले. बालटिमोर चे ॲटर्नी व कामगार नेते यांची बायको मिसेस् शर्ली रॉबर्टस म्हणजेच त्यांच्या मुलीला मिसेस रोझेनबर्ग यांनी हाक मारली. शर्ली रॉबर्टस् आपल्या आईवडीलांना भेटण्यासाठी आलेली होती.

हरवलेल्या मुलीची आई मिसेस् रॉबर्टस् यांनी आपल्या मुलीचे अपहरण झाल्याचे वृत्त दुपारी १ वाजून दहा मिनिटांच्या सुमारास पोलीसांना दिले.

अपहरणकर्ते नजर चुकवून आजोळच्या घरात घुसले, आजोबांच्या पॅटमधून त्यांनी मिसेस् रोझेनबर्ग यांच्या कारच्या किल्लया चोरल्या आणि मुलीला घेऊन गेले असे पोलीसांनी सांगितले.

'बेशोअर ड्राइव्ह' आणि 'बिस्केन बे' चा किनारा यांच्यामधील वालुकामय पट्ट्यात रोझेनबर्ग यांची कार पोलीसांना सापडली. ४ तास १० मिनिटांनी मिळालेल्या माहिती वरून पोलीसांनी हा छडा लावला. कारची चाके वाळून फसली होती आणि ड्राइव्हरने कार बाहेर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याचे टायरच्या खुणांवरून स्पष्ट दिसत होते.

'बेशोअर ड्राइव्ह' च्या आडरस्त्यावर झाडा झुडपात ॲन ज्युडिथचा विवस्त्र व अत्यंत क्रूरपणे छिन्न विच्छिन्न केलेला देह कार पासून थोड्यात अंतरावर सापडला. तिने जीवच्या आकांताने स्वतःचा बचाव करण्याच्या प्रयत्न केला असावा असे तिच्या रक्याने व धुळीने माखलेल्या शरीरावरूनं लक्षात येत होते. निळ्या डोळ्यांच्या त्या अश्राम मुलीवर बलात्कार केला गेला होता आणि नंतर अवजड हत्याराने तिच्या मस्तकावर प्रहार करून तिच्या गळ्याभोवती कापडाचा तुकडा आवळण्यात आला होता. लाल ठिपके असलेला तिचा असलेला तिचा झिरझिरीत नाइट गाऊन तिच्या देहापासून आठ फुटांवर पडला होता.

हेच निवेदन वृत्तपत्रात पुढील पध्दतीने केले जाईल.

'वृत्त' लिहिण्याची वृत्तपत्रांची शैली –

ज्युडिथॲन रॉबर्टस या बार्लाटमोर येथील ॲटर्नी आणि कामगार नेत्यांच्या ७ वर्षाच्या निळ्या डोळ्यांच्या मुलीचे तिच्या आजोबांच्या घरातून आज अपहरण करण्यात येऊन तिच्यावर पाशळी बलात्कार करून त्यानंतर तिला ठार मारण्यात आले.

आपल्या मुलीचे अपहरण करण्यात आले आहे हे मिसेस् शर्ली रॉबर्टस यांनी कळविल्यापासून पाच तासानंतर पोलीसांना फॅशनेबल बेशोअर ड्राइव्ह येथे ज्युडिथचा विवस्त्र व क्रूरपणे छिन्नाविच्छिन्न केलेला देह झुडपात दडवलेला सापडला अवजड हत्याराने तिच्या डोक्यावर प्रहार करून कापडाच्या तुकडा तिच्या गळ्याभोवती आवळला होता. लाल ठिपक्यांचा तिचा झिरझिरीत नाइट गाऊन तिच्या देहापासून आठ फुटांवर पडल होता.

ज्युडिथ ॲनचा चिमुकला देह रक्ताने व धुळीने माखला होता त्यावरून तिने जीवाच्या आकांताने वाचण्याचा प्रयत्न केला असावा असे स्पष्ट होत होते.

ज्युडिथच्या आजी आजोबांच्या, मिस्टर आणि मिसेस् रोझेनबर्ग यांच्या घरात खुनी इसम घुसला. दुपारी सुमारे १च्या सुमारास त्याने रोझेन वर्ग यांच्या पॅटच्या खिशातून कारच्या किल्लाया चोरल्या आणि दिवाणखान्यात पलंगावर निजलेल्या मुलीचे अपहरण केले असे पोलीसांनी सांगितले.

आपल्या घरा समोरील गाडीच्या रस्त्यावरील कारच्या मोठ्या आवाजाने मिसेस् रोझेन वर्ग यांना जाग आली. मुलगी नाहीशी झाली आहे. व पुढचे दार सताड उघडे आहे असे त्यांना आढळले. पोलीसांना १ वाजता १० मिनिटांनी बोलावण्यात आले. ४ तास १० मिनिटांनी पोलीसांना रोझेनवर्ग यांची कार 'बेझोअर ड्राइव्ह' आणि 'बिस्के'न बे चा किनारा या मधील वाळूच्या पट्ट्यात सापडली. तिची चाके वाळून फसली होती. आणि कार बाहेर काढण्याचा ड्रायव्हरने आटोकाट प्रयत्न केल्याचे टायरच्या खुणांवरून स्पष्ट होत होते.

ज्युडिथच्या देह करपासून थोड्या अंतरावर सापडला.

शैलीयुक्त पत्रकारितेला पारंपरिक लेखनपध्दतीत स्थान आहे. परंतु तिचेही स्वरूप बदलते आहे. प्रधान गौण वृत्त कथन पध्दतीला पूरक अशा लेखनपध्दती आल्या आहेत. 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने 'डायमेड' लेखन शैली दिली. आहे तर 'कॅरेफ' शैली पारंपरिक विशेषवृत्तांनी दिली आहे.

'कॅरेफ' शैलीत

प्रधान गौण वृत्त कथन पध्दतीच्या 'लीड' च्या पाठोपाठ प्रदीर्घ कथन येते.

प्रधान-गौण वृत्तकथन पध्दती-

पत्रकारिता लेखनाचा अविभाज्य भाग आहे. सर्व प्रकारच्या लेखनाला लागू पडेल असे एक वैशिष्ट्ये या पध्दतीत आहे. यात पहिला परिच्छेद प्रभावी असावा लागतो. सर्व चांगल्या वृत्तांचा, सर्व चांगल्या पुस्तकांचा पहिला परिच्छेद तसे पाहिले तर प्रभावी असावा लागतो.

कॅरेफ-

'इन्हर्टेड पिरॅमिड' च्या उलट प्रकार यात आहे. बातमीचे सादरीकरण करताना परिच्छेदांची अदलाबदल केली जाते. ('खाली डोके वर पाय' असे काहीसे म्हणता येईल.) खाली असणारे परिच्छेद निवेदनात वर - खाली होतात. पारंपरिक लीड एखाद्या प्रश्नाचे महत्त्व आणि मर्म विशद करते. त्यानंतरच्या घडामोडी कथाकथनाच्या अभिजात पध्दतीने येतात. (प्रांरभ - मध्य-शेवट)

सरळ (क्रमबध्द) निवेदन-

हा कथन प्रकार तर्कसंगत प्रांरभ व तर्कानुसारी शेवट कालानुक्रमाने कथन करतो. परंतु या पध्दतीचे निवेदन पत्रकारितेत सहसा वापरले जात नाही. असे असून ही या प्रकरच्या निवेदनालाही पत्रकारितेत स्वतःचे असे स्थान आहे. चार्लस मॅक्डुवेल या स्तंभलेखकाने याच्या वापराचे समर्थन केले आहे. मोठ्या बातम्यांच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरणाऱ्या छोट्या छाट्या बातम्यांच्या संदर्भात (साइडवार) हे सरळ निवेदन चालून जाते. उदाहरणार्थ 'साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगाचे वर्णन आहे अशा मोठ्या बातमीशी संबधित लेखक मेळावे, ग्रंथ प्रदर्शन अशा अनेक गोष्टी बातम्यांचे विषय असू शकतात. या लहान लहान बातम्या सरळ निवेदन पध्दतीचा देता येणे शक्य आहे. 'पुलित्झर' पुरस्कार विजेत्या 'न्यू यॉर्क टाइम्स' च्या मेयर बर्गर याने या सरळ निवेदन पध्दतीचा उपयोग केला होता. 'एका माथेफिरू खुनी इसमाने न्यूयॉर्क मधील रस्तावरील अनेक माणसांना बंदुकीने मारेल' या घटनेवरील बातमीचा प्रांरभ खुन्याने खुनाच्या सत्राचा जिथे प्रारंभ केला तिथेच झाला व प्रत्यक्ष माहीतगारांकडून खुन्याच्या त्या नंतरच्या माथेफिरू वागण्याचा तपशील वर्गरने दिला.

डायमंड-

बातमीचे मर्म म्हणजे असा भाग की जिथे मुख्य उकल आहे, तिचा तपशील वाचकांपर्यत ठेवणारी एखादा किस्सा किंवा एखादी व्यक्ती या संबधातील माहिती सांगणारा वर्णनात्मक प्रास्ताविक परिच्छेद यात आधी येतो. त्यानंतर अन्य महत्त्वाचा तपशील येतो. या तपशीलामुळे बातमीचे मर्म व घटनाक्रम वाचकांपुढे स्पष्टपणे उलगडता जातो. गाभा (नट्) आणि महत्तपूर्ण परिच्छेद (लीड) हे दोन्ही प्रधान परिच्छेदात येतात व त्यानंतर तत्संबंधाची पार्श्वभूमी त्या त्या तपशीलाच्या महत्त्वानुसार उतरत्या क्रमाने दिली जाते. अर्थात 'डायमंड' लीड कसे लिहावे याविषयीच्या सुसूत्र नियमांपेक्षा वेगळे लेखनही कधीकधी केले जाते. मर्म सांगणाऱ्या 'नट ग्राफ' नंतर काही किस्से येतात व मग अधिक तपशील दिला जातो.

वर्तुळाकार किंवा आवर्ती कथन पध्दती -

जेव्हा गोंधळलेले असता तेव्हा 'आवर्ती' पध्दती वापरावी. शैलीदार लेखकाबद्दाल अंदाज बांधणे कठीण असते. अनुभवी लेखक बातमी कोठेही सुरू करतो आणि रंजक अशा पध्दतीने ती शेवटासही नेतो. 'आवर्तन' (वर्तुळ) पूर्ण करणाऱ्या कथा उत्तम साहित्या ठरतात. एका विशिष्ट गृहीतापाशी कथन सुरू होते व नंतर ते पुन्हा त्याच ठिकाणी येऊन थांबते. 'गूस एग्' हा कथा निवेदनाचा अभिजात ठरलेला प्रकार आहे.

वाचकांच्या भावनाची कदर ठेवणे -

कोणतीही चांगली लिहिलेली बातमी वाचकांकडून दुर्लाक्षिली जात नाही. काही भावभावना गुंतल्या नसतील तर घटना निवेदन वृत्त ठरण्याची शक्यता फार थोडी असते. लेखनात वस्तुनिष्ठता ठेवणे आवश्यक असले तरी लेखन वाचले जाणार नाही इतक्या रुक्षपणे व नीरसपणे लेखन करू नका.

तुम्ही रेकॉर्डस् सांभळणारे सचिव नाही तर वार्ताहर आहात हे लक्षात ठेवा. लोंकांच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचे तुम्ही साक्षीदार आहात आणि कोणीही प्रत्यक्ष निवेदन करणारा एखादी घटना पाहताना त्याच्या भावना निश्चितच हेलावतील.दुःखी होण्यासारखी घटना असेल तर दुःखाची भावना वाचकांपर्यत पोचवा. सुखद अनुभव असेत तर वाचकांना हसण्याचा अनुभव घेऊ द्या. वाचकाला आकडेवारीत स्वातस्य असेल तर त्याला सरकारी निवेदने वाचायला मार्ग मोकळा आहे.

*****

पाठ क्र. १३
पत्रकारितेची शैली

पत्रकारिता हे संपर्क-माध्यम आहे; तेव्हा पत्रकार आपल्यात आणि वाचकात सामंजस्य निर्माण व्हावे यासाठी संपर्काचा उपयोग करून घेतो. माहिती देण्यासाठी, करमणूक करण्यासाठी किंवा उपदेश करण्यासाठी अशा कोणत्याही कारणासाठी संपर्क साधताना वाचकाला त्यात रस निर्माण होईल अशी भाषा तो वापरतो.

संपर्काचे साधन म्हणून तो भाषा वापरतो. शब्द व वाक्प्रचार हे भाषेचे मुख्य घटक असतात. त्यांचा उपयोग कौशल्याचे व नेमकेपणाने करणे आवश्यक असते. पत्रकाराने वाचकाची नेहमीच दखल घेतली पाहिजे आणि प्रामुख्याने
त्याचा विचार केला पाहिजे. कठीण विचार किंवा कल्पना देखील पत्रकाराने वाचकापुढे त्याला सहज समजेल अशा भाषेत मांडली पाहिजे व त्यानुसार त्याची शैली असली पाहिजे. चांगली वार्ताहर योग्य शब्द योग्य वेळी, योग्य भाषेत आणि योग्य प्रसंगी वापरतो. विषय आणि त्याची हाताळणी यांना अनुसरून एखाद्या लेखाची शैली ठरते. काही लिखाण हलके-फुलके असते तर काही गंभीर तऱ्हेने लिहिले जाते. परंतु या दोन्ही ठिकाणी स्पष्टता, अचूकता असावी लागते तसेच या लेखनाचा वाचकावर थेट परिणाम कसा होईल याकडेही लक्ष द्यावे लागते. पत्रकाराला वर्व्य विषयाला
अनुरुप शैली वापरावी लागते. अनुरूपता, साधेपणा, नेमकेपणा आणि समतोलपणा हे शैलीचे मुख्य विशेष होत.

अनुरुपता –

गंभार विषय हलेकेपणाने (हलक्या फुलक्या रीतीने) व वर वर हाताळू नये. जर लिखाणात कृतिप्रवण व्हावे असा हेतू असेल तर शैली मुद्देसूद, खुसखुशीत, खेळकर अशी असावी. घटनेचे वर्णन बातमीत करावयाचे असेल तर सरळसोट कथनपर पध्दती उत्तम ठरेल. शैली प्रसंग व मनःस्थिती यांना अनुरूप असावी हेच या सर्व निदर्शक तत्त्वांवरून समजते. ही अनुरुपता असेल तरच वाचकाचे लक्ष वेधून घेता येईल. लेखकाच्या भावना एखाद्या विषयाबाबत कितीही तीव्र असल्या तरी त्याने वाचकांच्या नाजुक भावनांना दुखापत पोचवता कामा नये.

साधेपणा –

शेलीचा थाटमाट केव्हाही टाळलाच पाहिजे. साधे गद्यलेखन हेच चांगले गद्यलेखन असते. अगदी गंभीर विचारदेखील चांगल्या पण साध्ये गद्यात मांडता येतो. अलंकारिक शब्द आणि वाक्प्रचार टाळावेत. व्यक्त केलेला विचार वाचकांपर्यंत थेट जाऊन पोचला पाहिजे. साधेपणा आणि थेट भिडण्याचे सामर्थ्य ही 'बायबल'च्या प्रमाण प्रतीची वैशिष्ट्ये होत. चांगली पत्रकारिता वाचकांपर्यंत सरळ जाऊन पोचते. वाक्याची गती संथ पडत असल्याने इंग्रजीतील 'पॅसिव्ह व्हॉइस' हा वाक्यरचनाप्रकार टाळावा असा सर्वसामान्य नियम आहे. लहान वाक्ये वापरावीत हे खरे असले तरी त्यांचा अतिवापर एकसुरीपणा निर्माण करतो, आणि लेखन नीरस होते. लहान आणि मध्यम वाक्ये वापरताना कोणत्याही एका प्रकारच्या वाक्याचा अतिरेक होऊ देऊ नये. मुख्य विधानाशी पूरक वाक्यघटक अर्थदृष्ट्या संबंधित असावेत याची काळजी मिश्र वाक्ये लिहिताना घेतली पाहिजे.

चांगल्या पत्रकाराकडे विपुल आणि चांगला शब्दसंग्रह असणे आवश्यक आहे.

समतोलपणा –

'पॉरझ' या शब्दाचा अर्थ पूर्ण समतोल शैली असा होतो

लेखनाची शक्ती वाढविणारा, त्याला गुणवत्ता देणारा, त्याला सामर्थ्यवान करणारा भाषेचा समतोलपणा हा घटक शैलीचा गाभा आहे; महत्त्वपूर्ण घटक आहे. शैलीला समतोलपणा देणारी कितीतरी साधने वापरता येण्याजोगी आहेत परंतु त्यांचा वापर काळजीपूर्वक व संयमाने केला पाहिजे. उदाहरणार्थ, 'अलंकार' हे एक उपयुक्त साधन आहे परंतु त्याचा वापर जपून केला पाहिजे. योग्य अलंकारामुळे तुमचे लेखन लज्जतदार, रंजक होते.

समतोलपणाचा संबंध भाषेच्या नादाशीही असतो. एखादी रचना स्वतःशी वाचतानाही भाषेचा एक प्रकारचा ताल व तोल जाणवतो.

चांगल्या लेखनासाठी थोडेसे मार्गदर्शन –

सरावाने चांगल्या लेखनाची क्षमता निर्माण होते हे मान्य केले तरी सर्वच प्रकारच्या लेखनाला काही मार्गदर्शक नियम उपयुक्त ठरतील असे आहेत. प्रत्येक प्रकारच्या लेखनाला काही विशिष्ट शैली व कौशल्य लागते परंतु ही सर्वसामान्य तत्त्वे या सर्व लेखनप्रकारांना लागू पडतील. हे नियम थोडक्यात पाहू या.

(अ) वाचकाच्या आवडीनिवडी, त्याच्या सवयी आणि मतांचा अनुनय करणारे लिहू नका. त्याला खूष करण्याच्या हेतूने लिहायला उद्युक्त होऊ नका. एखाद्या समस्येबद्दलची स्वतःची निरीक्षणे व स्वतःचा अभ्यास यावर आधारित व स्वतःला पटले आहे तेच लिहा. त्यामुळे तुमच्या लेखनाला नष्टा आणि नवेपणा प्राप्त होतात.

(ब) अतिव्याप्त आणि सर्वसामान्य विधाने करू नका. त्यामुळे संदिग्धता निर्माण होते, गोंधळ वाढतो. ठोस उदाहरणे व दाखले दिल्याशिवाय वाचकाच्या मनावर प्रभाव पाडण्यात लेखकाला यश येणारे नाही.

(क) निश्चित हेतू आणि दृष्टिकोण ठेवून लिहिले पाहिजे. एखाद्याला खूप काही सांगायचे असेल तसेच त्याला अनेक दृष्टिकोण ठाऊकही असतील; परंतु लेखाच्या मर्यादेत खूप काही सांगण्याचा प्रयत्न केल्यामुळे वाचक बुचकळ्यात पडेल. लेखकच आपली वाच हरवून जाण्याचा धोकाही आहेच. आपण काय लिहीत आहोत हेच तो विसरून जाईल. म्हणूनच एकच गोष्ट एकावेळी नीटपणे सांगणे महत्त्वाचे ठरते. परीक्षणासाठी घेतलेल्या मुद्यावर लक्ष केंद्रित करुन त्याच्या सर्व बाजू सांगायला आपण शिकले पाहिजे. एखादा विषय त्याच्या मोठ्या आवाक्यासल विस्तृतपणे एका लेखात सामावणे शक्य नाही. थोड्या गोष्टी सांगा, त्यांचे यथासांग परीक्षण करा आणि एक दृष्टिकोण द्या. (हेच महत्त्वाचे आहे.)

(ड) तर्कसंगत लिहिले पाहिजे. लेखातील विचार तर्कशुध्द रीतीने संगतवार मांडला पाहिजे. एका विचारावरून दुसऱ्या विचाराकडे जाताना आणि एका परिच्छेदाकडून दुसऱ्या परिच्छेदाकडे जाताना वाचकाला लेखकाच्या विचाराची दिशा समजली पाहिजे. लेखक ज्या पध्दतीने विचार मांडल आहे त्या बरोबर वाचक जात राहतो.

(इ) बेजबाबदारपणे लिहू नका. तुम्ही काहीही लिहाल तरी वाचक त्याचा स्वीकार करतील ही समजूत चुकीची आहे. तुम्ही त्याच्या गळी कोणतेही लेखन उतरवाल हाही कल्पना बरोबर नाही. निसटती विधाने, आरोप, निष्कारण आरोप करणे सोपे आहे पण एकदा का ते खोटे ठरले तर मात्र लेखकाची सचोटी आणि त्याचे स्थानच शंकास्पद ठरते, धोक्यात येते. लेखकाची वाचकांच्या बाबतीत नैतिक जबाबदारी असते. वायकांना माहिती देताना, त्यांच्यापुढे विधाने करताना पुरेसा पुरावा (त्या वृत्ताला दुजोरा) आहे याची खात्री करून घेतली तर पत्रकार त्याची जबाबदारी पूर्णपणे पार पाडतो असे म्हणतायेईल. लेखकाने लिहिलेला मजकूर पडताळून पाहण्याचे व तपासण्याचे मार्ग वाचकाजवळ नेहमीच असू शकतात, हे लेखकाने ध्यानात ठेवले पाहिजे. शहानिशा केल्याशिवाय केलेले लेखन म्हणूनच बेजबाबदार ठरते.

''लहान वाक्ये वापरा. लहान परिच्छेद वापरा. जोमदार इंग्रजी वापरताना सरळ लेखन करण्याचा प्रयत्न करायला विसरु नका. विधायक भूमिका घ्या. नकारत्मक भूमिका घेऊ नका..... लेखन व्यवसायात हे साधेनियम मी शिकलो. त्यांला विसर कधीही पडला नाही. सांगत असलेल्या विषयाबद्दल ज्याला आस्था आहे व जो ते सचोटीने लिहीत आहे त्याला लेकनात यशस्वी होणे अजिबात अशक्य नाही.'' – अर्नेस्ट हेमिंग्वे

साहित्य आणि पत्रकारिता अशी दोन्ही क्षेत्रे समृध्द करणारे उत्तमोत्तम लेखक आहेत. अभावातून सृष्टी निर्माण करण्याचे कार्य करीत असल्यामुळे साहित्यिकाला 'सृजनशील लेखक' असे म्हटले जाते.

सर्वसामान्य वृत्तपत्र वार्ताहर आग, एखादी प्रचंड सभा, कोर्टापुढील खटला, एखादे भाषण अशा पैकी एखाद्या घटनेने वृत्तकथन करतो. स्वतःच्या दृष्टिकोणातून बातमी कथन करण्याचे व त्यावर स्वतःची मते देण्याची, अन्वयार्थ लावण्याची संधी मोठ्या लेखकाला किंवा झुंजार पत्रकाराला दिली जाते.

साहित्यिक पत्रकारिता –

लेखनाची सखोल दृष्टी आणि प्रतिभा यांची जोड आपल्या पत्रकारितेला देऊ शकणारा पत्रकार साहित्याच्या जवळपास जातो. वृत्तपत्रात एखादा पत्रकार अधिकारच्या जागेवर असला तर त्याच्याकडे साहित्यिक पत्रकार होण्याची कुवत असतेच असे मात्र नाही. साहित्यिक पत्रकार म्हणून स्वतःची योग्यतासिध्द करण्यासाठी टीकाकार, संपादक स्तंभलेखक, झुंजार

वार्ताहर यांना कठोर मेहनत करावी लागते. 'डेडंलाइन' साठी लेखन करीत असताना, त्या घाईगर्दीतही पत्रकार साहित्यकृती ठरेल असे काही लिहून जातो. इ. स. १९०६ मध्ये भूकंपामुळे सॅन फ्रॅन्सिस्को उद्ध्वस्त झाले तेव्हा 'न्यू यॉर्क सन' या वृत्तपत्रात विल आयर्विन हा तरूण वार्ताहर होता. सॅन फ्रॅन्सिस्कोचा असल्याने आणि शहर त्याला चांगले माहीत असल्याने 'सन' या वृत्तपत्रासाठी ही बातमी लिहिण्याचे काम त्याच्यावर सोपवले गेले. 'दि सिटी दॅट वॉज' या वृत्तकथनात त्याने सुंदर, आनंदी आणि निसर्गरम्य अशा त्याला माहीत असलेल्या 'सॅन फ्रॅन्सिस्को' चे वर्णन केले. अतिशय प्रभावी आणि उत्कृष्ट उतरलेले हे वृत्तकथन साहित्यिक पत्रकारितेचे उदाहरण होय.

वसाहतींच्या काळापासून आजपर्यंत साहित्यिक पत्रकारांचे लेखन अमेरिकेत होत आले आहे. आत्माविष्कार करण्यासाठी वृत्तपत्राचे लेखन त्यांनी केलेच पण लेखनाचे प्रशिक्षण केंद्र म्हणूनही लेखन केले. या लेखकांचे पाच वर्ग पडतात. विनोदी लेखन करणारे, निबंधकार, टीकाकार आणि काही वेळा कवींनीही वृत्तपत्रांच्या स्तंभलेखनात आपल्या उपजत कलागुणांचा उपयोग केला (साहित्यगुणांचा उपयोग). मानवी स्वभाव आणि मानवी संबंध पाहण्यासाठी व पारखण्यासाठी पत्रकारितेच्या कामाचा उमेदवारी म्हणून कथा कादंबरी लेखकांची उपयोग केला.

निबंधकार आणि टीकाकार यांना वृत्तपत्रात स्थान आहे. जोसेफ ॲडिसन आणि रिचर्ड स्टील अठराव्या शतकातील वृत्तपत्रलेखक होते. अठराव्या शतकातील उत्तम लेखनाची उदाहरणे म्हणून 'स्पेक्टेटर' मधील त्यांचे निबंध सांगता येतील. नॅथॅनिएल पार्कर विलीस इ. स. १८४० या दशकातील अत्यंत लोकप्रिय निबंधकार व स्तंभलेखक होता. आज तो फारसा माहीत नाही. न्यूयॉर्क मधील वृत्तपत्रांसाठी लिहिणाऱ्या जेम्स गिबिन्स ह्युनेकर याला टीकालेख आणि शब्दचित्रे रेखाटण्याच्या बाबतीत मान्यता मिळाली होती. वृत्तपत्रांत लेखन सहभाग घेणारा एडगर ॲलन पो याने महत्त्वपूर्ण टाका लिहिली. टीकाकार म्हणून त्याने केलेली परीक्षणे केवळ समकालीन महत्त्वाची नाहीत तर समीक्षेच्या आजच्या विद्यार्थ्यालाही ते लेखन उपयुक्त आहे.

साहित्यिक पत्रकार त्याच्या लेखनशैलीविषयी दक्ष असतो. वृत्ताचे सरळसोट पध्दतीने वर्णन करण्याचे वार्ताहरावर असलेले बंधन साहित्यिक पत्रकारावर नसते. लोकांना घटना सांगणे एवढेच काम न करात घटना त्यांना कशा भावतील हे पाहणे त्याचे काम असते. 'काय सांगायचे' इतकाच प्रश्न साहित्यिक पत्रकारापुढे असत नाही तर 'कसे सांगायचे' हाही प्रश्न त्याला सतावीत असतो.

अर्नेस्ट हेमिंग्वे, जॉन डॉस पॅसोस आणि जेम्स फॅरेल यांच्यासारखे वास्तववादी लेखक साहित्यिक पत्रकारांत आहेत. बोचरा उपरोध व्यक्त करणारे सिन्क्लेअर लुईस यांच्यासारखे लेखक आहेत. उदा. 'मेनस्ट्रीट' हे त्यांचे पुस्तक. रिचर्ड हार्डिंग डेविस यांच्यासारखे रोमॅटिसिस्ट दुसऱ्या बाजूला दिसून येतात. स्वतःचे जीवनाचे दृष्टिकोण लोकांना समजावेत यासाठी आपल्या लेखन कौशल्यांकडे लक्ष देण्यासाठी या साहित्यिक पत्रकारांना विशेष परिश्रम घ्यावे लागतात. प्रस्तुत प्रकरण वृत्तलेखनाशी संबंधित असले तरी वृत्तसंकलन लेखनाहून वेगळे काढणे सोपे नाही. वृत्तलेखन वृत्त गोळाकरणे, त्याची विभागणी करणे, त्याचे विश्लेषण करणे, त्याची शहानिशा करणे या सर्व गोष्टींवर अवलंबून असते. वृत्त जाणणे, वृत्तमूल्य समजणे आणि वाचकांना कशात रस आहे हे जाणणे यांवर वृत्तलेखन कौशल्य अवलंबून असते.

वृत्तकथनासाठी अनेक तंत्रे वापरावी लागतात. हा सर्व तंत्रे मिळून वृत्तसंकलनाची प्रक्रिया सिध्द होते. वृत्तकथनाची ही तंत्रे परस्परांशी संबध्द आहेत तसेच ती परस्परपूरक आहेत. पहिल्या तंत्राला 'स्टेनोंग्रॅफिक' तंत्र म्हणतात. ऐकणे आणि टिपून घेणे एवढेच त्यात अपेक्षित असते. प्रश्न विचारणे किंवा मुलाखत घेणे हे दुसरे तंत्र होय. सुजाणपणे प्रश्न विचारण्याची दक्षता प्रश्नकर्त्याला घ्यावी लागते. तसेच मुलाखतीतला वृत्तमूल्य असलेला भाग निवडण्याची क्षमताही यात लागते. सहजसाध्य असलेल्या ऐकणे व प्रश्न विचारणे या दोन तंत्रांच्या भरीला वार्ताहराला निरीक्षणक्षमतेची जोड घ्यावी लागते. निरीक्षण करायला पत्रकाराला शिकावे लागते. अन्य सूत्रांकडून जमविलेल्या घटनांमध्ये वार्ताहरांना अशा रीतीने जास्त मजकूर घालता येतो. हे निरीक्षणाचे तंत्र अधिक प्रगत आहे आणि शिकायला जास्त अवघड आहे.

चौथे तंत्र शोध पत्रकारितेसाठी शोध घेण्याचे तंत्र आहे. इथे वार्ताहर माहितगार व्यक्ती आणि दस्तऐवजांचा सूत्र (सोर्स) म्हणून उपयोग करतो. शहर समितीची बैठक, (प्रेस रिलिज) पत्रके किंवा भाषणे यातून मिळणारी व कानावर येणारी माहिती या सूत्रांवर वार्ताहर विसंबून राहात नाही. तरबेच वार्ताहर या सर्व तंत्रांचा उपयोग करतो व वार्तासंकलनाच्या या सर्व तंत्रांचा उपयोग करतो व वार्तासंकलनाच्या या सर्व स्तरांवर काम करतो. प्रश्न विचारण्याचे कौशल्य, निरीक्षणशक्ती आणि स्वतंत्र सूत्रांचा उपयोग यांच्या आधारे अचूक आणि अर्थपूर्ण वृत्तकथन करता येते.

पूर्वीच्या काळाच्या तुलनेने या इलेक्ट्रॉनिक युगात वृत्तपत्र हे अधिक कल्पक, आधुनिक असे अधिकाधिक चांगले उत्पादन होणे क्रमप्राप्त आहे. केवळ आजची वृत्तपत्रेच नव्हे तर भविष्यातही वृत्तपत्रांचे लेखन, संपादन आणि व्यवस्थापन अधिक चांगले करण्यासाठी आजच्या व उद्याच्या पत्रकारांना अधिक बुध्दिमान, अधिक प्रशिक्षित आणि अधिक तयारीनिशी सिध्द व्हावे लागेल.

लेखन आणि संपादन ही सर्जक कौशल्ये आहेत. पेन-पेन्सिल, टाइपरायटर किंवा व्ही. डी. टी. या साधनांनी ती कौशल्ये प्राप्त करता येतील. परंपरागत साधनांचा वापर 'इलेक्ट्रॉनिक की बोर्डा ' वर बसल्यावरही उपयोगी पडेल; फक्त या नव्या माध्यमांचा वेगळेपणा जाणून घेऊन काम करावे लागेल.

आज वृत्तपत्र व्ही. डी. टी.च्या की बोर्डावर (बोर्डाच्या आधारे) दैनिकाची प्रत छापतात. शिकाऊ टंकलेखन, संथ गतीचा टंक लेखक, चाचपडत टाइप करणारा पत्रकार असेल तर त्याचा मोठा कठीण काळ येईल. संपादन विभागाला योग्य त्या दिवशी, योग्या त्या पानावर आणि योग्य त्या आवृत्तीत वृत्त दिले जावे यासाठी व्ही. डी. टी. च्या आधारे छपाई होणाऱ्या सर्व कामाशी जुळवून घेण्याची पध्दत शोधणे भाग पडणार आहे.

नाटनेटकी आणि अचूक 'कॉफी' (बातमीचे लिखित रूप) तयार करण्याची जबाबदारी वृत्तलेखकांवर असते. टंकलेखनाच्या चुका नसलेली, टंकलेखनविषयक सुधारणा सुचविण्यात झालेले पेन्सिल मार्कस् (पेन्सिलीने केलेली खाडाखोड) नसलेली अशी 'कॉपी' म्हणजे नीटनेटकी कॉपी होय, सराव आणि अनुभाव यांच्यामुळे कॉपी नीटनेटकी तयार करता येऊ लागते. पण शिवाय काही मूलभूत नियमही पाळावे लागतात. शब्द खोडणे, विभागणे, गाळणे, शब्दांत अंतर राखणे, परिच्छेद पाडणे याबद्दल खुणा असतात, तसेच कॉपी संपादित करण्याच्या काही खुणा असतात. (परिच्छेद, एखादे अक्षर पहिल्या लिपीत लिहिणे, संक्षेप, अवतरण देणे या संबंधात काही खुणा निर्धारित केलेल्या आहेत.)

पत्रकरितेसाठीचे लेखन –

लेखनाला कोणत्याही वृत्तपत्रात अतिशय महत्त्वाचे स्थान असते. वृत्तपत्रीय लेखन हे आटोपशीर असे लेखन असते. मुद्दे थोडक्यात व संक्षेपाने मांडले जातात. आपला अत्यंत मान्यवर कादंबरीकार – विल्यम फॉकनर सारखा कांदबरीकार वृत्तपत्रलेखनाच्या या घाईगर्दीच्या लिखाणात सामावून जाणे जरा अवघडच आहे. दोन पाने चालणाच्या वाक्यांसाठी संपादकांनी त्याच्यावर टीका केली असती. अर्नेस्ट हेमिंग्वे या अन्य कादंबरीकाराने, ज्याने पत्रकारिताही केली. संपादकांना चालेल असे लेखन केले. त्याचे छोटे व आटोपशीर परिच्छेद पत्रकारितेच्या परंपरेतला संग्राह्य ठेवा आहे. आटोपशीर परिच्छेदलेखन गरजेतून निर्माण झालेले आहे. मर्यादित जागेत खूप काही बातम्या रोज वृत्तपत्रांना छापायच्या असतात. कमी जागेत खूप सांगणे हे पत्रकारितेचे अतिशय कठीण असे कौशल्य पत्रकाराला आत्मसात करावे लागते. बराच सराव आणि कठोर संपादनाच्या दिव्यातून गेल्यावरच हे कौशल्य संपादन करता येईल.

परिच्छेद लहान ठेवा. पाच छापील ओळीपेक्षा जास्त असलेल्य परिच्छेद मोठाच म्हटला पाहिजे. तीन चार ओळी म्हणजे अगदी शिकस्त! एखादा संपूर्ण विचार वा विषय वृत्तपत्राच्या परिच्छेदात सामावू शकत नाही. एखाद्या विचाराचे एक दोन ओळीचे केलेले विभाग असे अनेकदा या परिच्छेदांचे स्वरूप असते. वृत्तकथनाच्या गरज लक्षात घेऊन परिच्छेदलेखन केले जाते.

अतिशय त्वरेने मुद्दा स्पष्ट करा. हे काम पहिल्या दोन-तीन परिच्छेदात केले जाते. ज्याला बातमीचा पहिला परिच्छेद किंवा 'लाड' असे म्हणतात. गतिदर्शक शब्द वापरा. गतिमान क्रियापदे बातमीला रोमहर्षक आणि वजनदार बनवतात आणि बातमी सहज नजरेत भरते, वाचली जाते. 'या व्यक्तीने गर्दीत मुसंडी मारली' हे वाक्य 'व्यक्ती रस्त्यातून पळत गेली, या वाक्यापेक्षा अधिक लक्षणीय होते. 'पॅसिव्ह व्हॉईस' या प्रकारच्या वाक्यरचेनमुळे वाक्यची गती संथ होते व वाक्य विचित्र होते. (अर्थदृष्ट्या सरळ राहात नाही.)

तुम्ही काही 'रेकॉर्डिंग सेक्रेटरी' नाही; तपशीलातून निवड करायची आहे, हे लक्षात ठेवा. महत्त्वाच्या आणि रूचिपूर्ण तपशील बातमीतून निवडणे आणि वाचकाचे लक्ष वेधून घेईल आणि टिकवून ठेवणे हे काम पत्रकाराने केले पाहिचे. वृत्तकक्षात येणाऱ्या तपशीलामधील फार मोठा भाग गाळावा लागतो व थोडाच भाग शिल्लक राहतो, ते वार्ताहराला अनुभवाने समजते. बातमीतील उत्तम भाग निवडून तो योग्य क्रमाने लावणे हे पत्रकाराचे काम आहे. यात त्याचे कौशल्य सामावले आहे.

तपशील गोळा करून तो बातमीच्या रूपात व्यवस्थितपणे लिहिणे हे काम पत्रकार (वृत्तपत्राचा लेखक) करतो. पारंपरिक वृत्तलेखन पध्दती घटनाकलानुक्रमाला न अनुसरणारी असते. आधी तुम्ही वृत्ताचा गाभा सांगता आणि

नंतर त्यातील मर्म खुलवून तपशीलवार सांगता. शैक्षणिक जगतात या पध्दतीला इन्व्हर्टेड पिरॅमिड अशी प्रधानगौनवृत्तकथन पध्दती म्हणतात. महत्त्वाच्या उतरत्या क्रमाने (घटनांचे महत्त्व) वृत्त लेखक घटनाप्रसंग लिहितो. यात नेहमीचे निवेदन उलट करून सांगितलेले असते. रहस्यकथेचे लेखन (ज्यात खुनाचा तपशील आहे) खुनाचे वर्णन व नंतर त्याची उकल असा न करता आधी उकल सांगणे व नंतर क्रमाने मागे जात जिथे सामान्यतः लेखन सुरू असते अशा प्रारंभाचे वर्णन केले जाते. या प्रकारच्या लेखनाचे तीन प्रमुख भाग असतात. प्रथम परिच्छेद, मध्य आणि वृत्ताचा विस्तार. प्रथम परिच्छेदात बातमीचा अत्यंत महत्त्वाचे तपशील येतो. मध्यभागी पूरक तपशील येतो व शेवटी बातमीची पार्श्वभूमी सांगणारा जास्तीचा तपशील येतो.

आजची पत्रकारितेची शैली गेल्या शतकात निर्माण झाली. माध्यमाच्या गरजांना साजेशी आणि मितभाषी अशी ही शैली असते, तिची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) परिपूर्ण, सामन्यपणे लहान वाक्ये. प्रत्येक शब्द जास्तीत जास्त परिणाम व्हावा अशा रीतीने निवडलेला असतो.
२) छोटे संक्षिप्त परिच्छेद
३) सुटसुटीत थेट अभिप्राय व्यक्त करणारी साधीसुधी शैली व्हावी म्हणून अनावश्यक शब्द, वाक्य घटक टाकून योग्य अर्थावर भर देणे
४) संपादकीय मते, सजावट आणि थाट यांचा अभाव, अनाठायी विशेषणे, नामे आणि अन्य विद्वज्जड शब्दांना टाळून घटनांना प्राधन्य देणारे वर्णन
५) परिणामकारक नामे आणि क्रियापदे वापरावीत. जुने, ठराविक, सामान्य प्रचारातील व अप्रचलित असे शब्द वापरू नयेत,
६) व्याकरणविषयक नियम योग्य शब्दप्रयोग यांचे पालन करणे.

अनावश्यक शब्द –

अे, ॲन, दी या 'आर्टिकल्स' चा उपयोग इंग्रजी भाषेच्या नियमांना अनुसरून करावा.

वाक्ये सुटसुटीत करावीत –

'समिती अशा निर्णयाप्रत आली' असे लिहिण्याऐवजी 'समितीने निर्णय घेतला' असे लिहावे. दुसरे उदाहरण–'सोसायटीने या प्रश्नावर चर्चा घडवली' आयोजित केली. यापेक्षा 'सोसायटीने प्रश्नावर चर्चा केली' असे म्हणणे सुटसुटीत होईल.

अनेक शब्द योजण्याऐवजी एक शब्द योजावा –

उदा. शंभरावे वर्ष साजरे केले (शताब्दी) हितांचे रक्षण करणारा (हितचिंतक)

तारखा किंवा अन्य तपशील अकारण वाढवू नये.

ह्या येत्या सोमवारी बैठक होईल ऐवजी सोमवारी बैठक आहे; दुपारी १२ वाजता सभा झाली ऐवजी दुपारी सभा झाली असे लिहावे. याप्रमाणे अनावश्यक शब्द, वाक्प्रचार, शब्दघटक टाळावेत, अनेक शब्दांच्या ऐवजी एक शब्द वापरता आला तर वृत्तपत्राची जागा तर वाचतेच पण वृत्तलेखन वा अन्य कोणतेही लेखन आटोपशील होते.

वाक्यघटकांची पुनरूक्ती टाळावी.

जे.... ते, ज्या..... त्या अशा पध्दतीने वाक्य घटकांची कंटाळवाणी पुनरूक्ती टाळावी. उदा. 'सचिवांनी जे काम लिपीकांना दिले होते, ते काम त्यांनी वेळेवर केले नाही.' किंवा 'ज्या उड्डापुलाचे उद्घाटन मंत्रीमहोदय करणार होते त्या उड्डाणपुलाचे काम अपुले राहिल्यामुळे .....

– काही शब्द पुन्हा पुन्हा वापरल्याने त्यांची अर्थवाहकता कमी होते असे दिसून येते. पत्रकारांनी लेखनात काही लकबी रूढ केल्याने असे होते. 'आकाशवाणी पत्रकारितेंचे एक उदाहरण घेऊ. कार्यक्रमाच्या एका निर्मात्यांनी निवेदनात श्रोत्यांना उद्देशून 'मंडळी', 'महाराजा' अशी संबेधने रूढ केली. तो आकाशवाणी कलावंत निवृत्त झाल्यानंतरही काही काळ ही लकब पुढील लेखकात काही काळ ही लगब पुढील लेखकात टिकून राहिली. भोषच्या उपयोगाच्या संदर्भातील या लहानसहान बाबी पत्रकाराने ध्यानात ठेवाव्यात.

*****

पाठ क्र. १४
विशेषवृत्ते – व्याख्या व प्रकार

विशेषवृत्ताच्या काही व्याख्या–

'विशेषवृत्त' म्हणजे काय व ते बातम्यांहून भिन्न कसे असते याचा विचार व्याख्यांमध्ये केला गेला आहे. अचूक आणि परिपूर्ण व्याख्या करणे अवघड आहे. अनेक व्याख्यांपैकी काही पुढे दिल्या आहेत.

१) वृत्तपत्रातील मोठा मजकूर – अभ्यास, संशोधन व मुलाखत यांच्या आधारे प्रश्नांचे स्पष्टीकरण करणारे, विस्तृत आणि अन्वयार्थ लावणारे लेखन म्हणजे 'विशेषवृत्त' होय.

२) घटनांचा पुनरूच्चार करणे हेच केवळ विशेषवृत्ताये काम नसते; घटनांचे आणि तत्संबध्द विचारांचे कौशल्याने वर्णन करणे त्यात अपेक्षित असते. वरवर पाहणाऱ्याला न कळणाऱ्या बातमीच्या महत्त्वाच्या भागवर लक्ष वेधून घेण्याचे कार्य विशेषवृत्त करते.

३) मजकुराच्या सामयिकते व्यतिरिक्त अन्य घटकांना महत्त्व देऊन संपर्क माध्यमांमध्ये प्रसिध्द करण्यासाठी निवडण्यात येणारा मजकूर असे सर्वसामान्यपणे म्हणता येईल. प्रतिष्ठेचा म्हणून मानला गेलेला विषयच पाहिजे असे नाही, तर एखाद दुसऱ्या वैशिष्ट्यपूर्ण घटकामुळे विशेषवृत्त आकर्षक होते.

४) सरळसोट बातमीच्या त्याच त्या प्रश्नांच्या (कोण, काय, कोठे, का, कसे) व्यतिरिक्त काही अधिक बाबतीत परिणाम घडविण्याचे काम विशेषवृत्ते करतात.

५) पत्रकाराने 'वृत्त' सोडून अन्य कोणत्याही लिहिलेला मजकूर

विशेषवृत्त आणि वृत्तकथन यातील फरक

माहिती देणे, करमणूक करणे आणि वाचकांच्या भावनांवर परिणाम घडवणे या बाबतीत तरी विशेषवृत्तपर लेखन आणि वृत्तकथन या दोन्हींची उद्दिष्टे एकच आहेत, असे म्हणता येईल. परंतु या दोहोंत काही मूलभूत फरक आहेत. घटनांचे वस्तुस्थितीला धरून केलेले आणि कोण, काय, कोठे, केव्हा, का व कसे या मूलभूत प्रश्नांचे उत्तर ज्यात सामवले आहे असे कथन असे वृत्ताचे स्वरूप असते. घटनांचे बातमीत निवेदन करताना या मूलभूत प्रश्नांपैकी सर्वात महत्त्वाच्या प्रश्नांना अग्रस्थान मिळते.

वृत्ताच्या परीक्षणाने सुरुवात करून विशेषवृत्त त्याचे सांगोपांग विश्लेषण करते आणि वाचकाला त्या बातमीचे सर्व परिणाम समजावून सांगते. घटना घडल्या तशी त्यांची जंत्री सांगून विशेषवृत्ताचा कार्यभाग साधत नाही. त्यात प्रस्तुत विषयावर नवा प्रकाशझोत टाकायचा असतो आणि त्यामुळे समस्येची खोलवर जाऊन तपासणी करणे अपेक्षित असते. माहिती व करमणूक हे हेतू तर असतातच पण वाचकांची उत्सुकता जागी करणे, सहानुभूती प्राप्त करणे, हास्याची जोड देणे आणि वाचकांच्या अन्य भावनाही जागृत करणे हाही हेतू त्या जोडीने असतो. उदा. अर्थसंकल्प जाहीर होतो. वृत्तकथनात अर्थसंकल्पातील तरतुदींची माहितीच केवळ येईल परंतु समाजाच्या विविध थरातील लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा खटाटोप विशेषवृत्ताचा लेखक करील.

वार्ताहर घटनास्थळी राहून तेथील परिस्थितीचे वर्णन करतो व हे सर्व ताबडतोब प्रसिध्द करण्याचे बंधन त्याच्यावर असते. बातमी शिळी होण्याच्या आत प्रसिध्द व्हावी यासाठी अगदी आवश्यक तेवढा वेळच खर्च करून त्याला त्वरेने बातमी देणे भाग असते. विशेषवृत्त लेखक आपले लेखन हवा तितकावेळ घेऊन करू शकतो. वृत्ताचे यथार्थ आकलन आणि विश्लेषण या दोन्ही गोष्टींसाठी त्याला पुरेसा विचार आणि लेखन करायला अवधी मिळतो. उथळ विचार, गलथानपणा आणि निष्काळजीपणा हे दोष विशेषवृत्त लेखकात असू नयेत अशी अपेक्षा बाळगली जाते. त्याने एखादा दृष्टिकोण बाळगून लेखन केले पाहिजे. असा विशिष्ट दृष्टिकोण घेऊन लिहिणे हे विशेषवृत्ताचे महत्त्वाचे लक्षण आहे. ''दुष्टिकोण हा विशेषवृत्ताचा महत्त्वाचा घटक आहे, असे

मला वाटते. या विशिष्ट दृष्टीमुळे वाचकाला थोड्या वेळातच खिळवून ठेवता येईल आणि नंतर त्याचे लक्ष टिकून राहावे यासाठी विनोद, लोकरुचिपर लेखन, उत्कंठावर्धकता वा त्यासारखे एखादे आकर्षण यांचा वापर करून कलाटणीपूर्वक तसेच मर्मभेदक शेवट करता येईल..... विशेषवृत्तलेखक अगदी कोणताही विषय घेऊ शकेल व थोड्या लेखनकौशल्याने तो वाचनीय करील. बरेचदा लेखाचे कर्तृत्व लेखकाकडे जाते'' असे विचार पिटसबर्ग प्रेसच्या मिस्टर एडी वीचलर याने मांडले आहेत. वार्ताहराला स्वतंत्र मत वा विचार व्यक्त करायला वाव नसतो विशेषवृत्तकराला स्वतःची अशी काही भर घालता येते हा वार्ताहरापेक्षा एक मोठा फायदा त्याला मिळतो. स्वतःचा उद्‌गार, विचारपध्दती, येणारा रोमांचकारक अनुभव, त्याला वाटणारा रस हे सर्व लेखकाला विशेषवृत्तात व्यक्त करता येते.

लेखनशैली व सादरीकरण याबाबतीतही विशेंषवृत्तलेखक व वार्ताहराच्या लेखंनात फरक पडतो. अधिक वेळ व प्रतिक्रिया मांडण्याचे स्वातंत्र्य यांमुळे विशेषवृत्तलेखक स्वतःची शैली निर्णाण करू शकतो आणि कसे सांगायचे याची रुपरेषाही ठरवू शकतो. घाईगर्दीत आणि निर्धारित वेळेच बंधन पाळावे लागणाऱ्या लेखनात जवळजवळ काहीच स्थान असत नाही. विचार व्यक्त करण्यातला थेटपणा व स्पष्टता यांना विशेषवृत्तलेखक यांच्यात एखादा विशिष्ट दृष्टिकोण मांडण्याच्या बाबतीत एक सामंजस्याचा व सहकार्याचा नातेसंबंध निर्माण होतो. लेखकाची व्यक्तिविशिष्ट भूमिका तयार होण्यात शब्दांची निवड आणि वाक्प्रयोगांचा वापर यांचा वाटा असतो. या विशिष्ट भूमिकेमुळे विशेषवृत्तलेखकाला स्वातंत्र्य व अधिक वाव मिळतो. मतपरिवर्तनाच्या प्रक्रियेत शब्दांच्या निवडीला अधिक महत्त्व असते. विशेषवृत्तलेखनात विचारप्रवृत्त करण्याची शक्ती, एखादी विशिष्ट रंग (हा एखाद्या विचारप्रणालीचा रंग किंवा अन्य अर्थ असू शकेल) आणि कल्पनाशक्ती यांची जोड हवी हा विचारही मतपरिवर्तनाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. वाक्ये आटोपशील असली पाहिजेत आणि वाचन रंजक आणि अनिवार्य वाटावे अशी खुबी त्या वाक्यरचेनेत असली पाहिज. वाचकांच्या आवडींची माहिती असणे आवश्यक आहे; ती असेल तरच लेखक वाचकांशी संवाद साधू शकेल म्हणूनच वार्ताहरापेक्षा अधिक वाव व स्वातंत्र्य विशेषवृत्तलेखकाला असले तरी त्याच्यावरची जबाबदारीही तेवढीच मोठी आहे. संकलन, संशोधन, विषयाचे परिप्रक्ष्य (सखोल आकलन), सादरीकरण व कल्पनाशक्ती यांची योग्य ती सांगड आपल्या लेखनात घालता आली तरच विशेषवृलेखक आपल्या कामाची परिपूर्ती करू शकेल.

बातमीवर वार्ताहराचे नाव (सहसा) आढळत नाही. विशेषवृत्ताचा लेखक कोण आहे त्याचा निर्देश असतो.

विशेषवृत्तलेखक

मानवी व्यवहार आणि लोकजीवनाच्या विविध विभागात त्या त्या क्षेत्राचा विशेष अभ्यास केलेले वार्ताहर वृत्तपत्र कचेरीत असतात. आवश्यकता वाटल्यास त्यांना विशेषवृत्त लिहायला सांगतात. वृत्तपत्रकर्मचारी नसलेल्या अशा बाहेरील तज्ज्ञ व्यक्तींना विशेषवृत्त लेखनासाठी पाचारण करण्याचीही प्रथा आहे. अतिशय कमी वेळात काही विशेषवृत्ते तयार करावी लागतात. समोर असलेल्या समस्येवरील सखोल अभ्यास या प्रकारच्या विशेषवृत्तांकडून अपेक्षित नसतो. वाचकाची जिज्ञासा तातडीने भागविण्यासाठी ताबडतोब उपलब्ध माहिती गोळा करणे व महत्त्वपूर्ण विषयावरील तत्संबंधीचा तपशील देणे एवढेच काम ही विशेषवृत्ते करतात.

विशेषवृत्तांचे प्रकरा –

वृत्ताला सखोलता, अर्थपूर्ण व परिप्रेक्ष्य निर्माण करून देण्याचे विशेषवृत्त हे महत्त्वाचे साधन आहे. वॉल्टर फॉक्सने दाखवून दिल्याप्रमाणे विशेषवृत्त ही 'त्रिमिती परिमाण असलेली कथा' आहे हे कथन माहिती देते, आवश्यक तो संदर्भही देते आणि वृत्तकथनाला व्यापक आणि महत्त्वपूर्ण अर्थ प्राप्त करून देते.

कोणत्याही विषयावर विशेषवृत्त लिहिता येते. पत्रकारितेच्यां प्रातात आज अनेकविध प्रयोग होत असताना विशेषवृत्ते वर्गवारीत बसवणे अवघड बाब आहे. अगदी आतापर्यत विशेषवृत्तांचा संबंध 'लोकरूचिवार्तापत्रा' पुरता (ह्युमन इंटरेस्ट स्टोरीज) मर्यादित ठेवला जात होता. परंतु हल्ली विशेषवृत्त लेखक गंभीर विषय हाताळतात. आणि त्यामुळे वृत्तावर आधारित विशेषवृत्ते अधिक महत्त्वाची ठरत आहेत. 'अन्वेषणात्मक विशेषवृत्ते' आज लोकप्रिय ठरते आहेत. अनुभवी वार्ताहराच्या हाती पडल्यास अन्वेषणात्मक विशेषवृत्त सहसा शक्य न होणारी मर्मभेदक दृष्टी प्राप्त करून देऊ शकते. मनोवेधक अशा अलीकडच्या विषयावरील आपण शोधून काढलेल्या गोष्टी सांगत राहिल्यास त्याची एक विशेषवृत्त मालिका तयार होऊ शकते.

बातमी विशेषवृत्त आज पत्रकारितेत सर्वश्रेष्ठ जागा व्यापून असले तरी लोकरूचिविशेषवृत काही कमी महत्त्वाची ठरत नाही. वाचकाची कल्पनाशक्ती वेधून घेण्याचे काम ही विशेषवृत्ते करतात, कारण सामान्य माणसाच्या बाबतीत ही लोकरूचिविशेषवृत्ते काही सांगत असतात. प्रख्यात माणसांवरच ही विशेषवृत्ते आधारलेली असतात असे नसून फारशा माहीत नसलेल्या व्यक्तींवर आधारित विशेषवृत्ते वाचकांची मने हेलावून टाकतात व त्यांना प्रेरक ठरतात. माणसाचा शोध घेण्यासाठी लेखकाजवळ तशीच शोधक व अंतर्भेदी दृष्टी लागते. अशा विशेषवृत्तात त्यामानाने वृत्तमूल्य कमी असते व म्हणूनच लेखकाजवळ तशीच शोधक व अतर्भेदी दृष्टी लागते. अशा विशेषवृत्तात त्यामानाने वृत्तमूल्य कमी असते व म्हणूनच लेखकाजवळ उच्च कोटीचे लेखन कौशल्य असावे लागते. या कौशल्याच्या जोरावर अपरिचित व्यक्ती व अप्रसिध्द घटनांच्या वर्णनात तो वाचकांना गुंगवून टाकतो. लोकरुचिविशेषवृत्तांचे आणखी एक अंग मुलाखतींवर अधारित असणऱ्या व्यक्तिरेखाटनात पाहावयास मिळते. एखाद्या घटनेशी संबध्द असल्यामुळे महत्त्व पावलेल्या व्यक्तीच्या बाबतीतले विशेषवृत्त असले तर ती बातमी विशेषवृत्त होते. लेखकाला आकलन झालेल्या व्यक्तीच्या काही विशिष्ट गुणांना विशेषवृत्तात महत्त्व असले तर व्यक्तिरेखाटन लोकरूचिविशेषवृत्तात महत्त्वा असले तर ते व्यक्तिरेखाटन लोकरूचिविशेषवृत्त समजले जाते.

व्यक्तिरेखाटनात तपशीलाचे बारकावे असले तर व्यक्तिरेखाटनाच्या नाटकाची मूर्ती वाचकासमोर उभी राहू शकते. नायकाच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी त्याच्या तोंडची वाक्ये व जीवनातील काही किस्से उद्धृत करणेही महत्त्वाचे असते. व्यक्तिरेखाटनाचा नायक आपल्या डोळ्यापुढे उभा राहावा व त्याचा आवाज आपल्या कानात घुमावा असे वाचकाला वाटत असते. नायकाच्या स्वतःच्या शब्दांइतकी अधिकृतता अन्य कोणत्याही मार्गाने मिळविणे कठीण असल्याने नायकाकडून जास्तीत जास्त माहिती हस्तगत करण्याचे व त्याचे दृष्टिकोण जाणून घेण्याचे मुलाखततंत्राचे मूलभूत कौशल्य लेखकाजवळ असले पाहिजे.

पाहावीशी वाटतील अशी स्थळे, तात्रिक विषय, संघटना व संस्था, विविध अनुभव आणि तसे पाहिले तर आधुनिक वृत्तपत्रांच्या रंजक विषयांच्या कक्षेतील कोणताही विषय विशेषवृत्ताला चालतो असे असले. तरी प्रासंगिक विषयावर आणि लोकांना सामन्यापण रस वाटेल अशी काळजी विशेषवृत्ताला विषय निवडताना घ्यावी. फार व्यापक विषय न घेता नेमका विषय निवडून एखाद्या विशिष्ट प्रश्नावर किंवा विभागावर लक्ष केंद्रित करावे. उदाहरणार्थ, भारतीय चित्रपटांवर विशेषवृत्त तयार करताना त्याच्या सर्व अंगांवर मिळेल तो मजकूर लिहीत बसण्यापेक्षा अलीकडील प्रमुख प्रवृत्ती, गुन्हेगारी व कामवासनांचे चित्रण, किंवा उद्योगातील नवे चेहरे अशा एका विषयावर लक्ष केंद्रित करून लेखन करणे अधिक श्रेयस्कर आहे.

अन्वयार्थपर वृत्तकथन, अन्वेषणात्मक वृत्तकथन, वृत्तविश्लेषण आणि लोकरुचिवार्ता असे आणखी काही लेखनप्रकार आधुनिक काळात पत्रकारितेचे अरिभाज्य अंग बनले आहेत. या सर्व प्रकारांना वार्तासंकलनात व विशेषवृत्तांस स्थान मिळाले आहे. लोकरूचि जाणून तसा एखादा दृष्टिकोण घेतल्यास 'बातमीचे' विशेषवृत्तात रूपांतर करता येते.

आज लेख विशेषवृत्तांहून भिन्न राहिलेले नाहीत, संपादकीय पृष्ठावर येणारा मुख्य लेख विश्लेषणपर किंवा गंभीर स्वरुपाचे विशेषवृत्तच असते. पी. टी. आय् एन्. एफ्. ए. (इंडिया न्यूज ॲन्ड फीचर अलायन्स), पब्लिकेशन सिंडिकेट आणि पंजाबी फीचर सर्व्हिस या संस्थाकडून संपादकीय पृष्ठावरील मुख्य लेखांचा पुरवठा वृत्तपत्रांना प्रामुख्याने होतो. संपादकीय लेखनात व अग्रलेखातही विशेषवृत्ताने शिरकाव केला आहे.

संपादकीय पृष्ठावर प्रसिध्द होणारा मनोंरजक आणि हलकाफुलका असा तिसरा अग्रलेख 'विशेषवृत्त ' या एकारात अधिक शोभून दिसेल असा असतो. त्याला 'विशेषवृत्त अग्रलेख' असे संबोधता येईल.

पूर्वी अन्वयार्थ लावणे व मतप्रदर्शन करण ही क्षेत्रे संपादकीय सदरांसाठी राखून ठेवली जात होती. आता अन्वयार्थ लावणे हा वार्ताहराच्या कर्तव्याचा एक भाग मानला जातो. वातृकथन हीच दोन कामे फक्त न करता आवश्यक तेथे तो स्पष्टकरण करतो व अन्वयार्थही लावतो.

'शोध पत्रकारिता' हे वार्तासंकलनाचे नवे क्षेत्र मानले गेले असले तरी स्वातंत्र्यपूर्व राष्ट्रीय पत्रसृष्टीत या स्वरूपाच्या अनेक बातम्या आढळतात. याच कारणासाठी ब्रिटिश राजवटीत पत्रसृष्टीतील या प्रकारच्या बातम्या कायदे करून दाबून ठेवल्या जात असत. 'अमृत बझार पत्रिके'च्या इतिहासात अन्वेषणात्मक वृत्तकथनाची उदाहरणे सापडतात. तिहार तुरूंगातील गैर व्यवस्थेबद्दल 'इंडियन एक्स्प्रेस मध्ये (१९७९) प्रसिध्द झालेली 'अश्विन सरीन' यांची बातमी 'शोध' पत्रकारितेचे उत्तम उदाहरण होय. या बातमीने लाकसभेत हलकल्लोळ माजवला होते.

'मुलतान' च्या तुरूंगातील क्रौर्य आणि छळ यांविषयीच्या सनसनाटी गौप्यस्फोटावर आधारलेले विशेषवृत्त लाला लजपतराय यांच्या उर्दू दैनिकात – 'वंदेमातरम्' मध्ये (१९२०) प्रसिध्द झाले. या गौप्यस्फोटात

गोवलेल्या उच्च अधिकाऱ्यांनी दैनिकावर बदनामी केल्याचा खटला भरला. परंतु निकाल अधिकाऱ्याच्या विरोधात गेला आणि या खटल्यातील तपशील 'ब्रिटिश पार्लमेंट' मध्ये सादर केला गेला. तुरूंग सुधारणांचे कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदांपुढेही ही माहिती ठेवली गेली. एकेकाळचा भारताचा 'स्टेट सेक्रेटरी लॉर्ड ऑलिव्हर' याने तुरूंगात होणाऱ्या मोठ्या भ्रष्ट कारभाराकडे लक्ष वेधल्याबद्दल 'वंदेमारम्' चे अभिनंदन केले.

वृत्तविश्लेषण करताना वार्ताहर त्या विषयाचा तळ गाठतो. १९६४ मध्ये नील कॉपल याचे पुस्तक 'डेपथ रिपोर्टिंग' प्रसिध्द झाल्यापासून वृत्तविश्लेषण ही संज्ञा लोकप्रिय झाली. काही लोक 'सखोल वृत्तविश्लेषण' अशी संज्ञा वापरतात. वार्ताहर बातमीच्या सर्व बाजू मांडण्याचा प्रयत्न करतो आणि जास्तीत जास्त शोध घेण्याचा प्रयत्न करतो. सामान्य वाचकाला समजावे अशा हेतूने गोळा केलेल्या तपशीलाचा तो अन्वयार्थ लावतो.

बातमी 'महत्त्वाची घटना' या गोष्टीला महत्त्व देते; तर विशेषवृत्त लोकरूचीला अनुरूप अशा रंजक घटना शोधते. 'सामयिकता' (वेळा) या घटकाचे महत्त वृत्ताला अधिक असते. हे निकष सापेक्ष आहेत, त्यांना काही वेळा अपवादही संभवतात. परंतु एकत्रिपणे सामायिकता व रंजकता हे घटक वृत्त व विशेषवृत्तातीला फरक स्पष्ट करतात.

विशेषवृत्तांचे आशयानुसार पुढील प्रकार होतात.

बातमी विशेषवृत्त –

वृत्ताच्या पृष्ठावर ही छापली जातात; परंतु घटनाधिष्ठित वृत्तापेक्षा यांचे वृत्तमूल्य कमी असते. वृत्ताचा पाठपुरावा करणारे विश्लेषण, प्रसंगावर आधारित परिस्थितीचे वर्णन करणारे लेखन 'कसे' या प्रश्नाचे उत्तर देणारी विशेषवृत्ते या प्रकारात मोडतात. उदाहरणार्थ, चार्लस् शोभराज व डेव्हीड हॉल यांना अटक झाली या वृत्तावर आधारित विशेषवृत्तात शीर्षक होते – 'ॲज ड्रॅमॅटिक ॲज द एस्केप.'

प्रासंगिक विशेषवृत्ते –

वाढदिवशी वा वर्धापनदिनी ही विशेषवृत्ते प्रसिध्द केली जातात. यांची योजना आधी तयार केली जाते. 'वर्धापनदिन' हा त्यातील वृत्ताचा आधारे असतो. यात प्रावीण्य संपादन करणाऱ्यांना 'कॅलेंडरक जर्नॅलिस्ट' म्हणतात. याही विशेषवृत्तात 'लोकरूची'चा एक विचार केला जातो.

हलकीफुलकी किंवा मनोरंजक विशेषवृत्ते –

या प्रकारात वृत्ताची आधार असेल वा नसेलही! मनोरंजनासाठी ती असतात. कित्येक दैनिकांत 'मिडल्स' जातात. (संपादकीय पृष्ठावर मधोमध छापले जाणारे छोटेखानी हलेके फुलके सदर)

व्यक्तिविशेष –

व्यक्तींशी यांचा संबंध असतो. ज्यांच्या बाबतीत महत्त्व व रस वाटेल अशा व्यक्तींवर हे आधारित असते आशय लोकरूचीच्या संदर्भात पुरेपूर समृध्द असतो. मृत्युलेखही या वर्गात मोडतात.

पृथक्करणात्मक विशेषवृत्तांना 'लेख' असे म्हटले जाते. ही म्हटले जाते. ही विशेषवृत्ते विषयाचा सखोल विचार करतात त्याच्या विविध बांजूचे विश्लेषण करतात.

लोकरूचि विशेषवृत्ते –

सामान्य मनुष्य असामान्य परिस्थितीत सापडला किंवा असामान्य माणसाच्या बाबतीत काही सामान्य घडले तर ते 'ह्युमन इंटरेस्ट फीचर' होते. वाचकाच्या हदयाला हात घालण्याचे व त्याच्या भावना हेलावण्याचे सामर्थ्य त्यात असते.

वन्यप्राणी विशेषवृत्ते –

हल्ली पर्यावरण व वन्य प्राणी यांच्यात लोकांना अधिकाधिक रस वाटू लागला आहे. त्यामुळे वृत्तपत्रे आणि मासिके यांच्या संपादकांकडून या विषयांवरील विशेषवृत्ते अधिक छापली जातात. बहुधा या विशेषवृत्तांच्या जोडीला अनुरूप अशी छायाचित्रे असतात.

फोटो फीचर्स –

मुख्यत्वेकरून छायाचित्रांवर अवलंबून असतात. छायाचित्रांना शब्दांचा आधार असतो (फोटो खाली मजकूर 'कॅप्शन्स' असतात.) आजकाल फोटो सोबत असलेल्या कोणत्याही विशेषवृत्ताला 'फोटो फीचर' म्हणण्याची प्रथा पडलेली आहे.

*****

पाठ क्र. १५
विशेषवृत्त लेखकांना मार्गदर्शन

विशेषवृत्त लेखन कसे काय करतो?- लेखकाने निवडलेल्या विषयावरील सर्व मजकूर गोळा केला पाहिजे. मजकूर मिळण्याची सूत्रे अनेक संदर्भग्रंथ, विश्वकोश, त्या विषयावर दैनिके आणि नियतकालिके यांच्यात प्रसिध्द झालेला अद्ययावत मजकूर अशा असंख्या ठिकाणांहून आवश्यक मजकूर शोधता येतो. विषयाची सखोल समज येण्यासाठी व प्रत्यक्ष विषय समजण्यासाठी मुलाखत तंत्राचाही उपयोग होतो

एकदा का मजकूर गोळा झाला व तो शब्दबध्दही झाला का त्याचे पुनलेखन करून रंजक, सुसंगत आणि उत्तम अशा रीतीने एक लेख तयार करता येतो. वाचकांना आकर्षून येईल असे योग्य शीर्षकही द्यावे. लागते. मुख्य शीर्षकाशी सतत संबंध लक्षात येण्याच्या दृष्टीने उपशीर्षके दिली तर वाजकाला लेखाची दिशा व रोख समजायला मदत होते. विशेषवृत्ताचा पहिला परिच्छेद व पहिले वाक्य शीर्षकाइतकेच महत्त्वाचे असते. राटाळ, कंटाळवाणी सुरूवात किंवा फारच सर्वसामान्य अशी विधाने वाचकाला वाचनापासून परावृत्त करतात आणि चटकन तो दुसरा लेख किंवा पुढचे पाहायला लागतो. आकर्षक प्रांरभ उपयुक्त ठरते. वेधक शीर्षक आणि चांगली सुरवात यामुळे लेखक वाचकप्रिय होतो.

विशेषवृत्त लेखकांना मार्गदर्शन

कोणत्याही प्रकारचे विशेषवृत्त असले तरी लेखकाला काही मार्गदर्शक. तत्त्वे उपयोगी पडतातच. 'वाचकप्रियता' निर्माण करायची असल्यामुळे ही तत्त्वे सर्व विशेषवृत्तांना लागू पडतात.

(अ) नेमके लिहाः-

घटनांवर लक्ष केंद्रित करा. अघळपघळ लिहू नका. काघ्याकूट करू नका, विचार, कल्पना, घटना मूर्त स्वरूपात उभ्या करण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असेल तर वाचकाला गोष्टी समजायला सोपे जाते. लेखकच भरकंटायला लागला वाचकाचा गोंधळ उडेल.

(ब) 'तुम्ही' या घटकाचा वापरः

वाचक समरस कसा होईल? वाचकांशी संवाद साधून तुम्ही लिहिता ते त्याला आपलेसे वाटेल म्हणून काय करता येईल? जाहिरातीत 'तुम्ही' हा घटक वापरतात. हाच घटक योजून वाचकाला विचारप्रवाहात ओढता येईल आणि तुम्ही निर्माण करीत असलेल्या वातावरणाशी तो समरस होईल.

काही उदाहरणे-

(१) ''नवीन धोरणावर टीका करण्याचा तुमचा विचार असेल तर----''

(२) ''---- ही गोष्ट करणे मूर्खपणाचे आहे असे तुंम्ही वाटून घेऊ नका.''

(३) '' कोणाही गृहिणीला विचारा आणि ती तुम्हाला सांगेल (की) ----''

(क) 'अवतरणे'

विशेषवृत्ताची वैशिष्ट्ये या अवतरणातून लक्षात यावी. थोड्या वेगळ्या उदाहरणाने हाच मुद्दा स्पष्ट करू. 'रोज मरे त्याला कोण रडे! 'अशी म्हण आहे. मध्य रेल्वेच्या वाहतुकीची दुर्दशा कथन करणाऱ्या एका अग्रलेखाला संपादकाने शीर्षक दिले- 'रोज म.रे. त्याला----'

(ड) मोठा आवाका असणारा विषय लहान-लहान भागांत सांगावा.

प्रदीर्घ आणि किचकट लेख वाचावा लागला तर वाचक कंटाळून जाईल. फार मोठ्या संख्या व खूप आकडेवारी असलेले वा गुंतागुंतीचे लेखन नीरस ठरले. अशा वेळी लहान घटकांत विशेषवृत्त विभागून

मांडल्यास वाचणे व समजणे सोपे जाते.

(इ) गतघटनांचा वापर

विशेषवृत्ताची पार्श्वभूमी समजण्यासाठी व योग्य दृष्टी मिळण्यासाठी गतकालीन घटनांना दिलेला संदर्भ उपयुक्त ठरतो. लेखाची अखंडता, एकात्मता, सातत्य यांना बाधा येणारे नाही हे मात्र भूतकाळ उगाळताना लक्षात घ्यावे लागते. गतकालीन घटना विशेषवृत्ताचा प्रस्तुत विषय समजण्यात उपयुक्त ठरली पाहिजे.

(फ) 'लोकरूची' चा घटक

एखादी घटना कोणा तरी व्यक्तीच्या बाबतीत घडते आहे ही कल्पनात मुळी वाजक आणि तो विषय यांचा सांधा जोडते. (वैऱ्यावरही असा प्रसंग येऊ नये' वगैरे उद्‌गारांत हाच अनुबंध नेहमीच्या) व्यवहारात व्यक्त होतो)

मादक द्रव्ये सेवन करणाऱ्या एका तरूणाला काय भोग सहन करावे लागले हे तुम्ही लिहिलेत तर 'ड्रग ॲडिक्शन' या विषयावरील लेखात वाचकांना साहजिकच रस वाटेल. अशा प्रकारचे लेखन वाचताना वाचक स्वतःला त्या तरुणाच्या ठिकाणी पाहील व विषयाशी तादात्म्य पावेल. एखादी समस्या हवेत मांडण्यापेक्षा जे घडते आहे, ते कोणाच्या तरी बाबतीत घडते आहे हे सांगणे अधिक प्रभावी ठरते.

(ग) मनोवेधक किस्से व त्यांचा वापर

अनेक वाक्ये लिहून जे साधणार नाही, ते एक आठवण किंवा एक किस्सा सांगून जातो. जर तुम्ही एखाद्या क्रिकटपटूची मुलाखत घेत असाल तर त्याने केलेल विक्रम, त्याने काढलेली अर्धशतकें, फलंदाजीतील पराक्रम हे सर्व सांगूनही त्याचा मोठेपणा पूर्णपणे सांगता येईलच असे नाही; तुम्ही एखादी आठवण, आख्यायिका, एखादा किस्सा सांगितलात तर ती मुलाखत परिपूर्ण होईल.

किस्से विविधतापूर्ण असावेत आणि व्यक्तीच्या व कार्यक्षेत्राच्या व्यक्तिमत्वाच्या व कार्यक्षेत्राच्या बाजू किंवा पैलू त्यावरून दिसून आले पाहिजेत. किस्से वापरल्यामुळे विशेषवृत्ताला परिपूर्णता येते. विशेषवृत्तलेखक सर्व माहिती, आकडेवारी, संशोधन, प्रतिपादन आणि दृष्टिकोण या गोष्टींनी सिध्द असला; शैली सादरीकरण आणि मतपरिवर्तन यांच्या तंत्रात वाकबगार असला तरी एफ्. डब्ल्यु हॉगसन यांच्या मदाप्रमाणे त्याने वाजकांच्या मनात जागरूकता निर्माण केली पाहिजे. त्याच्या जवळ संयोजकता हवी. स्वतःचा विषय त्याला चांगला ठाऊक आहे; त्याने संशोधन केलेले आहे, वाचकाच्या बाबतीत तो जागरूक आहे; हे सर्व असूनही वेगवेगळ्या दैनिकांच्या वाचकांपर्यंत जाऊ शकण्याचे, स्वतःचे विचार त्यांच्या पर्यत पोचवण्याचे सामर्थ्य त्याच्या जवळ हवे.

(ह) विनोद–

माफक प्रमाणात योग्य असा विनोदाचा उपयोग केल्यास लेख टवटवीत आणि मनोरंजक वाटतो. गंभीर स्वरूपाच्या लेखातही विनोदाचा वापर करणे शक्य असते. लांबलचक, नीरस आणि किचकट निवेदनामुळे लेखन वाचणे अशक्य होऊन बसते. या ठिकाणी वाचकाचे अवधान टिकवून ठेवण्याचे कार्य विनोदामुळे साधते.

बातमी–विशेषवृत्तांचे लेखन आज होऊ लागले आहे. म्हणून आज वृत्त आणि विशेषवृत्त यांच्यात काटेकोर सीमा आखता येत नाही. उदाहरणार्थ, एखादा सोमवार या वर्षातील सर्वात अधिक ऊष्मा उसणारा दिवस ठरू शकेल. आकाशावाणी पुढील प्रमाणे वृत्त देईल – विक्रमी उष्णतेमुळे शहरातील सोमवारी लोकांच्या अंगाची काहिली झाली आणि कोणतीही सुटका दृष्टिपथात नाही.' वृत्तपत्रातील बातमी विशेषवृत्त पुढील प्रमाणे सुरवात करील.

'सोमवारी आम शहरी नागरिक करीत तेच जॉन हिल्कविच करीत होते. बीचवर आसरा शोधण्यात त्यांनी दिवस खर्च केला.'

निखळ वृत्त आणि रूचिपूर्ण वृत्त (सॉफ्ट न्यूज)

'वृत्त' निखळ स्वरूपाचे असते. पाच 'डबल्यु' आणि एक 'एच्' यांचा घटनांच्या संदर्भात काटेकोरपणे शोध घेणाऱ्या वृत्ताला निखळ वृत्त किंवा घटनाधिष्ठित वृत्त म्हणता येईल. हेच वृत्त अधिक विविधतापूर्ण व रूचिपूर्ण बनू शकते. लोक, ठिकाणे आणि वस्तू जगाला, राष्ट्राला वा समाजाला कोणता आकार देतात याचा जितका शोध घेतला जाईल, तितके त्याचे स्वरूप 'सॉफ्ट न्यूज' असे होईल.

काही वेळा निखळ वृत्त आणि रूचिपूर्ण वृत्त यातील फरक स्पष्टपणे कळतो. आग लागून माणसे मृत्यूमुखी

पडली की या घटनेला वृवमूल्य असते. त्यातून निष्पन्न झालेले वृत्त प्रधान-गौण वृत्त कधनपद्दतीने सांगितले जाते. अर्थातच सर्वात महत्त्वाचा तपशील प्रांरभी येतो. असे असले तरी जेव्हा राज्यपाल गावाला अगदी अनौपचारिक स्वरूपाची भेट देता; गावाकडूल एखाद्या त्यांच्या खास रेस्टॉरंटमध्ये त्यांच्या आवडीची चमचमीत डिश खायला येतात तेव्हा प्रधान गौण वृत्त कथन पध्दतीला लेखकाने पर्याय शोधायला हरकर नाही.

राज्यपाल त्यांचा खास आवडीचा स्वादिष्ट पदार्थ खाण्यासाठी गावात आले आहेत, असे वृत्तकथन करून 'निखळ वृत्ता' च्या स्वरूपात लिहिता येईल. या घटनेवर 'लोकरूचिपर्ण विशेषवृत्त' लिहिता येईल. हा विशिष्ट चमचमीत (झणझणीत) पदार्थ तयार तरी कसा होतो आणि रूचिपूर्ण करता येईल. कोणत्याही प्रकारे ही बातमी दिली तरी शक्य तेवढ्या वस्तुतिष्ठतेने ती लिहिली पाहिजे व ती सहजतेने समजेल हेही पाहिले पाहिजे. पुढील उदाहरणात एकच बातमी 'प्रधान गौण वृत्त कथन पध्दतीने आणि रूचिपूर्ण शैलीत अशा दोन्ही रीतीने लिहून दाखवली आहे.

इन्व्हटैड पिरॅमिड

अपार्टमेंड बिल्डिंग्ज मध्ये घरफोड्यांचे प्रकार गेल्या वर्षीच्या तुलनेत २०० टक्क्यांहूनही अधिक वाढले आहेत. या बाबतीत पोलीसांच्या मते फारच थोडे करता येण्याजोगे आहे. ''अधिक पैसा उपलब्ध करून देऊन जास्त कुमक दिल्यास या वाढत्या गुन्हेगाराला आळा घालता येईल. साक्षीदार पुढे येतील आणि गुन्हगार पकडण्यात साहाय्य करतील इतकीच जास्तीत जास्त अपेक्षा (सध्या तरी) करता येईल.'' असे लेफ्ट. फेलिक्स रॅगिरेज यांनी घरफोड्यांच्या तपासाच्या संदर्भात सांगितले.

बेरोजगारीची भेडसावणारी समस्या या घटकाकडे या वाढत्या गुन्हेगारीचा दोष जातो असा निर्देश करून रेंमिरेज पुढे म्हणाले की संपूर्ण दिवसभर शाळेत असणारे विद्यार्थी बहुतांशी आपार्टमेंटस् मध्ये राहतात हे आणखी महत्त्वाचे कारण आहे.

लोकरूचिपूर्ण विशेषवृत्त -

मंगळवार संध्याकाळचा पाचचा सुमार होता. हर्बर्ट विल्यमसन घरफोडी करणाऱ्या तीन अज्ञान व्यक्तींवर चाल करून गेले. घरातल्या वस्तू जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या पाहून त्यांनी पोलीसांना तातडीने फोन केला व ते मदतीसाठी ओरडू लागले.

पंधरा मिनिटांतच गाडीचा छडा लागून सॅक्स्टन स्ट्रीटवर पोलीसांनी तिघा व्यक्तींना अटक केली. गाडीच्या मागच्या सीटवर तीन पेटिंग्ज आणि शेकडो डॉलर्स किंमत होईल चांदीची नाणी आणि कपडालत्ता या विल्यमस्न यांच्या अपार्टमेंट मधून चोरीस गेलेल्या सर्व वस्तू पोलीसांनी हस्तगत केल्या.

शहरात आकशाला जाऊन भिडलेल्या घरफोड्यांच्या प्रचंड संख्यांमधील विल्यमसन यांच्या अपार्टमेंट मधील घरफोडी हा केवळ एक लहानसा किस्सा आहे. विद्यापीठ परिसरालगतच्या भागात घरफोडींच्या प्रकारात गतवर्षीच्या तुलनेत २०० टक्क्यांनी भरू पडली आहे. वाढती बेरोजगारी या घटनेकडे या गुन्ह्यांचा दोष जातो व या बाबतीत फारच थोडे करता येण्याजोगे आहे असे पोलीसांनी सांगितले.

विशेषवृत्तांचे प्रकार

मानवी भाव भावनांना आवाहन करणाऱ्या, लेखनाला रंग भरणाऱ्या, शिक्षण देणाऱ्या, करमणूक करणाऱ्या वा एखादी बाजू उजळून टाकणाऱ्या लोकरूचूपूर्ण वृत्तापना विशेषवृत्त ही एकच कामचलाऊ संज्ञा वापरली जाते. थेट वृत्त पोचवण्याचे काम विशेषवृत्ताकडून अपेक्षित नसते. आगोदर वृत्तप्रसारणातून प्रसिध्द झालेल्या मुख्य बातम्यांना नवा पेहराव देण्याचे काम विशेषवृत्त करते. स्वतंत्रपणे ते प्रसिध्द होते किंवा मुख्य वृत्ताच्या प्रसिध्दी बरोबर जोड बातमी म्हणून ते प्रसिध्द होते. बातमीयोग्य विषयाबद्दल जास्त माहिती हे जोड वृत्त देते. मुख्यबातमी लगत किंवा दैनिकाच्या त्याच आवृत्तीत ते अन्यत्र प्रसिध्द होते.

विशेषवृत्ताचे प्रकरा असे आहेत-

(१) व्यक्तिरेखाटन

(२) लोकरूचिपूर्ण विशेष वृत्त

(३) प्रवृत्तिकथनपर वृत्त

(४) सखोल वृत्त – वृत्त विश्लेषण

(५) वृत्ताचा पाठपुरावा.

व्यक्तिरेखाटन (पर्सनॅलिटी प्रोफाइल)

वृत्ताच्या वलयातून बाहेर काढून श्रोत्यांना व्यक्तीच्या जवळ आणण्याचे काम 'प्रोफाइल्स' करतात. व्यक्तीचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व चित्रित करण्यासाठी मुलाखती व निरीक्षणे आणि सृजनशील लेखनाचा उपयोग केला जातो. आजच्या माध्यमांमधून व्यक्तिरेखाटने लोकप्रिय झालेली दिसतात. लोकांना दुसऱ्या लोकांबद्दल वाचायला आवडते.

सनसनाटी खुनाच्या खटल्याचा निकाल देणारा न्यायाधीश आणि अपंग मुलांसाठी मदत गोळा करण्यासाठी चाकांच्या खुर्चीवर बसून क्रॉसकंट्री प्रवासात सहभागी होणारी अपंग व्यक्तीं यांची मुलाखत ही व्यक्तिरेखाटनपर विशेषवृत्तांची उदाहरणे होऊ शकतील. मेरी गिलेस्पी यांनी स्वतःच्या वडिलांवर व्यक्तिरेखाटनपर विशेषवृत्त लिहिले. ते दुसऱ्या महायुध्दात युध्दकैदी होते. शीर्षक होते 'आय् डिडन्ट एक्स्पेक्ट टू क्राय.'

लोकरूचिपूर्ण विशेषवृत्त –

प्रतिपाद्य विषयाचे वेगळेपण, भावनिक आवाहन आणि त्याची रंजकता प्रकट करण्यासाठी या प्रकारचे विशेषवृत्त लिहिले जाते. मिस् अमेरिका या कार्यक्रमाचा दिमाख टिकून राहावा यासाठी ॲटलाटिक शहराचे दररर्षी होणारे प्रयत्न, धुण्याचे यंत्र दुरूस्त कसे करावे, देशाच्या बेरोजगाराचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या शहरात लोक कसे जीवन व्यतीत करतात हे 'ह्युमन इंटरेस्ट' चे काही विषय उदाहरण म्हणून देता येतील.

प्रवृत्तिकथनपर वृत्त –

समाजावर प्रभाव असलेल्या लोकांचे वस्तूंचे वा संस्थांचे परीक्षण करणाऱ्या व त्यांच्या संदर्भात दिसून येणाऱ्या प्रवृत्ती दाखवून देणाऱ्या वृत्ताला प्रवृत्तिकथनपर वृत्त म्हणतात. अगदी अलीकडच्या सामाजिक प्रवृत्ती काय आहेत, ते वाचायला लोक उत्सुक असतात. त्यामुळे 'ट्रेंड स्टोरीज' लोकप्रिय होतात. उन्हाळी सुट्टयांच्या काळात (वसंत ऋतूत) येणाऱ्या विविध फॅशन्स, नवीन धर्म किंवा युवकांच्या तोंडी असलेली भाषा असे विविध विषय उदारहणार्थ देता येतील.

सखोल वृत्त, वृत्त विश्लेषण –

व्यापक संशोधन आणि परिश्रमपूर्वक घेतलेल्या मुलाखतींमुळे तयार होणारे वृत्तविश्लेषण मूळ वृत्त किंवा विशेषवृत्त यांच्या पलीकडील किती तरी माहिती पुरवते.

एक विषय विस्तृतपणे मांडणारे प्रदीर्घ बातमी विशेष वृत्त, व्यक्तीने केलेले प्रसाद उलगडून सांगणारे अन्वेषक विशेषवृत्त, (चुका संस्थांकडून ही होऊ शकतात; त्यावरही असे विशेषवृत्त लिहिता येते.) लेखकाने प्रथमपुरुषी कथन केलेला एखादा सुखाचा व दुःखाचा अनुभव अशी विविध रुपे वृत्तविश्लेषण घेऊ शकते. उदाहरणार्थ, तीन कुटुंबावर कॅन्सरचा झालेला परिणाम, अमेरिकेत परकीय नागरिक बेकायदेशीरपणे कसे घुसतात, एक कलापथक कीर्तीशिखरावर कसे पोचले व दुसरे अपयशी कसे ठरले असे काही विषय वृत्त–विश्लेषण पध्दतीच्या विशेषवृत्तांच्या आधारे चांगले मांडता येतील.

वुत्ताचा पाठपुरावा –

हाही वृत्तविश्लेषणाचाच प्रकार म्हणता येईल बातमीयोग्य प्रश्नांवर अधिक माहिती, वृत्ताची पार्श्वभूमी देऊन त्या प्रश्नांना वृत्त विश्लेषण अधिक अर्थ प्राप्त करून देते. वाचकांना अद्ययावत माहिती त्यामुळे मिळते. देशी व्यक्ती संस्था व अन्य कोणतीही गोष्ट आजच्या स्थितीला कशी पोचली हे त्यावरून समजते. खुनो व्यक्तीला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर, लगेच राज्यातील फाशीच्या शिक्षेबाबत विश्लेषण करणारे वृत्त किंवा विद्यापीठाच्या खाद्य सेवांना विशेष करार करण्याची संधी कशी मिळाली या विषयाचे स्पष्टीकरण करणारे वृत्त ही दोन्ही वरील प्रकारच्या वृत्त विश्लेषणाची उदाहरणे म्हणून सांगता येतील विशेष वृत्तासाठी विषय शोधणे आणि तो सविस्तर मांडणे– विशेषवृत्त लेखनामागे काही एक हेतू असला पाहिजे व विषय असला पाहिजे. लेखक निर्हेतुकपणे विशेषवृत्त लिहीत नाही. विशेषवृत्ताचा हेतु निश्चित केला जातो. काही तरी शिकवणे किंवा दडवलेले काहीतरी प्रकटपणे सांगणे, एखाद्या विषयावर नवा प्रकाशझोत टाकणे असा काही एक विशिष्ट हेतू मनाशी बाळगून मग लेखक त्या विषयाला व हेतूला अनुसरुन संशोधन करतो व विशेषवृत्ताची रचना करता. आदि–मध्य–अंत असे विशेषवृत्ताचे तीनही घटक विषयाच्या

अनुषंगाने लिहिले गेले पाहिजेत.

लेखक विशेषवृत्ताचे विषय शक्य तो आटोपशीर ठेवतात. 'कॅन्सर' या असाध्य रोगावर कोणीही विशेषवृत्त लिहायला धजावणार नाही. त्यावर भला मोठा ग्रंथ निर्माण करावा लागेल. अत्याधुनिक औषधें, कोणता आहार कॅन्सरचा धोका कमी करू शकेल, कॅन्सरला एखाद्या व्यक्तीने धैर्याने दिलेली टक्कर यासारख्या एखाद्या विषयावर विशेषवृत्त लिहिणे उत्तम रीतीने साधता येईल.

एकदा विषय निश्चित झाला की सर्व संशोधन, मुलाखती आणि लेखन त्या विषयाला पूरक असे झाले पाहिजे. सांशोधन आणि मुलाखत यांच्या प्रक्रियेत काही नवीन माहिती अशी येण्याची शक्यता आहे की जिच्यामुळे विशेषवृत्ताचा निवडतो तेव्हा त्याला अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात.

नवेपणा

या विषयावर पूर्वी विशेषवृत्त लिहिले आहे का? लेखक नवीन किंवा असामान्य विषय शोधण्याचा प्रयत्न करतो. 'कॅन्सर' या सारख्या जुना विषय निवडला तरी त्याचीही एखादी अलक्षित राहिलेली बाजू घेऊन या विषयाचा रोख बदलता येतो.

विशेषवृत्तात वाचकांना स्वारस्य वाटले पाहिजे. स्वतःचा या विषयाशी काही संबंध नाही असे वाटले तर कितीही चांगले लेखन असूनही लोक ते वाचणारे नाहीत.

खिळवून ठेवण्याचे समार्थ्य– भावनिक आवाहन येथे महत्त्वाचे आहे. वाचकाला त्यात रस वाटला पाहिजे. वाजकांना विशेषवृत्त हसवील की रडवील? हा विचारही महत्त्वाचा ठरतो.

मुद्रणयोग्यता–

लेखकांनी हा प्रश्न विचारात घेतला पाहिजे. लेखक छापण्याच्या योग्यतेचे आहे का? हा प्रश्न लेखकाने न विचारल्यास संपादक विचारील. वृत्त निर्देशक हा प्रश्न उपस्थित करील. ''हे विशेषवृत्त फार लहान व फार मोठे तर होणारे नाहीना? या विषयाच्या संकल्पित व्याप्तीला (वृत्ताचा आंकार) वृत्त मूल्य आहे ना? ''असे प्रश्न लेखकाने विचारात घेतले पाहिजेत. 'विशेषवृत्त' या संज्ञाला अनेक अर्थ आहेत. लेकरूचीपूर्ण वृत्ते त्यांच्या काही गुणांमुळे वाचकांना आवडतात. विशेषवृत्ताचा विशिष्ट दृष्टिकोण त्यांना भुरळ घालतो. विशिष्ट कोनातून एखादा अनुभव पाहिल्यामुळे वाचकांचे रंजन होते व त्यांच्या भावनांना आवाहन केले जाते.

मनोरंजक किंवा गंभीर कसेही असले तरी वाचकाला गुंतवून ठेवण्याच्या वैशिष्ट्यामुळे विशेषवृत्त वाचकाला मोठेच आवाहन करते. मनुष्यस्वभावाच्या सर्वांना ज्ञात असलेल्या वैशिष्ट्यांशी विशेषवृत्त निगडित असते. कोणाही व्यक्तीच्या संबंधात घडलेल्या व घडू शकतील अशा गोष्टी विशेषवृत्ते हाताळतात. इतर लोकांमध्ये वाचकाला वाटणारे स्वारस्य लक्षात घेऊन त्याचा वापर विशेषवृत्त करतात आणि आपणा सर्वांना सारखेच अनुभव येत असल्याची आठवण करून देतात.

विशेषवृत्ताचे कोन – (अँगल्स)

एखाद्या विशिष्ट बाजूवर वा अंगावर भर असणे या अर्थाने विशेषवृत्तांना कोन असतो असे म्हटले जाते. मग ते विशेषवृत्त लहान मोठे असो, त्याचे प्रथम परिच्छेद वेगवेगळ्या प्रकारचे असोत, वा विविध पध्दतींनी त्यांनी रचना केलेली असो! 'फीचर अँगल' याला सर्व प्रकारांत महत्त्व दिले जाते.

पुढे काही प्रचलित 'फीचर अँगल' दिले आहेत. ते विकसित करून त्यातून मनोरंजक लोकरूची विशेषवृत्ते तयार करण्यात आली आहेत.

- आपल्या केमिस्ट्रीच्या संचाच्या मदतीने एक युवक नायट्रोग्लिसरिन तयार करतो आणि त्यामुळे स्फोट होतो.
- रस्त्यात सापडलेल्या भल्यामोठ्या रकमेचा मालक कोण आहे याचा शोध घेण्यासाठी स्थानिक रहिवासी पालीसांना मदतीसाठी बोलावतो.
- मर्यादित वेळ ग्रंथालयसेवा आहे, त्याचा निषेध नोंदविण्यासाठी विद्यार्थी 'स्टडी इन' आंदोलन करतात.

- ठराव मांडणारा चूक करतो आणि भलतीच इमारत हलविण्याचा प्रस्ताव ठेवतो.
- अनधिकृत बोधकामे तोडणारा विभाग चुकून दुसरीच इमारत जमीनदोस्त करतो.
- लहान मुलेमुली मोठ्या संख्येने पोलीस स्टेशनमध्ये सायकली विकत घेण्यासाठी गर्दी करतात.
- तरून जोडपे असाधारण परिस्थितीत विवाहबध्द होते- आकाशातील 'बलून' मध्ये विवाहसोहळा.
- देनिकातील चुकीच्या जाहिरातीमुळे ग्राहका स्थानिक दुकानात 'सेल' साठी जमतात.

विशेषवृत्तांच्या या विषयांची यादी बरीच लांबलचक होईल. हरवलेले लहान मूल, लहान कुत्र्याला 'घर' हवे आहे, कुटुंबाचे सदस्य दीर्घ कालावधीनंतर भेटतात, कार किंवा विभाग अपघातात लहान मूल अनाथ होते, कष्टाच्या अनेक वर्षानंतर शेवटी अंगठी सापडते, दोन डोक्यांत वासरू, चार पायांचे कोंबडीचे पिलू, बाळाच्या जन्माची वाट पाहणाऱ्या जोडप्याला जुळे वा तिळे होते, घटस्फोटित जोडपे पुन्हा विवाहबध्द होते, पस्तावलेला गुन्हेगार असे विशेषवृत्ताचे अनेक घटनाचक्र फिरत असते, हसवणारे, उसासे सोडायला लावणारे, रडवणारे असे काहीतरी त्यात असते. वृत्तपत्रे या घटना प्रसिध्द करतात आणि करतील आणि वाचक वाचतील व त्यात रस घेतील.

विशेषवृत्ते अनेक पध्दतींनी लिहिती जातात. थोडक्यात सारांश सांगणारा परिच्छेद प्रथम परिच्छेद म्हणून लिहून नंतर बातमी कालानुक्रमे सांगणे ही एक साधीसोपी पध्दत होय.

'फीचर ॲन्गल' काय आहे यावर विशेषवृत्ताचा परिणाम अवलंबून असतो. वृत्त मुळातच स्वारस्यपूर्ण असते आणि लेखकाने फक्त सांगण्याचे कामच काय ते करायचे असते. वृत्ताने स्वतःच निवेदन पध्दतीची दिशा दाखवलेली असते.

कल्पक प्रारंभ –

शब्दचमत्कृती किंवा शब्दच्छल (शब्दांचा खेळ करणे) यापेक्षा कल्पक आणि सृजनशील भाषेचा उपयोग काही विशेषवृत्ते करतात. सृजनशील प्रांरभाची उदाहरणे.

(१) ''शिस्तबध्द युवक इमारतीत प्रवेश करतात---- ९,२८०.''
''बेशिस्तपूर्ण रीतीने युवक इमारतीत शिरतात----१७''

–दि न्य यॉर्क टाइम्स

(२) एखादा दिवस किंवा फार तर एक आठवडा, आपण कार कोठे पार्क केली होती, हे कोणीही विसरेल. पण १ वर्ष सहा महिने आणि २२ दिवस?

–'रायटर्स'

(३) रिचर्ड हेज् तुरूंगात होता, तर त्याचा जुळा भाऊ केनेथ 'बाहेर' होता. परंतु काही काळ केनेथ 'आत' होता आणि रिचर्ड 'बाहेर' होता. वास्तविक रिचर्ड 'आत' असणे केनेथ बाहेर असणे (असे काही घडणे) अपेक्षित होते.

–'असोसिएटेड प्रेस'

*****

पाठ क्र. १६
लेखनाचे प्रकार

'वृत्त' हा वृत्तपत्रातील लेखनाचा इतर सर्व लेखनाला आधारभूत असा मुख्य प्रकार आहे. ७ ते १० वर्षे वृत्तपत्रात काम केल्यानंतर पत्रकार अनुभवी होतो तसेच त्याला ज्येष्ठताही प्राप्त होते. त्यावेळी त्याला 'वृत्त विभाग' आणि 'संपादकीय विभाग' या दोन पैकी एक कार्यक्षेत्र निवडावे लागते. मोठ्या वृत्तपत्रांत सामान्यतः ही प्रथा दिसून येते.

वृत्तलेखनाची चर्चा केल्यानंतर आता 'दैनिका' च्या संपादकीय पृष्ठीचा थोडा अधिक विचार करू, विशेषवृत्ते आणि लोकरूचिवार्ता कशा प्रकारे लिहिल्या जातात हे आपण पाहिलेच आहे. पुस्तकपरीक्षणे, प्रदशर्नाची वृत्त, रुचिपूर्ण वृत्ते, 'मिडल्स' या सदरांमधून येणारे हलकेफुलके लेखन, वाचकांची पत्रे इत्यादी मचकुराला दैनिकाच्या संपादकीय पृष्ठावर जागा मिळते. 'वृत्त' सर अन्य प्रकारांचाही विचार आता आपण करू.-

१) लेखन-प्रकार वृत्त -

वार्ताहराला एखाद्या घटनेची माहिती गोळा करण्याचे काम सोपवले गेल्यानंतर तो तपशील गोळा करतो आणि ५ 'W's आणि १ 'H' या घटकांच्या आधारे ता वृत्त तयार करतो. ('W' ने सुरु होणारे - काय, कोण, कधी, कोठे व का- हे प्रश्न आणि 'H' ने सुरु होणारे ' कसे ?' हा प्रश्न यांची उत्तरे समाविष्ट होतील असे वृत्तकथन

घटनाधिष्ठित (घटतेवर आधारलेले) वृत्त लिहिण्याचे प्रकार आहेत. प्रधान गौण वृत्तकथन पध्दती. कालानुक्रमानुसारी वृत्तपध्दती इत्यादी. अन्य पाठांत याबद्दाल संदर्भ आलेला आहेच. वार्ताहराला वृत्त कसे लिहावे ते ठरवावे लागते. संपादकीय लेखन मात्र होऊ नये याची काळी वृत्तकथन करताना घ्यावी लागते. वार्ताहर प्रसिध्द पत्रकार असेल तर वृत्तावर लेखकाचे नाव दिले जाते; आणि अशा ठिकाणी मदप्रदर्शन चालून जाते.

(२) संपादकीय लेखन - अग्रलेख-

विशेष महत्त्वाच्या घटनांवर बातम्यांवर संपादक त्याची मते व प्रतिक्रिया व्यक्त करतो. वृत्तपत्रांचे धोरण या अग्रलेखांमधून प्रदर्शित होते. महत्त्वाच्या प्रश्नांवर वृत्तपत्राचा दृष्टिकोण त्यावरून स्पष्ट होतो. अग्रलेखातील दृष्टिकोणाचा काहीवेळा लोकांवर आणि सरकारवर प्रभाव पडतो.

खूप विचार आणि ठाम विश्वास या आधारे अग्रलेख लिहिले जातात. नुसता प्रश्न समोर न ठेवता त्या प्रश्नाचे विश्लेषण करणे आणि विचाराची दिशा देणे वा उत्तर सुचविणे ही कामेही अग्रलेख करतो. अग्रलेख स्तुती व निंदा कारतात; आग्रह धरतात किंवा निषेध करातात; किंवा अन्य मनःस्थितीही प्रकट करतात. संपादकाची एखाद्या प्रश्नावर काय प्रतिक्रिया आहे यावर अग्रलेखाचा 'मुड' अवलंबून राहतो. प्रभावी आणि रंजनपर असे दुहेरी स्वरूप धारण केले तरच सामान्य माणसाला त्यात रस घेता येईल.

३) विशेषवृत्ते -

खास आवड निर्माण झालेल्या क्षेत्रातील वृत्तांशी संबंधित असतात. विशेषवृत्ते मनोरंजक वा प्रबोधनपर असतात. महत्त्वाच्या घटना, चित्रपट, लोक, पुस्तके, विज्ञान इत्यादी. याच पुस्तकात अन्यच विशेषवृत्त लेखनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे.

४) परीक्षणे -

वृत्तपत्रांत विविधतापूर्ण परीक्षणे येतात. मान्यवर समीक्षकांकडून चित्रपट, दूरदर्शन कार्यक्रम, नाटके, पुस्तके यांची परीक्षणे लिहून घेतली जातात. समीक्षकाला त्याची मते मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. पण पूर्वग्रह

मनात ठेवून परीक्षण लिहिल्यास ते वाईट परीक्षण ठरेल.

५) मिडल्स –

लेखांच्या खाली आणि वाचकांच्या पत्रांच्या वर संपादकीय पृष्ठावर मध्येच स्थान मिळाल्याने या लेखनप्रकाराचे नाव 'मिडल्स' असे पडले आहे. याचे लेखन खेळकर वृत्तीने होत असेल, तरी कधीकधी रंजकतेच्या जोडीने लोकांच्या तक्रारींकडे किंवा त्यांच्या होत असलेल्या गैरसोयींकडे लक्ष वेधण्याचे काम लेखक करीत असतो.

६) वाचकांची पत्रे –

स्थानिक, राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय विषयांवर लोक आपली मते या पत्रांद्वारे व्यक्त करतात. नेमक्या तक्रारीविषयीही लोक लिहितात. उपाय सुचवतात किंवा विशिष्ट प्रश्नांकडे लोकांचे लक्ष घेतात. 'वाचकांची पत्रे' हा दैनिकांचा अनिवार्य घटक होऊन बसला आहे. आज त्यांना अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे.

७) स्तंभलेखन व सदरे –

(सदरलेखन) जवळजवळ सर्व वृत्तपत्रांत नियमितपणे, आठवड्यातून एकदा वा अधिक वेळा आपल्या आवडीच्या वा प्रावीण्य संपादन केलेल्या स्तंभलेखकांची नेमणूक केलेली असते. स्तंभलेखकांच्या लेखांतील मते वृत्तपत्रांचे मत प्रतिध्वनित करीत नाहीत; परंतु अनुभवी पत्रकार या नात्याने त्या मतांना एक वजन असते, त्या मतांना किंमत दिली जाते. अनुभवी आणि खास स्तंभलेखकांनी लिहिलेली सदरे वाचण्यासाठी वाचक नेहमीच उत्सुक असतात.

पुन्ही एकदा 'वृत्ता' विषयी –

पत्रकाराचा व्यवसाय 'वृत्त' लेखनाचा पडतो आणि त्याच्याकडून अपेक्षाही वृत्तलेखनाचीच केली जाते. करण्याच्या अनुभवाबरोबर 'वृत्त' विषयक समज वाढतो.

वेळेवर सांगणे, सत्य सांगणे आणि लोकांना रस वाटेल असे सांगणे यागोष्टी वृत्तकथन करताना लक्षात ठेवाव्या लागतात.

वृत्त पूर्ण करण्याच्या निर्धारित वेळेचे बंधन असलेल्या संपादकाच्या तगाद्यामुळे पत्रकाराला वृत्तकथनात सुटसुटीत वर्णन करण्याच्या काही युक्त्या प्रयुक्त्या योजना लागतात. बँक लुटणारा 'बंदुकधारी' होतो. पाण्यात पार बुडालेला माणूस (ज्याचे नाव विचारायचे राहूनचे गेला) 'पुराचा एक बळी' ठरतो. किंवा 'एक आपद्ग्रस्त रहिवासी' असा त्याचा उल्लेख होतो.

वृत्त पूर्ण करण्याच्या निर्धारित वेळेच्या थोडा वेळच आधी एखाद्या विधानसभा सदस्याच्या प्रेस कॉन्फरन्सचे वृत्त येत असते. त्यात त्याने केलेल्या बाष्कळ बडबडीला प्रसिध्दी देण्याइतका वेळ नसल्याने पत्रकार त्याची बोळवण 'वादाच्या भोवऱ्यात सापडलेला लोकप्रतिनिधी' अशा शब्दांनी करतो. पत्रकारितेच्या कामाच्या धकाधकीतही बुध्दिमान लेखक वृत्तलेखनावर आपली विशिष्ट मुद्रा उमटवू शकतो, छाप पाडू शकतो; परंतु एक सावधानता म्हणून मुरब्बी पत्रकार वृत्तकथनासाठी लेखनाच्या मळलेल्या वाटांची निवड करतो आणि पारंपरिक वृत्तकथनपध्दती स्वीकारतो. पारंपरिक कथनपध्दतीत कालानुक्रमाची उलटापालट होते. प्रथम बातमीचा मुख्यभाग (मग तो कालानुक्रमाने येणारही नाही) येतो व नंतर अधिक खुलवणारा (बातमीचे मर्म उकलून सांगणारा भाग येतो. याला 'प्रधान गौण वृत्तकथनपध्दती' असे म्हणताता.

लेखनाच्या विविध प्रकारांकडे आता आपण थोडक्यात दृष्टिक्षेप टाकू या. वृत्तलेखनाच्या पायावर सर्व इतर लेखनप्रकारांची भिस्त आहे. वृत्तपत्राच्या लेखनसंसारात वृत्तलेखनाची स्थिती मजबूत करण्याच्या हेतूने संपदकांनी वृत्तलेखनातील मजकुराच्या स्वरूप भिन्नतेवरून वृत्तलेखनाला विविध नावे दिली आहेत, 'हार्ड न्यूज' (निखळ बातमी), 'सॉफ्ट न्यूज' रुचिपूर्ण वृत्त, 'स्पॉट न्यूज' (घटना – वृत्त) – या प्रकारच्या वृत्तची स्वरुप 'तक्षुर्वैसत्यं' वर्णनाचे किंवा 'आँखो देखा हाल' वाचल्याचे (प्रत्यक्ष पाहिल्याचे) एक प्रकारचे समाधान मिळते. (असे एक 'फीलिंग' येते. हा शब्दप्रयोगही आज मराठीत रूढ आहे.) आता यानंतर पुन्हा एकबाव आपण याआधी पाहिलेल्या लेखनप्रकारांची लेखनप्रकारांची माहिती मिळवू.

विशेषवृत्ते –

लेखनाची प्रबळ इच्छा असलेल्या पत्रकारांसाठी 'विशेषवृत्त – लेखनांचे क्षेत्र खुले आहे. विशेष वृत्तांची निरनिराळी नावे आहेत. 'वृत्ता' पेक्षा विशेषवृत्तांचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी तसेच वृत्ताचे स्थानही टिकून राहावे यासाठी संपादकांची ही नावे

सुचविली आहेत. विशेषवृत्तांनाही वृत्तांचा आधार असतो हे सुचविणारी ही नावे आहेत, उदा. वृत्तविशेष, रुचिपूर्ण वृत्त.

वृत्तपत्रांमधून वृत्ते आणि विशेषवृत्ते ही दोन्हीही प्रदीर्घ काळापासून येत आहेत. हे दोन लेखनप्रकार सर्वस्वी भिन्न आहेत, असेही नव्हे. पारंपरिक 'लोकरूचिवार्तापत्रे' (ह्युमन इंटरेस्ट स्टोरीज) ही विशेषवृत्तेच होत. 'लोकरूचिवार्तापत्रे' वृत्तघटक टिकवून ठेवतात. या वृत्त घटकामुळे समाजाची आजची राहणीपध्दती आणि वैचित्र्यपूर्णता मोठ्या प्रमाणावर (मॅग्निफाइड) समोर येते. 'वृत्त' आपल्या संपूर्ण सामर्थ्यासह ऐन भरात असताना त्याला लोकांच्या कथेचे रूप येते. लोकांबद्दलची वृत्त १९७० च्या आसपास वृत्तपत्रांमधून मोठ्या प्रमाणावर प्रसिध्द झाली. मात्र त्यानंतर फार थोड्या वृत्तपत्रांनी लोकांबद्दलच्या बातम्या प्रसिध्द करण्याच्या बाबतीत सातत्य राखले.

ताज्या घडामोडींशी थोडाफारही दुवा न राखणारे विशेषवृत्त अन्य नियतकालिकांसाठी योग्य असते. वृत्तपत्रात त्यांना स्थान मिळणे अवघड असते. कोणत्याही वृत्त कथनाचे विशेषवृत्त तयार होऊ शकतो. अन्वयार्थपर वृत्तकथनात आणि शोध पत्रकारितेत वृत्त आणि विशेषवृत्त यांच्या संकल्पना जोडल्या गेल्या आहेत. अन्वयार्थपर वृत्तकथनात गुंतागुंतीच्या घटनांच्या अर्थ उलगडून करावा लागतो आणि शोधपत्रकारितेत विविध 'घोटाळा प्रकरणा' च्या बातम्यांना विशेषवृत्ताचे रूप देण्यावर भर देण्यात येतो. (उदाहरणार्थ – 'बोफोर्स' भ्रष्टाचार, रोखे गैरव्यवहार प्रकरण, 'युरिया घोटाळा' प्रकरण इत्यादी बातम्यांना विशेषवृत्ताचे रूप दिले जाते.)

अन्वयार्थपर वृत्तकथन (विशेषवृत्ते)

व्यापार, वैचारिक खाद्य पुरविणारे लेखन, स्पष्टीकरणात्मक, एखाद्या घटनेचे मर्म उलगडणारी, पृथक्कणात्मक अशा (विषयांशी संबंधित) आणि एखादी जाचक समस्या व उद्योग यांच्या संबंधातील मिळवलेली माहिती अन्वयार्थपर वृत्ताये रुप घेते. पुढीलप्रमाणे शीर्षके आणि प्रथम परिच्छदातील ओळी आढळतात. 'चलन–फुगवटा जाणार नाही आणि परिस्थिती कदाचित आणखी हाताबाहेर जाईल.' किंवा 'अणुस्फोटा पुढे पीच ट्री प्लाझा हॉटेल टिकाव धरू शकेल काय?' आणि 'ॲटलांटावर उपग्रह कोसळला तर काय होईल?' असे एखादे शीर्षक असते. एखाद्या विषयावर लोकांना समजावून देण्याची गरज असल्यामुळे अन्वयार्थपर वृत्तलेखनात स्पष्टता अधिकच महत्त्वाची ठरते. तज्ज्ञांनी वापरलेली भाषा सामान्य लोकांना अनाकलनीय ठरण्याची शक्यता असल्याने या प्रकारच्या बातमीत लेखकाने बराचसा भाग लेखी स्वरूपात उलगडून सांगणे वाचकांना सांगताना त्यांना समजेल अशा भाषेत तो विचार त्याने सांगायला हवा.

''अण्वस्त्र उत्पादकयंत्रातील पाणी उकळण्याचे काम करणारा किरणकार्यकारी (रेडियोॲक्टेव्ह) रॉड थंड करण्यासाठी थंड पाणी उपलब्ध नसेल तर रॉड वितळेल आणि प्लॅन्टच्या जमिनीवर पसरून रेडिओ ॲक्टिव्ह वाफेमुळे सर्व शहर नष्ट करील.''

ही माहिती पारिभाषिक संज्ञांमधून यापेक्षा कठीण स्वरुपात दिलेली असते. वार्ताहराने शक्त तितक्या सोप्या भाषेत मांडली पाहिजे. तरच वाचकांना माहिती समजू शकेल. स्वतःचे ज्ञान सिध्द करणे हा हेतू न ठेवता वाचकाला काही समजेल असे लेखन करण्याचा हेतू बाळगावा. अतिशय कठीण भोषत सांगितलेले ज्ञान अनभिज्ञ (ज्ञान नसलेल्या) वाचकांना शिकवण्याची उत्तम संधी अन्वयार्थपर विशेषवृत्तमुळे लेखकाला मिळते.

अन्वेषणात्मक वृत्तकथन –

या जगातून खल प्रवृत्ती अजून नाहीशां झालेल्या नाहीत या गृहीतावर अन्वेषणात्मक वृत्तकथन सुरू होते. संताप व्यक्त करायच्या हेतूने या प्रकारच्या कथनाचे लेखन अधिक चांगले होते; मात्र हा संताप मनाचा समतोल राखून व्यक्त व्हायला हवा. काही वेळा वस्तुस्थिती काय आहे हे सांगूनही काम भागते. 'डॅफी एलिमेंटरी स्कूल' चे शिक्षक दातांचे आरोग्य चांगले राहण्याचे निमित्त करून विद्यार्थ्यांकडून 'कॅन्डी' जप्त करतात आणि स्वतः खातात असे एका माहीतगार पालकाने सांगितले. (विनाशकारक युध्दे आणि राष्ट्राध्यक्ष पदाचा त्याग असेच विषय नेहमी मिळतील असे नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.)

अन्वेषणात्मक वृत्तकथनात आरोप करणे ही एक महत्त्वाची बाब आहे आणि हे आरोप कोणी केले आहेत हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे. वार्ताहराने आहोप करणाऱ्याची भूमिका घेऊ नये. प्रत्यक्ष पुरावे देणाऱ्या अनेक व्यक्ती असल्या तरी वार्ताहराने ही भूमिक घेणे हितावह नाही. अन्वेषात्मक वृत्तकथन करणे या कामाभोवती पत्रकारितेच्या क्षेत्रात एक प्रसिध्दीचे वलय आहे; पण अन्वेषणात्मक लेखन करणे हे कमालीचे कंटाळवाणे व चिकाटीने करण्याचे चिवट काम आहे.

एखादी व्यक्ती वा संस्था कुप्रसिध्द आहे वा अनादरास पात्र आहे असे जाहीरपणे प्रसिध्द केल्यावर बिनतोड पुराव्यांची भक्कम पार्श्वभूमी नसेल तर तुमच्या लेखाचे लक्ष्य असलेली व्यक्ती 'बदनामी' केल्याबद्दल तुम्हाला कोर्टात खेचील. म्हणूनच अन्वेषणात्मक वृत्ते लांबलचक, प्रदीर्घ असतात. ती लिहिण्यासाठी जीवाचा आटापिटा करावा लागतो आणि या वृत्तांना पूरक मजकूर जोडावा लागतो. लेखाचा विषय झालेल्या व्यक्ता चलाख असतील व आपला बचाव जाहीरपणे करू शकणाऱ्या असतील तर तुमच्या लेखात त्या मुद्यांना अग्रस्थान द्यावे लागेल त्यामुळे तुमच्या लेखनाला समतोलपणा येईल. अन्वेषणात्मक वृत्तांचे स्वरूप लोकांच्या भावना दुखावू शकतील असे असल्याने समतोल पणाची, सरळपणाची बूज राखली जाईल अशी काळजी लिखाण करताना घ्यायला हवी. म्हणूनच लेखविषय झालेल्या व्यक्तीने वा संस्थेने त्यांची बाजू सबळ करणारा एखादा नगण्य पुरावा जरी दिला तरी न्यायाच्या भूमिकेतून त्याला प्रसिध्दी देणे हे पत्रकाराचे कर्तव्य आहे. पत्रकाराचे घाबरून राहून यथोचित बातमी देऊ नये वा विश्वास ठेवण्याच्या लायकीचे नाही असे तो लिहीत आहे अशा आरोपाला त्याने दबून राहावे असा या सर्व विधेचनाचा अर्थ नाही. अन्य कोणतीही बातमी देताना जी दक्षता पत्रकार बाळगतात तीच दक्षता अन्वेषणात्मक वृत्ताच्या बाबतीत बाळगावी. काही महत्त्वाचे सापडल्याशिवाय या प्रकारचे शोधंपर लेखन करून नये.

अग्रलेख –

तुम्ही पुरेसे अनुभवी झाल्याशिवाय मोठ्या वृत्तपत्रात तुम्हाला अग्रलेख लिहिण्याचे काम दिले जात नाही. संपादकीय पृष्ठ वृत्त वेगळे उठून दिसते आणि या जागी मते मतांतरे यांची दखल घेतली जाते. संपादकीय पृष्ठावर पूर्णग्रहयुक्त, एकांगी, आत्मनिष्ठ आणि ठाम आग्रही मते मांडली आहेत, या बद्दल टीका करणारा वृत्तपंत्राच्या कार्यपध्दती बद्दल अनकिज्ञ आहे असे जाणले पाहिजे; कारण मते, दृष्टिकोण मांडणे हेच तर संपादकीय पृष्ठाचे महत्त्वाचे कार्य असते. अग्रलेख लिहिण्याचे काम सोपवताना प्रकाशक गंभीरपणाने विचार करतात. दैनिकाची प्रतिष्ठा आणि कार्याबद्दलची सचोटी संपादकीय पृष्ठ वाचून समजून येते आणि म्हणून या पृष्ठाचे लेखन व संपादन अधिक जबाबदारीचे करावे लागते. या कामासाठी म्हणूनच जुन्या आणि जाणत्या पत्रकारांची निवड केली जाते.

अग्रलेखांचे दोन मूलभूत प्रकार मानले जातात. लेखकाचे नाव नसलेले अग्रलेख 'स्टाफ एडिटोरियल' म्हणून ओळखले जातात. 'संपादकीय मंडळा' तील सदस्यांचे ज्या काही विषयांवर मतैक्या झाले असेल अशी मते त्यामधून मांडली जातात. संपादकीय मंडळातील एक सदस्य प्रत्यक्ष लेखनाची जबाबदारी घेतो, लोकांना एखाद्या विषयावरील माहिती देणारे व्याख्यान असे या लेखाचे स्वरूप असते. बहुतेक दैनिके अशी ३ ते ५ 'स्टाफ एडिटोरियल्स' रोज लिहितात.

स्थानिक स्तंभलेखक तसेच 'सिंडिकेट' मध्ये लिहिणारे स्तंभलेखक असे दोन्ही पत्रकार वृत्तपत्रांत काम करतात 'सिंडिकेट् कडून वृत्तपत्रे स्तंभलेखन विकत घेतात. किती वृत्तपत्रे लेख विकत घेतात त्यानुसार स्तंभलेखकांना 'सिंडिकेट्' मानधन देतात. (कॉमिक्स', राशिभविष्य, 'हे स्वतः करून बघा' या प्रकारचे लेख, विशेषवृत्ते असे विविध प्रकारचे लेखन सिंडिकेटस् वृत्तपत्रांना उपलब्ध करून देतात.

विशेषवृत्ते –

अग्रलेखांच्या जोडीला मोठ्या वृत्तपत्रांत विविध सदरे असतात किंवा विशेषवृत्तांचे स्तंभ असतात. काही ठराविक मर्यादा सांभाळून विशेषवृत्त स्तंभलेखकाला स्वतःची मते मांडण्याची सवलत असते. वैश्विक सत्ये सांगण्यापेक्षा माणसांच्या समस्यांचा विचार करण्याचे काम विशेषवृत्त लेखक करीत असतात. मोठ्या वृत्तपत्रात अनेक स्तंभलेखक काम करतात. वृत्तपत्रांनी निसटता उल्लेख केलेल्या व दुर्लक्ष केलेल्या एखाद्या विषयाचे विस्तृत विवेचन ही विशेषवृत्ते करतात. विशेषवृत्त लेखक पाळीत प्राणी, मुले आणि स्वतःच्या जुन्य जमान्यातील मैत्रिणी यांच्यावरही लिहिताना दिसतात. काही स्तंभलेखक खेळकरपणे लिहितात, काही भावुकतेने लिहितात, तर काही मित्रांच्या कहाण्या ऐकवतात.

विशेषवृत्त ही अशी गोष्ट आहे की जिच्याबद्दल आख्यायिका सांगितल्या जातात. विशेष वृत्तलेखन ही गौरवास्पद, प्रतिष्ठेची बाब मानली जाते. कॉंग्रेसचा एखादा कायदा संमत व्हायला वेळ लागावा इतका अवधी विशेषवृत्त स्तंभलेखक व्हायला

या स्पर्धेच्या युगात वेळ जातो. तुमच्या बरोबरीचे पत्रकार यमलाकोस गेल्याशिवाय किंवा निवृत्त झाल्याशिवाय किंवा स्वकर्तृत्वाबद्दल तुम्हाला वाटणाऱ्या विश्वासात तुमचा संपादक सहभागी झाला तरच तुमची स्तंभलेखक म्हणून वर्णी लागू शकते. लहान वर्तमानपत्रात एखादे वेळी नशीब लवकर उघडते. मोठ्या वृतपत्रांच्या बाबतीत तुम्ही अनुभवी व आपल्या कामात तरबेज असावे लागता.

परीक्षणे व टीकालेख –

कलाक्षेत्राशी संबंधित अग्रलेखांना परीक्षणे व टीकालेख असे म्हणता येईल. जवळ जवळ प्रत्येक वृत्त पत्रात परीक्षक व टीकाकारापेक्षा अधिक दयाळू असतो. 'दलास' वरील अत्याधुनिक नाट्यकृतीचा वा संगीताच्या एखाद्या मैफिलीचा फक्त वृत्तान्त लिहितो. टीकाकार दोष दाखवायला ठपलेलाच असतो; क्वचित तो स्तुतीही करतो. या शब्दांची अदलाबदल करूनही वृत्तपत्रे त्यांचा वापर करतात आणि त्यांना बरेचदा 'संपदक' म्हणतात; जसे कला-संपादक, संगीत संपादक. टी. व्ही. एडिटर इत्यादी. चित्रपट, टीव्ही, संगीताचे विविध प्रकार, कलांचे विविध प्रकार यांची थोडीफार आवड असणाऱ्या वृत्तकक्षातील एखाद्या पत्रकाराला वेठीला धरून परीक्षणे लिहून न घेता अलीकडे वृत्तपत्रे कलाक्षेत्रातील तज्ज्ञांना परीक्षणे लिहिण्यासाठी नेमतात.

क्रीडावृत्त –

क्रीडा विषयक लेखन, खेळांविषयीची वृत्ते आणि विशेषवृत्ते खेळांविषयीची वृत्ते आणि विशेषवृत्ते यात येतात. क्रीडाविषयक लेखन करताना लेखकाचे कौशल्य पणाला लागते ही क्रीडावृत्तलेखनाबाबतची कुतूहलजनक गोष्ट आहे. क्रीडावृत्ते ही बहुधा गतिमान वृत्ते असतात हे एक त्याचे मुख्य कारण आहे. गतिमान घटना कशा लिहाव्यात हे समजण्यासाठी उत्तम कौशल्य संपादन करावे लागते, आणि अनेक नामवंत पत्रकारांची निवड दैनिकाच्या क्रीडा विभागातून करण्यात आलेली आपण पाहतो. राल्फ मॅक्गिल, जेम्स रेस्टन, टॉम वुल्फ ही यांपैकी काही नामवंत पत्रकारांची नावे होत. वृत्तेलेखन आणि विशेषवृत्त लेखन असे दोन्ही दृष्टिकोण एकाच वेळी घेऊन लिहिण्याची किमया क्रीडावृत्तांनी वर्षानुवर्षे चालवली आहे. बारटोव्हस्कीच्या बरगड्या मोडल्या हे आधी सांगून नंतर फाल्कन्स सपाटून हरले हे सांगितल्याने वृत्तलेखनात वैचित्र्य निर्माण होते.

क्रीडापृष्ठे अधिक वाचली जात असल्याने त्याबद्दल संपादन विभागाला क्रीडावृत्तांबद्दल चांगली माहिती असली पाहिजे. संपादकाने क्रीडवृत्त लेखनाचे महत्त्व जाणले पाहिजे.

*****

पाठ क्र. १७
प्रकल्प लेखन

सैध्दान्तिक विचार आणि प्रकार

मुक्ता शिक्षण आणि दूरशिक्षण यांचा प्रसार इंग्लंड आणि सर्व जगभर मोठ्या प्रमाणावर होत आहे. 'इग्नु' आणि अन्य मान्याता प्राप्त विद्यापीठांनी भारतात शिक्षण विस्ताराचे कार्यक्रम हाती घेतले आहे. या कार्यक्रमांना अनुसरून त्यांनी दूरशिक्षण विभाग स्थापन केले आहेत. शिक्षण देण्याचे काम प्रभावीपणे करता यावे यासाठी विद्यापीठे विविध शिक्षण पध्दतींचा शोध घेत आहेत. शिक्षका जवळ असलेल्या शिक्षण पध्दतींच्या भात्यात प्रकल्प लेखनं या शस्त्राचाही समावेश असावा व उपयोग व्हावा असे अनेक शिक्षण तज्ज्ञांना वाटते. प्रकल्प लेखनाचा समावेश करण्यात काही व्यावहारिक अडचणीही आहेत. विद्यार्थ्यांना तयार असे ठराविक प्रकारचे अध्ययान साहित्य ही मुक्त विद्यापीठे पुरवीत व त्यामुळे त्या प्रमाणात विद्यार्थी परावलंबी बनतात. या आक्षेपाला चोख उत्तर देण्यासाठी प्रकल्प लेखनांचा मुक्त विद्यापीठे व दूर शिक्षण विभागांच्या अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे असे ठामपणे मानायला वाव आहे. विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी व स्वाध्याय करण्यास उद्युक्त करण्यासाठी प्रकल्प उपयोगी ठरतील. मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत आधारित संपूर्ण अभ्यासक्रम सध्या तरी येत नाही. (दूर शिक्षण' विभागाच्या संदर्भात) परंतु प्रकल्प समाविष्ट करण्याची उपयुक्तता ध्यानात घेता वर्षभर केलेल्या एखाद्या प्रकल्पावर एक प्रश्न आधारित ठेवून त्याला गुण दाब (वेटेज, २० गुंणाचे) देणे ही गोष्ट विद्यापीठाने आवश्यक मानली आहे.

'प्रकल्प लेखन' ही संकल्पना आता आपण मुळातून पाहू.

'प्रकल्प' म्हणजे काय, ते समजण्यासाठी पुढील निकष लक्षात ठेवावे लागतील.

१) विद्यार्थी विषय निवडतो.

२) विद्यार्थी संदर्भ-आधारासाठी उपयोगी साहित्य शोधून काढतो.

३) विद्यार्थी अहवाल तयार करतो. १००० शब्द ते ५००० शब्द. (प्रकल्प लहान मोठा असेल त्यानुसार)

४) प्रदीर्घ कालावधीपर्यंत चालतो.

५) शिक्षक सल्लागाराचे काम करतो.

विद्यार्थी पुढाकार घेतात. प्रकल्पाचे स्वरूप असंघटित किंवा सुसंघटित असते. असंघटित प्रकल्पाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असते. विषयाची निवड तो करतो व प्रकल्प पूर्ण होईपर्यत काम करतो. सुसंघटित प्रकल्पांच्या बाबतीत शिक्षक विषय सांगतो. (विद्यार्थ्यांना शिक्षकांनी सुचविलेल्या विषयांपैकी एक विषय निवडता येतो) आणि माहिती मिळविण्याची व तिचे पृथक्करण करण्याची पध्दतीही शिक्षक सांगतो. असंघटित अशा प्रकारचे प्रकल्प लिहायला विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु प्रकल्प लेखनासाठी काय काय तयारी केली पाहिजे म्हणजेच सुसंघटित प्रकल्प टप्पे कोणते असतात. व तो हाती कसा घेतला जातो याचेही मार्गदर्शन येथे करण्याचा आमचा मानस आहे.

प्रकल्प ही संज्ञा विविध उपक्रमांना लावण्यात येते. चार मूलभूत प्रकारच्या शोधंनिबंधांमध्ये त्यांची वर्गवारी करता येते.

साहित्य-परीक्षण ग्रंथालयात बसून संशोधनाच्या साहाय्याने करता येते; माहिती-शोध प्रधान व दुय्यम तपशीलाच्या आधारे करता येतो; अनुभवजन्य संशोधनात सर्वेक्षण वा पाहणी, केस स्टडी किंवा एखादा प्रयोग यांचा समावेश होतो; डिझाइन प्रोजेक्ट आखीव, योजनाबध्द स्वरूपाचे असते; किंवा त्यात काही रचनाही अपेक्षित असते. (तंत्रज्ञानाच्या मदतीने आकाराला आणावयाच्या वस्तूंच्य बाबतीत डिझाइन प्रोजेक्ट उपयोगी पडते.)

अनुभवजन्य संशोधन

पाहणी	केस स्टडी	प्रयोग
समाजिक शास्त्रे	शिक्षण व्यवस्थानप पध्दती शास्त्र	शास्त्र

डिझाइन प्रोजेक्टस् तंत्रज्ञान, कला व कारागिरी या क्षेत्रात वापरतात. (डिझाइन)

प्रकल्पावर अहवाल तयार करणे किंवा विशेषवृत्त लिहिणे यामुळे संशोधन आणि पत्रकारिता यांच्यात एक दुवा निर्माण होतो. चार प्रकारांपैकी साहित्यपरीक्षण (वृत्तपत्र – परीक्षणे), सर्वेक्षण वा पाहणी यावर 'पत्रकारिता' या विषयाचे प्रकल्प तयार करणे चांगल्या पध्दतीने साधता येते. पुढील विषयांपुरती ही चर्चा आपण मर्यादित ठेवू या.

१) वार्तासंकलन
२) लेखन
३) संपादन

प्रकल्पच्या विषयांची काही उदाहरणे –

१) तुमच्या दैनिकासाठी घटनाधिष्ठित वृत्तलेखन करा. (वृत्तपत्रांच्या दृष्टीने ही खरीखुरी 'बातमी' या संज्ञेला पात्र ठरणारी असते. उदाहरणार्थ – दुष्काळ, अवर्षण, भूकंप, बॉम्ब स्फोट, महापूर, दंगली इत्यादी घटनांवर आधारित वृत्ते.
२) कानानुक्रमानुसार एखादी घटना कथन करा; नंतर प्रधान–गौण वृत्तकथनपध्दतीने तीच घटना वृत्ताच्या रूपात लिहा.
३) शैलीदार असे वृत्त लिहाः वृत्ताचे विशेषवृत्तात रूपांतर करा. उदाहरणार्थ एखादी बातमी निवडा आणि मुलाखत किंवा व्यक्तिरेखाटनाचा आधार घेऊन त्यावर विशेषवृत्त लिहा.
४) तुमच्या वृत्तपत्रासाठी 'खासवृत्त' मिळवा. एखाद्या विशिष्ट दैनिकातच छापून आलेल्या खास बातमीला 'स्कूप' म्हणतात. उदा. 'चार्लस् शोभराजला अटक' हे खासवृत्त फक्त 'महाराष्ट्र टाइम्स' मध्येच प्रथम छापून आले.
५) शासनाने हाती घेतलेल्या उपक्रमावर, योजनेवर वा विकासकार्यक्रमांवर आधारित विशेषवृत्त लिहा.
६) प्रख्यात व्यक्तीची मुलाखत घेऊन व्यक्तिरेखाटन तयार करा.
७) तुमच्या मासिकासाठी प्रसिध्द उद्योगपती वा व्यापारी यांच्या मुलाखतीवर आधारित विशेषवृत्त तयार करा.
८) नोकरदार स्त्रिया, आदिवासी स्त्रिया. माध्यमात काम करणाऱ्या स्त्रिया, श्रमिक स्त्रिया यांच्या पैकी कोणताही एक वर्ग घेऊन 'भारतातील महिलांची हलाखीची स्थिती' या विषयावर सर्वेक्षण वा पाहणी करा.
९) मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन्. शोषन यांनी निवडणूक प्रक्रिया सुधारली. यासारखा एखादा विषय घेऊन वृत्तपत्रांची कात्रणे जमा करा व तुमच्या मासिकासाठी 'मुखपृष्ठ कथा' तयार करा.
१०) 'संपादन' विषयावर आधारित प्रकल्प
   (अ) बातमी शीर्षक लेखन
   (ब) 'कॉपी' चे संपादन
   (क) 'प्रथम परिच्छेद' लिहिणे
   (ड) दैनिकाच्या कचेरीतून 'गॅलीज्' मिळवा.(वृत्तसंस्थांकडून टेलीप्रिंटरवर सतत येणाऱ्या कागदांची भेंडोळी) आणि तुमच्या आवडीच्या शैलीत वृत्त लिहा. प्रधान गौण वृत्तकथन पध्दती, समरी लीड, ब्लाइंड लीड, किंवा साहित्यिक शैलीतील प्रथम परिच्छेद.

'प्रकल्प' कसा लिहावा? –

महत्त्वाचे टप्पे – प्रकल्पलेखनाच्या तीन पायऱ्या आहेत.

१) विषयाची निवड
२) तयारी
३) प्रकल्प लिहून तयार करणे.

१) योग्य असा विषय मिळण्याच्या बाबतीत विद्यार्थ्यांला खूपच अडचणी येतात. दूरशिक्षण द्वारा शिक्षण घेतलेल्या एका विद्यार्थ्याचे उद्‌गार–

''(प्रकल्प निवडीच्या बाबतीत) अनेक शक्तता दिसत होत्या. मला काय करावे तेच समजेनासे झाले आहे.'' विद्यार्थ्यापुढील अडचणींवर पुरेसा प्रकाश टाकतात. विद्यार्थ्याला सैध्दान्तिक विवेचन चांगले समजते; परंतु उपयोग करण्याची वेळ आली की विषयनिवडीच्या बाबतीच्या त्याला प्रश्न पडतात. पत्रकारितेचा विद्यार्थी चाणाक्ष वाचक असायला हवा. दैनिकाचे वाचन नियमितपणे व बारकाईने करायला हवे. कोणत्याही बातमीच्या विविध बाजू लक्षात येण्यासाठी एकाहून अधिक दैनिके वाचणे अपेक्षित असते.

विषय निवडल्यानंतर थोडीफार तयारी झाल्यावरही, वाचन झाल्यावरही त्याला निवडलेला विषया कठीण वाटण्याची शक्याता आहे किंवा त्याला दुसरा मनपसंत विषय सुचण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकदा विषय निवडायला (बदल करायला) हरकत नाही पण नंतर त्याने एकाग्रतेने तयारीला लागायला हवे.

२) त्यानंतर विद्यार्थी माहितीच्या आणखी सूत्रांकडे वळतो. प्रमुख सुत्रे आहेत

(अ) ग्रंथालये– संदर्भ ग्रंथांमधून विषयाबद्दलची आवश्यक ती माहिती मिळविता येते. साप्ताहिके, मासिके, वृत्तमासिके, डायजेस्टस्, रिव्ह्यूज यांच्या जुन्या अंकांमधून येणाऱ्या लेखांमधून व मुखपृष्ठकथांमधून जास्तीची माहिती मिळते. 'इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' 'इंडिया टुडे' यासारखी इंग्रजी साप्ताहिके व मराठीतील 'लोकप्रभा' या सारखे साप्ताहिक विद्यार्थी संदर्भाधारांसाठी पाहू शकतो.

(ब) वृत्तपत्रे, मासिके यांतील वृत्तांची व फोटोंची कात्रणे गोळा करणे.

(क) संबंधित व्यक्तींना भेटून मुलाखतीद्वारा एखाद्या विषयाबद्दल अधिक माहिती विद्यार्थी मिळवू शकतो. उदाहरणार्थ, ''एन्‌रॉन करार आणि त्याचे दुष्परिणाम'' याबद्दल सर्वप्रथम 'मुंबई ग्राहक पंचायतीने' ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण केली'' असे विधान 'ग्राहक पंचायती'च्या अध्यपक्षांनी केले होते. जर विद्यार्थ्याला 'पर्यावरण' या विषयावर मुखपृष्ठकथा तयार करायची असेल तर 'मुंबई ग्राहक पंचायती'चे अध्यक्ष किंवा सचिव यांची मुलाखत घेऊन विद्यार्थ्याला अधिक माहिती मिळवता येईल.

(ड) शैक्षणिक सहली – या ठिकाणी अशा भेटींचा संदर्भ येतो का जिथे गेल्यामुळे जास्त माहिती मिळवणे शक्य होते. उदाहरणार्थ, वृत्त पत्रछपाईतील नवे तंत्रज्ञान या विषयावर तुम्ही लिहीत असाल तर एखाद्या वृत्तपत्रसंघटनाला भेट देऊन अधिक माहिती मिळवता येईल.मोठ्या वृत्तपत्राच्या मुद्रणविभागाला भेट देणे अशक्य असेल तर शहरातील लहान वृत्तपत्रांना भेट देणे शक्य आहे.

तयारीच्या दुसऱ्या टप्प्यावर असताना वेळेच नियोजन, अंतर, निवडलेल्या विषयापासून दूर नेणाऱ्या गुपफटणे असे काही अडथळे येण्याची शक्यता आहे. विषयाशी समरस होणे ही एक गोष्ट झाली परंतु प्रकल्पाची शक्याशवयताही लक्षात घ्यायला हवी, उदा. 'माझगाव' विधानसभा निवडणूक अनेक राजकीय पक्षांच्या दृष्टीने महत्त्वाची होती. एका विद्यार्थ्याला शिवसेनेच्या उमेदवाराची मुलाखत घेऊन प्रकल्प लिहायचा होता. उमेदवार त्यावेळी खूप कामात असल्याने मुलाखतीसाठी भेट होऊ शकलो नाही. साहजिकच वृत्तपत्रांतील वृत्ते व मुलाखतींचा आधार घेऊन प्रकल्पलेखन पूर्ण केले.

प्रकल्प कसा लिहावा?

प्रस्तावना (सुमारे ५० ते ६० शब्द)– लोकसंपर्क, संपर्क माध्यमे या संबंधातील सर्वसामान्य माहिती व विद्यार्थ्यो निरीक्षण व अनुभव

अनुक्रम – आशय काय आहे, ते सांगणारी विषयाच्या उपविभागांची अनुक्रमाणिका.

विषय प्रवेश – विषय कसा निवडला, माहिती कशी गोळा केली, निवड, तयारी आणि लेखन या प्रत्येक टप्प्यावर कोणत्या अडचणी आल्या हे सुमार २०० शब्दांत सांगावे.

निवडलेल्या विषयावरील टिपण सुमारे १००० ते १५०० शब्दांचे असावे.

निष्कर्ष व सारांश – विषयावर आधारित काही महत्त्वाचे मुद्दे पुन्हा ठळकपणे मांडणे.

सूची – संदर्भ पुस्तकांची यादी. अन्य आवश्यक शब्दांची /संज्ञांची/घटनांची/व्यक्तींनी संपादन केल्ल्या मानसन्मांची एकत्रित यादी– मुलाखतीवर आधारित प्रकल्प किंवा – व्यक्तिरेखाटन असेल तर व्यक्तीच्या कार्याची सूची आवश्यक ठरते.

सरावासाठी प्रकल्पांचे काही विषय

१) तुमच्या शहरात प्रसिध्द झालेली दोन–तीन दैनिक वाचा. एखाद्या महत्त्वाच्या बातमीचे सादरीकरण व त्या विषयाची हाताळणी कशी केली आहे, त्याची तुलना करून, पृथक्करण करून तुमचे मत लिहा.

२) दैनिकाच्या दर्शनी पृष्ठाचे पृथ्यकरण वृत्ताची मांडणी, शीर्षकांचे प्रकार, 'टाइप्स' ची निवड याबाबतीत कोणते प्रयत्न करून या वृत्तपत्रांची मुखपृष्ठ (पहिले पान) आकर्षक केले आहे? छायाचित्रांचा उपयोग कसा करून घेतला आहे?– यासंदर्भात दोन–तीन दैनिकांची तुलना करा.

३) वृत्ताचा पाठपुरावा – प्रदीर्घ काळ दैनिकाची जागा व्यापणाऱ्या वृत्ताची निवड करा. उदा. 'काश्मीर निवडणुका' या एका वृत्तामागे किती विषयांचे व प्रश्नांचे धागेदोरे गुंतलेले आहेत, ते कात्रणांच्या आधारे लिहून तयार करा.

४) तुम्ही उपस्थित राहिलात अशा एका कार्यक्रमावर/सभेवर आधारित एक वृत्तान्त तयार करा.

५) दैनिकातील तुमच्या मताने नीटपणे लिहिलेले नाही असे एक वृत्त निवडून त्याचे संपादन करा. पुनर्लेखन हवे तर करा व शीर्षक द्या.

६) सध्या लोकांना रस वाटेल असा विषय शोधून सहकारी विद्यार्थी, शेजारी सहकारी कर्मचारी यांच्या मुलाखती घेऊन विशेषीवृत्त लिहा.

७) आकाशवाणीवर ऐकलेल्या कार्यक्रमाच्या आधारे त्या कार्यक्रमाचा वृत्तपाठ (टेक्स्ट) तयार करा. (लिखित रूपातील कार्यक्रमाचा तपशील) उदा. 'स्पॉट लाईट', 'कॉमेंटस् फॉम प्रेस', 'ध्वनिचित्र', 'वृत्त', संथगतीने दिल्या जाणाऱ्या बातम्या असे कार्यक्रम ऐकून त्यांची 'आकाशवाणी संहिता' तयार करता येईल.

८) शैक्षणिक व माहितीपर स्वरूपाच्या दूरदर्शनवरील कार्यक्रमाची संहिता तयार करा.

प्रकल्प लेखनाची आणखी काही उदाहरणे

कीर्ती महाविद्यालय, मुंबईच्या विद्यार्थ्यांनी (१९९४) पुढील काही विषयांवर प्रकल्प तयार केले होते.

१) विविध क्षेत्रातील प्रख्यात व्यक्तींची मुलाखत. उदा. उद्योग किंवा अगदी धर्मासारखेही एखादे लोकांना जिव्हाळ्याचे वाटणारे क्षेत्र घेऊन त्यातील प्रसिध्द व्यक्तीची मुलाखत.

२) 'विमेन इन् टुडेज् मिडिया' – विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती घेऊन हा प्रकल्प तयार झाला. सुसंघटित प्रकल्पाचे हे उदाहरण होय; कारण शिक्षकांचे मार्गदर्शन सर्व टप्प्यांवर झाले. तरीही विद्यार्थ्यांना त्यांचे श्रेय द्यायलाच हवे. माहिती मिळविण्यासाठी त्यांनी अपार श्रम घेतले.

३) एका फर्मच्या जनरल मॅनेजरांची मुलाखत घेतली. छायाचित्रांचा वापर केला होता. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केलेले हे व्यक्तिरेखाटन हा एक यशस्वी प्रकल्प ठरला.

४) दैनिकात व्यंगचित्रांचे स्थान दाखवून देणारा प्रकल्प – 'कार्ट्रनिस्टस् ॲन्ड देयर कार्ट्रनस्'.

५) माध्यमाच्या ग्राहकांना दिलेली प्रश्नावली. प्रश्नावलीच्या टप्प्यावरच हा प्रकल्प राहिला. माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात विद्यार्थी असमर्थ ठरले.

६) 'द इयर दॅड वॉज'– १९९३–९४ या वर्षात माध्यमांनी प्रसिध्द केलेल्या महत्त्वपूर्ण घटना एकत्रितपणे मांडणे.

*****

पाठ क्र. १८
वृत्तपत्राचा संपादक

संपूर्ण वृत्तपत्राला आधारभूत अशी व्यक्ती म्हणजे वृत्तपत्राचा संपादक, संपादकाला वगळले तर सारेच वृत्तपत्र गतप्रभ होऊन जाते. तो द्रष्टा व समाजसुधारक असतो, बुध्दिवंत व भाष्यकार असतो, उत्तमपैकी लेखक असतो व सर्वप्रथम वृत्तपत्राचा प्रमुख असतो. त्याला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात.

आज वृत्तपत्रव्यवसायाला मोठ्या उद्योगाचे स्वरूप आले आहे व म्हणून संपादकाच्या कार्यक्षेत्रातही भर पडली आहे. वृत्तपत्राचे व्यवस्थापन ही संपादकाचे सर्वप्रथम जबाबदारी असते. कुठल्याही औद्योगिक उत्पादनासाठी लागते तसेच वृत्तपत्रासाठीही पूर्वनियोजन, मनुष्यबळाचा योग्य वापर, वृत्तपत्रकार्यालयातील विविध विभागांमध्ये संयोजन व सहकार राखणे ही कामे त्याला करावी लागतात. तातडीने निर्णय घेणे, प्रसंगवधान राखणे, माणसांची पारख करून त्यांच्याकडून निर्णयाची अंमलबजावणी करणे हे व्यवस्थापनकौशल्य त्याला दाखवावे लागते. वृत्तपत्र जर एखाद्या खेळाडूंच्या चमूसारखे असते असे मानले तर संपादक हा त्या चमूचा कर्णधार असतो. चमूतील प्रत्येक व्यक्तीकडून योग्य ती कामगिरी करून घेणे कसदार संपादन करणे हे संपादकाच्या अखत्यारीतील काम असते. संपादकाचे ज्ञान, व्यासंग व दूरदृष्टी यांमुळेच त्याच्या चमूला उत्साह व प्रेरणा मिळते व वृत्तपत्र घडत जाते.

प्रत्येक वृत्तपत्राचे स्वतंत्र धोरण असते. ते धोरण राजकीय दृष्ट्या अलिप्त असो अगर एखाद्या पक्षाशी वा विचारप्रणालीशी बांधिलकी राखून असो, ते धोरण राबविण्याची जबाबदारी संपादकीय असते. वृत्तपत्राची व छपाईची संपूर्ण मालकी व्यवस्थापनाची असते. वृत्तपत्राच्या प्रत्येक आवृत्तीवर मालकाचे व संपादाकाचे नाव छापलेले असेत. उदा. 'महाराष्ट्र टाइम्स' हे वृत्तपत्र बेनेट व कोलमन व कंपनीने मुद्रित केले असून संपादक श्री. कुमार केतकर हे आहेत असे प्रत्येक आवृत्तीवर छापलेले आढळून येईल.

वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी या नात्याने वृत्तपत्राच्या प्रत्येक आवृत्तीची संपूर्ण जबाबदारी संपादकाची असते. छपाईक अथवा मुद्रणात काही दोष असल्यास त्यास संपादक जबाबदार ठरतो; तसेच कुठल्याही प्रकारचा आक्षेपार्ह मजकूर छापल्यास नाहीतर चारित्र्यहनन करणारा मजकूर छापल्यास त्याबाबतही संपादकासच जबाबदार धरले जाते. म्हणून वृत्तपत्रविषयक कायद्यांचे ज्ञान त्याला असावे लागते, व अशा प्रकारची छपाई होऊ नये ही दक्षता त्याला घ्यावी लागते. चारित्र्यहनाविषयक चालणाऱ्या सर्व खटल्यांमध्ये संपादकाची उपस्थिती न्यायालयात असणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची अश्लीलता वृत्तपत्रात येऊ नये; वृत्तपत्राची प्रतिम डागाळेल अशी अभिरुची व्यक्त होऊ नये ही काळजीही त्याला घ्यावी लागते. चांगल्या दर्जाचे लिखाण, वस्तुनिष्ठ वृत्तनिवेदन, चांगले संपादन व चांगले मुद्रितशोधन या सर्वांचा मेळ घालण्याचे अवघड काम संपादकाचे असते.

वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाने एकूण ढोबळ धोरण ठरविण्याचे त्याची अंमलबजावणी कशी करावी याचे बारकावे संपादकाने ठरवायचे असतात. कुठल्या विषयांवर अलिप्त रहावे अथवा राहू नये; किती लिहावे वा लिहू नये; कुठल्या विषयाला किती प्राधान्य द्यायचे हे ठरविण्याचे सारे अधिकार त्याला असतात, त्याप्रमाणे तो विषयानुसार वृत्तपत्राची मांडणी वृत्तसंपादकातर्फे करवून घेतो. त्याची संपादकीय दृष्टी व एकंदरीत समाजातील घडामोडीविषयींची समज व दृष्टिकोन हा त्याच्या वृत्तपत्रात प्रतिबिंबित होतो. आपल्या वृत्तपत्राची खास उद्दिष्टे व आकर्षणे कोणती असावीत हे तो ठरवतो. एखाद्या विषयावर किती खोलवर शोध व लिखाण व्हावे हेही त्याच्या निर्णयाप्रमाणे ठरते. त्यानुसार तो वृत्तसंपादकास सूचना देतो. उदा. मानवी हक्कांसारख्या एखाद्या विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन व वृत्तपत्रापाशी असणारा वेळ व जागेची उपलब्धती यांच्या संदर्भात त्या विषयावर तज्ज्ञांकडून लेख मागविणे, वेगवेगळ्या वार्ताहरांकडून प्रत्यक्ष माहिती, छायाचित्रे व आकडेवारी गोळा करवून घेणे, अमुक त्या क्रमाने सारी माहिती छापविणे, या विषयावर अेक किंवा अनेक अग्रलेख लिहिणे, विविध व्यक्तींच्या मुलाखती सातत्याने छापणे, वाचकांची मते मागविणे इ. खटाटोपानंतर तो वाचकांपुढे मानवी हक्कांची संकल्पना काय आहे व त्या हक्कांची पायमल्ली कशी होते किंवा नाही याबद्दल संपूर्ण सत्य वाचकांपुढे ठेऊन त्यांना अंतर्मुख करतो.

वाचकांना नव्या जाणीवा देणे, त्यांच्याशी मानसिक संवाद साधणे व वैचारिक प्रक्रिया चालू ठेवणे समाजप्रबोधनाचे काम वृत्तपत्राचे मुख्य उद्दिष्ट असते, किंबहुना असावे. हे उद्दिष्ट बरेचसे संपादकीय पृष्ठाकडून होत असते, खास करून अग्रलेखांतर्फे होत असते, म्हणून अग्रलेखांना आजच्या वृत्तपत्रीय जगात विशेष महत्त्व आहे. वाचकांचे विचार कुठल्या दिशेला वळवावेत हे तो आपल्या वाचकांनी मानसिकता ओळखून त्याप्रमाणे ठरवतो. या वैचारिक प्रक्रियेला पोषक अशी भाषा व शैली, तो वाचकांची एकंदर समज व प्रगल्भता लक्षात घेऊन त्यानुसार वृत्तपत्रात वापरतो. वृत्तपत्राची भाषा ही मुख्यत्वे सहजसुलभ व मार्मिक असावी, सोपेपणा व आशयघनता दोन्ही असलेली भाषा वाचकाला सरळ जाऊन भिडते. कुठला विषय गंभीरपणे हाताळावा व कुठल्या वषयावर हलकेफुलके लिखाण करावे; तसेच एकाच विषयावर प्रसंगानुरूप गंभीर वा हलकेफुलके लिहावे हे त्याला कळावे लागते. युध्दासारख्या किंवा इतर आणीबाणीच्या प्रसंगी वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हवा असेल तर वृत्तपत्राच्या भाषेला तसे वळण त्याला देता आले पाहिजे, व विषयानुरुप भाषेचे वळण बदलता आले पाहिजे. आजचे वृत्तपत्र हे सामाजिक व आर्थिक विचारप्रणालींवर, समस्यांवर टीकाटिप्पणी करीत असते तसेच त्यांचे मुल्यमापन करीत असते, व त्यातून वाचकांशी संवाद साधायचा प्रयत्न करीत असते. संपादकीय पानामधून संपादकाचे मन व उद्दिष्ट उलगडत जाते. अग्रलेख बऱ्याच वेळा उपहासात्मक, मर्मभेदक असतात, तर बऱ्याचदा विनोदाच्या झालरीखाली ते वास्तवाचे दर्शन वाचकाला घडवितात. आजचा आधुनिक समाज हा अतिशय गतिमान आहे, त्याला अखंड माहितीची गरज असते. समाजातील बदलती व्यवस्था व मूल्ये, समाज घडविणाऱ्या व्यक्ती व त्यांचे मन, बदलत्या काळो तत्त्वज्ञान व साहित्य या साऱ्या व याहूनही कितीतरी अधिक विषयां वर त्याला लिहावे लागते. अग्रलेखासाठी विषय निवडताना देखिल त्याला स्थळकाळाचे अग्रक्रम लक्षात घ्यावे लागतात. सुसंस्कृत व सुजाण वाचकवर्ग घडविणारा संपादक हा शेवटी एक व्यक्ती राहत नाही तर एक चालती बोलती संस्थाच बनतो.

बदलत्या समाचाच्या विविध घटकांच्या वाचनाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. उदा. मुंबईसारख्या महानगरीत राहणाऱ्या माणसाला आपल्या शहरात काय घडते याची पुरेशी माहिती असणे जरूरीचे असते. स्त्रिया, तरुण, मुले यांच्या गरजाही वेगवेगळ्या असतात. त्यानुसार 'बॉम्बे टाइम्स' सारखी खास पुरवणी काढणे किंवा महिलाविषयक, क्रीडाविषयक, प्रवासविषेयक, व्यवसायविषयक पुरवण्या काढणेही संपादकाला ठरवावे लागते. म्हणून त्याला भविष्यात डोकावून समाजाची निकड लक्षात घेऊन वृत्तपत्राचे स्वरूप बदलाचे लागते.

संपादक हा वृत्तपत्राचा शासकही असतो. विविधांगी लेखन संपादन करण्यासाठी त्याला चांगल्या वृत्तसंपादकाची, वार्ताहरांची उपसंपादकांची गरज असते. आपल्या हाताखालील प्रत्येक व्यक्तीचे कसब व आवड तसेच व्यक्तिमत्त्वातील बारकावे व दुबळेपणाही लक्षात घेऊन त्याला त्याप्रमाणे कामाची जबाबदारी सोपवावी लागते. तो स्वतः संपादनकलेचा उत्तम जाणकार असतो; तरीही संपादकीय विभागातील प्रत्येक बारीकसारीक गोष्टीसाठी त्याच्यापाशी वेळ असलेच असे नाही. अग्रलेखाचे कामही वेळा उपसंपादकावर वा वृत्तसंपादकवर टाकावे लागते, व तरीही त्या अग्रलेखांमध्ये काय लिहिले जाणार आहे हे त्याला ठाऊक असावे लागते.

संपादनाचे काम करता करता वेळेच्या मर्यादा सांभाळणे हे अत्यंत जिकिरीचे असते. आज वृत्तपत्राला इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांशी स्पर्धा करावी लागते आहे. या माध्यमांकडून वृत्ताचे प्रसारण फार जलदपणे होत असते. अशा वेळी वृत्तपत्राची छपाई सुरु होण्यापूर्वी जरूर ती काटछाट व बदल करून बातमी शिळेपणा घालविण्याचा प्रयत्न त्याला करावा लागतो. तसेच त्याचे त्या शिळ्या बातम्या देण्याऐवजी बातम्या अधिक सखोल माहितीसह देण्याचीही आवश्यकता त्याला भासते. उदाहरण द्यायते झाल्यास, निवडणुकांच्या वेळी वेळोवेळी इलेक्ट्रॉनिक माध्यमे माहिती सातत्याने सांगत जातात, पण वृत्तपत्राला या माहितीशी स्पर्धा करणे अशक्य असते; पण उशीराने मिळालेल्या माहितीप्रमाणे संपूण चित्र तो वाचकांपुढे ठेवू शकतो.

वाचकांच्या दृष्टीने संपादक हा समाजाचे बौध्दिक नेतृत्व करीत असतो, म्हणून चांगल्या संपादनाला, चांगल्या अग्रलेखांना व प्रबोघनात्मक लिखाणाला वाचकांचे उदंड प्रेम व सन्मान दोन्ही मिळतात. अग्रलेखासाठी सामान्यतः वाचक खास वेळ काढून ठेवतो व लक्षपूर्वक वाचतो. अग्रलेख हा बातमीसारखा भराभर डोळ्यांखालून घातल जात नाही. सतत चांगले अग्रलेख लिहिणे हे कठीण तपस्येचे, कष्टाचे फळ असते. असे म्हटले जाते की वाचक जेव्हा रात्री निद्रिस्त असतो तेव्हा संपादकाची लेखणी, मन व बुध्दी त्याच्यासाठी झटत असतात व अग्रलेख लिहून संपला की दुसऱ्या दिवशी संपादकाचे विचारांचे नवीन आवर्तन सुरु होते.

सर्व संपादकीय विभागावर संपादकाच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडलेली असते. नव्या जोमाच्या सहसंपादकांना तो एक स्फूतीस्थान असतो, व त्याचा वारसा तरूण, नवीन सहसंपादक चालवतात व शेवटी त्याच्यासारखे उत्तुंग व्यक्तिमत्व कमाव शकतात, सत्याविषयी तळमळ व सामाजिक बांधिलकीची जाणीव, बौध्दिक प्रामाणिकपणा व एकनिष्ठता या गोष्टी आदर्श संपादक आपल्या सहकाऱ्यांना स्वतःच्या आचरणाने दाखवून देऊ शकतो. त्याची मते सर्वसंमत असतीलच असे नाही, पण विरोधी मतांशी सहिष्णुता तो व नंतर त्याचे सहकारी दाखवितात. सरकार, राजकीच पक्ष वा विचारप्रणाली, उद्योगपती व त्यांच्याकडून येणारा दबाव व टीका यांना न जुमानता वाचकांसमोर सत्य घटना ठेवण्याचे धैर्य व चारित्र्य त्याच्यापाशी असावे लागते, तरच खऱ्या अर्थाने त्याचे वृत्तपत्र स्वतंत्र अस्तित्त्व जगू शकते. संपादकीय लिखाणातून कित्येक वाद उद्‌भवतात, पण त्या वादांमधून एक बौध्दिक वातावरण समाजात निर्माण होत जाते. आपल्या छोट्याशा चमूसमवेत सत्यशोधन करणारा संपादक हा सहका एकांडा शिलेदार असतो. स्वतःची मते नसणारी संपादक हा शुष्क नदीसारखा असतो असे म्हटले जाते. तसेच भरभरून मते व विचार देणारा संपादक अथांग सागराप्रमाणे असतो.

*****

पाठ क्र. १९
वृत्तसंपादक व वृत्तसंपादन

वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात उपसंपादक, वार्ताहर, मुख्य उपसंपादक, प्रमुख वार्ताहर, स्तंभलेखक मुद्रितशोधक इ. सर्वांचा समावेश होतो बातम्या लिहिणाऱ्या उपसंपादकांच्या चमूला 'कॉपी डेस्क' असे म्हटले जाते. मोठ्या वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात स्थानिक, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील बातम्या लिहिण्यासाठी स्वतंत्र डेस्क असते. या डेस्कचा प्रमुख येणाऱ्या बातम्यातून प्रत्येक उपसंपादकाला लिहिण्यासाठी वाटून देतो. या बातम्यांचे वाटप करतान प्रत्येक उपसंपादकाची आवड व शैली तो लक्षात घेतो. त्यानंतर उपसंपादक हातात आलेली मुळ बामती पुनश्च व्यवस्थित लिहून काढतो व तिला शीर्षक देतो. या बातम्या व शीर्षके मुख्य उपसंपादकाने वाचून त्यात हवे ते बदल अथवा सुधारणा केल्यानंतर त्या कंपोझिंगरूप अथवा जुळणी विभागात जळवल्या जातात. प्रत्येक बातमी जुळणीला देण्याआधी संपूर्ण, वाचनीय व अचूक झाली आहे याची खात्री केली जाते. डेस्कपाशी बातम्या लिहिल्या गेल्यानंतर त्यांचे संपादन करताना त्यातील भाषेचे व्याकरण, शब्दांची व वाक्यांची रचना, शुध्दलेखन यांकडेही लक्ष द्यावे लागते. ज्या प्रचंड वेगाने वृत्तसंस्थांकडून बातम्यांचा पुरवठा वृत्तपत्राला सतत होत असतो त्याचवेगाने मुख्य उपसंपादकाला प्रत्येक बातमीचे संपादन, योग्य ती काटछाट व पुनर्बाधणी करून शीर्षक द्यायचेही काम करावे लागते, आणि ते त्याच्या दैनंदिन कामाचेच एक अंग असते. संपदकीय विभागातील महत्त्वाची कामे पुढीलप्रमाणे आहेत.

वृत्तसंपादक :

हा संपादकाचा प्रमुख सहकारी असतो. वृत्तपत्राचे धोरण व एकंदरीत वैचरिक पाया संपादक ठरवितो व ती अमलात आणण्याचे काम वृत्तसंपादकाचे असते. वृत्तपत्राये मन, बुध्दी व विवेकदृष्टी जर संपादकाची असेल तर वृत्तपत्राचे डोळे व कान म्हणजे वृत्तसंपादक होय. सतत बातम्यांचा ओघ येत असताना कुठल्या बातम्या कुठल्या पानावर क्रमाने द्यायच्या हे तो ठरवतो. वृत्तपत्राच्या प्रत्येक आवृत्तीची 'डमी' त्याला आदल्या दिवशी बनवावी लागते. बातम्यांच्या कच्चा आराखड्याला 'डमी' संबोधले जाते. या आराखड्यात जाहिरातींकरिता ठराविक पानांवरील ठराविक जागा मोकळ्या सोडलेल्या असतात. छायाचित्रे मागविणे, व्यंगचित्रमालिका किंवा कोडी, खास वृत्तविशेष यांची जुळवाजुळव करणे, शहरी व डाक या दोन्ही आवृत्तींची तयारी करणे ही कामे वृत्तसंपादकाची असतात. भारतातील वृत्तपत्रांमध्ये वृत्तसंपदकाला याखेरीज इतर कामेही असतात, ती पुढीलप्रमाणो :

१) बातम्यांचे प्राधान्य ठरविणे, त्यांची जागा व व्याप्ती ठरविणे व वृत्तपत्राच्या आवृत्तीच्या उत्पादनाची संपूर्ण जबाबदारी घेणे.

२) वृत्तपत्राचा आराखडा (ले आऊट) मुख्य उपसंपादकाच्या सहाय्याने ठरविणे, सदरे व विशेषवृत्ते यांची निवड व मांडणी करणे.

३) वृत्तसंपादनात मदत करणे. वृत्तसंपादकाची मर्जी नसल्यास बातमी न छापण्याचे अधिकार त्याला असतात.

४) जाहिरात विभागाशी संपर्क साधून असणे, छाया चित्रकारांना त्यांचे कमिशन देणे. विभागातील कर्मचाऱ्यांचा ओव्हरटाईम, रजा, इ. बाबींकडे लक्ष देणे, संपादकीय वर्गामध्ये कामाची आखणी करून देणे, ही वृत्तसंपादकाची जबाबदारी असते.

त्यानंतर संपादकीय विभागातील एक प्रमुख व्यक्ती म्हणजे मुख्यउपसंपादक होय. वृत्तसंपादकाकडून मिळणाऱ्या सूचना तंतोतंत अंमलात आणण्याचे काम त्याला करावे लागते. त्याची कामे पुढीलप्रमाणे :

१) सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे वृत्तपत्राचे सारी पांने वेळेवर लावून झाली आहेत हे पाहणे, कारण छपाई, मुद्रितशोधन व वितरणे ही कामे अत्यंत जलद गतीने व्हावी लागतात व त्यासाठी वृत्तपत्राची पाने वेळेवर

लावून तयार असावी लागतात. रात्रपाळी करणे, यंत्रांच्या गतीने काम करणे व वेळेवर वृत्तपत्र निघते याची दक्षता घेणे हे धकाधकीचे काम असते. त्यात थोडासा विलंब झाल्यास हजारो प्रतींच्या छपाईचे काम खोळबून राहते.

२) छपाई सुबक, नितळ व जलद कशी होईल याकडे त्याला लक्ष द्यावे लागते.

३) येणाऱ्या बातम्यांचे व्यवस्थित वाटप करून आपल्या सहकारी उपसंपादकांकडून सातत्याने योग्य व दर्जेदार लिखाण करून घेणे, व प्रत्येकाच्या व्यक्तीगत क्षमतेचा व कौशल्याचा विचार करून त्यानुसार वाटप करणे हेही त्याचे महत्त्वाचे काम असते.

४) कुठल्यीही महत्त्वाची बातमी छापायची राहून जाऊ नये तसेच कुठलीही बातमी अपूर्ण अवस्थेत छापले जाऊ नये याकडे लक्ष द्यावे लागते.

५) बातम्या लिहिल्या गेल्यानंतर त्यांमध्ये जर शुध्दलेखन व व्याकरणाच्या चुका झाल्या असतील तर त्या दुरूस्त करणे फार आवश्यक असते. बातम्यांचे उगीच लांबण लावले जाऊ नये, बातम्यांची भाषा सुसंस्कृत व सुबोध असावी, भाषेत कुठल्याही प्रकारची हीनता वा अश्लीलता येऊ नये, कुणाचेही चारित्र्यहनन होऊ देऊ नये, याबाबतीतली दक्षता मुख्य उपसंपादकाला घ्यावी लागते.

६) कुठल्या पानावर कुठली बातमी द्यायची, त्यांचा क्रम कोणता असाव त्यांच्यासाठी कुठल्या आकाराचा ब्लॉक वापरावा हे तोच ठरवतो. पाने पूर्ण लावून छपाईस सुरवात झाली की त्याची जबाबदारी संपते.

वृत्तपत्रीय जगात घडद्याआड राहून काम करणारी व प्रकाशझोतामध्ये न येणारी व्यक्ती म्हणजे वृत्तपत्राचा सहसंपादक होय. अनामिक राहून प्रसिध्दीचे वलय नसूनही बहुमोल असे कार्य तो करीत असतो. वृत्तपत्र वाचकाशी बोलते त्याच्याच लेखणीतून चांगला सहसंपादक बनण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत.

१) वृत्ताचा वेध त्याला घेता आला पाहिजे. टेलिप्रिंटवर येणाऱ्या 'कच्च्या माला' तून सफाईदारपणे 'बातमी' पकडून तिचे बातमीपण शब्दात पकडता आले पाहिजे. बातमी ही 'बांधायची' असते व ती बांधताना मूळ गाभ्याचा विपर्यास होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

२) बातमीचा समतोल राखण्याचे कौशल्या त्याच्याकडे असले पाहिजे.

३) कुठल्याही प्रकारचा अतिरंजितपणा येऊ न देता, काल्पनिक कथन न होऊ देता अचूक बातमी लिहिता आली पाहिजे.

४) सहसंपादकाला भरपूर वाचन व इतर माहिती, तसेच मनाची सर्वसाधारण प्रगल्भता असणे आवश्यक तसेच वाचकांची मनोवृत्ती त्याला माहित असणेही आवश्यक आहे. आपली स्वतःची मते व भावना बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ वृत्तीने त्याला बातमी लिहिता आली पाहिजे.

५) वृत्तपत्रलिखाण व विशेषतः चारित्र्यहनासारख्या आरोपांविषयींचे कायदे त्याला माहित असले पाहिजेत, वृत्तपत्रीय लिखाणच्या जबाबदाऱ्या त्याला समजल्या पाहिजेत. आपल्या लेखनाचा चांगला तसाच विपरीत परिणाम वाचकांच्या मनावर होत असतो हे त्याने समजून असले पाहिजे.

६) आपल्या इतर सहकारी सुसंपादकांबरोबर सहकार्य करून त्याला काम करण्याची जाणीव असली पाहिजे.

७) सर्वात शेवटी व महत्त्वाचे म्हणजे सतत लिहिण्याची व न कंटाळता वृत्तलेखनाचा दर्जा सतत सुधारत राहण्याची त्याची वृत्ती असावयास हवी.

उपसंपादकाची कामे :

१) बातमी अचूक लिहिणे व योग्य तो अर्थ लावून लिहिणे.

२) लिखाणातल्या चुका दुरूस्त करणे – मग त्या शैलीच्या, व्याकरणाच्या वा कसल्याही असोत. त्यात वापरली जाणारी विशेषणे तारखा स्थळे व आकडे तसेच नावे व पत्ते या साऱ्या गोष्टी अचूकपणे लिहिणे.

३) बातम्यातील अनावश्यक भाग गाळून शाब्दिक अवडंबर न माजवता त्या छोट्या, सोप्या बनविणे.

४) वादग्रस्त विधाने टाळणे, अश्लीलता टाळणे तसेच पुराव्याशिवाय विधाने टाळणे.

५) चारित्र्यहनन होईल असे लिखाण टाळणे.

६) बातम्यांच्या नावाखाली प्रचार होणार नाही याची दक्षता घेणे.
७) संदिग्ध किंवा जी विधाने द्व्यर्थी ठरतील अशी विधाने टाळणे.
८) अपघात, खून इ. सनसनाटी घटना लिहितांना त्यातील बीभत्सता अुघडपणे लिहिली जाणार नाही ही दक्षता होणे. बातम्यांच्या संदर्भात येणाऱ्या व्यक्तींच्या व्यक्तिगत जीवनातील खाजगी बाबी उगाच उघडपणे न लिहीणे.
९) पुनरावृत्ती किंवा शिळेपणा टाळणे.
१०) वृत्तपत्राचे धोरण लक्षात ठेवणे तसेच वृत्तपत्र व्यवसायाचे एकंदरीत भान ठेवणे, व वस्तुनिष्ठ लिखाण करणे.
११) योग्य ते संदर्भ व बातमीचे स्त्रोत कोणते ते नमूद करणे अनामिक राहू इच्छिणाऱ्यांचे नाव प्रकट न करणे.
१२) वाचकांचे स्वारस्य व हित लक्षात घेणे व त्याबरोबरच एक चांगली अभिरुची निर्माण करण्याचा प्रयत्न करीत राहणे.

एवढी सगळी जबाबदारी सांभाळणार उपसंपादक हाच वृत्तपत्राचा खरा आधार असतो.

*****

पाठ क्र. २०
वृत्तसंपादनातील सृजनशीलता

वृत्तपत्राचे संपादन हे यांत्रिकपणे होत नसते, त्यासाठी सृजनशीलतेची नव्या कल्पनांची व प्रयोगशीलतेची आवश्यकता असते. वृत्तपत्रीय लिखाणात व एकंदर प्रस्तुतीमध्ये तोचतोपणा आला तर त्याचा वाचकांवर प्रभाव न पडता उलट ते वृत्तपत्र कंटाळवाणे, जुनाट शैलीचे वाटू लागते. आजे कुठल्याही वृत्तपत्राकडे पाहिल्यास विविध तन्हेचा मजकूर, विषयानुरूप पुरवण्या, रंगीत छायाचित्रे इ. गोष्टींच्या सहाय्याने विविध प्रकारची मांडणी व सजावट केलेली आढळते व ही मांडणी कालानुसार बदलत जाते व अधिकाधिक आकर्षक बनविली जाते. वृत्तपत्राचे जे नवे उन्मेष आपल्याला दिसतात त्यांमागे संपूर्ण संपादकीय विभाग व छपाई यंत्रणा राबत असते. वृत्तसंपादकाची कल्पकता, वृत्तपत्र व्यवसायातील नवी आव्हाने व स्पर्धा यांना तोंड देण्यासाठी पणास लागते. म्हणून संपादकीय विभगाला सृजनशीलतेची जबाबदारीही पार पाडावी लागते, ती जबाबदारी खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) रोजच्या बातम्या अधिकधिक सुबोध व आकर्षक रीतीने मांडल्या जाव्यात, वाचनीय व्हाव्यात याकडे संपादकीय चमूला लक्ष द्यावे लागते. पानांचा ले आऊट, कृष्णधवल जागांचे प्रमाण, विषयांवर आधारित संबंधित बातम्यांची विशिष्ट पानांवर जुळणी इ. बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

२) वृत्तपत्राची भाषा काळाप्रमाणे, वाचकाच्या गरजेप्रमाणे व कुवतीप्रमाणे बदलावी लागते. आजच्या वृत्तपत्रांमध्ये अलंकारिक भाषेला फारसे प्राधान्य नाही. सहजपणे अर्थ वाचकांपर्यंत असा तऱ्हेचे बातम्यांचे लिखाण होत. भाषेची क्लिष्टता असेलच तर ती काढून टाकून सरलता आणली जाते. वाचकांपाशी अंसलेला नियमिता वेळ लक्षात घेता भराभर वाचून संपूर्ण बातमी समजेल अशा प्रकारे बातमीचे लेखन व्हावयास हवे. शब्दबंबाळ भाषेमुळे वाचक अडखळतो.

३) जर बातम्यांमध्ये वैचारिक गहनता असेल तर तिचे सुलभीकरण करणे आवश्यक असते. सर्वसाधारण वाचक हा विद्वान पंडित नसून मर्यादित विद्वत्तेचा माणूस आहे हे समजूनच अवघड संकल्पना व विचार सोपे करून लिहावे लागतात. अर्थात् साहित्यिक मूल्य जर बातमीला असेल तर त्या बातमीला एक वेगळे सौंदर्य प्राप्त होते, पण त्या सौंदर्याकरिता शब्दांचे पांडित्य दाखविले तर ती बातमी पूर्ण समजली जाईलच असे नाही, याचे भान ठेवावे लागते. साध्या भाषेतील वृत्तकथनही प्रेक्षकांच्या हृदयास भिडू शकते, कारण त्या वृत्तातले सत्य हे भेदक असू शकते. बातम्यांप्रमाणेच विशेषवृत्ते, सदरे यांचे संपादन वाचकाची अभिरूचि, व गरज लक्षात घेऊनच करावे लागते.

४) आवश्यकता असेल तर बातमीचा 'टोन' बदलावा लागतो. उदा. एखाद्या व्यक्तीस जर एखादा सन्माननीय किताब बहाल करण्यात आल असेल तर त्या बातमीत त्या व्यक्तीवर रोख ठेऊन वृत्तकथन करावे लागेल. व्यत्कीनुरूप व प्रसंगानुरूप बातमीची रोक बदलत रहावा लागतो.

५) संपादकीय विभागांला बातम्यांना व छायाचित्रांना शीर्षक व कॅप्शन्स देण्याचेही काम करावे लागते. दरवर्षी मुंबईत मुसळधार पावसाने उडाविलेल्या हाहाःकाराची क्षणचित्रे काव्यात्मक वा अर्थपूर्ण शीर्षकांनी सजलेली आपण पाहतो. शीर्षक लिहिताना शाब्दिक कसरत करावी लागते व तेथे उपसंपादकाच्या सृजशीलतेला थोडक्या जागेत परिणामकारक शीर्षके वा मथळे लिहिण्याचे आव्हान असते.

६) वृत्तपत्राची 'डमी' बनविताना अुपलब्ध जागेच जास्तीत उपयोग व्हावा पण वृत्तपत्र बोजड वाटू नये अशा रीतीने छपाई व्हावी हेही सृजनशीलतेला आव्हानात्मक ठरते. अक्षरांचे वळण, ब्लॉक अथवा आकार, बातम्यांची रचना व एकंदरीत वृत्तपत्राचे रूप देखणे कसे होईल याचा वृत्तसंपादकाला विचार करावा लागतो.

संपादकीय विभागाला या व्यक्तिरिक्त काही व्यवस्थापकीय जबाबदाऱ्याही असतात, कारण वृत्तपत्र घडवणे हा एक व्यापारी उद्योग आज बनला आहे. संपादकीय डेस्कच्या व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) संपादित केलेला सारा मजकूर जुळणीसाठी जुळाऱ्यांकडे (कंपोझिटर्स) पाठवावा लागतो. जुळणीबाबत महत्त्वाच्या सूचना देणे व वारंवार लक्ष देत राहणे ही एक जबाबदारी असते.

२) वृत्तपत्रातील जागा वाया जाऊ नये म्हणून दक्षता घ्यावी लागते. जास्तीत जास्त मजकूर देणे तसेच त्या मजकुरामध्ये माहिती, ज्ञान व मनोंरजन यांचा समतोल राखणे हीही एक जबाबदारी असते.

३) मोकळी जागा शिल्लक राहिल्यास ती भरून काढण्यासाठी छोट्या बातम्या तयार ठेवाव्या लागतात त्यांना 'फिलर्स' किंवा 'बच्चा' असे म्हणतात. कुठल्याही वृत्तपत्रात सुटसुटीतपणे बसतील अशा 'फिलर्स' नेहमी तयार ठेवाव्या लागतात व या बातम्या अशा असतात की त्या थोड्या उशीरा दिल्या गेल्या तरी त्यामुळे फारसा फरक पडत नाही.

थोडक्यात सांगायचे तर बातमी देण्यामागील धोरण ठराविण्यापासून बातमीची मांडणी व अचूकता व तिच्या भाषेतील 'अपील' या सर्वच गोष्टी हाताळताना संपादकीय विभागाला सृजनशीलता दाखवावी लागते.

कच्च्या मालातून पक्क्या मालाचे उत्पादन व्हावे तसे टेलिप्रिंटरमधून येणाऱ्या कच्च्या बातमीतून शेवटी संपूर्ण बातमी तयार होईपर्यंत बऱ्याच गोष्टी घडत असतात. बातमी कशी 'बांधावी' याविषयी काही गोष्टी संपादकीय विभागाने लक्षात ठेवणे जरूरीचे असते. प्रत्यक्ष घडलेली घटना जेव्हा उपसंपादकाच्या लेखणीतून बातमीचे रूपधारण करून येते तेव्हा तिच्यावर त्याच्याकडून बरेच संस्कार झालेले असतात. ते खालीलप्रमणे होत.

१) मुरबी उपसंपादकाकडून वार्ताहराला बरेच काही शिकता येते. चांगला, महत्त्वाकांक्षी वार्ताहर वृत्तकथनाची कला व कसब संपादकीय डेस्कपाशी शिकतो. त्याने लिहिलेल्या मूळ वृत्तांतामध्ये (न्यूज रिपोर्ट) काटछाट का केली गेली, शब्दरचना व वाक्यरचना का बदलली गेली, परिच्छेदांची पुनश्च घडण का झाली हे लक्षात घेतल्यास त्याला आपल्या लेखनशैलीमध्ये योग्य ती सुधारणा करून ती प्रभावी बनवण्याच कसब साधता येते. अशा रीतीने प्रभावी पत्रकाराचा संपादक हा गुरू बनतो, व त्याचे यश हे पर्यायाने संपादकाचे शिष्यत्व पत्करल्याने मिळालेले यश असते.

२) अुपसंपादकला अतिशय विविध असा पटनांचे वृत्त लिहावे लगते. युध्दापासून दंगलीपर्यंत, अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांबाबतीत अचूक वृत्त देणे ही एक मोठीच जबाबदारी असते. लक्षावधी वाचकांची मने आपल्या लेखणीशी जुळलेली आहेत याचे भान त्याला असते, व त्याप्रमाणे त्याच्या वृत्तलेखनाच्या संस्कार होतात.

३) वृत्तलेखनाच्या नियमांविषयीचे शिस्तशीर पालन करणारे मन उपसंपादकापाशी असते. भाषेचा डौल सांभाळत असता लेखनातील तांत्रिक बाजूकडे दुर्लक्ष होऊन चालत नाही. या तांत्रिक खबरदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत.
   - वृत्तातील परिच्छेद स्पष्टपणे दिसले पाहिजेत.
   - ओळीच्या अखेरीस शब्द अर्धा लिहून तो पुढील ओळीत पुरा करू नये.
   - वृत्तातील वाक्ये व परिच्छेद एका पानावरून दुसऱ्या पानावर चालू ठेवू नयेत; शक्यतो ते त्याच पानावर संपवावेत. जर तसे करणे शक्य नसेल तर खुणांनी ती ओळ वा वाक्य पुढल्या पानावर चालू राहिल्याचे दाखवावे.
   - वृत्त संपेल तेव्हा पर्णविराम दिला गेला पाहिजे.
   - काही मजकूर वगळलेला असल्यास तो कंसात टाकून वगळाल्याचे दाखवावे.
   - शब्दांचे विशेषतः नावांचे स्पेलिंग बरोबर आहे हे तपासून पाहावयास हवे.

४) वरील तांत्रिक बाबी महत्त्वाच्या आहेत. त्याखेरीज भाषेमध्ये अगडबंब शब्द व वाक्प्रचार टाळणे, अचूकपणा व सुलभता आणणे, थोडक्यात पण स्पष्ट लिहिणे हेही आवश्यकच आहे. वृत्तलेखन हे नीरस वा कंटाळवाणे नसते, तसेच फार सृजनशीलही नसते.

प्रत्येक वृत्तपत्राच्या, कार्यालयात शैलीपुस्तिका अथवा 'स्टाईलबुक' आढळून येते. बहुतेक सारी वृत्तपत्रे शैलीचे समान व सर्वसाधारण नियम पाळतात. शैलीचे कुठेतरी एक समान तत्त्व असावे लागते व ते पाळले गेले नाहीतर नित्य नव्या शैलीमुळे वाचकला अडथळाच होण्याचा संभव असतो. या शैली त छपाईबद्दलचे, ब्लॉक व त्यांचा आकार इ. बद्दलचे किंवा कुठली बारकावे कसे द्यावेत याबद्दलचे सर्वसाधारण नियम असतात. उदा. 'एक रुपया' हा प्रयोग 'रु. एक' असा न लिहिता 'एक रूपया' असेच लिहितात. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग हे ब्रिटिश असावे की अमेरिकन, वृत्तामधील

व्यक्तींची, त्यांच्या पदांची नावे कशा प्रकारे लिहिली जावीत हे शैलीपुस्तिका सांगते. हे नियम पाळले गेले नाहीत तर वृत्तपत्राला एक शिस्तबध्द रूप दिसते ते असणार नाही, व वाचकाच्या मनावर त्याचा प्रभाव पडणार नाही.

बातमी अथवा लिहिलेले वृत्त हे वाचावेसे वाटले पाहिजे, त्याविषयी उत्सुकता व स्वारस्य निर्माण झाले पाहिजे. वृत्तपत्राला लोकांचा अथवा समूहाचा शाळामास्तर म्हटले जाते. सामान्य वाचकाची समजण्याची व वाचण्याची कुवत लक्षात घेऊन त्याप्रमाणे वृत्तपत्र त्याला 'शिकवीत' जाते. बातमीची वाचनीयता खालील गोष्टींवर अवलंबून असते :

१) साधू व सोपी शैली वापरणे आवश्यक आहे.

२) वापरात नसलेल किंवा फार मोठे शब्द टाळून त्याऐवजी छोटे सुटसुटीत शब्द वापरावेत. विशेषतः नव्या कल्पना व विचार लिहिताना मूळ इंग्रजी शब्दांएवजी संस्कृतप्रचुर व अवघड शब्द योजले जातात. त्याऐवजी काही वेळा मूळ इंग्रजी किंवा मराठी पर्यायी छोटे शब्द शोधून वापरायला हवेत, नाहीतर वृत्तपत्र व वाचक यांच्यात एक मानसिक दुरावा तयार होऊ शकतो. मोठमोठे जोडशब्द अथवा अलंकारिक शब्दही टाळावेत.

शब्दांप्रमाण वाक्येही छोटीच असावीत. एकच लांबच्या लांब गुंतागुंतीचे वाक्य लिहिण्या ऐवजी दोनतीन लहान व सुटी वाक्ये लिहिली तर ती जास्त सहजपणे वाचली व समजली जातात. मोठी वाक्ये तोडून छोटी वाक्ये तायर करणे, प्रदीर्घ असे परिच्छेद तोडून छोटेछोटे बरेच परिच्छेद देणे यासारख्या पध्दतीने वाचन सुलभ होते. पण ही काटछाट करताना अर्थाची दुर्बोधता येऊ नये ही काळची घ्यावयास हवी. नको असलेली विशेषणे, पुनरावृत्ती टाळून थोडक्या जागेत माहिती व्यवस्थित दिली गेली पाहिजे. तसेच बातमीचा आकार कमी करताना तिचे बातमीपण व महत्त्व जाणार नाही याकडेही लक्ष द्यावयास हवे.

आजचा चांगला सहसंपादक हा उद्याचा संपादक असतो. म्हणून त्याच्याबरोबरीने काम करणाऱ्या वार्ताहराला त्याच्या सृजनशीलतेचा प्रत्यय येत राहतो.

*****

नमुना प्रश्नपत्रिका क्र. १

एकूण गुण १००
वेळ ३ तास

सूचनाः- (१) प्रश्न क्रंमाक १ अनिवार्य आहे. क्रमांक २ ते ६ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. पुढे दिलेल्या कोणत्याही एका प्रकल्पावर (प्रोजेक्ट) आधारित एक विस्तृत टिपण तयार कराः-
   (अ) एखादी घटना कालक्रमानुसार लिहा; 'इनव्हर्टेड पिर्रेमिड' पध्दतीने तिचे पुनलेखन करा.
   (ब) प्रख्यात व्यक्तीचे व्यक्तिरेखाटन तयार करा. (प्रोफाइल)
   (क) स्कूप (खास वृत्त)-अलीकडे दैनिकात आलेल्या खास बातमीवर आधारित.
   (ड) तुमच्या आवडीच्या विषयावर साप्ताहिकासाठी एक मुखपृष्ठकथा तयार करा.

२. न्याय, वस्तुनिष्ठता आणि खात्रीपूर्वकता या घटकांना आजच्या भारतीय पत्रकारितेत कितपण महत्त्वाचे स्थान आहे, ते स्पष्ट करा.

किंवा

२. भारतीय पत्रकारांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कोणत्या आहेत. ते स्पष्ट करा.

३. 'वृत्त' म्हणजे काय? वृत्तनिवड कोणत्या तत्त्वाचा आधारे केली जाते?

किंवा

३. वार्तासंकलनाचे प्रकार कोणते? अन्वेषणात्मक वृत्तलेखनात पत्रकाराची कोणती जबाबदारी असते?

४. वृत्तसंपादकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कोणत्या असतात?

किंवा

४. मुख्य उपसंपादकाची सृजनशील आणि व्यवस्थापकाय अशी कोणती कर्तव्ये असतात?

५. दैनिकाच्या संपादकीय पृष्ठावर लेखनाचे कोणते प्रकार असतात?

किंवा

५. निखळ वृत्ता हून 'विशेषवृत्त' कोणत्या बाबतीत वेगळे असते? 'विशेषवृत्तांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

६. कोणत्याही दोहोवर टिपा लिहा.
   (अ) इ.स. १९४७ पूर्वीची भारतीय पत्रसृष्टी
   (ब) संदर्भ विभागाचे महत्त्व.
   (क) विदेशी वृत्तसंस्था
   (ड) एकाच वेळी अनेक ठिकाणांहून प्रसिध्द होणारी दैनिके.

नमुना प्रश्नपत्रिका क्र. २

एकूण गुण १००
वेळ ३ तास

सूचनाः- (१) प्रश्न क्रंमाक १ अनिवार्य आहे.क्रमांक २ ते ६ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. पुढे दिलेल्या कोणत्याही एका प्रकल्पावर (प्रोजेक्ट) आधारित एक विस्तृत टिपण तयार कराः-
   (अ) तुम्हाला स्वारस्थ वाटेल अशा कोणत्याही अलीकडच्या वृत्तावर आधारित एक विशेषवृत्त लिहा उदाहरणार्थ मुंबईतील झोपडट्टीवासीयांना मोफत घरे' या सारखी एखादी योजना; मुलाखतीच्या पध्दतीचे विशेषवृत्तही लिहायला हरकत नाही.
   (ब) राष्ट्रीय दैनिकामधून प्रसिध्द झालेल्या अलीकडील एखाद्या खास वृत्तावर (स्फूप) आधारित टिपण.
   (क) अत्यावश्यक वस्तूंच्य किंमतीत वाढ झाल्यामुळे लोकांच्या होणाऱ्या प्रतिक्रियांवर आधारित एक लेख तयार करा.
   (ड) एखाद्या प्रख्यात व्यक्तीचे व्यक्तिरेखाटन (प्रोफाइल)
२. पत्रकारितेच्या नीतिमत्तेची प्रमुख तत्त्वे कोणती आहेत? भारतीय पत्रकारिता या तत्त्वांची कितपत बूज राखते?

किंवा

२. वृत्तपत्रे आणि सरकार यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा. भारताच्या संदर्भात उत्तर लिहा.
३. वृत्तपत्राच्या खपावर परिणाम करणाऱ्या घटकांची चर्चा करा.

किंवा

३. वृत्तपत्राच्या विविध विभागांची कार्ये स्पष्ट करा.
४. एखाद्या घटनेचे वृत्तमूल्य कोणत्या घटकांच्या आधारे ठरते. ते स्पष्ट करा.

किंवा

४. रायकीय पक्षाने तुमच्या शहरात आयोजित केलेल्या मेळाव्याचा वृत्ताना तयार करा.
५. उपसंपादकाचे कार्य काय असते, या विषयावर एक टिपण लिहा.

किंवा

५. 'वृत्तपत्रात मजकुरा इतकेच पृष्ठमांडणीला महत्त्व असते.' स्पष्ट करा.
६. कोणत्याही दोहोवर टिपा लिहा.
   (अ) प्रशिक्षणार्थी पत्रकार
   (ब) वर्ग, व्यापार आणि व्यवसाय विषयक नियतकालिके
   (क) राजा राममोहन रॉय
   (ड) चित्रपटरीक्षणे
   (इ) 'शैली पुस्तिका'

नमुना प्रश्नपत्रिका क्र. ३

एकूण गुण १००
वेळ ३ तास

सूचनाः- (१) प्रश्न क्रमांक १ अनिवार्य आहे.क्रमांक २ ते ६ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. पुढे दिलेल्या कोणत्याही एका प्रकल्पावर (project) आधारित एक विस्तृत टिपण तयार कराः-
   (अ) दैनिकातील एका बातमीवर आधारित वृत्त-पृथक्करण
   (ब) चर्चेचा विषय असलेल्या एखाद्या व्यक्तीची वा राजकीय पुढाऱ्याची मुलाखत
   (क) सिनेनट वा खेळाडूची व्यक्तिगत माहिती (profile)
   (ड) अलीकडे वृत्तपत्रात तुम्ही वाचलेल्या एखाद्या खास वृत्ताच्या आधारे एक टिपण तयार करा.

२. स्वांतत्र्य आणि जबाबदारी ही पत्रकारितेची प्रमुख मार्गदर्शक तत्त्वे आहेत - या विधानचा यथार्थता पारखा.

किंवा

२. आधुनिक भारतीय पत्रकारितेतील प्रमुक प्रवाहांची चर्चा करा.

३. 'वार्ताहर हे वृत्तपत्राचे नेत्र आणि कान होत' चर्चा करा.

किंवा

३. आपल्या न्याय्य मागणय मांडण्यासाठी माध्यमिक शिक्षकांनी चालविलेल्या आंदोलनावर आधारित एक वृत्तान्त लिहा.

४. आघाडीवर असलेल्या राष्ट्रीय दैनिकाच्या संपादन विभागाची कार्ये स्पष्ट करा.

किंवा

४. उपसंपादकाची सृजनशीलतेला वाव असलेली आणि व्यवस्थापनविषयक कार्ये सांगा.

५. 'विशेषवृत्त' म्हणजे काय? त्यांचे प्रमुख प्रकार सोदाहरण सांगा.

किंवा

५. भारतातील निवडणुकांच्या बदललेल्या वातावरणावर आधारित एक विशेषवृत्त लिहाः

६. कोणत्याही दोन विषयांवर टिपा लिह-
   (अ) स्वातंत्र्य-लढा आणि भारतीय पत्रसृष्टी
   (ब) भारतातील वृत्तपत्रमंडळांची कार्ये
   (क) संदर्भ विभागातील छायाचित्रांचा उपविभाग
   (ड) आघाडीवर असलेल्या दैनिकांची योजलेली जाहिरात प्रदर्शनाची तंत्रे.

List of books for further reading:

1. The Professional journalist, 4 ed. 1976.
   -Hohenberg
2. News Reporting and Editing
   -K. M. Shrivastave
   Sterling Publishers, Newe Delhi, 1987.
3. News writing -Hough 4th ed., 1991
4. Into The Newsroom
   -Leanard Ray Teel
   -Ron Taylor
   Prentice-Hall of India, New Delhi, 1985.
5. Reporting-Charley, M.V.
6. Mass Communication in India-K.J. Kumar
7. The journalists hand book, 1988
   -M V Kamath
8. Professional joumalism 1980-M. V. Kamathe
9. Communication and Social
   dev.in India-B.Kuppuswamy
10. Press at the cross roads in india, 1988-
    S.K.Aggarwal UDH, Delhi

(१)	पत्रकार व्हयचंय!	प्रबोधन प्रकाशन, मुंबई.
(२)	वार्तासंकलन	चंद्रकांत ताम्हाणे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
(३)	बहुबनसमाच संज्ञापन	१९८३ अरविंद वझे
(४)	पत्रकारितेची मूलतत्त्वे	प्रभाकर पाध्ये अनुवाद- प्र. ना. परांजपे, १९९१
(५)	वृत्तपत्र व्यवसाय	काल आणि आज, १९८६ सुधाकर पवार
(६)	वृत्तसाधनः	द्वा.भ.कर्णिक, १९७३